म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
सं. क्र. ६४०
REFBK-0024781
REFBK-0024781

—: पर्यटनावरील एक संग्राह्य ग्रंथ :—

# प्रवासी मित्र

REFBK-0024781
REFBK-0024781

...यण ऊर्फ प्रमोद चितारी
(जी. डी. आर्ट; ए. एम्.)

मुखपृष्ठ :
श्री. परशुराम नाबर
(जी. डी. आर्ट; ए. एम्.)

छायाचित्रे व मलपृष्ठ :
श्री. नारायण ऊर्फ प्रमोद चितारी,
जी. डी. आर्ट; सी.टी.सी.; ए.एम्.


– प्रथमावृत्ती –
१५ ऑक्टोबर, (मंगळवार) १९८५.

मूल्य ६० रुपये.

श्री. सुरेश जगताप, जनसेवा
१९२, शुक्रवार पेठ, पुणे

– प्रकाशक –
चितारी ट्रॅव्हल्स.
भाईंदर पूर्व. जि. ठाणे.
किंवा
चितारी ट्रॅव्हल्स, कबुतरखान्यासमोर,
जैनमंदिरशेजारी दादर. मुंबई ४०० ०२८.

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.



**कै. श्री. रा. द. चितारी**

(राज छायाचित्रकार)

इ. स. १९४२ मध्ये ३६ देशांचा प्रवास करून आमच्या घराण्यात पर्यटनाची मुहूर्तमेढ रोवली त्या माझ्या आजोबांना नम्रपणे अर्पण.



# लेखकाचे मनोगत

**श्री. नारायण ऊर्फ प्रमोद चितारी**

पर्यटनाचा अनुभव दीर्घ असला तरी पर्यटनावरील लेखनाचा हा माझा पहिलाच अनुभव. हे लेखन सादर करताना मनात आंबट-गोड संमिश्र भावना आहेत. अनुभवाचे बोल वाचकांना गोड वाटतील तर कोठे सखोलता संपून उथळपणा आला तर तोंड आंबट होईल यात शंका नाही. शेवटी काय सर्व वाचकांनीच सांभाळून घ्यायचे असते.

पर्यटनावरील सविस्तर माहितीपूर्ण वाङमय मराठीत फारसे उपलब्ध नसल्याने पर्यटनाला चालना देण्याच्या हेतूने व एकट्याला अथवा कुटुंबाला बिनदिक्कतपणे स्वतंत्ररित्या अनुभवी माणसापेक्षाही उत्तम प्रवास करता यावा या उद्देशाने पर्यटनावरील विषयाचा हा प्रपंच मांडला आहे. कोणत्याही लेखकाला, वाचकांना फसवता येत नाही. वाचक केवळ कागद चाळीत नाहीत. हंसक्षीर नजरेने पाहणारे वाचक तर शब्दाशब्दाला थांबतात. शब्द-भावना यांचा अनुभूतीतून रसस्वाद घेतात व नंतरच पुढच्या वाक्याकडे प्रयाण होते. ही जाणीव ठेऊनच लेखनास सुरुवात केली आहे.

संपूर्ण भारतदर्शन पाच ग्रांथांत प्रसिद्ध करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगलेली आहे. त्यातील हे पहिले पुष्प वाचकांच्या रुपेरी तबकात ठेवताना माझे मन प्रमुदित झालेले आहे.

पर्यटनाविषयी कुतूहल माझ्यामनात किशोर वयात 'औंध' या जन्मभूमितच निर्माण झाले होते. संस्थानात कुरोली या ग्रामीण भागातच सहलिच्या शिस्तीचे प्राथमिक पाठ शिक्षकांकडून मनात ठसवले गेले होते. यांत वंशपरंपरागत आलेल्या गुणांचाही फार मोठा वाटा आहे. माझ्या आजोबांनी पंचवीस वेळा भारताचा व १९४२ च्या सुमारास ३६ देशांचा दीर्घ प्रवास केला. त्यांच्या दिनचर्येच्या पानांचे पारायण करून मी तृप्त झालो होतो. येथेच माझ्या मनात खूप खूप

प्रवास करण्याचे बीज पेरले गेले. या बीजातूनच लेखन प्रांगणात अवतरलेला पहिला अंकूर म्हणजे "प्रवासी मित्र" हे माझे पुस्तक होय. मी पहिल्या पुस्तकास अंकूर म्हटले कारण बहरणारा वृक्ष अजून फोफवायचा आहे. आपला अखंड प्रतिसादच हे काम पूर्ण करू शकेल.

मुंबईत आल्यावर पर्यटनाच्या आवडीचे रूपांतर पर्यटन व्यवसायात करण्याचे नवीन धाडस मनात अकारू लागले. या माझ्या महत्त्वाकांक्षेमुळेच "चितारी ट्रॅव्हल्स" ही लोकप्रिय व लोकमान्य पर्यटन संस्था उदयास आली. या कंपनीतून प्रवास करताना आलेल्या अनुभवांचे सार या पुस्तकात समाविष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

हा पहिला खंड प्रसिद्ध करताना विशेषत: खालील स्नेहांकितांचा ऋणनिर्देश टाळला तर तो कृतघ्नपणा ठरेल.

प्रवासाची आवड व सूक्ष्म निरीक्षण शक्ती या गुणांमुळे पर्यटनावरील पुस्तक प्रसिद्ध करण्यास व्यासंगी मार्गदर्शन लाभले ते माझे प्रिय मित्र प्रिन्सिपॉल श्री. रमेश जोशी त्याचे. यांची श्रेष्ठ अजोड कामगिरी शब्दांनी व्यक्त करणे निश्चित कठीण आहे.

लेखन सामुग्रीचे नियोजन, पुनर्लेखन, संदर्भ पुरविणे, पर्यटनावरील महत्त्वाच्या गोष्टींचे टिपण करून घेणे तसेच पुस्तकाची कल्पना मनात आकारू लागल्यापासून पुस्तक परिपूर्ण होईपर्यंतची सर्वस्वी जबाबदारी संभाळणारी पर्यटन व्यवसायातील माझी साहाय्यिका कु. भारती कालेकर हिने उचललेली कामगिरी अद्वितीयच आहे.

श्री. रामभाऊ देशमुख यांनी प्रत्येक प्रवासात मला सावलीसारखी साथ दिली त्यांच्या प्रोत्साहनाशिवाय पर्यटनावरील हा ग्रंथ प्रसिद्ध करणे अशक्यच होते.

पर्यटकांनी ही प्रवास शिदोरी गोड करून घ्यावी व आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात. हीच नम्र विनंती.

० ० ०

# अनुक्रमणिका

## भाग १ ला

### (संपूर्ण काश्मिर)


| | पान नंबर |
|---|---|
| १) पर्यटन | १ |
| २) काश्मिर | २९ |
| ३) जम्मू | ४७ |
| ४) वैष्णोदेवी | ६१ |
| ५) श्रीनगर | ७१ |
| ६) पहलगाम | ९९ |
| ७) अमरनाथ | ११० |
| ८) सोनमर्ग | ११५ |
| ९) लेह–लडाख | १२१ |
| १०) गुलमर्ग | १२९ |
| ११) काश्मिर सहलीची आखणी. | १३४ |


## भाग २ रा

### (उत्तर भारत)


| | |
|---|---|
| १) दिल्ली | १३९ |
| २) आग्रा | १६७ |
| ३) फत्तेपूर सिक्री | १८७ |
| ४) मथुरा | १९५ |
| ५) हरिद्वार | २०१ |
| ६) ऋषिकेश | २११ |
| ७) डेहराडून | २१५ |
| ८) मसूरी | २१९ |
| ९) चंदिगढ | २२५ |
| १०) सिमला | २३५ |
| ११) अमृतसर | २४३ |
| १२) उत्तर भारत सहलिची आखणी | २४८ |
| १३) अन्य माहिती. | २४९ |

# एम्. एन्. कौल अ‍ॅन्ड सन्स

खरेदीसाठी महाराष्ट्रीयन लोकांचे श्रद्धास्थान

एकच भाव

**मालाची गॅरेंटी, आमची पुणे व मुंबई येथे शाखा**

माल खराब निघाल्यास २ महिन्यापर्यंत आमच्या पुणे–मुंबई पैकी कोणत्याही शाखेतून माल परत करून पैसे घेऊन जावेत.

## श्रीनगरमधील गॅरेंटीबाबत एकमेव दुकान

साडी, शॉल, पर्स, रेशमी झब्बे, मध, अक्रोड, वदाम, पिस्ता, जर्दाळू, मसाला इ. असंख्य वस्तू.

**केशर** :– फक्त आम्हीच १००% शुद्ध केशर देऊ.

हॉटेल बुकींग, साईटसीईंग व श्रीनगरहून परतीची रेल्वेतिकीटे काढून देण्याची व्यवस्था.

**– लिहा अथवा भेटा –**

**श्री. राजन व अम्बूस कौल बन्धू**

**पत्ता** :– एम्. एन्. कौल अ‍ॅन्ड सन्स, पोस्ट बॉक्स नं. १११,
आर्टस् बाजार, मैसुम्मा, श्रीनगर– १९० ००१ (काश्मिर)

# प्रस्तावना

गेली २७ वर्षे सहल नियोजक म्हणून देश-विदेशात फिरताना मला प्रकर्षाने जाणवलेली गोष्ट म्हणजे 'पर्यटन' हे निव्वळ ज्ञान व मनोरंजनाचे साधन नसून समाज शिक्षणाचे एक प्रभावी माध्यम आहे! तसेच राष्ट्रीय एकात्मकता व आंतरराष्ट्रीय बंधुभावाची खरी गुरुकिल्ली आहे आणि म्हणूनच आजच्या परिस्थितीचा विचार करता युवकांनी—विद्यार्थ्यांनी आपला देश ममत्वाने पाहिला पाहिजे. विविध राज्यातील लोकजीवन, संस्कृती, आचारविचार, तेथील ऐतिहासिक व भौगोलिक परिस्थिती समजावून घेतली पाहिजे. कारण देश पाहिल्याविना देशप्रेम वा देशाविषयीची निष्ठा वृद्धिगत होत नसते.

पर्यटनासाठी उपयुक्त व मार्गदर्शक ठरावे अशी सविस्तर पुस्तके मराठी भाषेत अभावानेच उपलब्ध आहेत. प्रवासवर्णने खूप आहेत. त्यांतून प्रवासातील अडचणी, आरक्षण, भोजन, निवास, खबरदारीचे उपाय, मनोरंजन इ. बाबत संपूर्ण माहिती देणाऱ्या अशा पुस्तकाची पर्यटकांना अत्यंत आवश्यकता होती आणि ती माझे मित्र श्री. प्रमोद चितारी यांनी या 'प्रवासी मित्र' च्या रूपाने पूर्ण केली आहे असे मनोमन वाटते.

श्री. प्रमोद चितारी हे एक कुशल चित्रकार आहेत. उत्कृष्ट शिक्षकही आहेत व एका पर्यटन संस्थेचे आधारस्तंभही आहेत. असे असूनही आणि हा संदर्भग्रंथ मूले कुठार: होऊ शकेल हे ठाऊक असूनही, खरोखरीच 'प्रवासी मित्र' ह्या शीर्षकाला साजेल अशा सेवाभावी वृत्तीने व युवकांसह प्रौढांनाही आवडेल अशा संवेदनाक्षम शब्दांत सारे लिखाण केले आहे. ते माहितीपूर्ण तर आहेच, पण त्यातली सुसंगती, बारीक-सारीक टिपणे आणि प्रसंगी अत्यंत शैलीदार भाषा ही देखील मनाला मोहून टाकते. खरोखरच आपण त्या त्या प्रदेशात फिरत आहोत असे माझ्यासारख्या अनेक वेळा प्रवास केलेल्या पर्यटन नियोजकालाही वाटते. त्याअर्थी सर्वसामान्यांपासून चोखंदळ पर्यटकही ह्या ग्रंथाचे स्वागतच करतील ह्याची मला खात्री आहे.

अशा तऱ्हेचे पुस्तक व्यवसाय निवृत्तीपूर्वी लिहावे हा माझाही एक सेवाभावी हेतू होता पण प्रचंड कार्यबाहुल्यामुळे ते घडू शकले नाही. घडेल असे वाटत नाही. म्हणूनच श्री. प्रमोदभाईंचा हा प्रभावी प्रयत्न साऱ्या महाराष्ट्रानेच नव्हे तर शासनानेही कौतुक करण्याजोगा वाटतोय!

शुभेच्छा!

लग्न, मुंज, समारंभासाठी, अत्यंत अल्प खर्चात
ब्लॅक अँन्ड व्हाईट व कलर फोटोग्राफी
तसेच
व्ही. डी. ओ. शूटिंग

उत्कृष्ट दर्जा व नम्र सेवा हेच वैशिष्ठ्य.

आमच्या बरोबर आपण भारतातील कोणत्याही सहलीस आल्यास आम्ही आपल्यास सवलत देऊ.

हा ही एक आमचेकडे अनुभव घ्या.

— आजच संपर्क साधा —

चितारी फोटो स्टुडिओ

भाईंदर पूर्व (स्टेशनजवळ) जि. ठाणे.

# काश्मिर

(भाग पहिला)



# पर्यटन

प्रवास, दौरा किंवा भ्रमंतीपेक्षा पर्यटन ही संकल्पना अधिक आकर्षक आणि अर्थपूर्ण आहे. पर्यटनामागे सौंदर्यवादी दृष्टिकोन आहे, ज्ञानजिज्ञासा आहे. काळ, वातावरण, प्रदेश, भाषा, लोक, त्यांची संस्कृती, राहणीमान, खानपान यांत एकरूप होण्याचा, त्यांत समरस होऊन तुलनात्मक व आगळा आनंद लुटण्याचा, दैनंदिन कंटाळवाण्या त्याच–त्याच कार्यक्रमात गुंतण्यामुळे नैराश्याने करपलेल्या जीवनाला काही काळ का होईना, बदल घडवून आणण्याचा एकमेव आनंद–मार्ग म्हणजे 'पर्यटन' होय.

पर्यटनामागे विशिष्ट हेतू असू शकतात. वर उल्लेख केल्याप्रमाणे काही लोक यांत्रिक, कंटाळवाण्या जीवनापासून सुटका करून घेण्यासाठी पर्यटनास निघतात; तर काही लोक केवळ पुण्यप्राप्तीसाठी चार धार्मिक स्थाळांना भेट द्यावी, गंगोदक अंगावर घेऊन देवाची विविध रूपे डोळे भरून पाहून मगच डोळे मिटावे, हाच एकमेव हेतू ठेवून पर्यटन करतात, तर काही तरुण मंडळी रोजच्या जाचक बंधनापासून लांब जाऊन खाणे-पिणे मोकळेपणाने करावे, पाहता येतील ती स्थळे पाहत निसर्ग–सान्निध्यात मौज लुटावी, या हेतूने सुद्धा पर्यटनाला निघतात. काही अभ्यासू मंडळी कागद-पेन्सिल सरसावून ज्ञान–साधनेच्या हेतूने मिळेल ती माहिती गोळा करतात. काहींचा आनंद सौंदर्यस्थळे पाहण्यातच असतो. तसेच प्रवास हा सामाजिक प्रतिष्ठेचा भाग मानणारेही लोक असतात. आपण दूरवर पर्यटनाला जाऊन पैसे खर्च केले नाहीत, तर प्रतिष्ठा ती कसली ? पर्यटनाहून आले, की आपली सामाजिक प्रतिष्ठा वाढलीच म्हणायची, असाही एक समज रूढ आहे. काही लोक पर्यटनाचा आनंद 'कामात काम साधू या,' असे समजून लुटतात. खरेदी–

विक्री, परिषदा, प्रदर्शने, संमेलने, महोत्सव या निमित्ताने आजूबाजूचा सुंदर परिसर पाहून तेवढ्यावरच समाधान मानतात. 'साँप भी मरे, काठी भी न टूटे' त्यातलाच हा प्रकार, पर्यटनाचा मूलभूत हेतू कोणता असावा, असा प्रश्न कोणीही विचारला, तर अचूक उत्तर देणे कठीण आहे. कारण पर्यटनाचा हेतू हा ज्याचा त्याचा वैयक्तिक विचारांचा भाग आहे. त्याच्या वैयक्तिक हेतूला प्राधान्य आहे. पर्यटन जर वैयक्तिक हेतूने केले, तर ते सौंदर्यपूर्ण व शास्त्रशुद्ध पर्यटन होईलच, असे मात्र म्हणता येत नाही. पर्यटनाचा हेतू शुद्ध असावा, पर्यटनात कामाचा ताण नसावा, पर्यटनाचा कालावधी काळजीपूर्वक नसावा, पर्यटन अडचणीचे नसावे. उदा. खाणे-पिणे कमी, प्रवासाला पैसे कमी, उतरण्याची सोय नाही, आवश्यक वस्तू उपलब्ध नाहीत, अशा वेळी पर्यटनातील सात्त्विक आनंद लुटता येत नाही.

पर्यटन करताना निसर्गसौंदर्याची लयलूट, मर्यादित का होईना ज्ञानसाधना, जीवनात घडवून आणावयाचा बदल, नवीन भूमी, निसर्ग, मानवी संस्कृतीचा सहवास, ज्या जन्मभूमीत आपण जन्माला आलो, त्या वैविध्यपूर्ण पवित्र मातीवर मनसोक्त प्रेम करून, निर्भेळ आनंद लुटण्याचा हेतू पर्यटनात निखालसपणे असावा.

थॉमसन फुलर म्हणतो :

**The fool wanders, but the wise man travels.**

(मूर्ख माणसे भटकतात आणि शहाणी माणसे प्रवास करतात.)

याचा अर्थ काही निश्चित ध्येय न ठरवता वाटेल तिथे भटकणे, हा हेतुरहित निरुपयोगी प्रवास झाला, हे मात्र निश्चित. 'अभ्यास' हाच एकमेव हेतू असतो, असेही नाही. निर्भेळ 'आनंद' हाही प्रवासाचा हेतू असू शकतो. शहाणी माणसे प्रवास करतात, याचा अर्थ – प्रवास शास्त्रशुद्धपणे करतात. पूर्वनियोजन करून हेतूपूर्वक प्रवास करायचा असतो. इमर्सनचा प्रवासाविषयीचा दृष्टिकोन जरा वेगळा आहे तो म्हणतो :

The world is his, who has money to go over it.

येथे काही बोटांवर मोजता येतील, इतक्या ध्येयवाद्यांचा अपवाद सोडला, तर पैशाशिवाय प्रवास नाही, हे सर्वांना पटणारे आहे. पैसा असेल, तर जगप्रवास करणे कठीण नाही. पण केवळ पैसा म्हणजे प्रवास नाही. पैशाबरोबर ज्ञानलालसा हवी. नाहीतर प्रवास म्हणजे निव्वळ पायपीट होते. अगदी भाषेपासून अडचणी निर्माण होतात. प्रवासात स्वत्व उरत नाही, दुसरे सांगतील, तेथे जायचे व ते सांगतील, तसे वागायचे, अशी परस्वाधीनता वाट्याला येते.

प्रवासासाठी पैसे अत्यावश्यक–प्रवासात पैसे लागतात तरी कशासाठी? प्रवासाच्या भाड्याचा खर्च, राहणे व खाणे तसेच खरेदीसाठी होणारा खर्च, यांत





पहिला ठराविक खर्च सोडला, तर उर्वरित दोन खर्चांवर नियंत्रण घालणे सहज शक्य आहे.

मला तर प्रवासात भेटलेल्या एका आनंदी जोडप्याने सांगितले.

'आम्ही अतिशय आनंदाने प्रवास केला आणि करीत आहोत. त्याचे कारण आम्ही एक अलिखित नियम केला आहे की, कोठेही अनावश्यक खरेदी करायची नाही.'

अनामिकाचे हे बोल आपल्या आर्थिक परिस्थितीत आपल्याला मार्गदर्शक ठरू शकतात. पैसा आहे आणि तो खर्च करायचा आहे, म्हणून प्रवास करायचा, हा हेतू योग्य नाही. सारासार विचार करून पैशाचा विनियोग प्रवासात योग्य रीतीने करता येतो.




(खरी अडचण असते, ती ज्यांच्याकडे मर्यादित पैसा आहे त्यांना ! अशा लोकांना प्रवासाची हौस तर असते; पण पैसा नसतो, म्हणून मन मारून रोजच्या चार भिंतीतच त्यांचे पाय घोटाळत असतात. पण त्यांना यथावकाश प्रयत्नाने त्यातून मार्ग काढता येतो.)

कवी R. L. Stevenson आपल्या प्रवासाबद्दल म्हणतो :

A travel for trrvel's sake, the great affair is to move.

या विचारांचा एक वेगळा प्रभाव मनावर पडतो. 'प्रवासासाठी प्रवास' या शब्दांचा अर्थ शब्दश: न घेता, व्यापक अर्थाने घ्यायला हवा. प्रवास करताना अन्य व्याप नको. प्रवास म्हणजे प्रवास.

प्रवास ही काही हेतुशून्य कल्पना नाही. प्रवास कशासाठी तरी निश्चितच केला जातो. जरी ती वैयक्तिक संकल्पना असली, तरी त्याभोवती काही विशिष्ट विचारतत्त्वाचे वलय आहे आणि तसे ते नसते, तर झोपेत चालणे आणि प्रवास यांत फरक तो कोणता ?

प्रवासासाठी प्रवास, म्हणजे झोपेतील प्रवास नाही. प्रवासानंतर झोप ही नैसर्गिक प्रक्रिया झाली. खरे तर झोपेत होतो, तो प्रवास, असे म्हणणे कठीण आहे. डोळे बंद करून प्रवास तो काय करणार ? ताजमहालजवळ आल्यानंतर डोळ्यांवर पट्टी बांधून, केवळ गुळगुळीत संगमरवरावर हात फिरवून, आनंद लुटता येईल काय ? डोळेच काय, पण मनाचे दरवाजे सुद्धा प्रवासातील आनंद लुटताना सताड उघडे असायला हवेत.

प्रवास करताना कामाचा कोणताही ताण मनावर असू नये. हा अर्थ प्रवासासाठी प्रवास, या वाक्यातून घ्यावा. स्थलांतर ही मात्र प्रवासाची मध्यवर्ती कल्पना आहे. आपण लहानपणी कार्तिकेय आणि गणपती यांची गोष्ट ऐकली असेल. विश्वाला तीन प्रदक्षिणा घालण्यासाठी गणपतीने युक्ती योजून, आईला तीन प्रदक्षिणा घालण्याचे श्रेष्ठत्व दाखवताना, आई या व्यक्तीचा महती सिद्ध केली आहे. या गोष्टीचे एक सोडा, पण कार्तिकेयाचे काय ? त्याचा प्रवास निष्फळच समजायचा का ? ही शंका अजून कोणीही समाधानित केली नाही. एका कल्पनेचे श्रेष्ठत्व पटवून देत असताना, दुसरीवर नकळत अन्याय होत नाही ना ? या गोष्टीचा विचार होणे महत्त्वाचे आहे.

मिडलटन (Millton) म्हणतो :

'He travels best, that knows when to return'.

केव्हा परतायचे, हे ज्याला निश्चित ठाऊक आहे, तोच प्रवासाचा पुरेपूर आनंद लुटू शकेल. कारण पर्यटनाला मर्यादा आहे. जसे आपण पर्यटनाच्या वेळी निघायचे केव्हा, याचा विचार करतो. तेव्हाच परतायचे कधी, हा विचार केला पाहिजे; तरच पर्यटनाच्या नियोजनाला परिपूर्ती येईल.

पर्यटन हा जीवनातील एक निरतिशय आनंदाचा क्षण आहे. जीवनात असा योग बहुतेकांना येतो, म्हणजे तसा तो यावाही. प्रसंग आल्यानंतर प्रवासाला निघणे आणि निश्चित ठरवून प्रवासाला निघणे, यांत फरक आहे. मोठी माणसे प्रवासाला निघतात, तेव्हा लहान मुलांना आपोआप प्रवास घडतो. मात्र बालवयात आनंदापेक्षा प्रवासाला त्रासच अधिक असतो. प्रवासाला सुद्धा निश्चित वय आणि समज हवी. बालवयात जवळपासच्या निसर्गरमणीय स्थळी 'पिकनिक' काढून, प्रवासाची आवड बालमनात रुजवता येईल; पण ऐतिहासिक स्थळे दाखविली, तर कालांतराने

ते सारे विसरले जाते. हायस्कूलपासून समज वाढीस लागल्याने किंवा ऐतिहासिक व भौगोलिक पूरक ज्ञानात वाढ होऊ लागल्याने, हा कालखंड सहलीसाठी योग्य आहे.

कॉलेज-जीवन हा सहलीसाठी अतिशय उपयुक्त कालखंड आहे. या काळात सहल, समज, ज्ञान, हेतू यांचे बरेचसे आकलन झालेले असते. त्यामुळे पैसा व वेळ यांचा अपव्यय होण्याची शक्यता कमी असते. तारुण्य हा प्रौढ सामाजिक जीवनाचा पाया आहे. या वयोगटात विविध ठिकाणी जाऊन तेथील भाषा, चालीरीती, खान-पान, समाजजीवन अभ्यासणे जरुरीचे आहे. यामुळे राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजू शकते. देशातील वैविध्य न्याहाळणे, त्यातील सार आत्मसात करून, देशाच्या ऐक्याच्या पाठीशी उभे राहणे, हे तरुणांचे कर्तव्य ठरते. अर्थात वडीलधाऱ्या माणसांनी परवानगी व पैसे दिले पाहिजेत. तरुणांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

शिक्षण संपून स्वतः अर्थार्जन करू लागल्यानंतर, अनेकांना पहिल्या प्रवासाचा योग येतो, तो नवपरिणीत दांपत्याला-विशेषतः मधुचंद्राच्या निमित्ताने. या पर्यटनाची गोडी काही अवीट असते. मन अगदी मोरपिसासारखे हलके हलके होऊन, अलगद हवेवर तरंगत असते. अशा प्रवासात काही साध्य होवो, न होवो, पण आयुष्याच्या अखेरपर्यंत हे गुलाबी क्षण मनात रेंगाळत राहतात. थोडक्यात सांगायचे, तर वैवाहिक जीवनाचा मनसोक्त आनंद लुटण्याचा हा काळ.

म्हातारपणीचा प्रवास मात्र सर्व प्रवासापेक्षा अगदी वेगळा असतो. ‘ लागले, रे, नैत्र पैलतिरी ’ या अवस्थेतही प्रवासाची हौस संपलेली नसते. या प्रवासात आसक्तीपेक्षा भक्तीची जोडच प्रभावशाली असते. धार्मिक विचारांनी भारलेले मन, तीर्थयात्रेसाठी आसुसलेले असते. या वयात मंदिराच्या शिल्पापेक्षा, डोळे भरून गाभाऱ्यातील मूर्तीला पाहण्यात धन्यता वाटते. पवित्र नदीत डुंबताना जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटून जीवनाभोवती गुरफटलेली सारी किल्मिशे धुतल्या-सारखी वाटू लागतात. प्रवासास हा खरोखर कठीण काळ. कारण हवामान बदलते, तसतशी प्रकृती बिघडते, पण या विकृतीकडे दुर्लक्ष करून, हाती काठी घेऊन, पांढरे केस भुरभुर उडवीत ही हिरवी मने जिद्दीने पुढे पुढे जातात.

वयानुसार बदलणाऱ्या प्रवासाच्या अशा विविध तऱ्हा असतात. वय, विचार बदलतात, तसे पर्यटन-प्रवासाविषयीचे दृष्टिकोनही बदलतात. म्हणून असे म्हणता येईल की, पर्यटनाचे हेतू वयानुरूप बदलतात, नव्हे बदलायला हवेत. प्रेक्षणीय स्थळी उडणारे पक्षी पाहून लहान मुले मंत्रमुग्ध होऊन निरागसपणे टाळ्या वाजवतात. तसेच उत्तर-आयुष्याच्या काठी उभे असताना धार्मिक पर्यटन-स्थळी ब्रह्मानंदी टाळी लागून तळव्यांच्या तालात आरतीत सहभागी होणारे हात त्यात अभावितपणे तल्लीन होतात. शेवटी पर्यटन ही वैयक्तिक संकल्पना असली, तरी सामूहिक रीतीने केलेले पर्यटन अधिक आनंददायी ठरते, असा रसिक प्रवाशांचा आजवरचा अनुभव आहे.

## पर्यटनाचे फायदे :

(प्रवास हा मानवाचा फार मोठा शिक्षक आहे, असे म्हणतात. प्रवासात खूप शिकायला मिळते, म्हणूनच कदाचित त्यास शिक्षक असे संबोधले असेल. प्रवासाचे खूप फायदे असतात. पहिला फायदा मानसिक आनंदाची लयलूट. मानवाचे आधुनिक यांत्रिक जीवन, त्याला पिचून काढते. साऱ्या आशा-आकांक्षा कोमेजून जातात. या अळणी, ठरीव ठशांच्या जीवनापेक्षा थोड्या वेगळ्या जीवनाची आल्हाददायी फुंकर या जळजळणाऱ्या जीवनावर हवी असते. त्याला एकच उपाय पर्यटनासाठी स्थलांतर. रोजची दगदग, कटकट—सारे सारे काही विसरून, काही काळ स्वतःचे मन वेगळ्या वातावरणात गुंतवणे ! )

मानसिक, बौद्धिक, शारीरिक आनंद म्हणजे पर्यटन. पण तो लुटणारी व्यक्ती आणि आनंद लुटण्याचे स्वरूप, यावर मात्र बरेच काही अवलंबून आहे. प्रवासात विविध स्वरूपाचे ज्ञान प्राप्त होते. पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष उघड्या डोळ्यांनी वाचलेले निसर्गाचे खुले पुस्तक, कितीतरी ज्ञान देऊन जाते. भूतकाळाचा इतिहास समोर उभा असतो. भूगोलाचे ज्ञान प्रत्यक्ष स्पर्श करते, तर व्यवहारी ज्ञानाचा झराच गवसतो. विविध लोकांशी ओळखी होतात. इतरांशी अडीअडचणीतही कसे जमवून घ्यायचे, हा अनुभव पदरी येतो. खरेदी, विक्री, किंमती या विषयीचे अंदाज पक्के होतात. राहणीमान, चालीरीती, खानपान, पेहराव, इ. बाबींमुळे आपले व्यक्तिमत्त्व संपन्न व्हायला मदत होते. )

(प्रवास म्हणजे समाजकारण, इतिहास, भूगोल—सगळे काही संपन्न व्यक्तिमत्त्व घडायला प्रवासाचा फार फायदा होतो. त्यातूनच बहुविध व्यक्तिमत्त्व आकाराला येते. कुठे कसे वागावे, कसे बोलावे, या गोष्टींचे उत्कृष्ट ज्ञान प्रवासात प्राप्त होते. नव्याने ओळख झालेली माणसे आपली घनिष्ठ मित्रही बनतात. दूरदृष्टीने म्हणायचे झाले, तर राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी प्रवासाइतका प्रभावी मार्ग दुसरा नसावा. )

## पर्यटनाचे नियोजन :

प्रवासात निघण्यापूर्वी सतावणारा पहिला प्रश्न, म्हणजे पर्यटनास नेमके जायचे तरी कोठे ?

पर्यटन म्हणजे कोणत्याही गाडीत बसून, गाडी थांबेल तेथे उतरणे, असे तर नाही ना ? पर्यटनाचे स्थान, झेपेल एवढा प्रवास आणि प्रवासखर्च याचा विचार करावा लागतोच. पैसेवाल्या व्यक्तीस खर्चाचा प्रश्न नसला, तरी प्रकृती सतावीत असते. याउलट सुदृढ प्रकृती आहे, तर पुरेसा पैसा नाही, म्हणजे दात आहेत, तर चणे नाहीत. चणे आहेत, तर. . . .प्रथम कुठे जायचे, ते ठरवा, तीच ठिकाणे पाहण्यात काय

आनंद आहे, याचा विचार करा. दुसरे लोक तेथे जाऊन आलेत, म्हणून आपणही तेथेच गेले पाहिजे, असे नाही. पर्यटनाबाबतचे विचार आपले आपणच ठरवले पाहिजेत किंवा गटाने जाणाऱ्यांनी सर्वानुमते घेतले पाहिजेत. केवळ बँक/कंपनी वा कार्यालयाकडून प्रवासभत्ता मिळतो, म्हणून प्रवास करू नये. प्रवासापूर्वी प्रथम बचत केली पाहिजे. पर्यटन ही खर्चाची बाब आहे. बाहेरपडले की, प्रत्येक गोष्टीला पैसा लागतो. जेथे पर्यटनाला जायचे, तेथील अंदाजे खर्च काढून, दर महिन्याला प्रवासासाठी म्हणून वेगळी बचत केली पाहिजे. त्यामुळे येणाऱ्या अडीअडचणी त्यातून आपोआप दूर होतात.

प्रवासाचे नियोजन म्हणजे खर्च टिपलेली वाण्याची यादी नव्हे. यात मुख्य म्हणजे स्थळे केव्हा, कशी, कोणती पाहायची, परत कधी यायचे, तिकीट परतीसह केव्हा व कसे काढायचे, कोणकोणते सामान बरोबर घ्यायचे, पर्यटनाच्या टिपणवहीत साधारणपणे काय लिहायचे, या प्रत्येक गोष्टीविषयी आधी विचार केलेला असणे म्हणजेच पर्यटनाचे नियोजन, असे म्हणता येईल.

पर्यटनाच्या नियोजनातच प्रवासाला एकट्याने निघायचे, की कुटुंबासमवेत, की ओळखीच्या गटाबरोबर, हे प्रथम ठरवून घ्यावे. दोन पैसे गेले, तरी हरकत नाही, पण उत्तम प्रवासी कंपन्यांबरोबर पर्यटनास सुखाने जावे, असा प्रघातच पडू लागला आहे. प्रवासाची आखणी करण्यापासून ते परतेपर्यंतच्या प्रत्येक बारीक सारीक गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. लेणी पाहण्यास गेलेल्या व्यक्तीने बॅटरी बरोबर घेतली नाही, तर शिल्पकलेचा आस्वाद कसा चाखता येईल ? प्रवासाच्या घाईगडबडीत निघताना किंवा परतताना काही विसरलात, की मूडच जातो. प्रवासात घोळ निर्माण होतो. यासाठी प्रवासाचे स्वरूप ठरवून, त्याविषयी स्वतःलाच काही नियम घालून घेणे हिताचे ठरते.

## प्रवास कोठे करावा :

प्रवास या पर्यटनातील सर्वात गहन प्रश्न हाच आहे. प्रवासाचे स्थान ठरले, की प्रवास करणे फारसे कठीण नसते. मन विविध दिशांना भरकटत असल्याने स्थिरचित्ताने एकाच ठिकाणी जावे, असे ठरविले जात नाही.

प्रवास कोठे करावा, हा जरी वैयक्तिक आवडीनिवडीचा प्रश्न असला, तरी आपल्या मर्यादा ठरवून स्थान ठरविता येते. जेथे प्रवासाला जाल, ते स्थळ निसर्गरम्य, आल्हाददायी असावे, अशी प्रत्येकाची अपेक्षा असणारच, रमणीय निसर्ग हा तर पर्यटन-स्थळांचा आत्माच आहे. कुणाला शरदाच्या चांदण्यात हरखून जाऊन ताजमहालाचे अवलोकन करणे आवडेल, तर कुणाला सूर्यास्ताच्या वेळी विवेकानंद खडकावर, काही काळ का होईना, ध्यानमग्न होऊन बसावेसे वाटेल.

पर्यटन निवडीचे स्थळ मनोवृत्तीवर अवलंबून आहे. तसेच प्राप्त परिस्थितीवर अवलंबून आहे. मधुचंद्राला निघालेले सौंदर्यासक्त जोडपे 'खजुराहो' च्या सुरईतील सौंदर्य हातोहात ओठांत रिचवेल, तर तो तत्त्वज्ञानी विचारवंत राज्यघाटासमोर एका विशाल व्यक्तिमत्त्वाचे आत्मचिंतन करेल. व्यक्ती, प्रकृती, आवड, निवड, होणारा खर्च, सभोवताली उपलब्ध असणारी इतर स्थळे, स्थळांची वैशिष्ट्ये, इ. गोष्टी लक्षात घेऊन पर्यटनाचे स्थळ निवडायचे असते. स्वर्गीय सौंदर्याला लाजवणारे काश्मिरचे अनुपमेय सौंदर्य, काळ्या कातळात कोरलेल्या हळुवार कल्पनांचे अप्रतिम आविष्कार, देशी-विदेशी कलांतून निर्माण झालेल्या समन्वयी कलेचा साक्षात्कार, निसर्गाच्या कुशीत विराजमान होऊन दुधाचे घाट दुथडी वाहून नेणाऱ्या दऱ्याखोऱ्या अशी कितीतरी पर्यटन-स्थळे आहेत, पण तिथे जाण्यापूर्वी त्याविषयाची माहिती वाचली किंवा समजावून घेतली, तर आपला आनंद द्विगुणित होतो.

शक्यतो पर्यटनस्थळ निवडताना निसर्ग रम्यतेबरोबर नाजूक, मनोहर कोरीव काम, भव्य शिल्प, ऐतिहासिक वास्तू, श्रद्धास्थान, भौगोलिक वैशिष्ट्यांनी बहरलेले स्थळ निवडावे. मनोरे, जुने किल्ले, मंदिरे, राजवाडे, लेणी, धरणे, पर्वत-शिखरे, फळाफुलांनी विनटलेल्या जागा, सरोवरे, थंड हवेची ठिकाणे, अशा कित्येक ठिकाणांना भेटी देणे शक्य आहे.

## प्रवास कसा करावा :

आपल्याच मनाला विचारावयाचा हा प्रश्न जरा व्यापक आहे. वरील प्रश्नाचा अर्थ केवळ कोणत्या वाहनाने प्रवास करावा, या गोष्टींशी संबंधित नाही. मनःस्थिती, वाहन, प्रवासाच्या वेळची व भोवतालची परिस्थिती, ऋतुमान, सोबत या बाबींचा विचार यात समाविष्ट आहे.

प्रकृतीनुसार प्रथम कोणत्या ऋतूत प्रवासास निघायचे, ते ठरवावे. प्रवासाचे स्थान निवडल्यानंतर कोठून, केव्हा, कसे जायचे, ते निश्चित ठरवून परतीचे रिझर्व्हेशनही करणे आवश्यक ठरते. तळपत्या उन्हाळ्यात बसप्रवासच काय, पण कारने प्रवास करणे सुद्धा तापदायक ठरते. रेल्वेत गर्दीमुळे त्रास होतो. प्रवास थोडा करावा, पण चांगला करावा. पैशाकडे पाहून, उन्हात पायपीट करून, प्रवासातच आजारी पडून, पर्यटन अर्धवट सोडून परत येणारे महाभाग कमी नाहीत. सहज, सोपा प्रवास खानपान यांवर नियंत्रण हवेच. आवश्यक तेथे आवश्यक त्या वाहनांसाठी खर्च करावाच लागतो, रेल्वे-प्रवासात आपल्या बर्थवर केवळ वाचन व झोप अशा स्थितीत प्रवास केला, तर कंटाळवाणा प्रवास होईल. प्रवासात मन उत्साही हवे. बळजबरीने किंवा दुसऱ्यासाठी इच्छा नसताना करावा लागणारा प्रवास हा प्रवास नव्हे, खूपच मोठे कुटुंब असल्यास आणि शक्य असल्यास अर्थातच क्रमाक्रमाने प्रवास करणे सोयीचे ठरते.

वयांत अंतर नसलेली छोटी मुले अधिक असली आणि त्यांना घेऊन प्रवास करायचा म्हटला, तर आपली त्रेधातिरपीट उडते. पुरुषापेक्षा बाईच्या नाकीनऊ येतात. एक किंवा दोन मुले बरोबर असली, तर कमी त्रास होतो. प्रवासात त्यांची निगा राखता येते. त्यात मुलांमध्ये अंतर असेल, तर मोठा किंवा मोठी मुले समंजस असल्यास लहानांस सांभाळणे कठीण जात नाही. रजा नाही, घरात काही महत्त्वाचे धार्मिक कार्य आहे, किंवा पुरेसा पैसा नाही अशा अवस्थेत प्रवासाला गेलेच पाहिजे, असा हट्ट नसावा. सुखसोयी, सुविधा असताना निघणे अधिक चांगले. अशा प्रवासात जीव टांगणीला लागत नाही. कोणत्याही परिस्थितीत वर्षातून एकतरी पर्यटन वा प्रवास झालाच पाहिजे, हे म्हणणे योग्य नाही. याचा अर्थ असा नव्हे की, दहा वर्षात कोठे जाऊ न नये. साधारणतः दोन किंवा तीन वर्षांआड प्रवास करणे उत्तम. विशिष्ट वयात विशिष्ट हौस-मौजा आपापल्या कुवतीनुसार करायलाच हव्यात.

श्रीमंत लोक विमानाने किंवा वातानुकूल रेल्वे डब्यातून प्रवास करतात; पण मध्यमवर्गीय लोक दुसऱ्या दर्जाच्या टू किंवा थ्री टायर बोगीतून प्रवास करतात. तसेच हल्ली व्हीडिओ कोच किंवा टूरिस्ट बसने पण जाण्याची सोय उपलब्ध आहे पण रिझर्व्हेशन न करता लोंबकळून लांबचा प्रवास कधीच करू नये. आरक्षित नसलेल्या एक-दोन डब्यांत सामान व लोक यांची तुडवण पाहवत नाही. मुलांचे रडणे, मोठ्यांचे खेकसणे यातच अशा प्रवासाला तडा जातो. चांगल्या पर्यटकांनी गैरसोय करून घेऊन चुकूनही या मार्गाने जाऊ नये. खर्चिक नको, पण योग्य खर्च करून प्रवास करावा. चैनीचा नको, पण प्रवास सुखदायी असलाच पाहिजे. वातानुकूल नसेल, पण अगदीच गुदमरून टाकणारा, दमछाक करणारा प्रवास शक्यतो टाळावा. अशा परिस्थितीत प्रवासाची आवड तर निर्माण होणार नाहीच, उलट प्रवास म्हटला की, धास्तीच अधिक वाटेल.

'प्रवासाचा दर्जा कोणता, यावर प्रवासाचे सौख्य अवलंबून नसून प्रवासाचे नियोजन किती विचारपूर्वक केले आहे, यावर प्रवासातील आनंद अवलंबून आहे.'

## पर्यटनास आवश्यक वस्तू :

पर्यटनास निघाल्यावर हातात काही न घेता जाणे योग्य नव्हे. हल्ली पैसे असले की, सर्व सोयी उपलब्ध होतात, असे क्षणभर गृहीत धरले, तरी स्वतःच्या वस्तू जवळ नसताना किती परस्वाधीनता येते, हे अनुभवानेच कळते. यासाठी एक साधेच उदाहरण घ्या ना ! गाडीत तहान लागली, तर पाणी प्यायला ग्लास नाही. कोणाकडे मागणार ? आणि किती वेळा ? येथे पैशाचा उपयोग काय ? म्हणजे याचा अर्थ असा नव्हे की भरपूर सामान घेऊन प्रवासास निघावे. आवश्यक आणि सुटसुटीत सामान असावे. आपल्याकडील सामान अधिक जड असेल, तर ते लगेज

बोगीत ठेवावे लागते. असे सामान अवेळी कोठे उतरायचे असेल, तर होणारी धावपळ विचारायलाच नको. शिवाय प्रत्येक ठिकाणी हमालीचा खर्च वाढतो, तो वेगळा. काही ठिकाणी हमाल न मिळाल्यास सामान आपल्याला सहजरीत्या उचलता आले पाहिजे.

वाटेत फळे वगैरे कापण्यासाठी चाकूची आवश्यकता असते. धारदार सुरी बरोबर न घेता दुमडणारा लहानसा चाकू बरोबर घ्यावा. आपल्याबरोबर असणाऱ्या बॅगला कुलूप असणे आवश्यक आहे. कारण क्लोकरूममध्ये कुलुपाशिवाय सामान ठेवून घेत नाहीत. तसेच कुलूप नसेल तर दुसऱ्याच्या ताब्यात, काही काळ का होईना, सामान देणे धोक्याचेच. ज्यांना वातविकार किंवा पाठ वा पाय–विशेषत: गुडघे दुखण्याचा विकार असेल, त्यांनी वयोमानानुसार आधार म्हणून सुंदर कोरीव छडी बरोबर घ्यावी. हल्ली घडीच्या छड्या बाजारात उपलब्ध असतात.

जेवणाचे डबे उंच कप्प्याचे किंवा बिस्किटाचे टिन डबे नसावेत. वाटेत भोजन मिळते. स्वत:चे अन्न ते प्रवासात टिकणार किती ? आणि यथेच्छ भोजनाला घरच्या-सारखा वेळ मिळणार केव्हा ? प्लॅस्टिकच्या बॅग्जमध्ये कोरडे पदार्थ घेऊन बरोबर कागदी डिशेस् घ्याव्यात. पायात बूट असतील तर एक रबरी चप्पल वा सपाता कागदात बांधून बरोबर घ्याव्यात. काही वेळेला ह्यांचा उपयोग होतो. वेळही वाचतो.

### पर्यटन आणि मनोरंजन :

पर्यटनाचा एक हेतू मनोरंजन हाही आहे. पर्यटन हेच मनोरंजन असेल, तर वेगळ्या मनोरंजनाची आवश्यकता काय ? असा प्रश्न निर्माण होईल. जेव्हा आपण प्रेक्षणीय स्थळ बघण्यात गर्क असतो, तेव्हा मनोरंजनाचा प्रश्नच उद्भवत नाही. विश्रांतीचा वेळ, हॉटेलमधील वेळ अपरिचित ठिकाणी कसा घालवावा, हा प्रश्नच असतो अशा वेळी मनोरंजनाची आवश्यकता वाटते. मनोरंजनाने मन ताजे-तवाने राहते. मनोरंजनाचे अनेक प्रकार आहेत. त्यांतील खालील प्रकार आपल्याला सहज शक्य आहेत.

**गप्पा** :–अबोल व्यक्ती सोडल्या, तर गप्पा कोणाला आवडत नाहीत ? त्या रंगतदार मात्र हव्यात. विनोद, कथन, जोक्स्, गाणी, भेंड्या, नकला, परिस्थितीवर उत्स्फूर्त भाष्य, राजकारण, चित्रमय पुस्तके, प्रेक्षणीय स्थळांवर चर्चा, असे कितीतरी विषय असू शकतात. ग्रुप असेल, तर आपल्यापासून इतरांना त्रास होणार नाही, अशा प्रकारे गाणे-बजावणे करावे.

**खेळ** :– बुद्धिबळासारखे किंवा क्युबसारखे खेळ तासन् तास खेळता येतात कमी किमतीत मिळणारी प्लॅस्टिकची विविध कोडी बाजारात उपलब्ध असतात,

ती खिशात ठेवता येतील, एवढी लहान असतात. पत्त्याइतके डाव अन्य खेळात असतील, असे वाटत नाही. पत्त्यातील अनेक डाव मनोरंजनाचेच असतात. मात्र रमी किंवा तीन पत्ते असे पैसे लावून खेळण्याचे डाव प्रवासात खेळू नयेत. यातून भांडणे उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सभोवतालचा प्रदेश निसर्गरम्य असेल आणि डोळ्यांवर झोप नसेल, तर खिडकीतून बाहेर तासन् तास पाहण्यात वेळ जातो. चालत्या गाडीत वाचनाने मनोरंजन करणे शक्य असले, तरी ते योग्य मात्र नाही. प्रवासात झोप ही हमखास हुकमी एक्का ! झोप कसली, सुषुप्तीची अवस्था असते ती; पण म्हणाल तेव्हा डोळे लावून नेपोलियनप्रमाणे झोपी जाणारे पर्यटक क्वचितच आढळतील.

पर्यटनात मन रिझवण्यासाठी काही लोक मादक द्रव्य घेतात, हे अगदीच वाईट. एकतर मादक द्रव्ये जवळ बाळगू नयेत. मद्य घेऊन तासन् तास झोपणे, गांजा ओढणे, सिगारेटची तंबाखू काढून त्यात पुन्हा मादक द्रव्ये भरणे किंवा भांगेची गोळी चघळणे हे सारे प्रकार गैर तर असतातच. पण त्यामुळे इतरांना पण त्रास होण्याची शक्यता असते. मादक द्रव्यामुळे आपला तोल जाण्याची दाट शक्यता असते. अशा अवस्थेत चुकून काही अतिरेकी प्रकार घडले, तर प्रवासी हाणामारीपर्यंत येतात. सभ्य, सज्जन पर्यटकांना हे खचितच शोभादायक नाही.

**प्रकृतीविषयी काळजी :**

(खालील सूचना प्राथमिक उपाययोजना म्हणून सुचविल्या आहेत. शक्य असल्यास जवळच्या डॉक्टरांशी संपर्क साधावा.)

ज्यांची शरीरप्रकृती मजबूत आहे, त्यांना पर्यटनाचा आनंद अधिक लुटता येतो. म्हणून विशेषत: तरुण वयात पर्यटन करणे योग्य ठरते. प्रौढ वयातही पर्यटनाचा फारसा त्रास होत नाही. वृद्धापकाळात प्रकृती जर तोळामासा असेल, तर प्रवास गांजतो. पण काटक शरीराचे वृद्ध लोक तरुणास लाजवतील, अशा उत्साहाने पर्यटन करताना आढळतात. त्याला कारण त्यांचा नियमितपणा, उत्साह, जिद्द आणि विशेष म्हणजे प्रबळ इच्छाशक्ती हे फार मोठे तारक अस्त्र आहे.

फिटस् येणे, ब्लड प्रेशर वाढताच चक्कर येणे, डायबेटिस किंवा इतर कारणांनी कोमात जाणे–असे विकार असल्यास शक्यतो एकट्याने प्रवास करणे टाळावे आणि तशी वेळ आलीच, तर स्वत:च्या पाकिटात योग्य माहिती त्यावरील तात्कालिक उपाय कागदावर लिहून ठेवावे. आवश्यक ती औषधे सुद्धा डॉक्टरी सल्ल्याने बरोबर ठेवावीत.

**सर्दी** :– सर्वसाधारणत: हवामान बदलले की, सर्दी-खोकला यांचा त्रास सुरू होतो. अशा वेळी रबेक्स किंवा व्हिक्सची लहान बाटली, बामची बाटली व वेदनानाशक गोळ्या जवळ बाळगाव्यात. ग्लायकोडीन, व्हिक्स, कफनाशक सायरप बरोबर ठेवावे.

**दाढदुखी** :–वाटेतच सुरू झाल्यास वेदनानाशक गोळी घेऊन लवंगीच्या तेलाचा थेंब कापसावर ठेवून दाढेत दाबून ठेवा.

**मधुमेह** :–आणीबाणीतील प्रथमोपचार. हातपाय कापू लागतात, घाम सुटून अंग गार पडते आणि डोकेदुखी चालू झाली, तर शक्यतो डॉक्टरांना बोलवावे.

**कापणे-ठेचाळणे** :– गरम पाणी उपलब्ध असल्यास कापूस गरम पाण्यात बुडवून जखम स्वच्छ पुसून घ्या. त्यावर टिंक्चर आयोडिन किंवा मर्क्युरी लाल औषध लावावे. अन्यथा बॅण्डेडची पट्टी त्यावर लावावी.

**अपचन** :– चूर्ण, लिंबूपाणी, खाण्याचा सोडा, ओवा, इ. वस्तू बरोबर असाव्यात.

**मळमळ-उलट्या** :– बसप्रवासात होत असल्यास येवोमिनसारख्या गोळ्या घ्याव्यात.

**भाजणे** :– तावडतोब उपाय म्हणून बरनॉलसारखी ट्यूब बरोबर असावी.

**नाकातून रक्त येणे** :–अशा वेळी मस्तकांवर पाणी थोपून, नाकावर बर्फाने शेकावे. नाकात काही घालू नये. मान खाली न करता उताणे झोपवावे.

**मुलांना ताप** :– वाटेत मुलांना ताप आल्यास प्रथम क्रेसिन/मेटासिनसारखे पातळ औषध किंवा गोळी द्यावी. शक्य झाल्यास जवळच्या डॉक्टरांकडून मिश्रण आणावे.

**चक्कर येऊन दातखिळी बसल्यास** :–अशा वेळी कांदा ठेचून नाकाशी धरावा. दातखिळी उघडून कापडाची घडी वा चमचा तोंडात धरावा.

**रांजणवाडी** :– काळी मिरी उगळून त्याचे लेपन करावे.

## प्रवासाच्या वेळी आहार :

आपण ज्या प्रदेशात जातो, तेथील खानपान आपल्याला करावे लागते. पण पचनशक्ती नाजूक असल्यास खाल्लेल्या अन्नाचे पचन होत नाही. त्यातून गॅस, पोट-दुखी, अपचन, मळमळ, उटलट्या असा त्रास होतो. आपल्याला जे जड अन्न पचणार नाही, ते खाऊ नये. विशेषतः तेलकट, गोड, मांसाहारी, मसालेदार पदार्थ टाळावेत. त्यामुळे डीसेंट्री, पोटदुखी, इत्यादी त्रास उद्‌भवणार नाहीत.

प्रेक्षणीय स्थळे पाहताना हिंडावे लागते. चढावे-उतरावे लागते, म्हणून पोट गच्च भरू नये. भरल्या पोटी फार चालवत नाही. पायऱ्या चढण्या-उतरण्यात पोटात कळा येण्याची शक्यता असते. मद्याचा पेग किंवा बिअर पिऊन मांसाहार करणाऱ्यांनी अधिक सांभाळायला हवे. कारण अशामुळे उत्साहापेक्षा सुस्ती अधिक वाढते. स्थळे पाहण्यापेक्षा अशी व्यक्ती झोपणे अधिक पसंत करते. श्रीमंतीत पर्यटन करायला

निघालेल्या पर्यटकांना असे पिणे, असे खाणे म्हणजे प्रेस्टीज वाटते. पण नियमित भोजनापेक्षा अनियमित खाणे-पिणे झाले की, प्रकृती बिघडणारच. म्हणून अशा काही सवयी प्रवासात बदलाव्याच लागतात.

काहींना विशिष्टच आहाराची सवय असते. अशा वेळी काही अन्नपदार्थ उपलब्ध नसले, तर पंचाईत होते. विशेषत: दक्षिणेकडे सर्वत्र कॉफी मिळते. चहा मिळणे कठीण जाते. याच्या उलट काश्मिरला कोठेही लवकर कॉफी मिळत नाही. सर्वत्र चहाच घ्यावा लागतो. त्यातही चहाचे दोन प्रकार नमकीन व मीठा. वेळीच उलगडा केला नाही, तर पुढ्यात येईल, तो चहा प्यावा लागतो. दुसरे उदाहरण म्हणजे दक्षिणेकडील लोक जेव्हा उत्तरेकडे जातात, तेव्हा त्यांना भाताची चणचण भासते किंवा प्रत्येक प्रादेशिक विभागात मसाले वेगवेगळे वापरतात, त्यांच्या चवी आवडतातच असे नाही. काही ठिकाणी दूध-दह्याचा तुटवडा असतो. अशा वेळी नित्याच्या सवयींमुळे नीट जेवण जात नाही. पर्यटनात भूक न लागणाऱ्यांनाही भरपूर भूक लागते. त्यामुळे खूप खावेसे वाटते. पर्यटनात जेवणापेक्षा बाहेरचे खाणेच लोक पसंत करतात. येईल त्या उपहारगृहात मिळेल ते खाणे, विशेषत: त्या विभागातील नवीन उपलब्ध खाद्यपदार्थ खाण्याकडे अधिक प्रवृत्ती दिसून येते. अशा खाण्याने मात्र नैसर्गिक भूक मंदावते. अनियमित जेवण हा तर पर्यटनाचा अविभाज्य भाग.

उन्हात फिरताना खूप बर्फाचे पाणी अथवा थंड पेय वारंवार प्याल्याने पोट बिघडते. उन्हातून आल्यावर आवश्यक असल्यास काही वेळ बसून नंतर थंड पेय, बर्फाचे पाणी अन्यथा उसाचा रस यांसारखे पेय प्यावे. बाहेरचे अन्न चांगले नसते, या समजुतीनेच भरून नेलेले अन्न काही दिवस लोक खातात. पण हवामानाच्या फरकामुळे अन्न नासते. असे फार शिळे अन्न खाऊ नये. हलके अन्न, फळफळावळ, रसपान, गरम, थंड पेयांचा नियमित व मर्यादित आस्वाद म्हणजेच पर्यटनातील योग्य आहार.

## प्रेक्षणीयस्थळी पोहोचल्यानंतर :

पर्यटनाला निघाल्यानंतर एखाद्या इच्छित शहरात गेल्यावर जेथे उतराल, तेथूनच सभोवतालची प्रेक्षणीय स्थळे कोणती ? त्या ठिकाणी जाण्याची वाहनांची सोय काय ? अंदाजे भाडे किती ? टॅक्सी, रिक्षाला मीटर आहे का ? सर्वसाधारण जाण्याचे रस्ते कोणते ? याची कल्पना आधी नीटपणे घेऊन बाहेर पडावे.

येथे मात्र सूक्ष्म निरीक्षण-शक्तीची आवश्यकता असते. प्रेक्षणीय स्थळ नवीनच असल्याने आपल्याला (गाईड) मार्गदर्शकाची गरज लागते. प्रेक्षणीय स्थळी किंवा टूरिस्ट सेंटरला गाईड उपलब्ध असतात. पर्यटन कार्यालयाजवळदेखील अधिकृत गाईड असू शकतात. माहीतगार माणसाला गाईड म्हणून निवडलेले बरे. वारेमाप

बडबडणारे लोक उपयुक्त ठरत नाहीत. गाईड निवडणे हेही एक कसब आहे. गाईडला परवाना आहे की नाही, हे आपण पाहू शकतो. गाईडचा मोबदला सामान्यत: ठराविक असतो. तरी दोन-तीन गाईड्सना विचारून खात्री करून घ्यावी.

प्रेक्षणीय स्थळ गाईडच्या नेतृत्वाखाली पाहावयाचे असल्यास आपण त्याला प्रश्न विचारायला काहीही हरकत नाही, मात्र त्यामागे जाणून घेण्याची जिज्ञासा असावी. नाहीतर सवयीने तो पाठ केलेल्या शब्दात भराभर माहिती सांगून मोकळा होतो. ज्यांना या माहितीवर आधारित लेखन करायचे आहे, व्याख्याने द्यावयाची आहेत किंवा त्यावर अभ्यास करायचा आहे, त्यांनी अशा वेळी एक टेपरेकॉर्डर वापरून सर्व माहिती संकलित करावी. गाईड एखादी गोष्ट समजावून सांगत असताना लक्षपूर्वक ऐकावे. काही वेळा बरेच प्रवासी माहितीकडे दुर्लक्ष करून समोर दिसणाऱ्या एखाद्या सुंदर दृश्याकडे पाहण्यात मग्न असतात. प्रेक्षणीय स्थळ पाहण्यापूर्वी त्यावर आधीच वाचन करून गेले तर उत्तम.

प्रेक्षणीय स्थळ कसे पाहायचे, हे त्या ठिकाणी आपण पर्यटनाला किती वेळ देणार आहात, यावर अवलंबून आहे. पर्यटन-कंपनीबरोबर गेलात, तर त्यांना त्या दिवशी जेवढी स्थळे दाखवायची असतील, तेवढा ठराविक वेळ ते नियोजित करतात. तेवढ्या वेळात आपल्याला ते पाहून आटोपावयाला हवे. अशा वेळी पर्यटक व संयोजक यांच्यात खटके उडण्याची शक्यता असते, पण दोघांनीही समजुतीने घ्यायला हवे. पर्यटकांना तेथे जादा वेळ हवा असतो. तर संयोजकांना दुसऱ्या ठिकाणी पोहोचण्याची घाई असते.

जे लोक अभ्यासासाठी जातात, त्यांना मात्र रोज ठराविक भाग पाहून त्यावर नोटस् घ्याव्या लागतात. अर्थात असे लोक थोडे असतात. पर्यटन म्हणजे केवळ अभ्यास, ही कल्पनाच चुकीची आहे. त्याचबरोबर आलो आहोत, तर दिसेल ते डोळ्यांनी पाहून घ्यायचे आणि त्यासंबंधी माहिती मात्र काहीच मिळवायची नाही, असेही होऊ नये. दृश्यस्वरूप वस्तूमागील पूर्वपीठिका ऐकायला मिळावी, तर ते स्थळ खऱ्या अर्थाने पाहिल्याचे समाधान लाभते.

कोणतेही स्थळ पाहताना प्रथम जिज्ञासा जागृत व्हायला हवी. मनात अनेक विचारतरंग उठायला हवेत. या स्थळाची महती काय ? यामागील इतिहास, ? प्रेक्षणीय वास्तूत कोणकोणती दालने आहेत ? त्या प्रत्येक भागाचे वैशिष्ट्य काय ? बांधकाम व घडण कशी आहे ? त्यासाठी कोणत्या पदार्थांचा वापर केला आहे ? नक्षीकाम, भव्यता, शिल्पाकृती कशा आहेत ? त्या प्रत्येकात असलेली भावगर्भता काय ? कालप्रवाह कोणता ? अशा अनेक प्रश्नांची गाईडकडून, शेजाऱ्यांकडून, कोठूनही उत्तरे मिळवली की, ते प्रेक्षणीय स्थळ पाहण्याचे सार्थक झाले, म्हणून समजावे.

ताजमहाल पाहिला, म्हणजे काय पाहिले ? असा प्रश्न मी कित्येक पर्यटकांना विचारला आणि काय मजेची उत्तरे ! वाहवा ! वा ! अति उत्तम ! सुंदर ! काय घुमट, काय मीनार ! शहाजहानने बांधलेली मुमताजची स्मृती. झाली ठरावीक ठशाची उत्तरे !

प्रत्यक्ष ताज पाहिला, म्हणजे त्यातील दगडादगडावर नेमके काय कोरले होते, याचा आपण अंदाजही घेत नाही. पर्यटन हा मौज व आनंदाचा भाग असल्याने एवढे सूक्ष्म अवलोकन हवे कशाला, असेही कुणाला वाटेल, पण प्रेक्षणीय स्थळापासून दूर असताना जेव्हा त्या स्थळाचे वर्णन आपण हुबेहूब शब्दचित्र करू शकतो तेव्हा ते स्थळ पाहिल्याचे खरे समाधान आपल्याला तर लाभतेच; पण इतर ऐकणाऱ्यांनाही पर्यटन न करता त्या स्थळांतील सौंदर्याचा आस्वाद लुटता येतो.

विशेषत: प्रेक्षणीय स्थळी शिक्षक, विद्यार्थी जातात, तेव्हा त्यांनी तेथेच प्रत्येक ठिकाणच्या स्थळाविषयी लहानसे टिपण तयार करावे. कालांतराने हे टिपण काढून वाचले, तर तो आनंद पुन्हा लाभतो.

प्रेक्षणीय स्थळी पोहोचल्यानंतर तेथे पहिली खबरदारी घ्यायची, ती त्या स्थळाच्या सौंदर्याला आपल्या अवाजवी जिज्ञासेने काही गालबोट तर लागणार नाही ना, या गोष्टीची. तेथील चुना कसा आहे, म्हणून चाकूने खडपाच काढून बघितला. संगमरवरावरचा कोपराच फोडून दगड खिशात घातला. हे अगदी वाईट. ऐतिहासिक स्थळे ही आपल्या देशाच्या प्राचीन कलात्मक वैभवाचा अभिमान वाटावा अशी सदोदित आनंद देणारी प्रेक्षणीय स्थळे आहेत. त्यांना दुधावरच्या सायीसारखे जपले पाहिजे. सौंदर्यप्रेमी वा विचारवंतांना हे कळते पण केवळ पर्यटनासाठी पर्यटन करणाऱ्या अतिउत्साही पर्यटकांच्या हे लक्षात येत नाही. असे नुकसान करणे हा कायदेभंगही आहे. पान खाऊन थुंकणे, तंबाखूची पिचकारी टाकणे, खाल्लेल्या वस्तूंचा कचरा सांडणे हा बेशिस्तपणा आहे. कारण हे वागणेही गैरवाजवीच वाटते. असे नाही तर देशी-परदेशी त्यावेळी चारचौघात आपली नाचक्की होते याची आपल्याला कल्पना नसते.

आपलं नाव व्हावं असे सर्वांनाच वाटते. पण ते काळ्या कोळशाने आपण "काळे करून" रंगवावे हा मात्र सूज्ञपणा नाही. सहलीला आलेले बरेच लोक आपण येऊन गेल्याच्या पाऊलखुणा पर्यटनस्थळी ठेऊ इच्छितात. ही पण एक क्रेझच म्हणावी लागेल. पर्यटन कंपू रंगीत खडूने, खिळ्याने अथवा कोळशाने आपले नाव, गाव, पत्ता तारीख त्या प्रेक्षणीय स्थळी भिंतीवर कोरतात. अगदी शहाजहानला पण एवढा भव्य ताज बांधल्यावर आपल्या नावाची पाटी कोरावी अशी इच्छा झाली नाही. पण हे औट घटकेचे "शहेनशहा" मात्र आपले नाव चिरंतन होण्यासाठी केविलवाणी धडपड करतात. याची कींव कराविशी वाटते.

प्रेक्षणीय स्थळ इतरांनापण पहायला हवे याची जाणीव मनाला शिवली तरी अशा सौंदर्यस्थळी कोणतेही अपकृत्य करायला आपण धजणार नाही.

सौंदर्यस्थळे हा अमोल खजिना आहे. तो लुटायचा नेत्रसुखाने. स्पर्शाविना त्याची जोपासना करायची. पुढच्या पिढ्यांना ते पहायचे आहे. परकीयांना येथे येऊन त्या भारतीय कलेचा आस्वाद घ्यायचा आहे हेही विसरून चालणार नाही. आपण आपली कला डागाळून कसे चालेल ?

सौंदर्यस्थळे ही लोकांसाठी आणि खऱ्या अर्थाने लोकांचीच असतात. सरकार ती फक्त जोपासते. आपल्या अनुपमेय, अतुलनीय सौंदर्याला हजारो, लाखो वर्षांचे आयुष्य लाभावे असे आपणाला प्रेक्षणीय स्थळी पोहोचल्यानंतर खचितच वाटले पाहिजे. भारतीयांच्या अभिमानाच्या त्या खूणा आहेत.

**प्रवासास निघण्यापूर्वी :–**

१) काढलेली तिकीटे बॅगमध्ये आधी ठेवा.

२) आपण सहलीबाबत मिळवलेली माहिती पुस्तकाच्या माहितीपत्रकात ठेवा.

३) नोटा, सुटे पैसे, ट्रॅव्हलर चेक्स वेगवेगळ्या सुरक्षित जागी ठेवा.

४) आपण प्रवासासाठी बरोबर घेतलेल्या सामानाची एक यादी स्वत:जवळ व एक यादी घरी ठेवावी.

५) आपण कोणत्या दिवशी कोठे रहाणार व जाणार याविषयीची आपली संपूर्ण दिनचर्या जवळच्या व्यक्तीस देऊन ठेवावी.

६) प्रवासाच्या ठरलेल्या मार्गात वारंवार बदल करू नका.

७) येताना खरेदी केलेल्या वस्तू ठेवण्यासाठी रिकामी फोल्डींग बॅग्ज् जवळ असावी.

८) बॅटरी, वॉटरबॅग, नेहमी लागणारी औषधे, मेणबत्ती पूडा, काडीपेटी, सुईदोरा, सौंदर्य-प्रसाधने, तेल, पेस्ट, साबण, शेव्हींग सामान, गॉगल, ओले कपडे ठेवण्यासाठी प्लॅस्टिक पिशवी, रोजचे कपडे, अंथरुण-पांघरूण, हवेची उशी इ. आवश्यक वस्तू जवळ ठेवाव्यात.

९) रिकाम्या घरात मौल्यवान वस्तू, दागिने व इतर साधने ठेऊन पर्यटनास निघू नये. सेफव्हाल्टची वा विश्वासू व्यक्तीची मदत घ्यावी.

१०) वाटेत नातेवाईकांना भेटावयाचे असल्यास त्याचे पत्ते लिहून बरोबर घ्यावेत.

ताजमहाल पाहिला, म्हणजे काय पाहिले ? असा प्रश्न मी कित्येक पर्यटकांना विचारला आणि काय मजेची उत्तरे ! वाहवा ! वा ! अति उत्तम ! सुंदर ! काय घुमट, काय मीनार ! शहाजहानने बांधलेली मुमताजची स्मृती. झाली ठरावीक ठशाची उत्तरे !

प्रत्यक्ष ताज पाहिला, म्हणजे त्यातील दगडादगडावर नेमके काय कोरले होते, याचा आपण अंदाजही घेत नाही. पर्यटन हा मौज व आनंदाचा भाग असल्याने एवढे सूक्ष्म अवलोकन हवे कशाला, असेही कुणाला वाटेल, पण प्रेक्षणीय स्थळापासून दूर असताना जेव्हा त्या स्थळाचे वर्णन आपण हुबेहूब शब्दचित्र करू शकतो तेव्हा ते स्थळ पाहिल्याचे खरे समाधान आपल्याला तर लाभतेच; पण इतर ऐकणाऱ्यांनाही पर्यटन न करता त्या स्थळांतील सौंदर्याचा आस्वाद लुटता येतो.

विशेषत: प्रेक्षणीय स्थळी शिक्षक, विद्यार्थी जातात, तेव्हा त्यांनी तेथेच प्रत्येक ठिकाणच्या स्थळाविषयी लहानसे टिपण तयार करावे. कालांतराने हे टिपण काढून वाचले, तर तो आनंद पुन्हा लाभतो.

प्रेक्षणीय स्थळी पोहोचल्यानंतर तेथे पहिली खबरदारी घ्यायची, ती त्या स्थळाच्या सौंदर्याला आपल्या अवाजवी जिज्ञासेने काही गालबोट तर लागणार नाही ना, या गोष्टीची. तेथील चुना कसा आहे, म्हणून चाकूने खडपाच काढून बघितला. संगमरवरावरचा कोपराच फोडून दगड खिशात घातला. हे अगदी वाईट. ऐतिहासिक स्थळे ही आपल्या देशाच्या प्राचीन कलात्मक वैभवाचा अभिमान वाटावा अशी सदोदित आनंद देणारी प्रेक्षणीय स्थळे आहेत. त्यांना दुधावरच्या सायीसारखे जपले पाहिजे. सौंदर्यप्रेमी वा विचारवंतांना हे कळते पण केवळ पर्यटनासाठी पर्यटन करणाऱ्या अतिउत्साही पर्यटकांच्या हे लक्षात येत नाही. असे नुकसान करणे हा कायदेभंगही आहे. पान खाऊन थुंकणे, तंबाखूची पिचकारी टाकणे, खाल्लेल्या वस्तूंचा कचरा सांडणे हा बेशिस्तपणा आहे. कारण हे वागणेही गैरवाजवीच वाटते. असे नाही तर देशी-परदेशी त्यावेळी चारचौघात आपली नाचक्की होते याची आपल्याला कल्पना नसते.

आपलं नाव व्हावं असे सर्वांनाच वाटते. पण ते काळ्या कोळशाने आपण "काळे करून" रंगवावे हा मात्र सूज्ञपणा नाही. सहलीला आलेले बरेच लोक आपण येऊन गेल्याच्या पाऊलखुणा पर्यटनस्थळी ठेऊ इच्छितात. ही पण एक क्रेझच म्हणावी लागेल. पर्यटन कंपू रंगीत खडूने, खिळ्याने अथवा कोळशाने आपले नाव, गाव, पत्ता तारीख त्या प्रेक्षणीय स्थळी भिंतीवर कोरतात. अगदी शहाजहानला पण एवढा भव्य ताज बांधल्यावर आपल्या नावाची पाटी कोरावी अशी इच्छा झाली नाही. पण हे औट घटकेचे "शहेनशहा" मात्र आपले नाव चिरंतन होण्यासाठी केविलवाणी धडपड करतात. याची कींव कराविशी वाटते.

प्रेक्षणीय स्थळ इतरांनापण पहायला हवे याची जाणीव मनाला शिवली तरी अशा सौंदर्यस्थळी कोणतेही अपकृत्य करायला आपण धजणार नाही.

सौंदर्यस्थळे हा अमोल खजिना आहे. तो लुटायचा नेत्रसुखाने. स्पर्शाविना त्याची जोपासना करायची. पुढच्या पिढ्यांना ते पहायचे आहे. परकीयांना येथे येऊन त्या भारतीय कलेचा आस्वाद घ्यायचा आहे हेही विसरून चालणार नाही. आपण आपली कला डागाळून कसे चालेल ?

सौंदर्यस्थळे ही लोकांसाठी आणि खऱ्या अर्थाने लोकांचीच असतात. सरकार ती फक्त जोपासते. आपल्या अनुपमेय, अतुलनीय सौंदर्याला हजारो, लाखो वर्षांचे आयुष्य लाभावे असे आपणाला प्रेक्षणीय स्थळी पोहोचल्यानंतर खचितच वाटले पाहिजे. भारतीयांच्या अभिमानाच्या त्या खूणा आहेत.

**प्रवासास निघण्यापूर्वी :–**

१) काढलेली तिकीटे बॅगमध्ये आधी ठेवा.

२) आपण सहलीबाबत मिळवलेली माहिती पुस्तकाच्या माहितीपत्रकात ठेवा.

३) नोटा, सुटे पैसे, ट्रॅव्हलर चेक्स वेगवेगळ्या सुरक्षित जागी ठेवा.

४) आपण प्रवासासाठी बरोबर घेतलेल्या सामानाची एक यादी स्वत:जवळ व एक यादी घरी ठेवावी.

५) आपण कोणत्या दिवशी कोठे रहाणार व जाणार याविषयीची आपली संपूर्ण दिनचर्या जवळच्या व्यक्तीस देऊन ठेवावी.

६) प्रवासाच्या ठरलेल्या मार्गात वारंवार बदल करू नका.

७) येताना खरेदी केलेल्या वस्तू ठेवण्यासाठी रिकामी फोल्डींग बॅग्ज् जवळ असावी.

८) बॅटरी, वॉटरबॅग, नेहमी लागणारी औषधे, मेणबत्ती पूडा, काडीपेटी, सुईदोरा, सौंदर्य-प्रसाधने, तेल, पेस्ट, साबण, शेव्हींग सामान, गॉगल, ओले कपडे ठेवण्यासाठी प्लॅस्टिक पिशवी, रोजचे कपडे, अंथरुण-पांघरूण, हवेची उशी इ. आवश्यक वस्तू जवळ ठेवाव्यात.

९) रिकाम्या घरात मौल्यवान वस्तू, दागिने व इतर साधने ठेऊन पर्यटनास निघू नये. सेफव्हाल्टची वा विश्वासू व्यक्तीची मदत घ्यावी.

१०) वाटेत नातेवाईकांना भेटावयाचे असल्यास त्याचे पत्ते लिहून बरोबर घ्यावेत.

११) खरेदी करताना आपणाला किती खर्च करावयाचा आहे याविषयी आधीच अंदाजपत्रक तयार करा.

१२) संकटाचे वेळी आधार म्हणून एखादी सोन्याची अंगठी, चेन जवळ बाळगणे योग्य ठरेल. वेळ काही सांगून येत नाही.

१३) रिझर्व्हेशनची खात्री करून घ्यावी.

१४) रेल्वेचे वेळापत्रक व प्रवास गाईडबुक जवळच बाळगावे.

१५) लहान मुलांचे आवश्यक कपडे व खाणे जवळ बाळगावे.

१६) आजारी असल्यास प्रवासाला न निघणं बरं.

१७) प्रवासात निघण्यापूर्वी पोटभर जेवू नये. तसेच पाणी जास्त पिऊ नये.

१८) प्रवासात संयमानं वागल्यास सहसा भांडण्याची वेळ येत नाही.

१९) वेळ जाण्यासाठी पत्ते-बुद्धीबळ, वाचनीय पुस्तक-मासिके जवळ असलेली बरी.

२०) एक मोठी दोरी असावी. कपडे वाळत घालण्यास किंवा बांधाबांध करण्यास ती उपयुक्त ठरते.

२१) आपल्या नोकरीच्या ठिकाणाचा पूर्ण पत्ता व फोन नंबर बरोबर ठेवावा.

२२) ऐनवेळी तयारी करून प्रवासास निघणे योग्य नव्हे. यासाठी २-३ दिवस अगोदर सामान बांधून ठेवा.

२३) फोल्डींग छत्री, हॅट, बरोबर असलेली बरी.

२४) प्रवासात तोंडाला चव राहाण्यासाठी घरगुती लोणचे, आलेपाक, लसूण, तिखट, मोरंबा, साखरआंबा तसेच मांसाहारी लोकांनी सुकी मच्छी इ. पदार्थ जवळ ठेवणे बरे.

२५) आपले संपूर्ण नांव, घरचा पत्ता व फोन आपल्या बॅगेवर लिहिलेला असावा.

२६) २ ते ४ दिवसांनी आपल्या खुशालीचे पत्र घरी लिहावे. शक्यतो पाकीटे व पोस्टकार्डे प्रवासाला निघताना बरोबर असावीत.

२७) खरेदीच्या वेळी आपण फसणार नाही याविषयी दक्ष असावे. तसेच ज्या व्यक्तिने आपणास दुकानात आणले आहे त्याचे कमिशन आपल्या खरेदीत नाही ना याचा अंदाज घ्यावा. गॅरंटी मिळेल अशा दुकानातच खरेदी करावी.

२८) हमाल, रिक्षा, टॅक्सी, बोर्डींग, गाईड, घोडा इ. ठरवताना त्याचे दर चार-चार वेळा ठरवून कच्च्या कागदावर लिहून त्यांची सही घ्या.

अन्यथा नंतर सर्व्हिस चार्ज, बक्षिसी, मीटरपेक्षा जादा पैसे घणे, अशा प्रकारच्या अनेक बाबी तापदायक होतात.

२९) प्रवासात अपरिचित ठिकाणी निष्कारण एखादे धाडस करू नका.

३०) वेगवेगळ्या नोंदी करून घेण्यासाठी अथवा हिशोबासाठी एक लहान पॉकेट-डायरी व पेन सतत आपल्या बरोबर ठेवावे.

३१) प्रवासात उघडे जिन्नस किंवा आईसकांडी सारखे पदार्थ खाऊ नका.

३२) प्रवासापूर्वी कॉलरा-टॉयफाईड इंजेक्शन घेऊन निघणे चांगले.

३३) राहाण्याचे ठिकाणी खोलीला लावण्यासाठी एक कुलुप-किल्ली बरोबर असावी.

३४) बरोबर आवळा सुपारी, लवंग, वेलदोडा इ. ठेवावे. जेवणात आमसूल वापरल्यास पित्ताचा त्रास कमी होतो. तसेच प्रथमोपचाराचे साहित्य आयोडीन, कापूस, बरनॉल, बॅन्डेज आयोडेक्स, पोटॅशिअम परमॅगनेटची पावडर (जखम धुण्यास) याशिवाय ताप, डोके दुखी व डिसेंट्रीसाठी गोळ्या, अमृतांजन इ. जवळ ठेवावे.

३५) रेल्वे प्रवासात सामान चोरीस जाण्याची शक्यता असते ते स्लीपरला बांधून ठेवणेसाठी एक साखळी व कुलूप बरोबर असणे चांगले.

आपला प्रवास सुखाचा होवो ! (Wish you best of journy)

० ० ०

श्रीनगर मध्ये मध्यवर्ती ठिकाणी उत्तम हॉटेल

# विक्रम गेस्ट हाऊस

—महाराष्ट्रीय लोकांचे श्रद्धास्थान—

मध्यमवर्गीय लोकांना अल्पखर्चात सर्वसुखसोयीयुक्त राहणे व जेवणाची उत्तम सोय

**वैशिष्ठ्ये :—** घरगुती वातावरण ♦ गुलाब-सफरचंद व चिनारची भव्य बाग ♦ खेळण्यासाठी पटांगण ♦ कार व बस पार्कींग ♦ ग्रुपसाठी भव्य दोन हॉल ♦ फॅमिलीसाठी २७ बेड रूम ♦ डायनिंग हॉल ♦ रनिंग हॉट वॉटर ♦ साईड सीन बाबतचे मोफत मार्गदर्शन ♦ लालचौक पासून पांच मिनिटांचे अंतरावर.

**— आपण आमचेकडेच बुकींग करा —**

(वरील नांवावर ड्राफ्ट पाठवावा) फोन किंवा पत्राने बुकींग करा.

आपला

**राजकुमार मदन**

'गौ का दल' मंदिर बाग, रतनरानी हॉस्पिटल जवळ, श्रीनगर 190 001

फोन : ७७७९५ किंवा ७४२७६.

(टिपः—ज्यादा माहितीसाठी किंवा बुकींगसाठी चितारी ट्रॅव्हलसला भेटा.)





भारताचे नंदनवन म्हणून संबोधलेल्या " काश्मिर "चे निसर्गसौंदर्य शब्दांकित करणे खरोखरीच कठीण आहे. परमेश्वराने काश्मिरच्या भूमीत निसर्गसौंदर्याची केलेली लयलूट अनुपमेय आहे. ज्या शाही सम्राटांच्या समोर हिंदुस्थानातील प्रत्येक ताठ मानेला झुकून मुजरा करावा लागे, त्या सम्राटांना काश्मिरच्या सौंदर्यशाली साम्राज्यापुढे आपले बादशाही मुगुट झुकवावे लागले. अनासक्त संन्यासी वृत्तीच्या, काळ्या कातळांच्या गुहांत साधना करणाऱ्या बौद्ध भिक्षूंना पण क्षणभर विचलित करून काश्मिरने सौंदर्यासक्ती निर्माण केलेली आहे. पाश्चिमात्य शीत प्रदेशातून येणाऱ्या गौरवर्णी युरोपियनांना आपापल्या देशातील निसर्ग सौंदर्याचा अभिमान फार मोठा. पण काश्मिरमध्ये पाऊल टाकताच तेथील स्वर्गीय सौंदर्याने बेहद्द खूष होणाऱ्या युरोपियनांच्या गुलाबी ओठांतून काश्मिरबद्दल शब्द उमटतात . . .

Beautiful ! simply beautiful ! !

" सौंदर्य म्हणजे काय, तर ते फक्त काश्मिरच ! "

काश्मिरला सर्व सुंदर म्हणतात, म्हणून काश्मिर सुंदर आहे, असे नाही. " काश्मिर " या शब्दाचाच अर्थ सौंदर्य आहे. सुंदरता आणि काश्मिर या दोन संज्ञा एकमेकांशी इतक्या निगडित झाल्या आहेत की, त्यांच्या अद्वैतातून ' काश्मिर म्हणजे सौंदर्य ', की ' सौंदर्य म्हणजे काश्मिर ' याची उकल करणेच कठीण आहे.

काश्मिरच्या सौंदर्याचे सारे श्रेय आहे तेथील गगनचुंबी बर्फाच्छादित पर्वत शिखरे, झुळझुळणारे निर्झर, दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या, हिरवी गच्च कुरणे आणि वृक्षवेलींना हव्या त्या आकारात, हव्या त्या रंगात, हव्या त्या जागी कोरलेल्या नैसर्गिक वेलबुट्टीत. अशा प्रत्येक नैसर्गिक घटकाने आपले स्वतःचे असे काही खास सौंदर्य निर्माण केले आहे. चिरतरुण हिरव्या चिनारची भव्यता आणि पुरुषार्थाचा गौरव करावा, तोच लालचुटुक कळ्यांच्या ओठांनी नाजूक हसणाऱ्या वेलीने आपल्या चपळ सुंदर शरीराला दृष्टीच्या मिठीत झोकून दिले की, भान हरपते. कुणाला पाहावे ? कुणाला स्पर्शावे ? धुंद मन भुंग्याप्रमाणे बेभान गिरक्या घेत फुलाफळांवर नाचते.


Kashmir
WULAR LAKE
BANDIPUR
SONAMARG
KOLAHOI GLACIER
AMARNATH CAVES
SHESHNAG
CHANDANWARI
PHALGAM
LIDDERWAT
LIDDER
GANDERBAL
TARSAR
ARU
MANASBAL LAKE
TANG MARG
SRINAGAR
PAMPORE
AVANTIPUR
MARTAND
ANANTNAG
ACHABAL
KOKERNAG
VERINAG
GULMARG
KHILANMARG
ALPATHER
YUS MARG
BANIHAL PASS
BATOTE
PATNITOP
KUD
VAISHNODEVI
KATRA
AKHNOOR
JAMMU TAWI

मृदुल परागकणांच्या स्पर्शाने सुखावते. वृक्षांची नजर चुकवीत कोमल वेलींच्या बोटांत बोटे गुंफली जातात. अनामिक स्पर्शाने पाकळ्या रोमांचित होतात, तर उमललेल्या गेंदेदार फुलांना केलेल्या स्पर्शाने हरित सौदामिनी भांबावून जातात.

निरागस नितळ सौंदर्याबरोबर निसर्ग-शृंगाराची अनुभूती चाखावी काश्मिर-मध्येच. नवोदित तारुण्याने उमललेल्या गौरकाय नववधूने हिरवा शालू परिधान केला, की सौंदर्य या संकल्पनेचा परमोच्च बिंदू गाठला म्हणायला हरकत नाही.

काश्मिरच्या भूमीचे असेच काहीसे आहे. बर्फामुळे गौरकाय वाटणाऱ्या या भूमीने मंद हिरवळीचे रेशमी वस्त्र परिधान केलेले असते. चापूनचोपून परिधान केलेल्या या वस्त्राआड असलेल्या अंगप्रत्यंगाच्या आकाराने जहाँगीरसारख्या सौंदर्यासक्त बादशहाला पण नूरजहाँचे अनुपमेय सौंदर्य कमीच वाटले असेल.

हिरवळीच्या हिरव्या गच्च काचोळीखाली पृथ्वीच्या उन्नत उरोजांची डेरेदार पर्वत टोके पाहताना अनेक सौंदर्यसम्राज्ञींनी आपल्या माना खाली झुकवल्या असतील. प्रतिभावंत चित्रकार किंवा कवींची खळखळणारी प्रतिभा थंडीने बर्फ गोठावे, तशी अचानक गोठून स्तब्ध झाली असेल. वर्णनासाठी झुळझुळ वाहणारे शब्द पण निःस्तब्ध होऊन या शाही सौंदर्याने जागच्या जागीच स्थिरावले असतील. निसर्गसौंदर्याने वेडावून टाकणाऱ्या पुरुषांच्या डोळ्यांतील मादक झलक पाहून सौंदर्यशालिनींना पण काश्मिर भूमीबद्दल सवतीमत्सर निर्माण झाला असेल.

काश्मिरला खऱ्या अर्थाने सुजलाम्-सुफलाम् केले आहे तेथील नद्या, निर्झर, ओढे आणि सरोवरांनी. सरोवरे म्हणजे तेजोरसाने भरून ठेवलेली रुपेरी भांडीच. कडेला रंगीबेरंगी शिकाऱ्यांची झालर. मध्यभागी कमळ, गुलाबांची ताटवी फुलवणारी बेटे, जलाशयात स्थिर उभे राहून वर्षानुवर्ष तपश्चर्या करणारे स्थितप्रज्ञ चिनार. सारेच दृश्य विलोभनीय.

निर्झर आणि नद्यांची नागमोडी चाल अन् खळखळ ऐकली की, स्वर्गात इंद्राच्या दरबारात मुजरा करणाऱ्या सुंदर अप्सरांची आठवण होते. पायांत घुंगरू बांधून पदन्यास करणाऱ्या अप्सरांच्या घुंगरू-नादाप्रमाणे सरितांचे खळखळ आवाज मनाला खिळवून टाकतात. नद्या वाहताताच मुळी लहान गोल आकाराच्या दगड-गोट्यांतून, उंच-सखल भागात उड्या घेत. दगडांच्या शुष्क जीवनाला जीवनसरितेच्या ओल्या स्पर्शाने आशेचे अंकुर फुटत असतील. काठाशी कोठेकोठे काळेकभिन्न खडक माना पुढे काढून सज्ज झालेले. पाण्याची पातळी वाढली की, सरितेच्या लहरींच्या ओठांना स्पर्श करताना कातळाचे काळीजही थरारत असेल. काही काळ का होईना, थंडगार पाण्यात डुंबण्याचा आनंद ते उपभोगतात. निर्झर पर्वताखालून झिरपत बाहेर येतात. त्याना मात्र बऱ्याच ठिकाणी मानवी शिस्तीत वहावे लागते. बांधीव बारादरी,

दगडी चाकोरीतून किंवा कारंजातून फवारणी करीत चश्म्याचे पाणी कृत्रिम वाटेने पण नैसर्गिक चालीत पुढे धावत असते. काश्मिरमधील विविध बागांमध्ये केलेला निर्झरांचा उपयोग मनोरम आहे.

नद्या-निर्झरांच्या पाठीशी असतात. उंच पर्वत-टेकड्या, हिरवळी, देवदार किंवा सुरूच्या झाडांनी व्यापलेल्या गर्द काळपट हिरव्या रंगाच्या मागे उंच पर्वत-शिखरांवर बर्फ ओसंडत असते. बर्फाच्छादित शिखरांच्या खालीच ढग तरंगताना आढळतात. उंच पर्वतशिखरांना टिपण्यासाठी जाण्यास ढगांची ताकद कमी पडत असावी.

सूर्योदयाला बर्फाच्छादित शिखरांचे चमकणारे रुपेरी कडे डोळे दिपवून टाकतात. गौरीला पाहून शंकराची तपश्चर्या अवचित भंग व्हावी, तसेच काहीसे गौरकाय पृथ्वीला पाहून तेजस्वी सूर्याचे मन पण चलविचल होत असावे. मग पृथ्वीच्या हृदयाची धडधड तर विचारायलाच नको. नकळत यावेळी कुसुमाग्रजांचे पृथ्वीचे प्रेमगीत आठवते. पृथ्वीच्या मनात भावनांचे आवर्त उठते. हिरव्या तृणांकुराचे रोमांच शहारतात. तिचे भान हरपते. आणि ओठी शब्द येतात.

**" न जाणे, न येणे, कुठे चाललो मी, कळे तू पुढे आणि मी मागुती "**

कापलेल्या किंवा ढासळलेल्या डोंगरांच्या कडा पाहिल्या की, तेथील उभ्या चिऱ्यात मातीत रुजलेले नदीतील लहान गोलगोल दगड विपुल आढळतात. त्यावरून या प्रदेशात पूर्वी 'टेथिस' नावाचा सागर होता. नंतर भूगर्भाच्या हालचालींमुळे सारा प्रदेशच नखशिखांत बदलला असावा या विचारांना बळकटी येते. जमिनीचे तळ इतके उंच उचलले गेले की, सागराच्या जागी जगाला स्तिमित करणारी हिमालयाची उंच पर्वतराई निर्माण झाली. पण जलाशयातील अवशेष मात्र माती-खडकात रुजलेले आढळतात. अजूनही हिमालयाच्या प्रचंड कड्यांत भूचल हालचाली चालूच आहेत. प्रचंड कडे हाराकिरी केल्यासारखे खाली अंग झोकून देतात. या परिस्थितीतही कड्यासारखेच धीरगंभीर जवान येथे बर्फात उभे असतात. पण ते खूपच लांबवर.

इतर कालखंडात मात्र शिखरेच काय, सर्व बाजूला बर्फ आढळते. नोव्हेंबर ते जानेवारी या महिन्यांत रस्ते, झाडे, घरांची छपरे, जलाशये सारे-सारे बर्फाच्छादित असते. मार्च ते मे मात्र बर्फ वितळू लागते. फक्त पर्वतशिखरे बर्फाच्छादित असतात. पर्वताच्या घळ्यांतून बर्फ वाहत खाली येते किंवा नद्यांच्या काठांशी प्रचंड हिमकडे आढळतात. या कालखंडातील भुसभुशीतपणे एकत्र आलेला बर्फ टणक नसतो. ठिसूळ असतो. अमोनियापासून तयार केलेल्या बर्फाचा हाताला ठणका लागतो. पण या भुसभुशीत बर्फाचे हाताने गोळे करता येतात. त्या बर्फाचा त्या वातावरणात गारवा पण कमी भासतो. बर्फाची लादी पाहिली, तरी गार होणारे मन चहूकडे बर्फाचा शिडकावा पाहून किती प्रमुदित होत असेल ? याची कल्पनाच केलेली बरी.

दमट किंवा कोरडया हवामानाच्या प्रदेशातून प्रथमच बर्फाच्छादित प्रदेशात आलेल्या प्रवाशांची मने त्या आगळ्या-वेगळ्या सौंदर्याने गोठून मुग्ध होतात. धुंद मने उंच कडयांची पर्वा न करता दृष्टीच्या आधाराने उंच उंच कडे चढत शिरपटावर आरूढ होतात. अन् पुन: घसरणीला लागून तळापर्यंत घसरत येतात. अनुभव प्रत्यक्ष, पण खेळ मनाचा.

प्रभुसृष्टीच्या रंगाऱ्याने काश्मिरच्या भूमीत उधळलेले रंग अमाप आश्चर्यकारक, अतुलनीय आहेत. एकाच रंगाचे मैल न् मैल गुलाबी, पिवळे किंवा जांभळ्या फुलांचे ताटवे पाहिले, की वाटते, परमेश्वराने एकाच रंगाचे घडे तर येथे रिते केले नसतील ना ? एकाच वेळी अगणित फुले कशी जन्माला येतात ? रंगकाम करून कंटाळलेल्या परमेश्वराने आपले रंगीबेरंगी कुंचले काही ठिकाणी झटकले असतील का ? बस्स ! तेच थेंब उडाले पिवळ्या नारंगी फुलांवर आणि त्यांचे अंग नक्षीदार झाले. फुले आणि फुलपाखरे यांची तर अंगावरील नक्षींची व रंगाची स्पर्धाच लागलेली. केशराच्या बागेतील निळी-जांभळी फुले आणि शाहीबागांत असलेली रंगीबेरंगी फुले स्त्रियांकडे पाहून खुदकन् हसतात. आपण सर्वाधिक सुंदर आहोत, असे वाटणाऱ्या प्रत्येक स्त्रीचा सौंदर्याचा गर्व या फुलांसमोर फुका वाटावा. नाजुक गुलाबी ओठांतून घरंगळलेले शब्द वातावरणात गोठून जातात. गोरीपान लांबसडक बोटे शिवशिवतात पुष्प-स्पर्शासाठी. नाजूक बोटांनी तोडलेले फूल रेशमी काळ्याभोर केशपाशात जखडले जाते. पण आपण सौंदर्यशाली मुखकमलावर विराजमान झाल्याचे विजयी हास्य मात्र फुलांच्या ओठांत तसेच विलसित होते.

काश्मिर म्हणजे बर्फाच्छादित पर्वत-शिखरांनी चहुबाजूंनी व्यापलेला एक रूपेरी फ्लॉवरपॉटच आहे. यात परमेश्वराने केलेली वृक्षवेली व फुलांची रचना, इतकी अप्रतिम आहे की, पुन: जपानमध्ये पुष्परचना शिकण्याची आवश्यकताच नाही. रंगसंगतीसाठी आसुसलेली नजर ही नैसर्गिक रंगीबेरंगी पुष्परचना पाहून तृप्त होते. या बर्फाच्छादित शीतल प्रदेशातील फुलांचे जीवन आणि सौंदर्य अमर असावे.

काश्मिरमधील वृक्षांचा राजा चिनारच असावा. त्या वृक्षांची भव्यता, दिमाख थेट राजशाही थाटाप्रमाणेच. चिनारचा जन्मच मुळी नूरजहाँच्या राजघराण्यातील. म्हणूनच शाही सौंदर्याचा दिमाख शेकडो वर्षांनंतर आजही तसाच कायम आहे. काश्मिरमध्ये प्रवेश करताना दुतर्फा उंचच्या उंच सरळ रांगेत उभे असलेले सफेदा वृक्ष पर्यटकांना मानाची पहिली सलामी देतात. त्यांचा मुजरा घेत या सौंदर्यशाली हिरव्या मखमली प्रदेशात आपण केव्हा शिरतो, हे लक्षातच येत नाही. एकदा काश्मिरच्या गोड-गुलाबी मिठीत सापडलो की, आपण आपले उरत नाही.

काश्मिरच्या नैसर्गिक सौंदर्याला मिळालेले वरदान येथील काश्मिरी लोकांना पण लाभलेले आहे. काश्मिरी मुले म्हणजे टवटवीत उमललेली गुलाबांची फुलेच.

त्यांच्या गालांवरची गुलाबी झलक पाहून अस्सल गुलाब पण त्यांचा हेवा करीत असतील. इवले इवले हात हलवीत ही हसरी फुले अनोळखी पर्यटकांना पण रिझवितात. येथे बालकवींच्या कवितेची प्रकर्षाने आठवण येते.......

**हिरवे हिरवे गार गालिचे**
**हरित तृणांच्या मखमालीचे**
**त्या सुंदर मखमालीवरती**
**फुलराणी ही खेळत होती.**

फुलराणीसारखी ही गोंडस मुले तितकीच निष्पाप-निरागस, गुलाबी चेहरा, लाल गाल, गुलाबी ओठ, निळे-काळे डोळे, भुरभुर उडणारे अवखळ केस आणि लाजणारी ही मुले पाहिली की, पुन: कवितेतील पुढील ओळी आठवतात.....

**पुरा विनोदी संध्यावात**
**डोलडोलवी हिरवे शेत**
**तोच एकदा हासत आला**
**चुंबून म्हणे फुलराणीला**
**छान माझी सोनुकली ती,**
**कुणाकडे, ग, पाहत होती ?**

तृप्त मनाने आपण हात हालवून टाटा केला की, लाजून चूर झालेल्या त्या 'फुलराण्या' वाऱ्याने गुलाब डोलावा, तसे माना डोलवीत नजरेआड होतात.

"पर्यटन म्हणजे धावते सौंदर्याचे दर्शन" ही वेदना मनात सलते. काश्मिरी स्त्रियांना लाभलेले सौंदर्य तर पृथ्वीतलावावरील प्रत्येक सुंदर स्त्रीला हेवा वाटावा असे आहे. शेतात काम करणारी शेतकरी स्त्री असो वा झाडूकाम करणारी मोलकरीण असो, कुणाच्याही सौंदर्यात उणेपणा नाही. मोंगल सम्राटांच्या मनात सौंदर्य ही भावना सर्वार्थाने रुजली असेल, ती काश्मिरमध्येच. गुलाबाच्या पाकळ्यांसारखे ओठ, काळा रेशमी केशभार, चाफेकळीसारखे रेखीव नाक, बदामी डोळे आणि लुब्ध करणारा गौरवर्ण, कपाळपाठीवरून केशकलपावर बांधलेला रुमाल, कानांत झुंबर आणि ओठांच्या कडांवरून ओसंडणारे स्मित सारेच काही लोभसवाणे आविष्कार. येथे दागिने किंवा कपड्यांनी शरीर सुंदर दिसत नाही, तर या सुंदर शरीरामुळे कपडे किंवा दागिन्यांना शोभा येते.

काश्मिरला भारताचे स्वित्झर्लंड किंवा नंदनवन म्हणून उपमा देऊन काश्मिरच्या सौंदर्याचा अनुपमेय आविष्कार व्यक्त करता येत नाही. काश्मिर हे काश्मिर आहे. या लाजबाब सौंदर्याचा आस्वाद घेताना अंतर्मुख होऊन तृप्त नजरेने हा मादक

सौंदर्याचा पेला रिता करायचा असतो. काश्मिरचे सौंदर्य पाहून जहांगिरच्या ओठांवर शब्द आले......

**गर फिरदोस बरुए जमी अस्त**
**हमीं अस्तों, हमी अस्तों, हमी अस्तो**

"जिवंतपणी कोणाला पृथ्वीवर स्वर्ग बघावयाचा असेल तर तो हाच होय, हाच होय, हाच होय."

## काश्मिरची भौगोलिक पार्श्वभूमी :

लाखो वर्षांपूर्वी अति उत्तरेकडील भाग समुद्रांकित होता. दक्षिण हिंदुस्थानचा भाग आफ्रिका खंडाला जोडलेला. जर्मन तज्ज्ञ 'वेंजर' याने या विशाल भूखंडाची कल्पना मांडली होती. भूगर्भातील हालचालींमुळे या विशाल भूखंडाला प्रचंड तडे गेले व त्यात टेथिस समुद्राचे पाणी शिरले. आज मात्र येथे हिमालय पर्वत आहे. त्या ठिकाणी पूर्वी 'टेथिस' नावाचा समुद्र होता. त्याचे पुरावे आजही शास्त्रज्ञांकडे उपलब्ध आहेत. या काळात जमिनीला गेलेल्या तडयांनी अंगाराभूमी व गोंडवन असे दोन भूभाग तयार झाले. त्यांतील गोंडवनमध्ये पुन: भूस्तरीय प्रचंड हालचाली झाल्यात. टेथिस समुद्राचा तळच उचलला जाऊन त्यातून हिमालय पर्वताचा जन्म झाला. खोल समुद्राचा जगातील एक सर्वाधिक उंच पर्वत व्हावा, ही प्रचंड उलथापालथ भूगोल शास्त्रज्ञाला विस्मयकारक वाटणारी घटना आहे.

हिमालयाच्या रांगांचा परिसर, पश्चिम बलुचिस्तान ते पूर्व ब्रह्मदेश पसरलेला आहे. हिमालयातील सर्वाधिक उंच शिखरे तिबेटजवळील परिसरात आहेत. हिमालय पर्वताची शिखरे सदोदित बर्फाच्छादित असतात. हिम = बर्फ आणि आलय = घर हे बर्फाचे घर म्हणजे हिमालय. खडक-मातीची गगनचुंबी पर्वत शिखरे, हिरव्यागार वनस्पती, खळखळणाऱ्या नद्या, प्रचंड सरोवरे ही हिमालयाची संपत्ती. हिमालयाची उत्तरेकडील संरक्षक भिंत भारताला वरदान ठरली आहे.

याच हिमालयाच्या कुशीत उत्तरेला आशिया खंडातील भारत या महान राष्ट्रात काश्मिर हे निसर्गसंपन्न राज्य आहे. काश्मिरने केवळ भौगोलिक उलथापालथीच अनुभवल्या असे नाही, तर ऐतिहासिक उलथापालथीचा प्रचंड इतिहास पण काश्मिरच्या पाठीशी उभा आहे. स्त्री असो वा भूमी, त्यांना एक शापच आहे. त्यांना जर निरतिशय सौंदर्याची देणगी लाभली असेल, तर दुर्जनांच्या घातक वृत्तीला त्यांना तोंड द्यावे लागते. काश्मिरचे काहीसे तसेच आहे. स्वर्गीय सौंदर्य लाभलेल्या या भूमीवर परकीयांची नजर गेली नसती, तरच नवल! काश्मिर म्हणजे भारतमातेच्या मस्तकावर ठेवलेला मानाचा सरताज. त्यास कुणाचा स्पर्शही होऊ नये, म्हणून भारतीय लष्करी जवान रात्रंदिन खडा पहारा ठेवून त्याचे संरक्षण करीत असतात.

## काश्मिरचा प्राचीन इतिहास :

कांश्मिर हे प्राचीन कालखंडात हिमालयातून वाहत आलेल्या पाण्याने तयार झालेले एक प्रचंड सरोवर होते. याला 'सतीसार' असे संबोधले जात असे. सती म्हणजे पार्वती. पार्वती ही हिमालयाची मुलगी मानली जाते. या सरोवरात हरमुख नावाचा एक पर्वत होता. या पर्वतावर शंकर तपश्चर्या करीत असत. याच सरोवरात 'जलोद्‌भव' नावाचा राक्षस राहत होता. तो आजूबाजूच्या ऋषींना आणि लोकांना अतिशय त्रास देत असे. याचवेळी कश्यप ऋषी या प्रदेशात भ्रमण करण्यासाठी आले. त्यावेळी त्यांना हा प्रदेश फार आवडला. कश्यप ऋषींचा जन्म ब्रह्मदेवापासून झाला, असा धार्मिक इतिहास आहे. कश्यप ऋषींनी आर्य लोकांना या ठिकाणी आणून वसाहत वाढवायला सुरुवात केली. पण जलराक्षसाचा त्रास वाढतच होता. कश्यपपुत्र नीलनाग याने सरोवरातील जलराक्षसाचा शोध घेण्यास सुरुवात केली. पण त्यालाही त्यात यश आले नाही. शेवटी या राक्षसाचा विनाश करण्यासाठी कश्यप ऋषींनी विष्णूचे मन वळविण्यास सुरुवात केली. विष्णूने बलरामाला बोलावून त्याच्याकडे ही कामगिरी सोपवली.

बलरामाने आपल्या नांगराच्या साह्याने बारामुल्ला या ठिकाणी हे सरोवर फोडून पाण्यास वाट काढून दिली. हळूहळू सरोवरातील पाणी कमी होऊ लागले. तसा जलोद्‌भव राक्षस बाहेर आला आणि मग त्याचा विनाश करण्यात आला. यामुळे सर्व ऋषिजनांना अभय मिळाले. आर्यवर्तातून आलेले लोक या ठिकाणी स्थायिक झाले. काश्यपाच्या प्रयत्नाने निर्भय जीवनाची शाश्वती मिळाल्यामुळे या प्रदेशाला लोक काश्यपमरू असे संबोधीत असत. काश्यपमरू या शब्दाचाच अपभ्रंश 'काश्मिर' असा झालेला आहे. ज्याठिकाणी 'जलोद्‌भव' राक्षसाला मारले, त्या जागेस वैरनाग असे म्हणत. आता त्याच ठिकाणाला वेरीनाग असे संबोधतात. त्याच ठिकाणाहून 'झेलम' नदी उगम पावते व नंतर श्रीनगर शहरात प्रवेश करून पुढे 'सिंधू'स मिळते. नीलमत पुराणात कांश्यप ऋषींचा मुलगा नीलनाग याने येथे सुरू केलेल्या वसंतोत्सवाचा उल्लेख आहे. काश्यप मुनींना नाग लोक फार मान देत. नाग लोकांच्या काश्मिर भागात ठिकठिकाणी वसाहती असल्यामुळे अनेक गावांच्या शेवटी 'नाग' हा शब्द येतो. काश्मिर भाषेत नाग म्हणजे झरा. यालाच चश्मा सुद्धा म्हणतात.

वर उल्लेख केलेल्या नीलमत पुराणात श्रीकृष्ण व पांडवकालीन परिस्थितीचे वर्णनदेखील आहे. या ठिकाणी प्रथम 'गोनंद' राजा राज्य करीत होता. जरासंधाला श्रीकृष्णाविरुद्ध मदत करताना गोनंद व त्याचा मुलगा दामोदर दोघेही मारले गेले.

यानंतर काश्मिरमध्ये मौर्य घराण्याचे राज्य आले. मौर्य घराण्यातील यशस्वी सम्राट अशोकाचे साम्राज्य येथे पण पसरलेले होते. अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारल्याने त्या प्रचारार्थ बौद्धभिक्षू याठिकाणी आले व त्यांनी बौद्ध धर्माचा प्रचार केला.

यानंतर सम्राट कनिष्काचे राज्य येथे होते. कनिष्काच्या वेळेला काश्मिरमध्ये कनिष्कपूर येथे बौद्ध धर्म परिषद भरविण्यात आली होती.

सहाव्या शतकात जैन धर्माचे प्राबल्य येथे होते. पण बौद्ध व जैन अहिंसावादी धर्मांमुळे या ठिकाणी शांती नांदत होती. यानंतर हूण-शक टोळ्यांनी उत्तरेत हल्ले सुरू केल्यामुळे काश्मिरमधील शांतता भंग पावली. हुणांचा राजा मिहिरकुल याने इ. स. ५१० मध्ये काश्मिरवर स्वारी केली. त्यांनी काश्मिरवासीयांवर अमानुष अत्याचार केले. स्कंदगुप्ताने या हुणांच्या टोळ्यांचा निप्पात केला. नंतर गोपाळदियाने येथे राज्य केले. मंत्रीगुप्तानंतर प्रवरसेन राजा झाला. यानेच अशोकाच्या जुन्या राजधानीचा पुनरुद्धार करून श्रीनगरची स्थापना केली. इ. स. ७१५ ते ७५२ या सुमारास काश्मिरवर ललितादित्य या घराण्याचा अंमल होता. राजा ललितादित्य अतिशय पराक्रमी होता. त्याने भारत आणि भारताबरोबर मध्य आशियापर्यंत आक्रमण करून राज्य पादाक्रांत केले. या काळात काश्मिरमध्ये विद्या-कलांची भरभराट झाली होती. मार्तंडमंदिर आजही ललितादित्याच्या वैभवसंपन्नतेची साक्ष देत आहे. याने परिहासपूर शहर पण वसवले.

यानंतर त्याचा मुलगा जयपीड इ. स. ७३६ मध्ये गादीवर आला. याने बंगालपर्यंत मजल मारली. पण त्याच्यानंतर अजतपीडाकडे सत्ता आली. त्याने पांपोर शहराची स्थापना केली. त्यानंतर आलेल्या अवंतीवर्मनने अवंतीपूर येथे विष्णुमंदिर व शिवमंदिर उभारले.

पुढे लाहोरच्या सिंहराजाची मुलगी दिद्दा हिने आपल्या पतीच्या मृत्यूनंतर सत्ता आपल्या हातात घेतली. तिच्यानंतर संग्राम राजाच्या हाती सत्ता आली. त्यावेळी भारतावर गझनीच्या महंमदाने स्वारी केली. पण बर्फाच्छादित प्रदेशात महंमदाला आक्रमण करणे कठीण झाले. त्यानंतर काश्मिरमध्ये शहाबुद्दीन उल् अबिदीन याने सत्ता गाजविली. त्यांनीच इस्लाम सत्तेची मुहूर्तमेढ या भूमीत रोवली. नंतर सिंधदेवाने सत्ता काबीज केली. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा सेनापती रामचंद्र याने सत्ता बळकावली. तिबेटमधील योद्धारेचन शहाने रामचंद्राला पराभूत करून आपल्या हाती सत्ता घेतली. त्याला हिंदुधर्म स्वीकारून रामचंद्राच्या मुलीबरोबर विवाह करावयाचा होता. यासाठी तो बौद्ध धर्म सोडून हिंदू बनण्यास तयार झाला. पण पंडितांनी त्यास हिंदू बनण्यास परवानगी न दिल्याने त्याने इस्लाम धर्म स्वीकारला. त्यानंतर काश्मिरमध्ये शियापंथीयांचे सामर्थ्य वाढले. शियापंथीय शेवटचा राजा होता याकूब खान.

**काश्मिरमध्ये मोंगल सम्राटांचा प्रवेश :**

इ. स. १५८६ च्या सुमारास सम्राट अकबराने याकूबखानचा पराभव केला. अकबराने हरीबरबतच्या सभोवताली ३ मैल लांबीची भिंत उभारली. काश्मिरमध्ये राजधानी उभारण्याचे अकबराचे स्वप्न अपूर्ण राहिले. अकबरानंतर त्याचा एकुलता

एक मुलगा सलीम ऊर्फ जहाँगीर मोगल सुल्तानचा सम्राट झाला. काश्मिरवर जहाँगीरने जिवापाड प्रेम केले. नूरजहाँच्या सहवासात आपल्या जीवनाचा मनसोक्त आनंद लुटला. शहाजहान, औरंगजेबापर्यंत काश्मिरवर मोंगलांची सत्ता होती. या मोंगल कारकीर्दीतच शालिमार-निशाद या बागा उभारल्या गेल्या आहेत. या कालखंडापर्यंत हिंदू, मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, जैन वगैरे सर्व धर्मीय लोक काश्मिरच्या खोऱ्यात सुखाने, सहिष्णुता व सहकार्याने नांदत होते. हळूहळू काश्मिरची शांतता भंग पावू लागली. इ. स. १८५१ मध्ये अफगाण अहमदशहा दुराणीने काश्मिरची सत्ता काबीज केली. रणजितसिंगाचा सेनापती चंद्रमिश्राने जम्मूचा राजा गुलाबसिंह याची मदत घेऊन काश्मिरचे राज्य जिंकले. काही काळ शिखांनी पण आपली सत्ता काश्मिरवर गाजविली. यानंतर शिखांचा पराभव होऊन इंग्रजांची सत्ता भारतात प्रस्थापित झाली. हा काश्मिरचा प्रदेश इंग्रजांनी डोगरा सरदार महाराज गुलाबसिंह यांना ७५ लाख रुपयांना विकला. गुलाबसिंहाच्या मृत्यू-नंतर इ. स. १८४७ मध्ये त्याचा मुलगा महाराज रणजितसिंह गादीवर आला. इ. स. १८६५ मध्ये त्याचा मृत्यू झाल्यावर त्याचा मुलगा प्रतापसिंह गादीचा वारस झाला. महाराज प्रतापसिंहला मुलगा नव्हता, म्हणून त्याचा भाचा हरिसिंग काश्मिरच्या राजगादीवर मालक झाला. हरिसिंगाच्या वेळी इ. स. १९४७ च्या सुमारास पाकिस्तानमधून लुटारू टोळ्या काश्मिरमध्ये शिरल्या. प्राणहानी व वित्तहानी झाली. राजा हरिसिंहाने भारत सरकारला विनंती करून भारतीय सैन्याची मदत मागितली. २६ ऑक्टोबर रोजी काश्मिर भारतात विलीन झाल्याची घोषणा होऊन करारावर सह्या झाल्या व यावेळी भारतीय सैनिकांनी परकीय टोळ्यांचा समाचार घेऊन त्यांना हाकलून लावले. आजही अखंड भारत छातीचा कोट करून काश्मिरच्या रक्षणासाठी उभा आहे.

**जम्मू–काश्मिर भूक्षेत्र :**

पाक-चायनाने बळकावलेल्या भागासह २,२२,२३६ चौ. कि. मी.

लोकसंख्या ५,९८१,६००. यात फक्त चीनच्या काबूत असलेल्या प्रदेशातील लोकसंख्येचा समावेश नाही.

काश्मिर हा भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे, याची जाणीव भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांनी भारतीयांना करून दिलेली आहे. भारतीय संस्कृतीशी येथील काश्मिरी लोक एकरूप झालेले आहेत. त्याचा प्रत्यय ठायी-ठायी येतो. अनंतनागला (मार्तंडमंदिर) कोणी श्राद्ध करण्यास बसले व काश्मिरी पंडितांचे मंत्रोच्चार आणि कर्मकाण्ड पाहिले, तर श्राद्धासाठी नाशिकला गोदातीरी किंवा गयेला फाल्गु नदीकाठी बसलो आहोत की काय, असा भास होतो. विविध वंशांचे व जमातीचे लोक पूर्वीपासून काश्मिरमध्ये स्थायिक झालेले आहेत.

काश्मिरी लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच आहे. गुडघाभर पाणी साठलेल्या शेतात स्त्री-पुरुष भात-लावणीचे काम करतात. स्त्रियांची निखळ पाण्यात उमटलेली प्रतिबिंबे निरतिशय सुंदर असतात. प्रतिबिंबालाच दृष्ट लागावी एवढे सौंदर्य त्यात असते. काही लोक कार्पेट, शाली विणण्याचे काम करतात. यांची ५–७ वर्षांची मुले पण कुशल विणकर असतात. स्त्रिया नाजूक भरतकाम करतात. गोऱ्यापान लांबसडक बोटांच्या स्पर्शाने कापडावरील कशिद्याला सौंदर्य प्राप्त होते. विणकाम-भरतकाम करणाच्या स्पर्धेत दोन्हीही तेवढेच सुंदर. त्यामुळे कोणत्या रेखीव सौंदर्याकडे पाहावे, असा संभ्रम निर्माण होतो. लाकडावरील व धातूवरील कोरीव काम करण्यातही काश्मिरी लोक कुशल आहेत. फळबाग व फुलबागांत काम करणाऱ्या स्त्रिया नाजूक बोटांनी भराभर फुले-फळे तोडीत असताना पाहिले की, गुलाबफुले आणि स्त्रियांच्या गालांवरील गुलाबी रंग यांची स्पर्धा मनाला भुरळ घालते.

पर्यटकांनी धर्म किंवा राजकारणापेक्षा निसर्गसौंदर्य किंवा त्यांचे व्यवसाय यासंबंधी गप्पा केल्यास काश्मिरी लोक त्यात गुंगून जातात.

**काश्मिरी भाषा :**

काश्मिरी लोक आपल्याशी अस्खलित हिंदी किंवा उर्दूत बोलू शकतात. पण आपसांत बोलताना मात्र ते काश्मिरीतच बोलतात. दुकानदार किंवा व्यावसायिक इंग्रजी बोलू शकतात. एवढेच काय, कसबी दुकानदारांनी ठराविक मराठी वाक्ये, व्यवसायापुरती का होईना, पण सफाईदारपणे बोलण्याचा सराव केलेला आढळतो. काश्मिरी लोक पूर्वी संस्कृतमधून अपभ्रंशातून निर्माण झालेली कशूर भाषा बोलत असत. मुस्लिम कालखंडात काश्मिरी भाषेत फारशी शब्दांचा भरणा वाढला. काश्मिरच्या परिसरात काश्मिरी, डोग्री, गोजरी, बालटी, पहाडी, दार्दिरो या भाषा बोलल्या जातात.

**काश्मिरमधील ऋतू :** (Seasons in Kashmir)

(मार्च-एप्रिल):—वसंतऋतू–काश्मिरमधील वसंतऋतू सारे लोक अगदी दिलखुलासपणे पसंत करतात. साधारणतः १५ मार्चनंतर वसंताची चाहूल लागते. काश्मिरच्या परिसरात एप्रिलमध्ये बदामाच्या झाडांना बहर आलेला दिसतो. खळखळणाऱ्या नद्या, हिरवळी, हिरवेगार चिनार किंवा सुरूची झाडे; या हिरव्या-मखमलीला चहूबाजूने बर्फाच्छादित पर्वतशिखरांची कोरीव कापलेली झालर लावलेली असते. समुद्रसपाटीपासून उंच अशा गुलमर्ग, सोनमर्ग, खिलनमर्ग या ठिकाणी बर्फ आढळतो.

(मे):–मेच्या सुरुवातीला काश्मिरमधील हवा आल्हाददायी असते. सकाळी-रात्री चांगलीच थंडी जाणवते. त्यावेळी लोकरीचे कपडे घालणे आवश्यक असते.

तसेच दुपारीसुद्धा स्वेटरची गरज भासते. सकाळी गारठ्यामुळे गरम पाण्यानेच सारी कामे करावी लागतात.

यावेळी चहुबाजूला हिरवळ असतेच. पण पेहेलगाम, गुलमर्गसारख्या ठिकाणी बर्फाच्छादित पर्वतशिखरे दिसतात. बागांमध्ये रंगीबेरंगी फुलांची उधळण असते. १८ मे नंतर पावसाला सुरुवात होते. पाऊस म्हणजे पाण्याच्या एकेका थेंबाची शिपडण. धो-धो पाऊस पडत नाही. पण झिमझिम पावसाने श्रीनगर मात्र चिखलाने माखून निघते. अगदी गमबूट घालावे असे वाटते. श्रीनगरच्या बाहेरचे रस्ते मात्र काळेभोर स्वच्छ असतात. हाच पाऊस गुलमर्गला लागला, तर आधी पावसाचे थेंब, नंतर थेंबाचे भुसभुशीत बर्फात रूपांतर होऊन काळ्या केसांवर शुभ्र रुपेरी कण चमकू लागतात.

(जून-जुलै):–हा काश्मिरमधील उन्हाळ्याचा कालखंड. श्रीनगर-जम्मू या भागात विशेषत: जम्मू तर फारच गरम असते. जम्मू हा काश्मिरमधील भाग असला, तरी आल्हाददायी शीतल हवेसाठी हा भाग सखल असल्याने प्रसिद्ध नाही. श्रीनगरला पण उष्मा जाणवतो, म्हणून लोक आजूबाजूच्या पहाडी प्रदेशाकडे प्रयाण करतात.

जूनमध्ये गुलमर्गला मात्र शीतल हवा असून अक्षरश: रंगीबेरंगी फुलांनी निसर्ग सजलेला असतो. पेहेलगामच्या शेजारी नदी व पर्वतराई असल्याने हा प्रदेशही शीतल असतो. जुलैमध्ये फुलाफळांना सुरुवात होते. यावेळी दल सरोवरात कमळाच्या वेली व कमळफुले उमललेली असतात. यावेळी लोटस् गार्डनचे दृश्य विलोभनीय असते. नाशपाती, द्राक्षे, खरबुजे इत्यादी फळफळावळे या कालावधीत उपलब्ध होतात. विशेषत: रायडिंग, बोटिंग या खेळासाठी हा कालखंड योग्य मानतात. दूरवर पहाडात भ्रमण करण्यासाठी जुलैमध्येच जाणे सोयीचे असते.

(ऑगस्ट-सप्टेंबर):–हा महिना काहीसा उन्हाळी, काहीसा पावसाळी असा असतो. ऑगस्टमध्ये काश्मिरला पाऊस पडतो. सप्टेंबर महिन्यातही पाऊस असतोच. या कालावधीत काश्मिरी शेतकरी आपापल्या शेतीकामात गर्क झालेले दिसतात. शेतात पाणी साचलेले असते. यावेळी फुलांचा भरगच्च बहर तर असतोच. पण आरोग्यदायी फळांचा राजा काश्मिरी मधुर–मिठास लालबुंद सफरचंद याच कालावधीत उपलब्ध होतात. अमरनाथ या हिमाच्छादित प्रदेशातील यात्रेसाठी लोक ऑगस्टमध्येच काश्मिरला येतात. श्रावणपौर्णिमेला अमरनाथच्या बिकट वाटेवरून हजारो लोक अमरनाथकडे श्रद्धेने दर्शनासाठी प्रयाण करतात.

(ऑक्टोबर):–हिरवळी, ऊन, फळफळावळे लुटण्याचा हा शेवटचा महिना. या नंतर हिवाळ्याची चाहूल लागते. याचवेळी झाडांच्या पानांचा रंग बदलू लागतो. ऋतुमानातील बदलांचा परिणाम निसर्गाच्या चेहऱ्यावर आधी जाणवतो. ऑक्टोबरचे महत्व काश्मिरला जाणवते, ते 'केशराच्या' उत्पादनामुळे. निळ्याजांभळ्या रंगाची

फुले पांपूरच्या बागेत डोलू लागतात. या फुलांच्या पू-स्त्री केसरांत केशराचे तंतू असतात. सहा तंतुंपैकी तीन केशर असतात. त्यांची निवड कौशल्याने करावी लागते. चांदण्यासाठी शीतल हवेच्या लहरींवर स्वार झालेल्या केशराचा सुगंध पांपूर आणि आसपासचा परिसर दरवळून टाकतो. रंगीबेरंगी फुले, हिरवळ, केशराचा सुगंध या शृंगाराने नटलेला हा निसर्ग महिनाभरात शुभ्र भस्म विलेपन करून संन्यासी होणार आहे, याची कल्पना सहजासहजी येत नसली, तरी शीतल शरद ऋतूला तोंड देण्यासाठी वृक्ष तयारीला लागतात. थंड वातावरणाच्या आगमनाच्या आठवणीने त्याच्या मनाचाही क्षणभर जीवघेणा थरकाप उडत असेल.

(नोव्हेंबर-ते-फेब्रुवारी) :–नोव्हेंबर लागताच थंड बोचरे वारे अंगाला झोंबू लागतात. हिरव्या निसर्गाचा चेहरा पांढुरका वाटू लागतो. याच वेळी (स्नो-फॉल) बर्फ पडायला सुरुवात होते. बर्फ पडते, म्हणजे भुसभुशीत पांढरा बर्फाचा चुरा वृक्ष, वेली, घरे, पर्वत, दऱ्या व रस्त्यांवर साचू लागतो. वाढदिवसाला बांधलेल्या फुग्यातून लहान-लहान कागदाचे कपटे जसे सावकाश खाली पडताना दिसतात. तसेच बर्फ कोसळताना दिसते.

भारतीय पर्यटकांना या थंड वातावरणाची सवय नसल्याने त्रास होतो. नुसते वुलनचे कपडे घालून ह्या गारठ्यापासून स्वतःला सुरक्षित ठेवणे कठीण जाते. युरोपियन किंवा थंड प्रदेशातील पाश्चिमात्य लोकांना मात्र येथील हिवाळा पण आल्हाददायी वाटतो. हिवाळी खेळासाठी कित्येक परदेशी पाहुणे बर्फाच्छादित गुलमर्गला पोहोचतात. बर्फामधील स्केटिंग, गोल्फ या खेळाचा आनंद लोक याच कालावधीत मिळवू शकतात. या काळात कॅलेंडरचे दिवस मोजून नेमक्या वेळात प्रवास करणे कठीण ठरते. कारण बर्फामुळे काही रस्ते बंद होतात, काही वेळा वादळी बर्फात बाहेर पडता येत नाही. शरद ऋतूच्या गारव्याने निसर्गच गारठून जातो. एप्रिलनंतर सुंदर वाटणारा हाच का तो निसर्ग, असा संभ्रम निर्माण होतो. वृक्षांच्या फांद्यांवर बर्फाचे थर साठतात. अशा वेळी हे काश्मिरी नाजूक वृक्ष नैसर्गिक ऊब कोठून मिळवतात, कोणास ठाऊक. गारठा सहन झाला नाही किंवा योग्य काळजी घेतली गेली नाही, तर हात, पाय, ओठ, गाल फुटतात. बर्फाच्छादित वातावरणातही प्रत्येक वृक्ष आपले तारुण्य जिद्दीने सांभाळण्याचा प्रयत्न करतात. पण जीवघेण्या हिवाळ्याबद्दल असलेली नाराजी निसर्ग लपवू शकत नाही. पर्वत तर नखशिखान्त बर्फाने न्हाऊन निघतात. ज्यावेळी बर्फाच्छादित पर्वतशिखरांवर कोवळे ऊन पडते, त्यावेळी रस्त्यांवर थोडीफार माणसांची हालचाल सुरू होते. इतर वेळेला मात्र गडी लपंडाव खेळावा, तसे चिडीचुप-गिडीचुप वातावरण. झाडांच्या फांद्या ओठावर बोट ठेवीत वाऱ्याची शीळ घालीत शू-ऽऽऽसाऱ्या वातावरणाला जणू गप्प करीत असतात. ऊन झिरपू लागले की मग मात्र मानवी मनाला पण धीर येतो. काही वेळा निसर्ग आणि मानवाची

गंमतशीर स्पर्धा पाहावयास मिळते. मानव रस्त्यावरील बर्फ हटवण्याचा प्रयत्न करतो आणि निसर्ग खटचाळपणे तेथे पुनः पुनः बर्फ ओतीत असतो. बर्फाचा गारठा सहन होत असेल, कफ किंवा दमा विकार ज्यांना नसेल, अशा पर्यटकांना मात्र हा बर्फाळ ऋतु मनसोक्त आनंद देणाराच ठरेल.

**काश्मिरमधील उष्णतामान :**

| महिना | जास्तीत जास्त | कमीत कमी |
|---|---|---|
| जानेवारी | ४.४ | २.३ |
| फेब्रुवारी | ७.९ | ०.४ |
| मार्च | १३.४ | ३.५ |
| एप्रिल | १९.३ | ७.४ |
| मे | २४.६ | ११.२ |
| जून | २९.६ | १४.४ |
| जुलै | ३०.८ | १८.४ |
| ऑगस्ट | २९.९ | १७.९ |
| सप्टेंबर | २८.३ | १२.७ |
| ऑक्टोबर | २२.६ | ५.७ |
| नोव्हेंबर | १५.५ | ०.९ |
| डिसेंबर | ८.८ | १.८ |

**कोणत्या ऋतूत कोणते कपडे काश्मिरमध्ये न्यावेत :**

**डिसेंबर ते फेब्रुवारी** :—हिवाळा–हँडग्लोज, कानटोपी, फुल ओव्हर स्वेटर, ओव्हरकोट, मफलर, वुलनसूट, वुलन पायमोजे, उंच बूट.

**मार्च ते मे** :—या काळात सकाळी १० ते संध्याकाळी ७ पर्यंत नेहमीचे टेरिलीन कॉटन, सिल्क कपडे आपण घालू शकतो. पण सकाळी आणि रात्री अधिक थंडी असते, त्या वेळी वुलनचे फूल स्वेटर व कानटोपी, शॉल किंवा फर कॅपची आवश्यकता भासते. कडाक्याची थंडी नसली, तरी गारठा झोंबणारा असतो. विशेषतः गुलमर्ग, सोनमर्ग, पेहेलगाम, इत्यादि ठिकाणी गारवा अधिक असतो. रात्री पांघरण्यासाठी रजई, वुलन ब्लॅंकेटची गरज भासते. नुसती वुलन शाल किंवा चादर पुरेशी नसते. १५ मे नंतर भुरभुर पाऊस पडू लागतो. रेनकोट जरूर नसला, तरी लहानशी फोल्डिंग छत्री

बरोबर असावी. जम्मूच्या परिसरात उन्हापासून तसेच श्रीनगरला पावसापासून आणि गुलमर्गसारख्या ठिकाणी भुसभुशीत वर्फाच्या पावसापासून बचाव होण्यास ती आवश्यक ठरते.

**जून ते ऑगस्ट**:——या काळात शहराच्या आसपासचे बर्फ बहुतेक वितळलेले असते. थंडी कमी असते. काही ठिकाणी तर उष्मा जाणवतो. पण यावेळी काश्मिर दऱ्याखोऱ्यातील अंतर्गत भागात सफर केली, तर गारठा असतो. ऊबदार हवा, पाऊस असे हवामान या महिन्यात असते. पावसामुळे हवेत रात्री गारठा असतो. नेहमीचे कपडे, त्या सोबत रेनकोट, रात्री गारठा असल्यास स्वेटर.

**सप्टेंबर ते नोव्हेंबर** :—— या महिन्यात काश्मिरमध्ये गारठा असतोच. पण कॉटन, वुलन, रेशमी, टेरिलीन, इ. कपडे नेहमीसारखे वापरता येतात. दिवसा वुलन सूट, वुलन स्वेटर, ओव्हरकोट याबरोबर रात्री पांघरण्यासाठी वुलन ब्लँकेटस् आवश्यक असतात. स्त्रिया स्वेटर किंवा शाल वापरतात. स्त्रियांसाठीपण नक्षीदार वुलनकोट उपलब्ध असतात.

## काश्मिरमधील स्वागत :

आपण रेल्वेने जम्मूला उतरा किंवा बस, टॅक्सी वा कारने श्रीनगरला उतरा ठिकठिकाणी हॉटेलचे एजंट रस्त्यावर भेटतील, आपणाबरोबर धावतील, स्वस्तात सुखसोयींनी युक्त अशा ठिकाणी चलण्याचा आग्रह करतील. नाशिक किंवा काशीला उतरल्यावर प्रवाशांना आपल्याकडे ठेवण्याची जशी झोंबाझोंबी करतात, तशीच येथील एजंटांमध्ये स्पर्धा चाललेली असते. त्यात नवीन प्रवासी गोंधळून जातो. म्हणून आधी हॉटेल बुक करावे. किंवा एजंटच्या कह्यात न जाता नीट तपास करून आपल्या खर्चानुसार हॉटेल हेरून नंतर प्रस्थान करावे. सर्व कुटुंबाला सर्व हॉटेलमध्ये फिरवण्यापेक्षा त्यांना एका ठिकाणी थांबवून स्त्री किंवा पुरुष प्रमुख व्यक्तीने हॉटेलचा तपास करून यावा. मनासारखी जागा राहण्यासाठी न मिळाल्यास एका ठिकाणी एका दिवसासाठी थांबून त्यादिवशी राहण्याची व खाण्यापिण्याची उत्तम सोय पाहून ठेवावी व दुसऱ्या दिवशी मुक्काम योग्य निवासस्थानी हलवावा.

काश्मिरचे लोक गोव्यातील लोकांप्रमाणे खुल्या दिलाने आपले स्वागत करतील. तथापि बहुतांशी जीवन टुरिस्टवर अवलंबून आहे. त्यामुळे पर्यटकांचे स्वागत, खानपान, त्यांना द्यावयाचा मान, त्यांना प्रत्येक बाबतीत करायचे मार्गदर्शन यात कशातही ते उणे पडू देत नाहीत. यात काही स्वार्थी धंदेवाईक स्वार्थासाठी उलटसुलट मार्गदर्शन करून फसवणूक करीत नाहीत, असे नाही. पण साधारणतः अशा समाज कंटकांविषयी आपणाला चांगले लोक सूचना देतात व काश्मिरच्या आतिथ्यशील स्वागताला गालबोट लागणार नाही, याची दक्षता घेतात.

काश्मिरमध्ये गरीब मजूर व कामगार वर्ग अधिक आहे. परिस्थितीने हे लोक गरीब असले, तरी मनाने गरीब नाहीत. त्यांच्या वागणुकीतून त्यांच्या मनाच्या श्रीमंतीचा प्रत्यय येतो. तेथील एखाद्याची ओळख होऊन जर का तुम्ही त्यांच्या घरी गेलात, तर इडली, कांदेपोहे, गोड चहा, उपमा अशी डीश मिळेल, याची अपेक्षा करू नका. हिवाळी थंडी असेल, तर अतिथी सत्काराच्या वेळी काश्मिरी लोक प्रथम कांगडी पुढे करतात. वुलनचे पायघोळ कपडे घालून रस्त्याने हात पोटाशी धरून ते चाललेले दिसतात. त्यांच्या गळ्यात कांगडी अडकवलेली असते. गुडघ्यापर्यंत लांब असलेल्या झब्ब्यामुळे ती आत झाकली जाते.

" कांगडी " म्हणजे लहान शेगडी. शेगडी आणि ती पण कपड्याच्या आत ! वाचून ' चटका ' बसला असेल नाही ? पण कांगडीचा चटका लागत नाही. आपल्याकडे विणलेल्या वेताची वर अर्धगोल चक्राकार हॅन्डल असलेली फुलांची परडी असते ना ? त्या प्रकारची कांगडीची रचना असते. ही बाहेरून वेताने विणली असली, तरी याच्या आत लहानशी मातीची शेगडी असते. माती उष्णतेची मंदवाहक असल्याने व लाकडातही तोच गुणधर्म असल्याने मातीची शेगडी व वेत यांचा समन्वय साधला जातो. या शेगडीत आत कोळशाचे निखारे टाकून त्यावर राख टाकतात. त्यामुळे राखेच्या आतले निखारे कपड्याच्या आत ठेवूनही ठिणग्या उडत नाहीत, चटका लागत नाही, पण उब मात्र मिळते. पाहुण्यांपुढे कांगडी आली की, त्यांनी पण ती जवळ घेऊन त्यावर स्वागताची ऊब चाखायची असते.

थंडीत चहापेक्षा कांगडी कितीतरी आल्हाददायी वाटते. चहा मिळतो, पण तो मिठाचा. आधी उकळत्या पाण्यात चहाच्या पत्त्या टाकून त्या उकळल्या जातात. हॉटेल व काही घरात साखर वापरतातही; पण नमकीन चहाची लज्जत काही औरच असते. काश्मिरमधील दूध उत्कृष्ट असते. चहा न पिणाऱ्यांकडे काश्मिरी लोक जरा आश्चर्यानेच बघतात. काश्मीरसारख्या शीतल प्रदेशात आणि चहा घेत नाही, याचे त्यांना आश्चर्य न वाटेल, तरच नवल. याबरोबर बशीतून दूध आटवून केलेले शुभ्र चिजाचे तुकडे पण खावयास मिळतात. वयस्कर व्यक्तीसमोर गुडगुडी (हुक्का) ठेवली जाते. हातात नळी घेऊन फुंकल्यावर सुरईसारख्या भांड्यातील पाण्याचा गुडगुड आवाज येतो. व नंतर तोंडात धूर जमा होतो. हा धूम्रपानाचा आनंद बरेच लुटतात.

काश्मिरमध्ये ज्या हॉटेलमध्ये उतराल, तेथील नोकर-चाकर आदब दाखवून नम्रपणे आपली कामे करताना आढळतील. पण या सेवेचा थोडाफार मोबदला ते हॉटेल सोडताना आपण त्यांना बिदागी देऊन चुकवला जातो. आपली बस किंवा टॅक्सी थांबली की, कुली तर इतक्या वेगाने धावतील की, काही वेळा चालत्या गाडीतच

चढून ते सामानाचा ताबा घेतात. गरिबीने गांजलेले ते लोक मजुरीवरच पोट भरतात. एखाद्या सीझनमध्ये काही कारणामुळे प्रवासी कमी आले की, ते स्वत:च्या नशिबाला दोष देतात. दुसरे करणार तरी काय ?

पर्यटकांवर अवलंबून असणारे मजूर, हॉटेल व्यवसायवाले, विक्रेते यांचा राजकीय हिंसाचार, रस्तेबंदी व वर्तमानपत्रातल्या भडक बातम्यांवर फारच राग दिसून येतो. कारण या गोष्टीचा विपरित परिणाम होऊन पर्यटक कमी येतात व त्यामुळे वर्षभराची कमाई बुडते. सीझनमध्ये होणारी कमाई त्यांना हिवाळ्यात पुरवून खावी लागते. पर्यटक हा अन्नदाता आहे. त्याची सेवा नीट केली पाहिजे. ही भावना मात्र सर्वत्र आढळते.


## काश्मिरच्या सौन्दर्यात भर घालणारे वृक्ष-वेली आणि पशुपक्षी :

सुंदर निसर्गाचे सौंदर्य वाढते, ते तेथील दिमाखदार भव्य वृक्ष, नाजूक वेली व रंगीत फुलांमुळे. काश्मिरचे अर्धेअधिक सौंदर्य याच वृक्षराईवर अवलंबून आहे.


आकाशाला स्पर्श करणारे सरळसोट सफेदा, अक्रोड, बदाम, सफरचंदाची झाडे, रेशमाची झाडे, वीर, चीब, देवदार, कैल, पडतल, इ. वृक्षांत अधिक भरदार इतिहास प्रसिद्ध चिनार, आणि पर्वत उतारांवर उगवलेली सुरूची हिरव्या नक्षीची झाडे मनाला मोह घालतात. बोडके पर्वत कमी नाहीत. पण हिरवेगार पर्वत त्यांच्या-पुढे ताठ मानेने उभे राहून मागील फक्त बर्फाच्छादित सौंदर्य उघडे ठेवतात.

रंगीबेरंगी फुले तर काश्मिरचे नाजूक 'दिल' आहे. जेवढे रंग अस्तित्वात आहेत, तेवढे रंग या फुलांना द्यायला परमेश्वर विसरलेला नाही. रंग आणि गंध यांनी सजलेली मायानगरी म्हणजे काश्मिर. रसदार फळांनी तर रसिकांची मनेच जिंकली आहेत. गुबगुबीत सफरचंदाचाच रंग येथील लोकांच्या गालांनी ल्यालेला आहे. त्याचबरोबर अक्रोड, बदाम, आलुबुखार, बग्गु, गोशा, नाशपाती, खुर्मानी अशी अनेक तांबडी, पिवळी, नारंगी फळे येथे उपलब्ध आहेत. चकोर, बुलबुल, कोकिळा, बगळे, गुबगुबीत काळेशार कावळे, पाण्यावर तरंगणारे अनेक पक्षी या ठिकाणी आनंदाने विहार करताना दिसतात. रानावनात चित्ता, हरण, अस्वल हे प्राणी आढळतात.

० ० ०


JAMMU CITY
TO POONCH
PLAURA ROAD
SARWAL ROAD
KOTLI
COLONY
BAKSHI NAGAR
RAJGHAWAN
R. ROAD
AMBPHALA ROAD
PANJTIRTHI
K.CHAWNI
P. DUNGA
OLD SECTT
M.LA HOSTEL
NEW SECTT
TEMPLE
M. LAXMI TEMPLE
LINK RD.
CITY CH
MASJID
DISTT H.Q
MAHAMAYA
G.H.
K.C
TH
R.R. LABORATORY
SILK FACTORY
BC
TALAB TILLO
TO GAJANSU
SHANKAR THEATRE
JAMMU VARSITY
STADIUM
JEWEL
G GATE
CENTRAL MARKET
UTTAM
T.R. CENTRE
JOGI GATE
BAHU
TO SARUINSAR
NEHRU MARKET
GANDHI NAGAR
NATIONAL H
USMAN CLUB
NAI BASTI
SATWARI
INDUSTRIAL ESTATE
DOGANA
TO PATHANKOT
TOMB BABA BUDDAN SHAH
TO CHATHA
TO R.S PURA

# जम्मू



(१) **प्रेक्षणीय स्थळाचे नाव** :—जम्मू.

(२) **जिल्हा** :—जम्मू.

(३) **राज्य** :—जम्मू-काश्मिर.

(४) **समुद्र सपाटीपासून उंची** :—३०५ मीटर्स.

(५) **ऋतु**:—हिवाळा—नोव्हेंबर ते जानेवारी, पावसाळा—जून ते सप्टेंबर, उन्हाळा—मार्च ते मे व ऑक्टोबर.

(६) **उष्णतामान** :—उन्हाळ्यातील—३९.९अंश ते कमीत कमी २३.४ सेंटीग्रेड, हिवाळ्यातील – २६.२ सें. ग्रे. ते ७ अंश सेंटीग्रेटपर्यंत.

(७) **सरासरी पाऊस**:—१०७ सें. मीटर्स.

(८) **लोक**:—हिंदू, मुसलमान व इतर धर्मीय लोक पण राहतात.

(९) **भाषा**:—हिंदी.

(१०) **येथे कोणत्या महिन्यात भेट द्याल ?**:—उन्हाळ्यात फारच उष्मा असतो. जम्मूत हिवाळ्यात जरी थंडी असली, तरी भेट देण्यास उत्तम सीझन.

(११) **उद्योग**:—शेती, कटलरी सामानाचे व्यापारी.

(१२) **कोणते कपडे बरोबर घ्यावेत ?** :—फेब्रुवारी ते मे–कॉटन, टेरिलीन, जून ते ऑक्टोबर–नेहमीचे कपडे, नोव्हेंबर ते जानेवारी–वुलनचे कपडे.

(१३) **उतरल्यावर कोणाशी संपर्क साधावा** :— (येथून पुढील प्रवासाची रूपरेषा ठरवता येते):– टुरिस्ट रिसेप्शन सेंटर जम्मू–रघुनाथ मंदिराजवळ.

## जम्मू : (Jammu)

काश्मिरच्या नंदनवनात शिरण्याचे महाद्वार म्हणजे जम्मू. बहुतेक पर्यटक जम्मूपर्यंत रेल्वेने येऊन येथून बस, टॅक्सी किंवा विमानाने पुढे श्रीनगरकडे प्रयाण करतात. जम्मूला काय पाहणार? असे म्हणून पर्यटक काश्मिरच्या वनराईत शिरण्याची घाई करतात. पण जम्मूलाही काही ऐतिहासिक स्थळे आणि सौंदर्य आहे, याचा विसर पडतो. दुसऱ्या शहराशी एखाद्या शहराची तुलना करता येत नाही. प्रत्येक शहराचे स्थान, इतिहास, निसर्गसौंदर्य, वातावरण, लोक, संस्कृती, व्यवसाय वेगवेगळे असतात. जम्मूला हिवाळ्याशिवाय काश्मिरची गुलाबी थंडी नाही. येथे सरोवरे, चिनार, फुलबागा नसल्या, तरी हे (तावी) नदीकाठी वसलेले एक देवालयांचे माहेरघर आहे. काश्मिरची ही हिवाळी राजधानी आहे.

जम्मू हे नाव जम्बू या मूळ नावाचा अपभ्रंश आहे. रघुवंशात जंबोलोचन नावाचा एक राजा होता. त्याच्या नावावरून जम्बो (जम्बू) जम्मू असा उच्चार रूढ झाला. तीन हजार वर्षांपूर्वीचा काळ जंबोलोचनाचाच असावा. जंबोलोचनाच्या राजधानीचे नाव मात्र 'बाहू' असे होते. तावी नदीच्या किनाऱ्यावर पलिकडे बाहू किल्ल्याचे अवशेष आहेत. प्राचीन काळातील एक दंतकथा येथील लोक ऐकवतात. जंबोलोचन राजा शिकारीसाठी जंगल असलेल्या या प्रदेशात आला. त्याला एक चमत्कारिक दृश्य पाहावयास मिळाले. एका जलाशयाजवळ सिंह आणि बकरी हे एकत्र पाणी पीत आहेत. शिकारीसाठी हातात सज्ज असलेले धनुष्य राजाच्या हातातून गळून पडले. सहिष्णुता जीवनाचा नवा साक्षात्कार राजाला झाला. हे ठिकाण त्याने पवित्र मानून त्याठिकाणी शहर वसवले. जम्बोने हे शहर वसविल्याने पुढे याच शहराला जम्मू असे संबोधले गेले.

जम्मू शहराचे दोन भाग आहेत. जुने जम्मू उंचावर वसले असून याच ठिकाणी टुरिस्ट हॉटेल्स आहेत.


जम्मूचा स्वतंत्र असा इतिहास उपलब्ध नाही. काही राजांची नावे इतिहासाला गवसतात. राजा ध्रुवदेवनंतर राजा रणजितदेव गादीवर आला, डोग्रा कारकिर्दीत

गुलाबसिंग राजाने १८३२ च्या सुमारास जम्मू आणि काश्मिर हे दोन प्रदेश एकत्र जोडून त्या दोन विभागाचे एक राज्य घोषित केले. आजतागायत त्या राज्याला "जम्मू-काश्मिर" अशा एकत्र नावानेच संबोधले जाते.

जम्मू आणि जम्मूच्या परिसरात रघुनाथमंदिर, जम्मू कांग्रा स्कूल, रणवीरेश्वर मंदिर, बटोत, कूद, मन्सार लेक, वैष्णोदेवी अशी कित्येक ठिकाणे आहेत की, जी पाहिल्यावर मनाला समाधान वाटते.

## रघुनाथ मंदिर : (Raghunath Mandir)

मंदिराचे शहर हे जम्मूचे नामाभिधान प्राचीन रघुनाथमंदिर आणि त्या सभोवताली असलेल्या अनेक मंदिरांमुळेच पडले असावे. जम्मू शहराच्या मध्यभागी रघुनाथ मंदिर हे प्रसिद्ध राममंदिर आहे. १८३५ मध्ये महाराजा गुलाबसिंग यांनीच मंदिर उभारणीला सुरुवात केली व त्याचे अपूर्ण राहिलेले काम त्याच्यानंतर आलेल्या राजा रणवीर सिंग यांनी १८६० मध्ये पूर्ण केले. मंदिरात मध्यभागी राम-लक्ष्मण-सीता यांच्या तीन मूर्ती आहेत. या मंदिराच्या प्रवेशद्वारात प्रथम प्रवेश केल्यानंतर दोन्ही बाजूंना असलेल्या तेथील स्थानिक नोकरवर्गाकडे पायातील चप्पल-बूट काढून



काश्मिरच्या नंदनवनात शिरण्याचे महाद्वार जम्मू शहर
व तेथील प्राचीन रघुनाथमंदिर

ठेवावे लागतात. उन्हाची वेळ असल्यास मंदिरापर्यंत जाण्यास लादीवर दोरांचे अरुंद पट्टीचे गालिचे असतात. त्यावरून चालत मंदिरात जाता येते.

याच मंदिराच्या परिसरात सुरुवातीला हनुमानाची मोठी उभी मूर्ती आहे. पुढील रघुनाथमंदिरासभोवती एकमेकांस जोडून असलेल्या मंदिरात दत्तात्रय, मत्स्य अवतार, कूर्मअवतार, नृसिंह, वराह, कपिनदेव, कल्की, नरनारायणी, जनमेजय, विष्णु, राजारघुजी, मकरध्वज, धर्मपाल, मार्कंडेय, लक्ष्मीनारायण, ध्रुव, वसिष्ठ कश्यप, जनक, कुबेर, बद्रिनाथ, द्रोणाचार्य, गंधर्व, चित्रकूट, दिलीप, श्रवण, प्रल्हाद कृष्णाचार्य, या व्यतिरिक्त कितीतरी लहानलहान मूर्ती पहायला मिळतात.

रघुनाथ मंदिराच्या मागच्या बाजूस ५ ते ६ फूट उंचीच्या मूर्ती तसेच शुभ्र व काळ्या स्फटिकाच्या विविध मूर्ती आहेत. त्यांत श्री गणपतीची मूर्ती तांबडी आहे. त्यानंतर भरत, शत्रुघ्न, नृसिंह, राधा-कृष्ण यांच्याही स्वतंत्र खणांत मूर्ती ठेवण्यात आलेल्या आहेत.

याच परिसरातील शीवजी मंदिर तर लक्ष वेधून घेते. या मंदिरात शालुंका आणि शंकराची मोठी पिंड आहे. त्या सभोवताली १२ ज्योतिर्लिंग आहेत. यावरोबर नवदुर्गा, महालक्ष्मी, सरस्वती, वैष्णोदेवी या स्वतंत्र मंदिरातील मूर्ती चित्ताकर्षक आहेत.

धार्मिक श्रद्धाळू सुसंस्कृत भक्तांनी रघुनाथजीच्या मंदिरात प्रवेश केल्यावर माहीत असलेल्या-नसलेल्या सर्व देवऋषींच्या दर्शनाने तृप्त समाधान लाभते. या मंदिरात हिंदू तर येतातच. पण इतर भाषा, प्रांतातील विविध धर्मीय लोकही श्रद्धेने येतात आणि दर्शनानंतर तृप्त मनाने परत जातात.

## बाहू किल्ला : (Bahu Fort)

४ कि. मि. अंतरावरील हे स्थान म्हणजे प्राचीन काळातील वैभवच मानावे लागेल. ज्या जम्बोलोचन राजामुळे जम्मू हे नाव रूढ झाले, त्या जम्बोलोचनचा भाऊ बाहूलोचन हा होता. या बाहुलोचनाने तारी नदीच्या डाव्या किनाऱ्याच्या पहाडावर हा किल्ला सुमारे तीन हजार वर्षांपूर्वी उभारला असावा. या किल्ल्याच्या आत 'काली' देवीचे मंदिर आहे. मूळ किल्ला जरी बाहुलोचनाने उभारला तरी त्याची पुनर्बांधणी करून ते ऐतिहासिक स्थळ जपण्याचे श्रेय डोग्रा अधिपतींना द्यावे लागेल.

### अमर महाल : (Amar Mahal)

अमरमहाल हे जम्मूमधील एक महत्त्वाचे सुंदर स्थान आहे. राजा अमरसिंग यांनी एका फ्रेंच वास्तु-शिल्प-शास्त्रज्ञाकडून हा महाल बांधून घेतला आहे. उंचावर

असलेल्या या राजमहालातून तावी नदीच्या परिसराचे नयनमनोहर दृश्य दिसते. येथे पहाडी चित्रकलेचे नमुने पाहावयास मिळतात.

**सचिवालय** : (Secretariate)

जम्मू ही काश्मिरची हिवाळी राजधानी असल्याने येथे जुने व नवे सचिवालय अशा दोन वास्तू आहेत. डोग्रा अधिपतीच्या राजवाड्यातच जुने सेक्रेटरीएट आहे. हे राजवैभव असल्याने याठिकाणचे पेंटिंग्ज व कलाकुसर मन वेधून घेते. नव्या सचिवालयाजवळ डोग्रा आर्ट गॅलरी गांधी भवनामध्ये आहे. बसोली आणि कांग्रा कला केंद्रातील पेंटिंग्ज् येथे पाहावयास मिळतात. सोमवारी ही आर्ट गॅलरी बंद असते.

जम्मू शहर पाहिल्यानंतर जम्मूच्या परिसराकडे पर्यटकांचे लक्ष वेधते. जम्मू येथील रघुनाथ मंदिरापासून पाच मिनिटांच्या अंतरावर असलेल्या जे. के. टुरिझम रिसेप्शन सेंटरतर्फे वाहने, खेळाचे अंतर, भाडे, प्रेक्षणीय स्थळांची माहिती दिली जाते. येथील मार्गदर्शनानुसार परिसरातील ठिकाणे योग्य खर्चात पाहणे शक्य होते.

**शुद्ध महादेव** : (Shuddha Mahadeo)

जम्मूपासून १२० कि. मी. अंतरावर शुद्ध महादेव हे स्थान आहे. येथे जाण्यासाठी जम्मूहून नियमित बसेस उपलब्ध आहेत. यात्रेकरूंसाठी हे एक पवित्र स्थान मानले जाते. कैलास हे शंकराचे निवासस्थान आणि पार्वती ही हिमालयाचीच मुलगी. याठिकाणी या दोघांचा विवाह झाला, अशी आख्यायिका आहे. याठिकाणी वातावरण निसर्गसुंदर व नयनमनोहर आहे. येथे देवक निर्झर पर्वतातून उड्या मारीत खळाळत खाली येतो, तो काही कि. मी. अंतरावर अचानक अदृश्य होतो. येथील शिव-पार्वतींच्या मूर्ती काळ्या संगमरवरी दगडावर कोरलेल्या आहेत. जून-जुलैमध्ये येथील यात्रेच्या वेळी भक्तलोक जातात. भक्तांना राहण्यासाठी येथे सोयी उपलब्ध असून राहण्याचा खर्चही अल्पसाच येतो. विशेषतः आषाढी पौर्णिमेला भाविकांची शुद्ध महादेव या स्थळी प्रचंड गर्दी असते. आरोग्यदायी वातावरण म्हणून उन्हाळ्यात लोक येथे राहाण्यास येतात.

**पटणी टाप** : (Patani-Tap)

जम्मू-श्रीनगर नॅशनल हायवेवर १०२ कि. मी. अंतरावरील हे ठिकाण निसर्गरम्य स्थळ म्हणून सहलीसाठी उत्कृष्ट आहे. या स्थळाची समुद्रसपाटीपासून उंची २०२४ मीटर आहे. जे. के. सरकार पर्यटन स्थान म्हणून या रमणीय स्थळाचा विशेष विकास घडवून आणीत आहे. उंचावर जाऊन सपाट झालेला हा हिरवळीचा पट्टा पठाराप्रमाणे आहे. आजूबाजूला हिरव्यागार गर्द झाडांनी व्यापलेले जंगल पसरले आहे. टेकडीवरून उतरत जाणारे हिरवे उतार अनुपमेय आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

पथोरा नावाचे आणखी एक निसर्गरम्य स्थान पटणीहून जवळ आहे. येथे राहायचे असेल, तर टूरिस्ट हट्स्-टूरिस्ट बंगले उपलब्ध आहेत. पण टूरिस्ट हॉस्टेल स्वस्त असून प्रत्येक व्यक्तीला झोपण्यासाठी बेड उपलब्ध आहेत. जम्मूच्या टुरिस्ट ऑफिसमध्ये येथील बंगल्यात राहण्यासाठी आधी रिझर्व्हेशन करून व्यवस्था करता येते किंवा पटणीटाप येथेही टूरिस्ट कार्यालय आहे. तेथे भेटूनसुद्धा राहण्याची सोय उपलब्ध होऊ शकते.

**आखनूर** : (Akhanoor)–चिनाब नदीकाठी वसलेले हे स्थान पिकनिक-साठी उत्कृष्ट असून जम्मूपासून ते केवळ ३२ कि. मी. अंतरावर आहे. जम्मूहून येथे नियमित बसेस उपलब्ध आहेत. चिनाबच्या काठाशी अखनूर किल्ल्याचे जुने अवशेष अजून आढळतात. अखनूरच्या जवळ कामेश्वर शिवाचे एक देवस्थान पाहण्यासारखे आहे.

**पूरमंडळ** : (Purmandal) – जम्मूपासून ३९ कि. मी. अंतरावरील हे ठिकाण हिंदूंना शंकराचे स्थान म्हणून विचित्र वाटते. येथे पायथ्याशी 'देवक' नावाचा झुळझुळ वाहणारा निर्झर आहे. या निर्झराजवळ पसरलेल्या खडकावर मंदिर उभारलेले आहे.

या स्थानाची एक धार्मिक आख्यायिका अशी आहे, की ऋषी काश्यप यांनी पापी मानवाची पापापासून मुक्तता व्हावी, म्हणून शिवाची तपश्चर्या आरंभिली शंकर त्या तपस्येने प्रसन्न झाले व कश्यपाने मानवी पापहरणाचा वर मागताच शंकराने 'देवक' हा पवित्र जलप्रवाह तेथे निर्माण केला. या प्रवाहात जो स्नान करील, त्यास पापापासून मुक्ती लाभते, अशी दंतकथा आहे. शिवकृपेनेच देवक जलप्रवाहाच्या काठी शुद्ध महादेव, पूर्णमंडळ, उत्तरबहेनी ही स्वयंभू शिवलिंगे निर्माण झालेली आहेत. पूर्णमंडळ हे अतिउत्तरेकडचे पवित्र तीर्थक्षेत्र मानले जाते.

**रामबन** : (Ram-Ban)–जम्मू-श्रीनगर हायवेवर जम्मूपासून १४८ कि. मी. अंतरावर हे ठिकाण आहे. जम्मूच्या टुरिझम कार्यालयात संपर्क साधून येथे राहण्याची व्यवस्था करता येते.

**रामनगर** : (Ramnagar)–जम्मूपासून हे स्थान १०२ कि. मी. अंतरावर असले, तरी उधमपूरहून मात्र केवळ १० कि. मी. अंतरावर आहे. रामनगरच्या रंगमहालात मूरल या पहाडी चित्रकलेचे दुर्मिळ नमुने पाहावयास मिळतात.

रामनगरच्या बाहेरील उंचचउंच मनोऱ्यावरून आजूबाजूचे रमणीय निसर्ग-सौंदर्य पाहावयास मिळते. या रंगमहालात कृष्णाच्या जीवनातील शिशुपालवध, राधाकृष्ण हे चित्रमय प्रसंग पाहावयास मिळतात. येथील कोरीवकाम नाजूक आणि मोहक आहे.

**बसौली :** (Besohli)–बसौली हे स्थान प्रथम शिल्पतज्ज्ञ विश्वकर्माने स्थापन केले, असे म्हणतात. हे प्राचीन शहर पण आताचे नवीन स्थान राजा भूपत पौल याने स्थापन केले. ते दोन हजार वर्षांपूर्वीचे जुने शहर असावे. जम्मूपासून येथे बसने जाता येते. येथील शिल्पसौंदर्य अजिंठा लेण्यातील परंपरेतील मानले जाते. प्राचीन राजांच्या राजवाड्याचे अवशेष तत्कालिन कलेचे नमुने पेश करून जातात.

बसौलीच्या जवळ वाहत असलेल्या रावी नदीच्या परिसरात खडकांत कोरलेल्या गुहा आढळतात. काही गुहांमध्ये शिल्पकलेचे नमुने पाहावयास मिळतात. बसौली आणि सरथाळ या परिसरामध्ये लाकडावर उत्कृष्ट कोरीवकाम केलेली मंदिरे पण आढळतात.

**सुरिसार** : (Surinsar)–आणि **मन्सार** (Mansar) सरोवर–जम्मूपासून ४५ कि. मी. अंतरावर सुरिसार सरोवर असून ८० कि. मी. अंतरावर मन्सार जलाशय आहे. सुरिसार येथे जाण्यासाठी जम्मूहून नियमित बसेस् उपलब्ध आहेत. सुरिसार जलाशय २ कि. मी. परिसरात पसरलेले आहे.

दुसरे मन्सार जलाशय सुरिसार जलाशयापेक्षा मोठे आहे. अर्जुनाने मारलेल्या बाणातून हे जलाशय निर्माण झाल्याची एक दंतकथा येथे ऐकवली जाते. मन्सारचा परिसर ४।५ कि. मी. इतका आहे. बाजूला असलेल्या टेकड्या वृक्षराईने हिरव्यागर्द दिसतात. मन्सार जलाशयाच्या बाजूला एका अवशेषात राहिलेला राजवाडा असून बाजूला अनेक मंदिरे आहेत.

चैत्र महिन्यात आणि शिवरात्रीला मन्सार सरोवरात स्नान करून लोक पुण्य संपादन करतात. मे महिन्यात येथे एक मोठा धार्मिक महोत्सव साजरा होतो. या सरोवरात कमळे उमलतात, तेव्हाचे दृश्य अधिक मोहक दिसते.

**बाबोर** :–(Babor)–जम्मूपासून हे स्थान ७२ कि. मी. अंतरावर आहे. मंदिराचे शिल्प पाहण्यासाठी येथे पर्यटक भेट देतात. येथे मंदिराचे अवशेष अजूनही तत्कालिन शिल्पकलेची साक्ष देतात. खांबावर हत्ती आणि सिंहाची तोंडे कोरलेली आहेत. बाबोरचे देवीचे मंदिर प्रसिद्ध आहे. तेथेच संपूर्ण कोरीव असे शंकराचे मंदिर पण आहे. येथील 'गंगे'ची सुंदर मूर्ती पाहाताच मन मंत्रमुग्ध होते.

**सनसार** :–(Sanasar)–जम्मूपासून हे हिरव्या कुरणाने व्यापलेले निसर्गरम्य स्थळ १२९ कि. मी. अंतरावर आहे. या ठिकाणची समुद्रसपाटीपासून उंची २०७९ मीटर आहे. डोंगरउतारांवर लुसलुशीत हिरवळ पाहिली, की रंगीत हिरव्या कपासारखा तो भूमिप्रदेश वाटतो. येथील कुरणात गुजर मेंढपाळ आपल्याबरोबर मेंढ्या घेऊन येतात. कुरणात चरणाऱ्या मेंढ्या पाहिल्या, की ते अनुपमेय दृश्य नजर

खिळवून ठेवते. पर्यटकांना जम्मूहून येथे जाण्यासाठी बसेस् उपलब्ध आहेत. येथील टुरिस्ट बंगलीमध्ये राहण्याची सोय आहे.

**पूंच** :–(Poonch)–जम्मूपासून २४५ कि. मी. अंतरावरील हा परिसर सम्राज्ञी नूरजहाँच्या स्पर्शाने जणू अधिकच सुंदर झालेला आहे. २०० फूट उंचावरून कोसळणाऱ्या शुभ्र धवधव्यावर मन थुईथुई नाचते. या धबधव्याचे नाव आहे नूरीछाम. काश्मिरच्या प्रवासात थंड तुषारांचा स्पर्श होताच हिंदुस्थानची सौंदर्यसम्राज्ञी नूरजहाँ येथे शांत होत असे.

**किश्तवार** :– (Kishtawar)–जम्मू-काश्मिर मार्गावर किश्तवार हे शहर आहे. केशरांच्या बागांसाठी हा भाग प्रसिद्ध आहे. किश्तवारच्या आजूबाजूच्या परिसरात अनेक फेसाळ पाण्याचे कोसळणारे धवधबे आहेत. येथून जवळच सरथळ देवीचे एक पाहण्यासारखे मंदिर आहे. किश्तवारला पूर्वी पायी किंवा घोडचावरून जावे लागत असे. पण आता मोटारने जाता येते. किश्तवारपासून १०० कि. मी. अंतराच्या परिसरात पाचूपण सापडतात. केशराच्या हंगामात निळचा फुलांच्या मनोहर दृश्याबरोबर हवेवर तरळणारा मंद सुगंध संपूर्ण वातावरण धुंद करून टाकतो.

**भद्रवाह** :–(Bhaderwah)–जम्मू प्रांतात पर्वतराईतील हे स्थान बटोतपासून ८० कि. मी. अंतरावर आहे. येथील हिरव्यागच्च वृक्षांचे सौंदर्य पर्यटकांना मोह घालते. हिरवळ, झुळझुळ वाहाणारे जलप्रवाह पाहून या छोटचा काश्मिरचा आनंद पर्यटक येथे मनसोक्तपणे लुटतात. येथूनच कपलाश या अतिउंचावरील सरोवराकडे अनेक भक्तलोक यात्रेसाठी जातात. वर्षाआड भाद्रपद महिन्यात ही यात्रा येते.

**कुद** :–(Kud)–जम्मूपासून ११३ कि. मी. अंतरावर हे शहर आहे. याची समुद्रसपाटीपासूनची उंची १७४० मीटर आहे. हे थंड हवेचे ठिकाण मानले जाते. कुदला 'क्वीन ऑफ हिल स्टेशन' मानतात. 'कुद' हा एक नृत्यप्रकारही आहे. चांदण्यारात्री या नृत्यासह लोक आनंदोत्सव साजरा करतात.

कुद हे स्थान उधमपूरपासून ४२ कि. मी. अंतरावर असून पटणीटापपासून ते केवळ ८ कि. मी. अंतरावर आहे. या ठिकाणच्या अमृत झऱ्याचे पाणी प्याले किंवा त्या पाण्याने हातपाय-चेहरा धुतला, तर त्वचेचे रोग नष्ट होतात. पाणी मात्र गोड, थंडगार व स्वच्छ आहे. येथील टूरिस्ट बंगल्यात प्रतिदिन भाडचाने खोल्या मिळू शकतात.

**बटोत** :–(Batota)–जम्मूपासून १२५ कि. मी. अंतरावरील हे थंड हवेचे ठिकाण निसर्गसौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे. जम्मू-श्रीनगर महामार्गावरच हे स्थान आहे. येथील वातावरणच आरोग्यदायी असल्याने येथे टी. बी. सॅनिटोरियम आहे. येथून

भद्रवाहला जाता येते. या ठिकाणी राहण्यासाठी बंगले, टूरिस्ट हट्स् आणि इतर हॉटेल्स उपलब्ध आहे.

**उधमपूर :–** (Udhampur)–देविका नदीकाठी हे शहर वसलेले आहे. जम्मूपासून उधमपूर बस सर्व्हिस उपलब्ध आहे. येथे नदीकाठी शंकराचे मंदिर असून नदीच्या दुसऱ्या तीरावर श्रीराम मंदिर आहे. उधमपूरला डाकबंगल्यात पर्यटकांना उतरण्याची सोय आहे.

**पाडर :–**(Padar)–हे स्थान किश्तवारपासून जवळ आहे. किश्तवार सोडून ६० ते ७० कि. मी. प्रवास होताच पाडरचे पर्वतीय क्षेत्र सुरू होते. या प्रदेशात 'नीलम' या प्रसिद्ध रत्नाच्या खाणी आहेत. तसेच गंधकातून वाहात आलेला सुंदर आरोग्य-दायी, उष्ण झरा येथे आहे. रोग निवारणार्थ लोक या प्रवाहात स्नान करतात.

**अगरजितो :–**(Agarjito)–आणि **झिरी** (Jhiri) जम्मूपासून २६ कि. मी. अंतरावर झिरी हे स्थान आहे. या ठिकाणची यात्रा प्रसिद्ध आहे. वैष्णोदेवीला येणारे यात्रेकरू कार्तिकी पौर्णिमेला या यात्रेचा अवश्य लाभ घेतात. आगर हे एक लहानसे गाव. या ठिकाणी बावजितो या सिद्ध पुरुषाचा जन्म झाला. तो आपल्या मुलीला घेऊन झिरी या ठिकाणी गेला. तेथील जहागिरदाराकडे तो शेती करीत असे. पण जहागिरदाराची हुकुमशाही त्याला नको होती. त्याने त्यास तीव्रविरोध दर्शविला. परिणामांती त्याला आपला प्राणत्याग पण करावा लागला. जहागिरदाराने त्या मृत आत्म्याला त्रास होऊ नये, म्हणून झिरी येथे त्याची समाधी उभारली. डोग्रा लोक श्रद्धेने त्या समाधीची पूजा करू लागले. या समाधीच्या बाजूला मंदिरे पण आहेत. हजारो भक्त यात्रेच्या वेळी समाधीच्या दर्शनार्थ या ठिकाणी जातात.

**मोहरगड :–**(Mohar Garb)–घनदाट जंगल आणि दुर्गम पर्वतीय प्रदेशात स्तिमित करणारा हा किल्लेवजा भाग कोणी, केव्हा, कशासाठी उभारला, हे रहस्य अजूनही इतिहासाला उलगडलेले नाही. अफगाणिस्तानातून येणाऱ्या मोंगलांचे हे विश्रांतीस्थान असावे किंवा कोणी बंडखोर सरदार येथे सुरक्षिततेसाठी आला असावा अशा दंतकथा ऐकवल्या जातात. मन्सार जलाशयापासून पायी चालत या ठिकाणी जाता येते. या स्थळाजवळच हरमंदिर नावाचे एक यात्रास्थान आहे.

**जवाहर बोगदा :–**(Jawahar Tunnel) जम्मू-काश्मिर या महामार्गावर जम्मूपासून १९४ कि. मी. अंतरावर बनिहाल या गावापासून जवळच ९००० फूट उंचीचा पीरपंजाब नावाचा पर्वत आहे. दऱ्याखोऱ्यांत पाय रोवून अगदी आडमुठ्यासारखा उभ्या असलेल्या या पर्वताचा मानवाला रस्त्यातच रोवून धरण्याचा उद्देश आहे, असे वाटते. पीर पर्वताचा हा दिमाख जिर-विण्यासाठीच जर्मन व भारतीय इंजिनियरांनी आपले कौशल्य पणाला लावले. त्या

पर्वताच्या पोटातच सुरुंग पेरले आणि त्यातून आकाराला आला आशिया खंडातील सर्वाधिक लांबीचा जवाहर बोगदा. पायी लांबी २५३१ मीटर आहे. या बोगद्यामुळे जम्मू आणि काश्मिरमधील ३० मैलांचे अंतर कमी झाले आहे. या बोगद्यात ऑरेंज कलरचे लाईट असून बोगदा सरळ असल्याने त्यातील प्रवास सुरू झाला, की त्या अंधारातल्या तांबड्या प्रकाशातील प्रवास चित्तथरारक वाटतो. येण्या व जाण्यासाठी असे बोगद्यात दोन भाग करण्यात आलेले आहेत. मधे-मधे हे दोन रस्ते एकत्र जोडल्याचे पण निदर्शनास येते. या बोगद्याला जवाहर बोगदा असे संबोधतात.

## जम्मूत कोठे राहाल ?

**सरकारी उपलब्ध सोयी** :–टूरिस्ट रिसेप्शन सेंटर:–जम्मू.

अे ब्लॉक, सी ब्लॉक, डी ब्लॉक, एअरकंडीशन रूम या प्रकारे विविध ग्रेडच्या रूम्स मिळू शकतात.

मॅनेजर, जे. के. टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, टूरिस्ट रिसेप्शन सेंटर, जम्मू या पत्त्यावर पत्र पाठवून कोणासही रिझर्व्हेशन करता येते.

**उच्च दर्जाची हॉटेल्स :–**

| हॉटेलचे नाव | सोयी-माहिती | पत्ता किंवा फोन |
|---|---|---|
| १) ब्रॉडवे | वातानुकूल व साध्या खोल्या | ४३६३६ |
| २) एशिया | वातानुकूल व साध्या खोल्या<br>सिंगल | नेहरू मार्केट<br>४६३७३ |
| ३) कास्मो | वातानुकूल व साध्या खोल्या | वीरमार्ग<br>५२२० |
| ४) नटराज | साध्या खोल्या | वीरमार्ग |
| ५) मन्सार | वातानुकूल | डेनीसगेट |
| ६) प्रीमियर | वातानुकूल वसाध्या खोल्या | वीरमार्ग<br>४२९७५ |
| ७) अशोक | वातानुकूल व साध्या खोल्या | रामनगर<br>४२०८४ |

खालील हॉटेल्समध्ये मध्यमवर्गीय कुटुंबांना राहणे शक्य होते. येथे सिंगल व डबल रूम मिळू शकतात.

| हॉटेलचे नाव | पत्ता |
|---|---|
| १) इंद्रा हॉटेल | चंद्रनगर |
| २) अँबॅसडर हॉटेल | पी. एन. बझार |
| ३) स्टॅन्डर्ड हॉटेल | वीरमार्ग |
| ४) अमृत हॉटेल | वीरमार्ग |
| ५) एअरलाईन हॉटेल | कॅनाल रोड (४७०९९) |
| ६) सिटी व्ह्यू हॉटेल | अपर घुमट |
| ७) दर्पण हॉटेल | तालाबतिल |
| ८) ग्रीन व्ह्यू | चांदनगर |
| ९) टूरिस्ट हॉटेल | वीरमार्ग |
| १०) जगन लॉज | आर. एन. बझार |
| ११) खोराना लॉज | हरी मार्केट |
| १२) नगीना लॉज | गुलमत |
| १३) न्यू क्वालिटी | वीरमार्ग |
| १४) प्रिन्स लॉज | ज्युवेल चौक |
| १५) प्रिया हॉटेल | कॅनॉल रोड (४२५०८) |
| १६) विमल लॉज | चांदनगर |
| १७) रिटायरिंग रूम | बसस्टॅन्ड |
| १८) यूथ होस्टेल | परेड ग्राऊंडसमोर |

जम्मूला ठिकठिकाणी अनेक धर्मशाळा आहेत. त्याठिकाणी कॉमनहॉल किंवा स्वतंत्र खोल्या पण मिळतात. त्यांचे दर अतिशय स्वस्त असतात.

**धर्मशाळाः–** १) आगरवाल धर्मशाळा २) ब्राहमीन सभा ३) जैन हॉल ४) महाजन सभा ५) रघुनाथ टेंपल ६) खुकरन बारादरी.

**स्नॅक्स व खाण्यासाठी रेस्टॉरन्ट :–**

१) कैलाशः––आर. एन. मार्ग २) क्वालिटीः––वीरमार्ग
३) कास्मोः–वीरमार्ग ४) नाझः––शहिदी चौक.

**जम्मूतील बँक्स:—**

| बँकेचे नाव | पत्ता | फोन क्रमांक |
|---|---|---|
| १) स्टेट बँक | रणबीर मार्केट | ५८९४ |
| २) कॅनरा बँक | वीरमार्ग | ७७०४ |
| ३) पंजाब नॅशनल बँक | शालिमार रोड | ५८३५ |
| ४) देना बँक | आर. एन्. बझार | ५८११ |
| ५) युनायटेड कमर्शिअल बँक | आर. एन्. बझार | ४२०७५ |
| ६) सिंडिकेट बँक | आर. एन्. बझार | ७६०५ |

**जम्मू गावातील वाहनांच्या सोयी :—**

(१) शहरात फिरण्यासाठी रिक्षा उपलब्ध आहेत.

(२) शहरात बेस्टसारख्या मोठ्या दुमजली बसेस नाहीत, पण लहान बसेस् आहेत. त्यावरील संयोजक ओरडून बस कोठे जाणार, हे सांगतो. १५।२० माणसे एकाचवेळी बसमध्ये घेतात.

(३) प्रेक्षणीय स्थळे पाहण्यास टॅक्सी पाहिजे असल्यास मिळते.

(४) श्रीनगरला टूरिस्ट रिसेप्शन सेंटरपासून टॅक्सीने जाता येते.

**जम्मूहून बाहेरगावी जाण्यासाठी बसेस् :—**

(१) गावातील बसस्टॅन्डवरून पहाटे ते रात्री १० पर्यंत प्रत्येक तासाला कटरासाठी बस सुटते. व रेल्वे स्टेशनवरून बाहेरगावी कोणतीही रेल्वे आली असताना कटरासाठी बस सोडली जाते. जम्मू गावातील बसस्टॅन्ड व रेल्वे स्टेशन यांमध्ये फक्त ७ कि. मी. अंतर आहे.

(२) रेल्वे स्टेशनवरून श्रीनगरसाठी सकाळी ७-३० पासून दुपारी १२ पर्यंत खालील-प्रमाणे बसेस् सुटतात.

| सुपर डीलक्स बस | अे क्लास बस | बी क्लास बस |
|---|---|---|
| २ × २ ची २० सीट | २ × २ ची २७ सीट | ३ × २ ची ४० सीट |

(३) अमृतसर व पठाणकोट यांसाठी गावातील बस स्टँडवरून सकाळी ६ ते संध्या ६ पर्यंत दर दोन तासाला एक याप्रमाणे बस सुटते.

(४) चंदिगढ़साठी दिवसातून फक्त चार बसेस् सुटतात.

(५) १–दिल्लीसाठी शहरातील बसस्टॅन्डवरून रोडवेजच्या सकाळी २ व संध्याकाळी २ बस सुटतात.

२–दिल्लीसाठी जम्मू शहरातून खाजगी बस सर्व्हिस आहे. २×२ च्या व्ही. डि. ओ. कोच लक्झरी बस ४।। याप्रमाणे रात्री ८ वा. सुटतात व सकाळी ७ वाजता दिल्लीला पोहोचतात.

**क्लब :–**

| क्लब | फोन क्रमांक |
|---|---|
| १) अमरसिंग क्लब | ८२०९ (तावी ब्रिज) |
| २) जम्मू क्लब | ४८००९ (स्टेडियम जवळ) |

**जम्मूतील हॉस्पिटल्स :–**

| | |
|---|---|
| १) गव्हर्नमेन्ट हॉस्पिटल | ५७४६ |
| २) सी. डी. हॉस्पिटल | ४६५१४ |
| ३) मुलांचे हॉस्पिटल | ५६२२ |
| ४) एस्. एम्. जी. एस्. हॉस्पिटल | ५०८० |

**निवासस्थानी डॉक्टरांची जरूरी भासल्यास :–**

| | |
|---|---|
| १) डॉ. सी. एल. गुप्ता (युरीयॉलॉजीस्ट) | ४६०१३ |
| २) डॉ. ओ. पी. गोयल (फिजीशियन) | ४६४४८ |
| ३) डॉ. सुशिल सहानी (गायनॉकॉलॉजिस्ट) | ५२६२ |
| ४) डॉ. आर. एम्. शर्मा (शस्त्र विशारद) | ४२९४४ |
| ५) डॉ. गुप्ता (कार्डियॉलॉजिस्ट) | ४६१०१ |

**प्रार्थना स्थळे :–** १) रघुनाथ टेंपल (रघुनाथ बझार) २) शिव मंदिर ३) रणबीरेश्वर मंदिर ४) कॅथॉलिक चर्च ५) सुंदरसिंग गुरुद्वार ६) जामा मशीद ७) सेंट पाउल्स चर्च ८) इब्राहीम मशीद ९) सिंगसभा गुरुद्वार.

**जम्मूतील मनोरंजन :–(चित्रपटगृहे) :** १) अप्सरा २) ज्युवेल ३) शंकर ४) इंद्रा ५) शकुंतला ६) उत्तम ७) स्वरण.

**अत्यावश्यक फोन :–** १) ॲम्बुलन्स—४२७७९.
२) पोलिस कंट्रोल रूम—१००
३) अग्निशामक—१०१.

**जम्मूहून काही प्रमुख ठिकाणांचे कि. मी.**

१) जम्मू ते अमृतसर—२४३ कि. मी.
२) जम्मू ते दिल्ली—;५८७ कि. मी.
३) जम्मू ते श्रीनगर——२९८ कि. मी.
४) जम्मू ते चंदिगढ़——४६३ कि. मी.
५) जम्मू ते पठाणकोट——११० कि. मी.
६) जम्मू ते कटरा——०४८ कि. मी.
७) जम्मू ते किस्तवार——०८० कि. मी.
८) जम्मू ते अखनूर——०३२ कि. मी.
९) जम्मू ते राजौरी——१६० कि. मी.
१०) जम्मू ते पूंच——२४० कि. मी.

**जम्मू शॉपिंगला चला :**—जम्मू हे शहर जम्मू-काश्मिर राज्याची हिवाळी राजधानी असल्याने, येथेही बाजारपेठ आहे. काही आवश्यक वस्तू खरेदी करावयाच्या असतील, तर वीरमार्ग आणि रघुनाथ बझार ही दोन ठिकाणे महत्त्वाची आहेत. वुलन कपडे, सुका मेवा (अक्रोड, बदाम इ.) फळफळावळे, कोरीव कामाच्या वस्तू व जीवनावश्यक अनेक वस्तू उपलब्ध असतात.

० ० ०



पहलगांम मध्ये राहण्याची उत्तम सोय

**हॉटेल होल्गा**

**'सर्व सुखसोयी युक्त'**

**उत्तम प्रकारचे राहणीमान व शाकाहारी / मांसाहारी जेवण.**

लिहा किंवा भेटा
**मॅनेजर हॉटेल होल्गा**
मु. पो. पहलगाम. (जे. अँड के)
फोन : ४६.




**वैष्णोदेवी** :– (Vainshno Devi)–अतिशय जागृत असे पवित्र धार्मिक देवस्थान आहे. भाषा, प्रांत, वयोगट, धर्म, वंश सारे भेद विसरून सर्व धर्मांचे लोक केवळ एकाच श्रद्धेने देवासमोर नतमस्तक झालेले या ठिकाणी दिसतात.

जम्मूपासून ४८ कि. मी. अंतरावर कटरा नावाचे एक लहान शहर आहे. या ठिकाणी येण्या-जाण्यासाठी नियमित बसेस् आहेत. त्रिकूट पर्वताच्या पायथ्याशी हे गाव आहे. येथूनच पायी किंवा घोड्यावरून त्रिकूट पर्वत चढून वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी जावे लागते. श्रद्धेने मुलांना खांद्यावर घेऊन जाणारे लोक, वृद्ध माता-पित्यांना आधार देत चालणारे तरुण, असे कितीतरी भक्तगण वाटेत भेटतात. सारेच चढण चढताना थकतात, अगदी मर्यादेपलीकडे, पण 'जयमातादी' असे अनोळखी व्यक्तीकडून ओळखीचे शब्द येताच थकवा नष्ट होतो व 'जयमातादी' असा प्रतिसाद देत नव्या उत्साहाने लोक पुढे चालू लागतात.

वैष्णोदेवीलाच उद्देशून 'जयमातादी' असे शब्द प्रत्येकाच्या ओठातून बाहेर पडतात. जेथे दुर्गम शिखरे चढून, असह्य त्रास सहन करूनही, हजारो भक्त रोज नतमस्तक होतात, त्या देवतेचा महिमा शब्दांनी काय सांगणार ? अनुभवानेच त्यातील रहस्य जाणता येते.

महिषासुराने केलेल्या उन्मत्तपणाची चीड आलेले देव आश्रयार्थ ब्रह्मा, विष्णु, महेशाकडे आले. त्यांची करुणकथा आणि व्यथा ऐकून देवांना दया आली. विष्णु आणि शंकराच्या मस्तकातून एक तेज बाहेर आले. ब्रह्मदेवाच्या दिव्य शरीरातूनही असेच एक तेज बाहेर आले. ते सर्व तेज एकरूप होताच त्यातून एक महाशक्ती जन्माला

आली. या शक्तीला मुख शंकराकडून मिळाले, केश यमराजाकडून, हात विष्णूकडून, कंबर इंद्राकडून, नितम्ब पृथ्वीकडून, चरण ब्रह्माकडून, दात प्रजापतीकडून, कान वायूकडून प्राप्त झाले. या तेजस्विनीस महिषासुराचा वध करण्याची प्रार्थना करण्यात आली. देवीच्या भयानक कोपाने पृथ्वीचाही थरकाप झाला. सैन्याचा पराभव होत आहे हे पाहून म्हशीचे रूप घेतलेला असुर चवताळून चालून आला. तलवारीने महिषासुराचे शिर देवीने घडावेगळे केले. त्यावेळी दर्शन घेणाऱ्यांना कृतार्थ झाल्याचे समाधान मिळाले. महाशक्ती अंतर्धान होण्यापूर्वी इतर देवतांना या शक्तिशाली देवतेने आश्वासन दिले, की संकटाचे वेळी स्मरण केल्यास मी पुन: प्रगट होईन. नंतर धूम्रनयन, चण्ड-मुण्ड, शुंभ-निशुंभ यांचा वध करण्यासाठी देवीला कालिमाता म्हणून प्रगट व्हावे लागले.



**त्रिकुट पर्वतात जागृत दैवताच्या दर्शनाने अनेक भक्तांचे जीवन उद्धारले ती 'वैष्णोदेवी' कटरा**

**वैष्णोदेवीची कथा:**—त्रेतायुगात खर-दूषण, त्रिशिरा, रावण या असुरांचा देवतांना आणि ऋषिमुनींना फारच त्रास वाढलेला होता. तेव्हा महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती यांनी एकत्र येऊन पृथ्वीवर एका दिव्य शक्तीला जन्माला घालण्याचे ठरविले. त्यांच्या शरीरातून निघालेल्या तेजस्वी किरणांतून एक तेजस्वी बालिका अस्तित्वात आली. त्या तेजस्वी बालिकेने हात जोडून विचारले,

'माझे नाव व काय काय ?'

महादेवींनी बालिकेला सांगितले,

'तुझे नाव 'वैष्णवी'. धर्मरक्षणार्थ तुझे अस्तित्व निर्माण झाले आहे. तू दक्षिण भारतात रत्नाकर सागराच्या घरी त्याची मुलगी म्हणून जन्माला येशील.'

पुढे रत्नाकर सागराला झालेल्या मुलीचे नाव 'वैष्णवी' असे ठेवण्यात आले. अनेक लोकांना वैष्णवीच्या दिव्य रूपाची कल्पना येऊ लागली. रामचंद्राला प्रसन्न करण्यासाठी वैष्णवीने समुद्राच्या काठी तपश्चर्या आरंभली. लंकेला जाण्यापूर्वी रामचंद्र समुद्रतटी आल्यावर त्यांना वैष्णवीच्या तपश्चर्येचे कळताच ते तिच्यासमोर उभे ठाकले. त्यावेळी वैष्णवी हात जोडून म्हणाली,

" हे प्रभो मी आपलीच प्रतीक्षा करीत आहे. आपल्या भेटीअंती आपणांशीच विवाह करण्याची प्रतिज्ञा मी केलेली आहे."

प्रभू रामचंद्र म्हणाले,

'मी एकपत्नी व्रत स्वीकारले आहे. तरीपण तुझी इच्छा पूर्ण होईल, पण एका अटीवर. मी रावणाचा वध करून परत येईन, त्यावेळी तू मला ओळखले पाहिजेस. तरच मी तुझा पत्नी म्हणून स्वीकार करीन.'

रावणाच्या वधानंतर एकदा स्वप्नातच वैष्णवीला दिलेल्या वचनाची आठवण रामाला झाली. त्याने साधूचा वेश परिधान केला. ते वैष्णवीच्या झोपडीत आले, तेव्हा वैष्णवी त्यांना ओळखू शकली नाही. नंतर तिला ते प्रभू रामचंद्र आहेत, हे कळल्यावर ती अतिशय दुःखी झाली. श्रीराम तिचे सांत्वन करताना म्हणाले,

" वैष्णवी ! दुःखी होऊ नको. कलियुगात कल्कीच्या अवतारात मी तुझ्याशी विवाह करीन. पण तोपर्यंत तू त्रिकूट पर्वतातील गुहेत तपश्चर्या करावी. त्या ठिकाणी तीन महाशक्तींचा निवास आहे. तेथे माझे भक्त तुझे रक्षण करतील. तुझा महिमा सर्वत्र पसरून लोक दर्शनार्थ तेथे येतील."

असे म्हणून श्रीरामचंद्र अयोध्येत गेले आणि वैष्णवी त्रिकूट पर्वताकडे रवाना झाली.

कलियुगात त्या ठिकाणी एका 'भैरव' नामक दुष्ट असुराने सतलज ते झेलमच्या परिसरात आपले राज्य वसवले. तो वैष्णवविरोधी होता. त्याने वैष्णवीची कीर्ती ऐकली होती. भगवती वैष्णवीची परीक्षाच पाहण्यासाठी तो अनुयायांच्या समवेत तिच्याकडे आला. त्यावेळी वैष्णवीने सूर्याने दिलेल्या कमंडलूच्या साहाय्याने सर्वांना पंचपक्वान्नाचे भोजन दिले. त्यासमयी भगवतीचे मोहक रूप पाहून भैरववळीचे मन तिच्याकडे आकर्षित झाले. परत आल्यावर त्याने दूतांकरवी वैष्णवीला आपली पत्नी व्हावे, असा निरोप पाठविला. त्याला होकार देण्याऐवजी त्याचा नाश करण्याची

प्रतिज्ञा वैष्णवीने केली. हा निरोप ऐकून भैरव क्रुद्ध झाला. त्याने आपले सैन्य लढाई-साठी पाठविले. पण त्या लढाईत भैरवाचा पराभव करून वैष्णवी 'भूमिका' या ठिकाणी गेली. तेथेही भैरवाच्या सैनिकांनी तिचा पिच्छा पुरवला. तेव्हा ती 'सलाल' या स्थानी गेली. तेथून ती 'चरण पादुका' या ठिकाणी थांबली. नंतर तेथून 'आदिकुमारी' या स्थानापाशी काही दिवस राहिली. तेथेही भैरव आपल्या सैन्यानिशी पोहोचला. तेथील युद्धाचे संचलन वैष्णोदेवीने 'गर्भगुंफा' या स्थानातून केले. यावेळी तिने भैरवाच्या ताव्यातील किरतवाड, भद्रवाह, रामनगर हे प्रदेश सोडवले व सर्थला, राजेश्वरी या देवीच्या हाती तेथील कारभार सोपवला.

इकडे भैरव पुन: सैन्याची जमवाजमव करीत होता. यावेळी भगवती वैष्णो-देवीने श्रीरामचंद्राने सांगितलेल्या गुंफेत प्रवेश केला. भैरव याही ठिकाणी लढण्या-साठी सैन्यानिशी आला. आता मात्र देवीचा प्रकोप झाला. तिने भैरवाचे मस्तकच उडवले. पण धडापासून वेगळ्या झालेल्या मस्तकाच्या मुखातून शब्द उमटले....

" हे माते, माझ्या नीचकर्माला क्षमा कर. मी शरण आलेलो आहे. माझा अंतिम क्षणाला तरी उद्धार कर."

वैष्णोदेवीचे क्रुद्धमन शांत झाले. ती वदता झाली ?.....

' हे भैरवा, मी तुला उ:शाप देते. माझ्या पूजनानंतर लोक तुझीही पूजा करतील. माझ्या दर्शनानंतर तुझे दर्शन घेतल्याशिवाय वैष्णोदेवीची यात्रा पूर्ण झाल्याचे श्रेय कोणालाही मिळणार नाही.'

असे म्हणून देवी गुंफेत गेली व भैरवाच्या मस्तकाचे रूपांतर दगडात झाले. आता या ठिकाणी भैरव मंदिर आहे आणि गुंफेत वैष्णोदेवी अंतर्धान पावून तपश्चर्या करीत आहे. या गुंफेत महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती अशा तीन मूर्ती आहेत. ती सर्व देवीचीच प्रतीके आहेत. या तीन पिंडांत मधली पिंड महालक्ष्मीची आहे. तिलाच वैष्णोवी किंवा वैष्णोदेवी असे संबोधतात.

**वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी कसा प्रवास कराल :–** अमृतसर, जम्मू, दिल्ली व श्रीनगर येथून कटरा पर्यंत येण्यासाठी बस सर्व्हिस आहे. जम्मूत दर तासाला कटरासाठी बस आहे. टॅक्सी सर्व्हिस पण सतत सुरू असते. जम्मू टूरिस्ट रिसेप्शन सेंटरला वहानाविषयी माहिती मिळते.

**कटरा :–** (Katra) जम्मूपासून ४२ कि. मी. अंतरावर असलेले छोटेसे गाव. हे समुद्रसपाटीपासून २५०० मीटर उंच आहे. त्रिकूट पर्वताच्या पायथ्याशी वसलेल्या या गावात सारे वातावरण वैष्णोदेवीच्या श्रद्धेनेच भरलेले आहे. येथूनच त्रिकूट पर्वताचा चढ सुरू होतो. कटरा बसस्टॅंड समोरच टूरिस्ट रिसेप्शन सेंटर आहे. या सेंटरच्या मागेच राहाण्याची उत्तम सोय आहे. हजार लोक राहतील, एवढी मोठी ही राहण्याची एकमजली इमारत आहे. एका रूममध्ये २० ते २५ लोक राहू शकतात.

पाणी २४ तास असून संडास-बाथरूमची उत्तम सोय आहे. यातील जागा अगोदर बुक करता येत नाही. पण ऐनवेळी तेथे सहज जागा मिळू शकते. तसेच स्टॅन्डच्या बाजूला धर्मशाळा व खाजगी लॉजेस आहेत.

मोटारस्टँन्ड पासून त्रिकूट पर्वतावर चढण्यासाठी दोन रस्ते आहेत. अंदाजे २ कि. मी. अंतरावर 'बाणगंगे' जवळ हे दोन्ही रस्ते एकत्र होतात. पूजेचे सामान या दोन्ही बाजूंच्या दुकानांत मिळते. तसेच गुंफेजवळच्या दुकानातसुद्धा यापेक्षा २–३ रु. महाग पूजेचे सामान उपलब्ध आहे. पर्वत चढताना वजन जवळ बाळगण्यापेक्षा गुंफेजवळ पूजेचे सामान विकत घेतलेले बरे.

वैष्णोदेवीचे देऊळ २४ तास उघडे असते. दर्शनासाठी लोक दिवसापेक्षा रात्रीच हा पर्वत चढणे अधिक पसंत करतात. आधार म्हणून पर्वत चढताना एक काठी तेथे घ्यावी व परत आल्यावर ती काठी त्याच दुकानदारास परत करावी. दुकानदार त्याचे नाममात्र ५० पैसे भाडे घेतो. कटरा येथेच टूरिस्ट सेंटरजवळ सामान ठेवण्यासाठी एक क्लोकरूम आहे. तेथे आपले सामान ठेवून दर्शनासाठी जाता येते. वाटेत पाणी पिण्यासाठी अनेक सोयी उपलब्ध आहेत. तसेच हॉटेल्सही आहेत. प्रवाशांसाठी वाटेवरील हॉटेल्स् २४ तास उघडी असतात. वर चढताना रात्री प्रवाशांना रस्ता दिसावा, म्हणून टयूबलाईट व बल्ब जागोजागी लावलेले आहेत. तरीपण आपल्याबरोबर बॅटरी असावी. वर चढण्यासाठी घोडे उपलब्ध असतात. त्यांचे दर ठरलेले आहेत. पण घोडयावर बसण्याची सवय नसल्यास रस्त्याने चालत जाणेच योग्य. डोंगरातून वर जाण्यासाठी दोन रस्ते आहेत. एक घोडयांचा वळणावळणाचा रस्ता आणि दुसरा पायऱ्यांचा रस्ता. पायऱ्या चढून गेल्यास अंतर कमी पडते. पण चांगलीच दमछाक होते. 'जयमातादी' शब्दाला प्रतिसाद देताना मात्र थकवा जाणवत नाही.

**दर्शनासाठी त्रिकूट पर्वतावर चढण्यापूर्वी :–** १) कटरा ते वैष्णोदेवी हे अंतर १३ कि. मी. आहे. तेवढेच परत येताना अंतर कापावे लागणार आहे, याचा पूर्ण विचार निघण्यापूर्वी करावा. २) वैष्णोदेवीचा डोंगर चढण्यापूर्वी परवाना काढावा लागतो. यात्रेकरू जास्त असल्यास त्यादिवशी वर चढण्यास परवानगी मिळत नाही. ३) बसस्टँड जवळच्या टूरिस्ट रिसेप्शन सेंटरच्या कार्यालयात परवाना विनाशुल्क मिळतो. ४) परवाना घेताना आपले नाव तेथे रजिस्टर केले जाते. कोठून आलात ? बरोबर स्त्री-पुरुष किती ? कोठे राहातात ? एवढीच माहिती सांगावी लागते. ५) परवाना न घेता डोंगर चढण्यास सुरुवात केल्यास २ कि. मी. अंतरावर दर्शनी दरवाज्याजवळ चेकपोस्ट आहे. तेथून परत पाठविले जाते. ६) देवळाच्या हद्दीत प्रवेश करताना आपला परवाना तेथे दाखवावा लागतो व दुसरा परवाना देवळात जाण्यासाठी दिला जातो. ७) वर चढताना सामान किंवा लहान मूल उचलण्यासाठी मजूर उपलब्ध असतात. वृद्धांसाठी डोलीही असते.

ज्यांना एका दिवसात जाऊन येणे शक्य नाही, त्यांच्यासाठी वैष्णोदेवीच्या मंदिराजवळ धर्मशाळा आहे. तेथे चार दिवसांपर्यंत राहता येते. तेथेच स्नानासाठी स्त्री व पुरुषांना स्वतंत्र कुंडे आहेत. जेवणाची सोयही आहे.

त्रिकूट पर्वताची उंची ८८७६ मीटर आहे. कटरा बसस्टँडवरून निघाले, की १ कि. मी. अंतरावर दर्शनी दरवाजा आहे. या ठिकाणीच भण्डारा (जेवणाचा प्रसंग) होऊन वैष्णवी त्रिकूट पर्वतावर आरोहणासाठी पुढे गेली. हे स्थान २७०० फूट उंचावर आहे. येथून पुढे १ कि. मी. अंतरावर बाणगंगा हे ठिकाण लागते. याची उंची २८०० फूट आहे. पूल ओलांडताना खाली जलाशय दिसते. बाणगंगेत लोक स्नान करतात. येथेच बाणगंगेचे मंदिर आहे. येथून वैष्णोदेवीकडे जाण्यासाठी दोन रस्ते सुरू होतात. पर्वताचे तीन टप्पे चढून गेल्यावर मात्र पायऱ्यांनी जाणाऱ्या लोकांनी तो रस्ता सोडून घोडयांच्या पाऊलवाटेने जावे. कारण तो पायऱ्यांचा रस्ता भैरवनाथाला व घोडयांचा पाऊलरस्ता वैष्णोदेवीकडे जातो. या रस्त्यालाच गर्दी आढळते. घोडयाच्याच वाटेने वळणावळणाने प्रवाशांनी जाणे फार सोयीचे आहे. परत २ कि. मी. डोंगर मागच्या बाजूला खाली उतरावा लागतो. तेव्हा वैष्णोदेवीचे मंदिर दिसते.

**बाणगंगा :–** या स्थानाचेही धार्मिक महत्त्व आहे. येथे वैष्णोदेवीने भैरवाचा पराभव केला व ती पुढे निघाली असताना तिच्या बरोबरच्या दोन वीरांना तहान लागली. तेथे आसपास पाणी नव्हते. तेव्हा देवीने जमिनीत बाण मारून गंगाजल उत्पन्न केले. या ठिकाणी देवी न्हात असे, अशी आख्यायिका आहे. म्हणून या ठिकाणाला 'बाणगंगा' म्हणतात.

**चरणपादुका :–** बाणगंगेहून पुढे ३ कि. मी. अंतरावरील स्थानाला 'चरणपादुका' असे संबोधतात. हे स्थान ३३८० मीटर उंचावर आहे. भैरवाचा पराभव करून देवी गुहेकडे निघाली असताना या ठिकाणी थोडावेळ थांबून तिने मागे वळून भैरवनाथाच्या सैन्याकडे पाहिले. त्यावेळी श्रीदेवीची पाऊले येथे उमटली. यासच 'चरणपादुका' म्हणतात. येथे छोटेसे मंदिर आहे. डोंगर चढतानाचा हा दुसरा टप्पा होय.

**आदिकुमारी :–** (Adikumar)–चरणपादुकापासून ४.५ कि. मी. अंतरावर आहे. या स्थानाची उंची ४७८३ मीटर आहे. या आदिकुमारीस वैष्णोदेवीच्या प्रवासकथेत एक वेगळे महत्त्व आहे. चरणपादुकेपासून देवी डोंगर चढताना या ठिकाणी आली. येथे एक तपस्वी तिला तपश्चर्या करताना दिसला. तिने तपस्व्याला सांगितले, मी येथे काही काळ विश्रांती घेईन. कोणी माझेबद्दल विचारले असता काहीही सांगू नकोस. एवढे सांगून वैष्णोदेवी एका गुंफेत निघून गेली. ज्या गुंफेत ती गेली, तेथे ती अतिशय सुरक्षित होती. अगदी मातेच्या गर्भात बालक असावे, तसे. नऊ महिने ती तेथेच तपश्चर्या करीत होती. यालाच 'गर्भजून गुंफा' असे म्हणतात.

भैरव वैष्णवीचा पाठलाग करीत तेथे आला, त्याने तपस्व्याला सुंदर कन्येस पाहिले का ? म्हणून विचारले. तेव्हा तपस्वी म्हणाला,

' जिला तू सामान्य कन्या म्हणतोस, ती महाशक्ती वैष्णवी आहे. तिने कौमार्य व्रत धारण केलेले आहे. '

या कौमार्य व्रतामुळेच या स्थानाला देवीचे दुसरे नाव ' आदिकुमारी ' असे देण्यात आलेले असावे. भैरवाने शेवटी ती गुंफा शोधून काढलीच. पण देवीने आपल्या त्रिशूळ प्रहाराने गुंफेचा दुसरा भाग फोडून ती तेथून निघून गेली. येथे आता आदि-कुमारी मंदिर आहे. मुक्कामासाठी येथे धर्मशाळा आहे. राहणे व जेवणाची व्यवस्था आहे.

**हाथी मत्थाः –** (Hathi Matha)–आदिकुमारी ते हाथी मत्था यातील अंतर अडीच कि. मी. आहे. ही मात्र सर्वांत अवघड व सरळ चढण आहे. या स्थानाची उंची ६५०० फूट आहे. हत्तीच्या मस्तकासारखा हा भाग दिसतो. म्हणून त्यास हाथी मत्था असे म्हणतात.

**साँझी छात :–** या पुढील टप्प्याचे नाव सांझी छत आहे. हे स्थान ७२०० फूट उंचावर आहे. याठिकाणी दोन रस्ते फुटतात. एक रस्ता भैरवनाथाकडे व दुसरा वैष्णोदेवीकडे जातो. येथून जिन्याचा रस्ता सोडून दिल्लीवाली छबील येथून वळसे घेणाऱ्या रस्त्याने पुढे जावे. येथून १ कि. मी. गेले असता डोंगराची चढण संपते. येथून परत २ कि. मी. डोंगर उतरून डोंगराच्या मागील बाजूस जावे लागते. याठिकाणी वैष्णोदेवीची गुंफा आहे.

**वैष्णो गुंफा** (Vaishno cave) :– ही गुंफा ५७८० फूट उंचावर आहे हेच ते वैष्णोदेवीचे पवित्र मंदिर. या प्रवेशद्वारातच आपण बरोबर आणलेला परवाना दाखवून दर्शनासाठी प्रवेश देणारे दुसरे टोकन घ्यावे लागते. येथे एक 'विशाल भवन' आहे. येथे मुक्कामाची सोय आहे. सामान ठेवण्यासाठी क्लोकरूमस् आहेत. चप्पल-बूट येथेच काढून ठेवावे लागतात. गुंफेत शिरण्यासाठी तीन टप्प्यांचा बांधीव भाग सुरू होतो. यांच्याच दुसऱ्या बाजूस स्नानाची सोय आहे. गुहेबाहेर तीन मंडप आहेत. या एका मंडपात एकावेळी ७० ते ८० लोक बसतात. १ मंडपातील लोक गुहेत गेले की, तेथे दुसऱ्या लोकांना आत प्रवेश दिला जातो. येथील दर्शनासाठी दोन ते तीन तास रांगेत उभे राहावे लागते. पहाटे ४ च्या आत दर्शनाच्या रांगेत उभे राहिल्यास अर्ध्या तासात दर्शन मिळते. नंतर रांग वाढत जाते.


**वैष्णोदेवी दर्शन :–** आपण वैष्णोदेवीच्या जवळ २० मीटरपर्यंत आलो, तरी नक्की कोठे गुंफा आहे, ते दिसतच नाही. गुहेस जेथे सुरुवात होते, तेथे बाहेरच्या बाजूला छोटासा मंडप बांधला आहे. या मंडपात १०।१५ लोकांची एक याप्रमाणे प्रत्येक रांगेत लोकांना बसविले जाते व एकेका रांगेतील लोकांना उभे करून त्या


गुहेत सोडले जाते. प्रथम त्रिकूट पर्वतातील काळाकभिन्न असा प्रचंड दगड दिसतो व त्यातच बोगद्यासारखी २ ते ३ फूट उंचीची गुंफेची पोकळी नजरेत भरते. 'जय-मातादी' म्हणून त्या गुहेत प्रवेश करताच ब्रह्मांड आठवते. संपूर्ण अंधार, गुडघ्यापर्यंत पाय बर्फाच्या वाहत्या पाण्यात पडतात. लहान मुलाससुद्धा उभे राहता येणार नाही, असा खडकाळ कपारीतील वळणाचा रस्ता. त्यातून खूपच वाकून चालावे लागते. वाकल्यामुळे कंबर दुखते व जरा ताठ व्हावे, तर डोक्याला काळ्या पाषाणाची टक्कर बसते. पण 'जयमातादी' असा श्रद्धेने जप करीत लोक पुढे जातात.

तेथून १० फूट पुढे गेल्यावर दोन पायऱ्या चढल्या, की अगदी अरुंद असा गोल रस्ता आहे. एकावेळी एकच व्यक्ती सरपटत देवीपर्यंत जाऊन पोहोचते. तेथे महा-काली, महालक्ष्मी (वैष्णोदेवी) व सरस्वती अशा तीन खडकातील मूर्ती दाखविल्या जातात. आपण आणलेले पूजेचे सामान तेथे फक्त टेकविले जाते व तेच आपल्याला प्रसाद म्हणून परत केले जाते. शिवाय तेथील पुजारी प्रसाद म्हणून सुटे पैसे आपणांस देतात. दर्शन होते, न होते तोच आपणास जवळजवळ ढकलून बाहेर जाण्यास सांगितले जाते. ज्या देवीच्या दर्शनासाठी ६–७ तास पर्वत चढून आपण येतो, तेथे अंधूक प्रका-शात काही सेकंदच देवीचे दर्शन मिळते. दर्शन घेतल्यानंतर बाहेर पडण्याचा बोगदा मात्र व्यवस्थित व मोठा आहे. बाहेर पुजारी आपल्या पूजेच्या सामानातील चुनी (लाल फडके) आपल्या डोक्यास बांधतो. त्यासाठी दक्षिणा द्यावी लागते. उदार-श्रीमंत लोक यावेळी दानधर्म करतात. येथून भैरवनाथाच्या दर्शनासाठी बरेच लोक परत डोंगर चढण्यास सुरुवात करतात. काही लोक परतीचा प्रवास सुरू करतात. त्या प्रवासातही कटरापर्यंत येण्यास घोडा मिळतो.

**वैष्णोदेवीच्या दर्शनाला केव्हा निघाल** :– रात्री ९ ते १० च्या सुमारास कटराहून निघणे उत्तम. रस्त्याने कसलीही भिती नाही. असंख्य भक्तजण आपल्या-बरोबर असतात. रात्री ३ च्या सुमारास तेथे पोहोचल्यानंतर आंघोळ उरकून घ्यावी. व नंतर दर्शन घेऊन अंदाजे ५ ते ६ च्या सुमारास परतीचा प्रवास सुरू करावा. सकाळी ९ पर्यंत कटरा येथे परत येता येते. वर चढून जाणे व लगेच परत येण्यास निघणे असे जाणे-येणे म्हणजे मात्र भक्ताची अक्षरश: सत्त्वपरीक्षाच आहे.

० ० ०


BHAIRAVNATH
VAISHNODEVI
HATHI MATH
ADIKUMARI
CHARAN PADUKA
BANGANGA


SRINAGAR
1 NISHAD
2 SHALIMAR
3 HARWAN
4 SECRETORIAT
5 LAL CHAWK
6 GEN. BUS-STAND
7 CITY BUS STAND
8 JAMMU BUS STAND
9 BAGHA CHAWK
10 CHAR CHINAR
BACHHAPURA
RANGPUR
PAZWALPURA
BANIGAM
ANCHAR LAKE
SORA
ANCHAR
WONTABOWAN
VICHARNAG
NASIM BAGH
HAZRATBAL
DAL LAKE
ISHERBARI
MUNDIBAL
NOUSHERA
NAGIN BAGH
BHAGWANPURA
ZADIBAL
SAIDPURA
ALAMGARI BAZAR
KHUSAL SAR
NAGIN LAKE
NOHATA
MAHARAJ GANJ
RAINAWARI
WANIYAR
SHIRAZI BAGH
RAJ BHAVAN
CHASHMA SHAHI
NAWAB BAZAR
HABBA KADAL
SHANKARCHARYA
GUPKAR
KARAN NAGAR
MUNAWAR
CHINAR BAGH
GOLF COURSE
BACHHWARA
(UNO)
BATMALU
SONAWAR BAGH
BADAMI BAGH
ARAMWARI
RAJ BAGH
LAL MAND
JAWAHAR NAGAR
JHELUM
RAM MUNSHIBAGH
MAHARAJPUR
SPILL CHANNEL
RAM BAGH



# श्रीनगर

**शहराचे नाव** :– श्रीनगर (ग्रीष्म ऋतू–उन्हाळ्यातील राजधानी)

**राज्य** :– जम्मू–काश्मिर.

**समुद्रसपाटीपासून उंची** :– १७६८ मीटर.

**ऋतू** :– १) १५ मार्चपासून वसंत ऋतू–स्वच्छ आल्हाददायी हवा पर्यटनास उत्तम. बर्फ भरपूर. मात्र फळा-फुलांचा आनंद मिळत नाही.

२) जून ते सप्टेंबर–रंगीबेरंगी फळा-फुलांचा ऋतू. थंडी साधारण. हा ऋतू म्हणजे काश्मिरचा उन्हाळा.

३) नोव्हेंबर ते फेब्रुवारी–हिवाळा. पाणी गोठवणारा गारठा. स्केटिंगसाठी उत्तम सिझन.

४) मे व ऑक्टोबर–रिमझिम पाऊस. पावसापुरती मर्यादित थंडी. एकूण वर्षात पाऊस २० ते २५ सें. मी.

**उष्णतामान** :– १) हिवाळ्यात–२.३ सें. कमीत कमी
५.१५ सें. जास्तीत जास्त.

२) उन्हाळ्या–१५.५ सें. कमीत कमी.
२८.३०.८ सें. जास्तीत जास्त.

**लोकसंख्या** :– ४.५०००.

**भाषा** :– काश्मिरी, उर्दू, इंग्रजी, हिंदी, डोग्री, पहाडी.

**टूरिस्ट कार्यालय** :– १) टूरिस्ट रिसेप्शन सेंटर–श्रीनगर. फोन–२९२७

२) एअरफोर्ट टूरिस्ट, ऑफिस–श्रीनगर. फोन–२१००.

**श्रीनगर** (Shrinagar) :– 'पूर्वेकडील व्हेनीस', 'अतिशय सुंदर नगरी', किंवा 'लक्ष्मीचे स्थान' अशा विविध शब्दांत श्रीनगरचे श्रेष्ठत्व वर्णन केले जाते. हे शहर थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असले तरी तेथील निसर्गसौंदर्य दृष्ट लागावे, इतके निरतिशय सुंदर आहे. पृथ्वीवर ज्याप्रमाणे तीन भाग पाणी व एक भाग जमीन आहे, त्याचीच छोटी प्रतिकृती म्हणजे श्रीनगर.

झेलम नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर श्रीनगर वसले आहे. हिमालयातील हे शहर टेकडया, उंचसखल भूभागावर वसले आहे, अशी कल्पना केली असेल, तर ती चुकीची आहे. कारण जम्मूपासून सुरू होणारा पहाडी रस्ता १९८ कि. मी. आहे. यानंतर गांधारबल, खानाबल, श्रीनगर ते गुलमर्ग हा संपूर्ण १९० कि. मी. चौरस लांबीचा भूभाग सपाट आहे. उंच पर्वतरांगा नक्षीदार झालरीप्रमाणे सभोवताली पसरलेल्या आहेत. दाल सरोवराने शहराच्या सौंदर्यात फार मोठी भर घातलेली आहे. सरोवराच्याच काठाने पुढे गेल्यास वाटेने लागणाऱ्या निशाद, शालिमार बागा मोंगलकालीन खानदानी सौंदर्याचा दिमाख प्रगट करतात. खळखळणारे निर्झर, रंगीबेरंगी फुले, माना उंचावून खुणावणारी बर्फाच्छादित शिखरे पाहिली, की आपण स्वप्नात तर नाही ना ? असे मनाला वाटते.

हिरव्या तारुण्याने मुसमुसलेली, बर्फाचे गोरेगोरे अंग सलजपणे वृक्षराईंनी झाकणारी, झेलम आणि दाल सरोवराच्या जलाशयात मुक्तपणे जलविहार करणारी ही 'जलनगरी' असंख्य लोकांना आपल्या प्रिय व्यक्तीपेक्षाही मोहक-आकर्षक वाटत असेल, यात दुमत नाही. परमेश्वराने आपल्याजवळ असलेला निसर्गसौंदर्याचा खजिना मुक्तहस्ते येथेच उधळून दिलेला असावा.

येथील निसर्गात शृंगारच शृंगार ओथंबून ओसंडताना दिसतो. सडपातळ कमरेच्या गौरवर्णीय नद्यांचे लचकत–मुरडत चालणे, हिरवळीच्या मखमलीखाली दडलेल्या भरदार उरोजाप्रमाणे भासणारे डोंगर, रंगीबेरंगी फुलांना चुंबणारी फुलपाखरे ! या धुंदमादक वातावरणात गळून पडणारी झाडांची ही पिवळी पाने पुनः तर हिरवी होत नसतील ना ?

हिमालयाच्या कुशीत वसलेल्या या शहरातूनच झेलम नदीचा प्रवाह वाहत असल्याने या शहराचे दोन्ही भाग विविध ठिकाणी मऊ लाकडी पुलांनी जोडलेले आहेत. या शहराचा प्राचीन इतिहास जाणून घेण्यासाठी इ. स. पूर्व काळापर्यंत पाने उलटी उलगडीत मागे जावे लागेल.

इ. स. पूर्वी तिसऱ्या शतकात सम्राट अशोकाने या शहराची स्थापना केली. त्यानंतर त्याचा मुलगा जलुका याने त्याचा विस्तार करून जेष्ठरुद्र मंदिराची स्थापना केली. यानंतर इ. स. १३९ मध्ये प्रवरसेन राजाने प्रवणापूर नावाचे नगर स्थापन केले. आज तेथेच बगामीबाग छावणी आहे. ज्याठिकाणी प्रवरसेनने नगर स्थापन केले, त्याच्या पलीकडे एक राक्षस होता. त्याचा वाकडा पाय त्याने लांब पसरवून त्यावरून पाण्याचा प्रवाह ओलांडण्याचे राजाला आव्हान केले. राजाने तलवारीने त्याचा पायच कापून टाकला. पण राक्षस त्यावर न रागावता त्याने त्याच्या बहादूरीवर खूष होऊन त्याला तेथे नगर स्थापन करण्यास सांगितले. हरिपर्वताच्या पायथ्याशी राजाने प्रवणपूर उभारले. नंतर राजाने शिवमंदीरसुद्धा बांधले. बण्चीबरन-च्या किल्ल्याजवळ अजूनही त्या मंदिराच्या इतिहासाची आजही साक्ष देत आहे. या शहराला इ. स. ६३१ मध्ये ह्यूएनत्संग या चिनी बौद्ध प्रवाशाने भेट दिली होती. वितस्ता नदीकाठी हे शहर वसले असल्याचे वर्णन या प्रवाशाने लिहून ठेवले आहे. हे शहर प्रथम उजव्या किनाऱ्यावर वसवले गेले. त्यानंतर राजा अनंताने आपली राजधानी वितस्ता नदीच्या डाव्या किनाऱ्यावर नेऊन श्रीनगर शहर आकाराला आणले. ही घटना ११ व्या शतकात घडली.

श्रीनगरचे राज्यपद नंतर राजा झेन-उल-अबादिन याच्या हाती आले. तो स्वतः विद्वान बादशहा होता. त्याने पर्शियन व संस्कृत भाषेच्या पंडितांना आश्रय दिला होता. त्याने इराणमधून गालिचे आणि शाल विणणारे कलावंत आणून या उद्योग-व्यवसायाचा पाया काश्मिरमध्ये घातला.

इ. स. ११२८ च्या सुमारास बादशहा झेन उलच्या आधी सिंधदेव नावाचा राजा झाला. हा काश्मिरमधील शेवटचा हिंदू सत्ताधीश. त्याच्या मृत्यूनंतर सेनापती रामचंद्रने सत्ता हाती घेतली. त्याचा सेनापती रेंचन शाह याने रामचंद्रला मारून टाकून त्याची मुलगी कीटा राणीशी विवाह केला. तो तिबेटियन होता. राजा झाल्यावर त्याने काश्मिरच्या ब्रह्मवृदांना हिंदू करण्याची विनंती केली; पण ती त्याने अव्हेरल्या-मुळे तो एका मुसलमान फकिराकडे गेला आणि त्याने इस्लाम धर्म स्वीकारला. सुलतान जैनुल हा काश्मिरचा लोकप्रिय राजा ठरला.

१८८६ मध्ये अकबराने शेवटचा वारस याकूब शाह यास लढाईत पराभूत केले. आणि मोगल साम्राज्याची मुहूर्तमेढ या सौंदर्यशाली भूमिप्रदेशात केली. काश्मि-रच्या सौंदर्यावर अकबरापेक्षाही मनापासून प्रेम केले ते त्याचा मुलगा जहाँगीर याने. अप्सरांच्या सौंदर्याला लाजवील, अशा सुंदर नूरजहाँवर त्याचे जेवढे प्रेम होते त्यापेक्षा अधिक आकर्षण त्याला काश्मिरचे असावे. नाहीतर त्याने काश्मिरच्या भूमीत मरण येण्याऐवजी नूरजहाँच्या मांडीवर डोके ठेवून मरण मागितले असते. जहांगीरने

श्रीनगरच्या गळ्यातील रत्नहारात एक हिरवे माणिक गोवले, ते म्हणजे शालिमार गार्डन. शाही इष्काचा तो एक अमोल नजराणा आहे.

१८१९ नंतर शीख राजा रणजितसिंग याने शेवटच्या सम्राटाचा पराभव करून श्रीनगर ताब्यात घेतले. त्यानंतर १८४६ मध्ये डोग्रा राजा गुलाबसिंग याने श्रीनगरचे राज्य मिळवले. १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाल्यामुळे ग्रीक कालीन राजधानी असलेल्या श्रीनगरच्या सभोवताली जम्मू व काश्मिर राज्य भारतीय संघराज्याचे अविभाज्य घटक ठरले.

श्रीनगरला जायचे-श्रीनगर पाहायचे, म्हणजे सौंदर्यशाली दृष्टिकोन हवा. लोकलला लोंबकळत मुंबई पाहावी, तसे श्रीनगर पाहाता येत नाही. नाजूक नितळ नजरेने श्रीनगरचे सौंदर्य पाहणे आवश्यक ठरते. हिरव्यागार भव्य प्राचीन बागा, थुईथुई नाचणारे कारंजे, पर्वताखालून येणारे निर्झर, झेलमचा हिरवट पाण्याचा खळखळणारा प्रवाह, शांत व भव्य दाल सरोवर, काश्मिरच्या निसर्गाची भव्यता व्यक्त करणारे चिनार आणि सौंदर्य वाढवणारी सुरू व सफेदाची झाडे, हे पाहताना भान हरपते. एका सौंदर्यविश्वात आपण हरवून जातो.

**दल सरोवरातील जलविहार :- (Dal-Lake)** – दल सरोवर म्हणजे श्रीनगरचा पांढराशुभ्र आरसाच. नितळ पाण्यात आजूबाजूची पर्वतशिखरे, वृक्ष आणि वरती लोंबकळणारे निळेशार आकाश सारखे आपले प्रतिबिंब त्यात न्याहाळीत असते.


श्रीधर पर्वताच्या पायथ्याशी पूर्वेला श्रीनगरच्याच एका टोकाला हे भव्य सरोवर पसरलेले आहे. शहरातून आलेल्या वक्र रस्त्याने वळसा घेतला, की या सरोवराच्या काठालाच मोंगल सम्राटांनी तयार केलेल्या निशाद, शालिमार बागा लागतात. मे महिन्यात या सरोवरातील पाणी बॉटलग्रीन रंगाचे दिसते. उन्हाचे किरण पाण्यात शिरले, की आतील हिरवेगार शेवाळ आणि वनस्पती स्पष्ट दिसतात. पण एक मात्र दिसत नाही. या सरोवराची खोली काही ठिकाणी २० ते २५ फूट आहे. गवताची पाती, कमळाच्या वेली आणि मधूनच डोकावणारी फुले अगदी पाण्यावर वेलबुट्टी काढावी, तशी वाटतात.

हिवाळ्यातच हे सरोवर गोठण्याचा प्रसंग अनेक वर्षांतून क्वचित एखादे वेळी येतो. यावेळी चांदीचा शुभ्र प्रचंड ट्रे आणून ठेवावा, तसे मोहक दृश्य दिसते. धुक्यातून सूर्यकिरण झिरपले, तर चंदेरी-सोनेरी रंगाचा समन्वय मनोहारी भासतो. ६×४ कि. मी. असे हे सरोवर पसरले आहे. दक्षिणेला शंकराचार्य टेकडी आहे, तर पश्चिमेला हरिपर्वत.

दल सरोवरात जलविहाराला शिकाऱ्यातून निघाल्यानंतर सरोवरातील विविध सौंदर्यस्थळांना भेटी देता येतात. पूर्वेकडे शहराची गजबज दिसते. श्रीमंत

थाटाची भव्य हॉटेल्स् याच ठिकाणी दिसतात. शिकाऱ्यात बसण्यापूर्वी तेथील नांवे नोंदवणाऱ्याकडून शिकाऱ्याचे नंबर व नाव घेऊन त्याच शिकाऱ्यात बसावे. म्हणजे पुढील कटकटी टळतात. आपल्याला प्रथम ग्राहक मिळावा, म्हणून प्रत्येक शिकार-वाला आपल्यास सतावीत असतो. शिकाऱ्यास रंगीबेरंगी पडदे लावून तो सुशोभित केलेला दिसतो. शिकारावाला हा हातानेच शिकारा वल्हवतो. मधून-मधून दम लागला, तर स्वारी वल्हवणे सोडून हुक्का पिण्यातच गर्क होऊन जाते.


शिकाऱ्यातून सरोवरात जलविहार करताना पाण्यात हात बुडवून पाणी उड-विण्यात मौज मानणारे कितीतरी पर्यटक आढळतात. शिकारावाल्याशी मैत्री झाल्यास काश्मिरच्या सौंदर्यापासून राजकारणापर्यंत सर्व गोष्टी त्याच्याकडून ऐकायला मिळतात. या सरोवरात दुकाने तरंगत आपल्याकडे येतात. किती मौज आहे नाही ? दुकाने म्हणजे दुसऱ्या बोटीच. त्यांतच दुकाने थाटलेली असतात. खाणे, पिणे, फुले, शाली, केशर, इ. सर्व वस्तू त्यात मिळतात. बोलता-बोलता 'कबुतरखाना' येऊन थबकतो. दल सरोवराच्या पाण्यातच ही वास्तू उभारली आहे. हवाबदल करण्या-साठी डॉ. करणसिंग यांनी ही बांधलेली आहे. सरोवरावरून उडणाऱ्या कबुतरांची पाण्यात पडलेली प्रतिबिंबे लाटांत मिसळून जातात.



**पूर्वेकडील व्हेनिस, अतिशय सुंदर नगरी, लालचौक श्रीनगर**

**चार चिनार :–**(Char-Chinar):–शिकारा चार चिनारकडे जाण्यासाठी पुढे सरकतो. चार चिनार हे दल सरोवरातील एक लहानसे बेटच म्हणाना ! पण या बेटाचे वैशिष्टय म्हणजे, याच्या चारही बाजूंस पाणी असून बेटाच्या जमिनीच्या

खालीपण दल सरोवराचे पाणी आहे. या इवल्याशा बेटाच्या चारही कोपऱ्यांवर अती सुंदर भव्य चार चिनार वृक्ष आहेत. म्हणून याचे नाव चारचिनार. नूरजहाँ या मोंगल सम्राज्ञीने चिनारवृक्ष इराणमधून भारतात आणवले होते. या उंच भव्य वृक्षांची हिरवीगार पाने नक्षीदार रेखीव कापल्यासारखी वाटतात. लावण्यसंपन्न, नूरजहाँन उन्हाचा ताप असह्य झाला, की शाही इतमामात ती येथे श्रांत होत असावी. सरोवरातून आलेल्या शीतल वाऱ्याच्या झुळकीने चिरतरुण चिनारच्या पानांची तारुण्यसुलभ सळसळ होताच त्या सुंदर रमणीने सम्राटाच्या सादेस प्रतिसाद दिला असेल. शाही इष्काने न्हाऊन निघालेले ते तरुण जोडपे पाहून चिनारची पाने पण लाजून चूर झाली असतील, नव्हे त्यांना हेवा वाटला असेल. शाही शृंगार सरोवरातील जललहरींनी पाहू नये, म्हणून चारही कोपऱ्यांवर चार चिनारांनी आपल्या भव्य विस्तारांचा आडोसा तर निर्माण केला नसेल ना? चिनारांच्या छायेत अजूनही पर्यटक विसावतात. मध्यभागी हिरवळ आणि रंगीबेरंगी फुलांची बाग आहे. जड अंतःकरणानेच चारचिनारांचा निरोप घेऊन शिकारा पुढील जलविहारांसाठी पुनः पाणी कापीत पुढे जाऊ लागतो.



**मोंगल दांपत्यांचा शाही शृंगार ज्या वृक्षांनी पाहिला ते चारचिनार दलसरोवरातील बेट–श्रीनगर.**

फ्लोटिंग गार्डन (Fleating Garden) :– दल सरोवरातील पाण्यावर तरंगणारी छोटीसी बाग किंवा शेती म्हणजेच फ्लोटिंग गार्डन होय. दल सरोवरातील वनस्पती पाण्यापासून वर काढून वाळवली जाते व नंतर तिचा गठ्ठा करून पाण्यात टाकला जातो. अर्थात हा थर पाण्यात तरंगत असतो. त्यावर मातीचा थर देऊन त्यात फळभाज्या लावल्या जातात. यांची मुळे खालील बाजूस पाणी शोषून घेतात. यामुळे झाडांना पाऊस किंवा पाण्याची गरज भासत नाही. शिवाय गवतात गाळ असल्याने खत न घालता फळभाजी उत्तम पिकते. फोमच्या गादीवर पाय ठेवला, की स्पंज ज्याप्रमाणे आत जाते, तशी ही शेती आहे. अर्थात या शेतीची लागवड छोटचा होडयांच्या मदतीनेच होते. या तरंगणाऱ्या बगिच्यात बीन, टमाटर, खरबूज, काकडी, फ्लॉवर, कोबी, नवलकोंद इत्यादी फळभाज्या पिकतात. येथे सौंदर्यापेक्षा कुतूहलच अधिक भासते.

शिकारा फ्लोटिंग गार्डन सोडतो आणि लोटस गार्डनकडे वळतो. येथे कमळाच्या वेलींची जाळी पाण्यात स्पष्ट दिसते. पाण्यात काढलेली ही हिरव्या रेषांची वेलबुट्टी नजर खिळवून ठेवते. येथेच जून सीझनमध्ये गुलाबी, पांढरी, पिवळसर कमळे फुलतात. इतरवेळी वॉटर लिली फ्लॉवर आढळतात.

कमळातून वाट काढीत शिकारा हाऊस बोटीतील दुकानाजवळ येतो. शिकारावाला प्रश्नार्थक मुद्रेने आपल्याकडे बघतो. समोर शोकेसमध्ये वुलन कपडे, शाली, सिल्क साडचा, कोरीव वस्तू, इ. दिसतात. यावेळी सरोवरातील शांतता भंग पावते.

शिकारावालाः–साहब कुछ लेना है ?

प्रवासीः–जी नहीं !

शिकारावालाः–बहोत अच्छा और सस्ता माल होता है ।

काही पर्यटक त्याच्या बोलण्याकडे चतुरपणे दुर्लक्ष करतात, ग्राहकाची इच्छा हेरणारा शिकारावाला शिकारा पुढे वल्हवतो आणि आपण याच सरोवरातील नेहरू पार्कला पोहचतो.

नेहरू पार्क (Nehru Park) :– चार चिनारनंतर या सरोवरातील हे रमणीय स्थळ. चारही बाजूला पाणी असलेल्या या बागेचा विस्तार मोठा असून बोटीतून पंचवीस पैशांत फिरायला येणारे लोक या किनाऱ्यावर उतरतात. चारही बाजूला हिरवळ असून एका कोपऱ्यात धवलवर्णाचा लाकडी बसस्टॅन्ड आहे. ठिकठिकाणी रंगीबेरंगी फुले उमललेली दिसतात. फुलांचे रेखीव वाफे बागेच्या सौंदर्यात भरच घालतात. अनेक पर्यटक येथे फोटो काढताना दिसतात. हिरवी जमीन, रंगीबेरंगी फुले आणि सभोवताली सरोवर असा सुंदर समन्वय क्वचितच आढळतो.

दल सरोवरातील जलविहारानंतर आपला शिकारा रांगेने किनाऱ्यावर उभ्या असलेल्या शेकडो शिकाऱ्यांच्या रांगेत शिरून इतका एकरूप होतो, की मागे वळून पाहिले, तर आपण कोणत्या शिकाऱ्यात बसलो होतो, याबद्दल संभ्रम व्हावा.



**दलसरोवरातील एक रमणीय बाग नेहरुपार्क—श्रीनगर**

**हाऊस बोट** (House Boat) :– सरोवरात तरंगते राजवाडे आहेत, असे म्हटले, तर विश्वास बसणार नाही ना ? पण ते खरोखरच आहेत. फक्त नाव वेगळे. (हाऊसबोट) म्हणून त्यांना ओळखले जाते. या प्रचंड कोरीव नक्षीदार इमारती पाण्यातील बोटीवर डौलाने उभ्या असलेल्या आढळतात. यांची रचना कलात्मक असते. सर्व सुखसोयींनी सुसज्ज हाऊस बोटीत बाथरूम, किचन, बेडरूम, डायनिंग रूम, आधुनिक फर्निचर, इ. आलिशान ब्लॉकमध्ये सर्व असावे तसेच भाग असतात. पुढे गॅलरी व वर गच्चीपण असते. गच्चीत गुलाबांची बाग असून आरामात बसण्यासाठी विविध प्रकारच्या खुर्च्या असतात. छोटे खेळ खेळता यावेत, एवढी जागा उपलब्ध असते. मात्र हाऊस बोटीतील (डिलक्स फर्स्टक्लास) विभाग खर्चीक असतो. (इकॉनॉमी) विभागात मात्र सामान्यजनास राहता येते. हॉटेल्सना ज्याप्रमाणे 'ग्रेड' असतात, त्याप्रमाणे हाऊसबोटीत पण ग्रेड असतात. १०० फूट लांब व १५ फूट रुंद हाऊस बोटीतील खोल्या प्रशस्त असतात. किनाऱ्यावरून हाऊसबोटीत येण्या-जाण्यासाठी त्या हाऊसबोटीच्या मालकीचे शिकारे मोफत मिळतात.

**हाऊस बोटींचा इतिहास** :– काश्मिरचा प्रदेश महाराज गुलाबसिंग यांनी विकत घेतल्यावर ब्रिटिश लोकांना त्याठिकाणी जागा उपलब्ध होईना. आणि उन्हाळ्यात तर काश्मिरची सफर इंग्रज लोकांना अधिक आनंददायी वाटायची. यावर उपाय

म्हणून त्यांनी पाण्यातच वसाहत करण्याचे ठरविले. इ. स. १८८८ मध्ये प्रथम हाऊसबोट तयार करण्यात आली. या हाऊसबोटीचे नाव 'व्हिक्टरी' असे होते. आणि तिचे डिझाईन केनहार्ड यांनी तयार केले होते. ही हाऊसबोट दल सरोवरात ठेवण्यात आली. यानंतर अनेकांनी हाऊस बोटस् तयार केल्या. यात शेवटी उद्योजकांची स्पर्धा निर्माण झाली. एकाहून एक सरस, सुखसोयींनी युक्त अशा हाऊसबोटी निर्माण होऊ लागल्या. यात बाथरूम सुद्धा आहेत. हाऊसबोटी विषयी स्थानिक माहिती डायरेक्टर ऑफ टूरिस्टकडे मिळू शकते.


**डुंगा** (Dunga):–हाऊसबोट व शिकारा याप्रमाणेच जलविहारासाठी ही एक रमणीय शोभिवंत बोट आहे. दल सरोवरात विहार करण्यासाठी कुटुंबासाठी शिकारा भाड्याने घेतो, पण आपला ५० ते १०० जणांचा ग्रूप असल्यास तो सर्व एकत्ररीत्या भ्रमण करण्यासाठी (डुंगा) चा उपयोग होतो. डुंगा शिकाऱ्यापेक्षाही अधिक सजविलेला असतो. त्यात एकूण २ ते ३ भाग असतात. यात बसण्यासाठी गालिचा व टेकण्यास लोड असतात. डुंगा वल्हवण्यासाठी ८ ते १० नाविक असतात. यात एक चार जणांचे करमणूक पथक असते. हे लोक विविध वाद्ये वाजवून काश्मिरी गाणी हावभावयुक्त गातात. मधूनच शायरी, गझल व कव्वाली होते. अशावेळो पर्यटक बेभानपणे डोलत असतात.

**शिकारा** (Shikara) :– दाल सरोवरात जलविहार करण्यासाठी सजावट केलेली ही एक लहान बोटच असते. समोर चौकट उभारून तीवर शिकाऱ्याचे नाव लिहिलेले असते. या चौकटीला आधारित मधल्या बाजूला दोन लाकडी खांब असतात. यावर रंगीबेरंगी कापड आच्छादलेले असते. त्यात गादीच्या सीटस् असतात. एकावेळी चार लोक यातून प्रवास करू शकतात. त्याच्या मागील बाजूस शिकारा वल्हवणारा असतो. दाल सरोवरात फेरफटका मारण्यासाठी 'राऊंड चार्ज' आकारला जातो. सीझनप्रमाणे भावात चढउतार असतो. शिकारा थांबवून पाण्यातील मासे पकडता येत नाहीत. यासाठी परवानगी लागते. सरोवरातील गाळ व गवत काढण्यासाठी एक यंत्र बसवलेली बोट पाणी स्वच्छ करण्याचे काम सातत्याने करताना आढळते.

**शंकराचार्य हिल** (Shankaracharya Hill) :– श्रीनगरच्या साईटसीईंगची सुरुवात या ठिकाणापासून होते. श्रीनगरपासून सोनमर्ग रस्त्यावर दाललेक गेट नं. १ जवळ हा रस्ता सोडून दाललेककडे वळावे. श्रीनगरपासून १ कि. मी. अंतरावर १००० फूट उंचीवर शंकराचे मंदिर आहे. हे मंदिर टेकडीच्या शिखरावर असल्याने त्या टेकडीला 'शंकराचार्य हिल' असे संबोधतात. इतिहासकारांच्या मते हे मंदिर इ. स. पूर्व २०० मध्ये अशोकपुत्र 'जालुका' याने बांधले असावे. इ. स. ६९९ ते ७३६ मध्ये ललिता दित्य राजाने या मंदिराचा जीर्णोद्धार केला. काहींच्या मते हे मंदिर गोपालदित्याने उभारले असावे, असे मत व्यक्त केले गेले आहे.

हिंदुस्थानात हिंदुधर्म विरुद्ध बौद्धधर्म असा संघर्ष सुरू होता, तेव्हा हिंदु धर्माचे पुनरुत्थान करण्यासाठी शंकराचार्यांनी प्रयत्न चालविले होते. त्याच कार्यासाठी ते काश्मिरमध्ये आले. याच टेकडीवर ते समाधिस्थ होत असत. तेव्हापासून या स्थानास हिंदू लोक शंकराचार्य हिल संबोधू लागले. बौद्ध लोक पेहार, तर मुस्लिम लोक तख्त-ई-सुलेमान असे संबोधतात. या टेकडीवरून श्रीनगरमधील झेलम, दालसरोवर, शाही बागा, नागीन सरोवर यांचे सौंदर्य दृश्य एकाच नजरेत न्याहाळता येते.

**हजरत बाल** (Hajarat Bal) :– श्रीनगरपासून सोनमर्ग रस्त्यावर ७ कि. मी. अंतरावर शुभ्र रंगाची ही मशीद आहे. ही मशीद अरेबियन वास्तुशास्त्राच्या नमुन्यानुसार बांधलेली आहे. आत गालिचे अंथरलेले आहेत. उंच कमानींच्या दरवाज्यांवर मध्यभागी शुभ्र घुमट दिसतो. चारही लोकांना लहान घुमट असलेले चौखांबी चौथरे असून फक्त एकाच बाजूला उंच धवल वर्णाचा मनोरा आहे. मशिदीत रुमाल बांधून प्रवेश करावा लागतो. आत गेल्यावर उजव्या हाताला घुमटाच्या खालीही १५ ते २० फूट उंचावर नक्षीकाम केलेली लाकडी बंद बाल्कनी आहे.



**अरेबियन वास्तूशास्त्राचा उत्कृष्ट नमुना हजरतबाल मशीद–श्रीनगर.**

इस्लाम धर्माचा प्रेषित महंमद पैगंबर याचा पवित्र केस याठिकाणी जतन करून ठेवलेला आहे. या मशिदीत दिवसातून पाचवेळा नमाज पडतात. ईदेमिलाद, खलीपेखिलाद, मेलाजालम या पवित्र दिनी येथील पवित्र केसाचे दर्शन दिले जाते.

येथील मशिदीतील प्रमुखाला खुदाम असे म्हणतात. दाल सरोवराच्या पश्चिम किनाऱ्यावर निशात बागेच्या विरुद्ध दिशेला ही मशीद आहे. मशिदीच्या उजव्या हातात दाल सरोवर व पार्श्वभूमीस बर्फाच्छादित टेकड्या तिचे सौंदर्य वाढवतात.

या ठिकाणाहून दल सरोवराच्याच काठानेच थोडे पुढे गेले, की काश्मिरचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय शेख अब्दुल्ला यांचा दर्गा आहे. स्मृतिदिन म्हणून एक संगमरवरी समाधीप्रमाणे एक चौथरा उभारण्यात आलेला आहे. हाच रस्ता पुढे सोनमर्गला जातो. स्वर्गीय शेख अब्दुल्लांच्या दर्ग्याच्या पुढे गेले असता उजवीकडे जो रस्ता वळतो, तो दाल सरोवराला प्रदक्षिणा घालून शालिमार गार्डनवर निघतो. म्हणजेच येथून गार्डन बघावयास जाणे असल्यास परत श्रीनगर शहरात यावे लागत नाही.

**मदीन साहिब मशीद** (Madin Sahib Masihd) :– श्रीनगरच्या जवळच असलेली ही मशीद इ. स. १४४४ मध्ये झेन-उल-अबीदीनच्या काळात उभारली गेली.

**हसनाबाद** (Hasanabad) :– (शियामशीद)–रैनावळीपासून १ कि. मी. अंतरावर ही मशीद आहे. ही मशीद अकबराने इ. स. १५८६ च्या सुमारास उभारली.

**चट्टी पदशाही** (Chatti Padshahi) :– (शीव प्रार्थनामंदिर)– दक्षिणे दिशेला कथी दरबाज्याबाहेर हे गुरुद्वार आहे. शीखांचे ६ वे गुरू हरगोविंदसिंग याठिकाणी विश्रांतीसाठी थांबले होते. या प्रार्थनामंदिरात त्यावेळेपासून ठेवलेला पवित्र शीख धर्मग्रंथ (ग्रंथसाहेब) आहे.

**रघुनाथ मंदिर** (Raghunath Mandir) :– डोग्रा अधिपतींनी हिंदू लोकांसाठी हे प्रसिद्ध मंदिर उभारले आहे. या मंदिराच्या बांधणीचा काळ शतकापूर्वीचा असावा.

**हनुमान मंदिर** (Hanuman Mandir) :– श्रीनगर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी झेलम नदीकाठी अमीरा कदल व बडशहा ब्रीजजवळ हे प्रसिद्ध मंदिर आहे. हनुमंताची ६ फूट उंचीची पंचमुखी उभी मूर्ती आहे. दर्शनासाठी हिंदू लोकांची दर शनिवारी गर्दी असते. लाल चौकापासून ४ ते ५ मिनिटांत या ठिकाणी पायी येता येते.

**जामा मशीद** (Jama Masjid) :– श्रीनगरमधील इस्लाम धर्मीय लोक दर शुक्रवारी आवर्जून येथे प्रार्थनेसाठी जमतात. ही भव्य मशीद इ. स. १३८८ मध्ये शिकंदरशहाने बांधून घेतली. अपूर्ण राहिलेले काम त्याचा मुलगा झेन-उल-उबीदीन याने पूर्ण करून घेतले. या नंतरच्या काळात मशिदीस दोन वेळा आग लागण्याचे प्रकार घडले गेले, पण महंमदशहाने व त्यानंतर औरंगजेबाने या मशिदीची पुनर्बांधणी केली.

**शाह हमादान** (Shah Hamadan) :– ही मशीद इ. स. १३७३ च्या सुमारास सुल्तान कुतुबुद्दीन ऐबकने बांधली. संपूर्ण मशीद लाकडाची असून त्यावर उत्कृष्ट कोरीव काम केलेले आहे.

**पत्थर मशीद** (Pathar Masjid) :– शाह हमादानच्या समोरच ही मशीद असून ती बांधून घेण्याचे काम एकेकाळची हिंदुस्थानची मल्लिका नूरजहाँने केले. शियापंथीय मुसलमान येथे प्रार्थनेसाठी येतात. ही मशीद दगडाने बांधलेली आहे.

**नसीमबाग** (Nasimbag) :– हजरतबालपासून ही बाग जवळच आहे. या बागेत मोंगल सम्राट अकबर याने १२०० चिनारवृक्ष लावून तिला अधिक शोभा आणली आहे. या बागेजवळ कॅम्पिंगसाठी प्रशस्त मैदान आहे. या बागेच्या मध्यातून एक चश्मा वहातो. चिनारवृक्षाची एक नर्सरीपण या बागेत आहे.

**हरीपर्वत किल्ला** (Hari Parbat Fort) :– काश्मिर जिंकल्यानंतर हरीपर्वताच्या शिखरावर किल्ला बांधण्याचे सम्राट अकबराने ठरविले. इ. स. १५९२ च्या सुमारास अकबराने २८ फूट उंचीची दगडी चिरेबंदी भिंत उभारली. पण येथील किल्ल्याचे बांधकाम इ. स. १८ व्या शतकात अफगाण गव्हर्नर अत्ता महंमद खान याने केले. या किल्ल्यात माता शीरका (कालीचे) मंदिर आहे. किल्ल्याच्या दुसऱ्या बाजूस मकदूमसाहिब मशीद आहे. तर तिसऱ्या बाजूस शीखाचे छटीपदशाही गुरुद्वार आहे. या स्थानाला भेट द्यायची असेल, तर डायरेक्टर ऑफ टूरिझम कार्यालयातून प्रथम लेखी परवानगी घ्यावी लागते.


**परीमहल** (Parimahal) :– श्रीनगरपासून १० कि. मी. अंतरावर परीमहल आहे. एकेकाळी बौद्ध भिक्षूंचा मठ येथे होता. शहाजहानचा मुलगा दारापिर याने परिमहलची उभारणी केली. दाल सरोवराच्या काठी एका उंच टेकडीवर परिमहल बांधलेला आहे. याच्या शेजारीच चश्मेशाही हा खळखळणारा निर्झर आहे.

**चश्मेशाही** (Chashmeshahi) :– आपण श्रीनगरहून शंकराचार्य टेकडीसाठी ज्या बुलीवर्ड रोडने निघतो, त्याच रोडने ८ कि. मी. अंतरावर मोंगल बादशहा शहाजहानने उभारलेली ही एक शाहीबाग आहे. याच्याजवळच रस्त्यातच आपणांस जम्मू-काश्मिर राज्याचे 'राज्यभवन' लागते. चश्मा म्हणजे झरा व शाही म्हणजे श्रीमंती. या बागेतून एक शीतल झरा वाहतो. सुरुवातीला दगडी पायऱ्या आहेत. नंतर लाल रंगाचे प्रवेशद्वार आहे. यातून आत जाताच सुंदर बाग दिसते. पुन्हा ८ ते १० पायऱ्या चढल्यावर समोरच लाल रंगाचे 'बारादरी' प्रमाणे घर आहे. याच्या मध्यावर चौथरा आहे. यातून हा जिवंत चश्मा खळाळत बाहेर पडताना दिसतो. हे पाणी अतिशय थंड, मधुर आणि आरोग्यदायी आहे. या पाण्यामुळे पोटाचे विकार

वरे होतात. पर्यटकांनी येथे पोटभर पाणी पिऊन बरोबर असलेली वॉटरबॅग भरून घ्यावी. असे म्हणतात, भारताचे पहिले पंतप्रधान कै. पंडित जवाहरलाल नेहरू काश्मीरमध्ये आल्यावर त्यांना पिण्यासाठी हेच औषधी पाणी देण्याची व्यवस्था असे.

या झऱ्यापासून परत निघताना डाव्या हातात पन्नास पावलांवर खालील बाजूस रोझ गार्डन आहे. या गार्डनसमोरच डोंगरात जम्मू-काश्मिर सरकारने राहण्यासाठी बंगले बांधलेले आहेत. ही बाग दर शुक्रवारी बंद असते. या बागेत प्रवेश शुल्क आहे. विविध रंगांचे प्रकाशझोत फुलांच्या ताटव्यांवर व झाडांवर सोडलेले असल्याने याचे सौंदर्य रात्री अधिकच खुलून दिसते. पण यावेळी फोटो घेता येत नाही.

**निशात गार्डन** (Nishat Garden) :– बुलीवर्ड रोडने चश्मेशाहीपासून ३ कि. मी. अंतरावर व श्रीनगरपासून ११ कि. मी. अंतरावर दाल सरोवराच्या काठी पर्वताच्या पायथ्याशी ही शाहीबाग आहे. बाग आणि लेक यांत फक्त एक रस्ता आहे. झबरवान पर्वताच्या पायथ्याशी इ. स. १६३३ मध्ये मोंगल सम्राज्ञी नूरजहाँचा भाऊ



**असफरखानचे शाही स्वप्न निशात गार्डन–श्रीनगर**

असफरखान याच्या कल्पकतेतून ही बाग अस्तित्वात आली. रस्त्याला लागूनच In आणि Out असे दोन दरवाजे आहेत. बागेची सीमाभिंत पक्क्या विटांनी बांधलेली आहे. प्रवेशद्वारातून आत गेल्यावर बागेच्या मध्यातून टप्प्या-टप्प्याने खळखळणारा

पाण्याचा प्रवाह दिसतो. ही जागा बागेसाठी निवडण्याचे मूळ कारण हा प्रवाहच आहे. बागेच्या पार्श्वभूमीवर अगदी शेवटच्या टोकाला पर्वतातून वाहत येणाऱ्या या झऱ्याचे प्रथम स्वागत होते, ते चार खांब असलेल्या लाल रंगाच्या बारादरीत. येथून १० टप्प्यांनी उड्या घेत हा झरा मध्येच लावलेल्या कारंज्यातून वेगाने पाण्याचे तुषार उडवीत दाललेकच्या दिशेने झेपावतो.


प्रवेशद्वाराकडून पहिला चौथरा ओलांडून आपण दुसऱ्या चौथऱ्याकडे आलो, की समोर जवळ-जवळ ५४८–३३८ मीटर भव्य अशी निशात बाग नजर खिळवून ठेवते. आणि मागे वळून पाहिले, तर काठोकाठ ओथंबलेला दाल सरोवराचा परिसर एकाच नजरेत साठवता येतो. प्रत्येक टप्पा ओलांडत जसजसे वर जावे, तसतसे बाजूला मखमली हिरवळ आणि या मखमलीवर काश्मिरी भरतकाम करावे, तसे रंगीबेरंगी फुलांचे आणि गुलाबांचे ताटवे पसरलेले दिसतात. तीनही बाजूंना हिरवेगार चिनारवृक्ष आहेत. बाजूला पीर पंतसल पर्वताची बर्फाच्छादित शिखरे निशातच्या सौंदर्यात अधिकच भर घालतात.

असफखानने सौंदर्याचा चाहता मोंगल बादशहा जहाँगीरला एकदा निशात बागेत भेट देण्यासाठी बोलावले. 'जोरू का भाई' आणि त्यात आग्रहाचे आमंत्रण, मग ते बादशहा कसे टाळणार? अखेर स्वारी मोठ्या लव्याजम्यासह बागेत भेट देण्यास आली आणि येथील निसर्गसौंदर्य पाहून त्याच्या तोंडून शब्द आले. . . .

"वाह!! यह बाग तो मेरे शालिमारसे भी सुंदर है!"

पण बादशहाच्या मनात मात्र शालिमारवर मात करणारी बाग पाहून असूया निर्माण झाली होती. लहरी बादशहाने बागेचे पाणी तोडण्याचा हुकूम दिला. अशी आख्यायिका आहे. पाणी थांबताच हिरवळ, वृक्ष, वेली, फुलांचे ताटवे कोमेजू लागले. निशात निराशेने हिरमुसली. पण बादशहाचा हुकूम कोण मोडणार? तेथील माळ्याला मात्र ते पाहवले नाही. प्राणावर उदार होऊन त्याने वृक्ष-वेलींना पुनर्जीवन देण्यासाठी पाणी सोडले. बाग पुन: आनंदाने डोलू लागली. पण परिणामी माळी मात्र बादशहाच्या रागाचा बळी ठरला. माळ्याला राजाज्ञेने हजर होण्यास फर्मावण्यात आले. आपला अन्नदाता प्राणास मुकणार म्हणून कोमल फुले व वृक्षपण व्यथित झाले असतील. माळ्याने बागेतील झाडे वाचविण्यासाठी पाणी सोडल्याचे सांगताच त्याचे झाडांवरील प्रेम पाहून बादशहाने त्याला शिक्षा करण्याऐवजी बक्षीस देऊन परत पाठवले. पुन: पाण्याचा प्रवाह सुरू झाला. जोपर्यंत निसर्गाचा वरदहस्त आहे, आणि पर्यटकांचे येणे-जाणे आहे, तोपर्यंत निशात बाग आहे तशीच चिरतरुण राहाणार आहे आणि या तरुण बागेच्या हृदयाशी जोडले गेलेले पर्यटकांचे हृदय वेगळे करणे कठीण आहे.

**शालिमार** (Shalimar Garden) :– सौंदर्याचा भोक्ता विलासी बादशहा सलीम ऊर्फ जहाँगिर आणि सौंदर्यसम्राज्ञी मेहरुन्निसा ऊर्फ नूरजहाँ यांच्या शाही इश्क आणि प्रेमाचे प्रतीक म्हणून आजही शालिमार बाग इतिहासाची साक्ष देत आहे. जहाँगीरला काश्मिरचे जबरदस्त आकर्षण होते. त्यात पर्वतावरून उसळत येणारा निर्झर आणि समोर दाल सरोवराचे सौंदर्य पाहून जहांगीरला बाग उभारावीशी वाटली नसती तरच नवल !



**मोंगलसम्राट व सम्राज्ञीचे साकार झालेले सुंदर निसर्गस्वप्न,**
**शाही इष्काची नचाकत–शालीमार गार्डन–श्रीनगर**

शाही विलासी शृंगाराला निसर्गाने साथ द्यावी लागते. देवदार, चिनार वृक्षांच्या छायेखाली येथे दोन तरुण हृदये शांत झाली असतील. घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकताच सारी वृक्षवेली स्वतःला सावरत उभे राहत असतील. हिरवळीवर बसलेल्या नूरजहाँच्या कुशीत मस्तक टेकून आकाशाकडे पाहणाऱ्या बादशहाला पाहून स्वर्गातील देवांनाही हेवा वाटत असेल की, असावा तर असा खानदानी शृंगार ! नूरजहाँची लोण्यासारखी मऊ लांबसडक बोटे बादशहाच्या केसांतून फिरू लागताच लाजून चूर झालेल्या वृक्षवेलींनी आपले डोळे तर झाकून घेतले नसतील ना ?

निशातचे सौंदर्य शालिमारला नाही, हे उघड सत्य असले, तरी शालिमारचे स्वतःचे असे खास सौंदर्य नाकारता येणार नाही. निशातपासून ३।। कि. मी. वर

व श्रीनगरपासून १४।। कि. मी. अंतरावरील ही बाग बादशहा जहाँगीरनेच इ. स. १६१९ मध्ये उभारली. पण बागेची लांबी ५३९ व रुंदी १८२ मीटर आहे. ही बाग तयार करताना पार्श्वभूमीवर पर्वत, त्यातूनच वाहात येत असलेला झरा आणि डोंगर उतार याचा उपयोग करून घेतला आहे. यात चार टप्पे आहेत. या प्रत्येक टप्प्यातून पाणी असंख्य धारांनी खालच्या चौकोनी कुंडात पडते. त्यातच विविध प्रकारची कारंजी आहेत. पाण्याला वेग असल्याने तेच पाणी कारंज्यातून उडते. वाहत्या पाण्यासाठी दगडांना बांधलेली उतारभित व खाली चौकोनी कुंड आहेत. पर्वतातून वाहणारा झरा बारा दरवाजे असलेल्या बारादरीतून पुढे येतो. पाणी खळाळत पुढील टप्प्यात येते. भिंतीवरून ते खाली कोसळताना त्या भिंतीलाच प्रवाहाच्या मागे कोनाडे आहेत. त्या कोनाड्यात रंगीबेरंगी फुले ठेवलेली होती. पारदर्शके, शुभ्र पाण्यातून उत्कृष्ट दिसणारे मागील फुलांचे रंग चित्तवेधक वाटत होते.

आनंदाने थुईथुई नाचणाऱ्या कारंज्यातील पाण्याच्या प्रत्येक तुषाराला येथील प्रेमकथा ठाऊक असावी. या जलकुंडात ठिकठिकाणी चौकोनी दगड आहेत. चार क्रमांकाच्या चौथऱ्याची सजावट खास संगमरवरी दगडांनी केलेली आहे. राजघराण्यातील स्त्रियांसाठी हा खास विभाग उभारला होता. चांदण्यासारखा गोरापान रंग असलेली नाजूक, सुंदर मोंगल सम्राज्ञी नूरजहाँ स्नानासाठी या जलाशयात उतरून एखाद्या स्फटिकी लादीवर बसत असेल, त्यावेळी साऱ्या वृक्षवेली ओठावर बोट ठेवून अगदी गप्प बसत असतील. ना फुलांचे डोलणे, पानांची सळसळ, ना पक्ष्यांची किलबिल. शाहीशिस्त आणि खानदानी सौंदर्याचे रक्षण करण्यासाठी मोंगल सम्राटांचा दबदबा तसाच होता. पण चारही बाजूंनी द्वाररक्षकाप्रमाणे उभे राहिलेले चिनार मात्र चोरट्या नजरेने भिरभिरत पाहण्याचा प्रयत्न करीत असतील. मनातून मात्र घाबरलेले असणारच. जर नूरजहाँने तक्रार केली असती, तर त्यांनाही न्यायप्रिय जहाँगीरने शिक्षा सुनावली असती.

शालिमार याचाच अर्थ आहे Garden of Love (प्रेमाचे उद्यान) या निसर्गाच्या प्रेममंदिरात मुक्त मनाने दोन पाखरे पंख फडफडवीत डेरेदार झाडांच्या आड लपली, की हिरव्यागच्च बागेच्या अंगावर गवताचे रोमांच उभे राहत असतील. या बागेच्या सौंदर्याची कल्पना तरुण राजशाही जोडप्यालाच होती, असे नाही, तर काश्मिरच्या एका सनातनी संताने या बागेला भेटायचे नाकारले. कारण काय? . .

"ही बाग पाहिली, तर स्वर्गाच्या सौंदर्याचे मला नंतर आकर्षण उरणार नाही !"

या त्यांच्या शब्दांतच येथील सौंदर्याचे रहस्य दडलेले आहे.

शालिमार बागेचा इतिहास रात्री जिवंत होतो. स्वतः इतिहासच बोलू लागतो. दर्दभरी गोड आवाजात प्रकाश-सावलीच्या खेळात तो आवाज थेट हृदयाशी येऊन भिडतो. . . .

रात्रीचे आठ वाजलेले. शालिमार बाग अंधारात बुडू लागते. चिनारांच्या समोर मांडलेल्या हिरवळीवरील खुर्चीत बसून प्रेक्षक समोर उत्सुकतेने पाहत असतात. ना पडदा, ना प्रोजेक्टर. डोळ्यांना लाईट दिसत नाहीत, पण प्रकाश विविध ठिकाणी पडत असतो. तसेच स्पीकर दिसत नसताना आवाज ऐकू येत असतो.

सांजरात्री कार्यक्रमास सुरुवात होते. आपल्या डावीकडून उजवीकडे झुळझुळणाऱ्या पाण्याचा आवाज अजूनही पहाडी शांततेला दुभंगीत पुढे जातो व अचानक सतारीचे सूर निनादतात. प्रेक्षकच नव्हे, तर सारी वृक्षराई रोमांचित होते. व पाण्याच्या खळखळाटाचा आवाज मात्र अतिशय स्पष्ट असतो. चिनारामागून वाहणारा निर्झर अगदी आपल्या जवळून वाहत नाही ना ? असा भास होतो. या वेळी 'लाईट अॅन्ड साऊंड'चा प्रोग्रॅम सुरू होतो. तिकीट काढून हा कार्यक्रम बघण्यासाठी आलेले सर्व प्रेक्षक कुतूहलाने चिनारकडे पाहातात. आवाज मात्र लोक ओळखतात. अजित, मीनाकुमारी, कबीर बेदी, प्रिया, इम्ताझखान व राजमेहरा इत्यादींचा आवाज सुनावणाऱ्या चोखंदळ दिग्दर्शकाला मनापासून दाद द्यावीशी वाटते.

दर्दभऱ्या आवाजात शब्द उमटतात.......

फुलोंकी बहार-जमीके बदनपर खिले हुए रंगी-बेरंगी फुलोंकी बहार। थंडे और नीले पानिके चश्मे।

(पुन: पाण्याचा खळखळ आवाज येतो.)

यह पहाडियोंमे सफेद नीली झिली है। इनमें सारे रंग खिलते हैं। और झीलोंमें कमल के फूल। खिलते हैं। अमर पानीपर तैरता हुआ कँवल जिससे संसार पैदा होता है-तीन रंगोंमें मुस्कुराता है। गुलाबी कमल जो सबसे पवित्र और मुकद्दर है। निकलते हुए सूरजका पयाम है। उसके ओठोंपर हिंदुओंकी देवता ब्रह्मा, विष्णु, महेश त्रिमूर्तीकी मस्कुराहट है। नीले रंग के कँवल उस युगकी याद दिलाते हैं कि जो जीवनकी दोपहर और संसारकी जवानी है।

(येथे सतारीचे मधुर स्वर गुंजतात.)

और सफेद कमल शिव की याद दिलाता है।

(तांडवनृत्यातील पदन्यासाचा आवाज)

इन तीनों रंगोंके फूलोंमें दुनियाकी कहानी है। यह कँवल गौतम बुद्ध के धर्मका वाहन है। अशोक के जमानेमें पाचसौ बौद्ध, भिक्षू कश्मिर आये। उनके होंठोंपर प्यार के शब्द थे।

बुद्धम् शरणम् गच्छामि
धम्मम् शरणम् गच्छामि।
संघम् शरणम् गच्छामि।

(बाजूच्या भिंतीवर लांबपर्यंत प्रकाशाचा झोत पडला जातो.)

यह कँवल बौद्ध धर्म का वाहन है। यही कमल उत्तर हिंदुस्थानमें खिलता है। और गहरा मुस्कुराता है।

(उजव्या बाजूला लांबवर मुल्लाज्जीचे प्रार्थनेचे सूर येतात. "अल्ला हो अकबर... ! ! !) कश्मिरके जिस्मको मोंगल बादशहाने बागोंसे सजाया है।

(सतारीचे सूर)

खामोश ऽऽऽ शाही सवारी आ रही है।... (गंभीर आवाज)

(घोड्यांच्या टापांचा आवाज दूर अंतरावरून आपल्याकडे येत असल्यास-सारखा स्पष्ट ऐकू येतो.)

नूरजहाँके जिस्मपर जवाहर जगमगा रहे हैं। ईरान पगडीके नीचे लँबे-लँबे बाल लहरा रहे हैं। कहते हैं इतने खूबसूरत बाल किसी औरत को नहीं मिले। उनकी खुशबू हवामें तैरती गयी, और जहाँगीरको दीवाना बना दिया।

जहाँगीरकी हुकुमत सारे हिंदुस्थानपर है। लेकिन जहाँगीरके दिलपर नूरजहाँकी हुकुमत है।

(या ठिकाणी नूरजहाँ जहाँगीरशी लाडिकपणे संभाषण करीत असते. तिच्या गोड हसण्याच्या आवाजाने शरीरच नाही, तर फुलेही थरथरतात.)

अनुरागाला रागाशिवाय मौज नाही. क्षणार्धात परिस्थिती बदलते. राजा-राणी एकमेकांवर रागावतात. अबोला. बिचारी नूरजहाँ अधिक काय करणार? मनाचा चडफडाट. शहनशहा सलीम मात्र मदिराक्षीपेक्षा मदिरेतच गुंग झालेला असतो.

एक दासी राणीच्या वतीने राजाचे मन वळविण्यासाठी परवानगी मागते. राणीला राजाचा स्वभाव पूर्ण ठाऊक आहे. जिद्दी-स्वाभिमानी सम्राट बोलणार नाही, याची तिला खात्री आहे.

दासीच्या पायातील नुपुरांचा आवाज, मदिरेच्या ग्लासांचा आवाज, शालि-मारमधील साऱ्या वातावरणालाच जणू धुंदी चढलेली. रागावलेला जहाँगीर दासीला पाहून हातातील ग्लासच फेकतो.

(पुनः काचा फुटण्याचा आवाज)

राग पुनः अनुरागात विरघळतो. जहाँगीर दर्दभरी आवाजात म्हणतो,

"काश्मिरला माझी ही भेट शेवटची तर ठरणार नाही?"

अन् राणीची नाजूक बोटे ओठावर ठेवली जातात. मनातल्या मनात ती अल्लाची प्रार्थना करते. अशावेळी जहाँगीर इच्छा व्यक्त करतो, मृत्यु आलाच तर काश्मिरच्या सुंदर भूमीतच माझे दफन व्हावे.

यानंतर ही बाग येथे का ? कशी बांधण्यात आली ? यासाठी वृक्ष कोठून आणले ? व त्यानंतर आजपर्यंत काश्मिरवर कोणाकोणाची हुकुमत चालली ? हा सर्व इतिहास या कार्यक्रमात आहे.

येथेच क्षणभर हृदयाची धडकन थांबल्यावर 'लाईट अँड साऊंड' कार्यक्रम संपतो. शालिमारचे सारे वातावरण शांत झालेले असते. भव्य चिनारवृक्ष पण अंधारात झोपी गेल्यासारखे वाटतात. कारण पुन: उद्या हेच गोड स्वप्न, काहीक्षण का होईना, त्यांना पाहायला मिळणार असते. भूतकालीन स्मृतीची पाने चाळवीत ते झोपी जात असतील.

**हार्बन गार्डन** (Hurban Garden) :– झील शालिमार बागेपासून केवळ ३ कि. मी. अंतरावर किंवा श्रीनगरपासून १७।। कि. मी. अंतरावर ही बाग असून तिच्या पार्श्वभूमीवर भव्य तलाव आहे. तलावात कृत्रिम बांध घालून पाणी अडविण्यात आले आहे. तलावाच्या मागील बाजूस उंच पर्वतराई असून बर्फाच्छादित पर्वतांची प्रतिबिंबे पाण्यात उमटलेली दिसतात. येथूनच श्रीनगरला पाणी–पुरवठा करण्यात येतो.

या बागेत प्रवेश करताच दोन्ही बाजूंनी बांधीव चाकोरीतून पाणी खळखळ वाहत असते. उजव्या बाजूच्या बागेला लागून एक टेकडी आहे. त्या टेकडीवरून एक पाण्याचा प्रवाह उड्या घेत बागेच्या बाजूने येत असलेला दिसतो. बागेच्या शेवटच्या टोकाकडे आले, की शुभ्रवर्णाचे मोगल पद्धतीचे एक बारादरीप्रमाणे गृह असून झीलमधील पाणी त्या गृहाच्या तळभागातून बागेत सोडले आहे. या गृहाच्या मागे एक हिरवी कृत्रिम टेकडी आहे. हाच झीलचा बांध आहे. या बांधावर चढण्यासाठी पायऱ्या आहेत. त्या चढून वर गेल्यावर हा भव्य झील सहजपणे एका नजरेत न्याहाळता येतो.

**बुर्ज होम** (Burju Home) :– श्रीनगरपासून जवळच शालिमार बागेपासून ५ कि. मी. अंतरावर पुरातन विभागाने उत्खनन करून या ऐतिहासिक स्थानाचा शोध घेतलेला आहे. दोन हजार वर्षांपूर्वीची हत्यारे, भांडी, शेतीसाधने येथील उत्खननात सापडली आहेत. ढाल सरोवराच्या खाली हे ठिकाण असून त्याच्या दुसऱ्या भागाला महादेव पर्वत आहे. इ. स. १९६० मध्ये इतिहास संशोधन संस्थेने या ठिकाणी उत्खनन सुरू केले. व ते पूर्ण होण्यास आठ वर्षे लागली.

**श्रीनगर शॉपिंगला चला** (Shopping in Shrinagar) :– काश्मिरला जसे निसर्गसौंदर्याचे वरदान लाभलेले आहे, तसेच कलात्मक कौशल्याचा अभिजात गुण काश्मिरी लोकांत आलेला आहे. त्यांच्या नाजूक सौंदर्याचे प्रतिबिंब कलेतही उमटलेले आहे, असे वाटते. ज्या वस्तूंना काश्मिरी कलावंताचा हस्तस्पर्श होतो, ती वस्तूच सुंदर होते. म्हणून तर पर्यटकांना खरेदीत काय घ्यावे व काय घेऊ नये, असे

प्रश्न भेडसावतात. वस्तू—ती लाकडाची असो वा कापडाची, तितकीच त्यावर नाजूक कलाकुसर आपल्याला पाहावयास मिळते. परमेश्वराने जणू काश्मिरी कलावंतांच्या बोटांना आकर्षक कलानिर्मितीचे वरदानच दिलेले आहे.

काश्मिरमधील लाकडावरील कोरीव कामाच्या वस्तू इतक्या प्रकारच्या व नावीन्यपूर्ण असतात, की त्यांची यादी देणेच अशक्य आहे. टीपॉय, अलंकार, पेटचा, सिगारेट केस, शो पीसेस् अशा कितीतरी लाकडी कोरीव वस्तू उपलब्ध असतात. काश्मिर हे फॅन्सी कापडाचे माहेरघरच मानावे लागेल. सिल्क, वुलन इ. चे विविध नमुने, तयार कपडे व त्यातील कलाकुसर काश्मिरइतकी इतर ठिकाणी उपलब्ध असणे कठीण वाटते. तेथील गालिचे, भरतकामाने तयार केलेल्या वुलन शाली, बेड-शीटस्, कुशन कव्हर, वुलन कोटस्, रेशमी रुमाल, टेबल—टी. व्ही. कव्हर्स, उच्च दर्जाचे पांघरण्याचे वुलन रग, इ. वस्तु उत्कृष्ट प्रकारच्या मिळतात. काश्मिरी लोकांतील पुरुष व स्त्रिया स्वतःसाठी ज्या शॉल्स वापरतात, त्यांना 'जामवार' आणि 'शाहतोश' म्हणतात.

तरुण आणि लहान मुलींसाठी तर नेहमी वापरण्यासाठी आवश्यक व स्वस्त किंमतीचे कला-कुसरपूर्ण दागिने (बांगड्या, इयररिंग, गळ्यातील माळा, विविध प्रकारचे पैलू पाडलेले खडे) श्रीनगरच्या दुकानांत उपलब्ध आहेत. शोकेसेसमध्ये ठेवण्यासाठी किंवा भेट देण्यासाठी लागणाऱ्या कलात्मक वस्तूंची इतकी विविधता आहे, की प्रत्येक वस्तूचे सौंदर्य वेगळे असल्याने खरेदी करणाऱ्याच्या मनात संभ्रम निर्माण होतो.

काही वस्तू मात्र नीट पाहून घेणे चांगले.

१) **केशर**:—यात फसवेगिरी फार आहे. भावात पण बरीच तफावत आढळते. अशी वस्तू खरेदीपूर्वी पडताळून पाहावी. चमचाभर दही घेऊन त्यात एक केशराचा पराग टाकावा. तो थोडासा लांबट होतो व नंतर हळूहळू विरघळू लागतो. सर्व दही सुवासिक व केशरी होते. त्यावेळी परागाचे अस्तित्व संपलेले असते. अंदाजे या क्रियेस ५ मिनिटे लागतात.

२) **अक्रोड**:—यात दोन प्रकार आहेत. कागदी व साधा अक्रोड. कागदी अक्रोड हाताने फुटतो व चवीला चांगला लागतो. साधा अक्रोड नवीन असेल, तरच घ्यावा. नाहीतर तो कडवट लागतो. जुना अक्रोड स्वस्त असतो व नवा अक्रोड महाग असतो.

३) **बदाम**:—बदाम, पिस्ते, जर्दाळू, मध या वस्तूंची चव घेऊन खरेदी करणे चांगले.

४) **साड्या**:—साडी खरेदी करताना पोत व किमतीचा विचार करून, साडी पसंत पडली, तर ती पूर्ण उघडून पाहून नंतरच विकत घ्या.

**शॉपिंग विभाग**:–रेसिडेन्सी रोड, काश्मिर गव्हर्मेंट आर्ट एम्पोरियम, बोलीवर्ड रोड, लालचौक, बादशहा चौक, या ठिकाणी प्रत्येक खरेदीच्या वस्तूची दुकाने उपलब्ध आहेत. ही दुकाने सकाळी १० ते रात्री ८–३० पर्यंत उघडी असतात.

**श्रीनगरची अन्य माहिती**:–१) श्रीनगरला येण्यासाठी जम्मू हा एकमेव मार्ग आहे. जम्मूहून स्पेशल बसने यात्रयाचे असल्यास 'जे. के. रोड ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन, जम्मू.' यांचेकडे अगोदर बस बुक करावी किंवा बसमधील सीटस्‌साठी आरक्षण करावे.

२) श्रीनगरला जवळचे रेल्वे स्टेशन जम्मू.

३) जम्मूहून श्रीनगरला जाण्यासाठी विमान, बस, टॅक्सी इ. सर्व्हीस आहे. बसने जम्मू ते श्रीनगर या अंतरास १० तास व टॅक्सीस ७ तास तर विमानास २२ मिनिटे लागतात.

४) श्रीनगर शहरात रिक्षा, टॅक्सी, बस, शिकारा (जल प्रवासास) वाहने उपलब्ध होतात.

५) जे. के. ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन किंवा भारत ट्रान्सपोर्ट (दोन्ही लालचौक) येथून साईटसीईंगसाठी बस मिळू शकते. वैयक्तिक किंवा ग्रूपसाठी वाहनांच्या सोयी उपलब्ध आहेत.

६) तेथील चहा हे प्रमुख पेय. ॲपल ज्युस हेही एक थंड पेय उत्तम.

७) दूध, दही भरपूर प्रमाणात व स्वस्त दरात मिळते.

८) मांसाहारी लोकांसाठी 'मांस' उत्तम दर्जाचे, चविष्ट व भरपूर स्वस्त असते.

९) फळभाज्या व फळे ताजी व भरपूर मिळतात.

१०) रात्रौ १० नंतर बाहेर पडू नये. गेल्यास आपण कोठे व कशासाठी जाणार आहोत, याची माहिती असावी व सोबत असणे आवश्यक.

११) सिनेमा दुपारचा पाहावा. तिकीट काढण्यापूर्वी मॅनेजरना भेटल्यास तो टूरिस्टना सिनेमागृहात प्रथम प्रवेश देतो व पाहिजे ती जागा दिली जाते.

१२) खरेदीच्या वेळी फार जागरूक असावे.

१३) इतर सहकार्य, मार्गदर्शन करणारे लोक असतात. त्यांच्याशी सहानुभूतीने वागावे.

श्रीनगरच्या वसाहतीचा भाग सोडून परिसरातील निसर्गरम्य स्थळे पाहिल्यानंतर तेथून परत निघताना पर्यटकांची पावले जड होतात. हे नाकारता येणार नाही.

**श्रीनगरपासून महत्त्वाच्या शहरांचे अंतरः– (कि. मी. मध्ये)**

| ठिकाणाचे नाव | कि. मी. | ठिकाणाचे नाव | कि. मी. |
|---|---|---|---|
| १) मुंबई | – २२९९ | १८) डेहराडून | – ८८५ |
| २) औरंगाबाद | – २०९८ | १९) दिल्ली | – ८९१ |
| ३) नागपूर | – १८७६ | २०) गोहत्ती | – २९२५ |
| ४) नाशिक | – २१११ | २१) ग्वाल्हेर | – १२१० |
| ५) पुणें | – २३२० | २२) इंदूर | – १६९७ |
| ६) सोलापूर | – २३९४ | २३) जयपूर | – ११५२ |
| ७) ठाणे | – २२५६ | २४) जम्मू | – २९८ |
| ८) धुळे | – १९५५ | २५) झाशी | – १३११ |
| ९) अकोला | – २१२१ | २६) कानपूर | – १३८१ |
| १०) अलाहाबाद | – १५३४ | २७) लखनौ | – १३९० |
| ११) अमृतसर | – ५१९ | २८) मद्रास | – ३०४८ |
| १२) बेंगलोर | – २९१० | २९) मंगलोर | – ३०७७ |
| १३) भोपाळ | – १६३२ | ३०) म्हैसूर | – ३०४५ |
| १४) कलकत्ता | – २१३३ | ३१) राजकोट | – २००२ |
| १५) सिमला | – ७८७ | ३२) त्रिवेंद्रम | – ३६७१ |
| १६) सुरत | – २०५० | ३३) वाराणसी | – १६५६ |
| १७) उदयपूर | – १५२६ | | |

**जम्मूहून श्रीनगरला निघाल्यानंतर वाटेत लागणारी ठिकाणेः–**

१) उधमपूरः–जम्मूपासून ६७ कि. मी.
२) कुदः–उधमपूरपासून २५ कि. मी. पटणीटापपासून ८ कि. मी.
३) बटोतः–जम्मूपासून १२५ कि. मी. पटणीटापपासून १२ कि. मी.
४) रामबनः–जम्मूपासून १५५ कि. मी. बटोतपासून ३० कि. मी.
५) बनिहालः–जम्मूपासून १९४ कि. मी. रामबनपासून ३९ कि. मी.
६) जवाहर टनेलः–जम्मूपासून २११ कि. मी. बनिहालपासून १७ कि. मी.
७) खानाबलः–जम्मूपासून २४३ कि. मी. टनेलपासून ३२ कि. मी.
८) बीजबेहराः–जम्मूपासून २५१ कि. मी. खानाबलपासून ८ कि. मी.
९) अवंतिपूरः–जम्मूपासून २६५ कि. मी. बीजबेहरापासून १४ कि. मी.
१०) पांपूरः–जम्मूपासून २८१ कि. मी. अवंतिपूरपासून १६ कि. मी.
११) श्रीनगरः–जम्मूपासून २९८ कि. मी. पांपूरपासून १७ कि. मी.

**श्रीनगर साईटसीइंग अंतरः– (कि. मी. मध्ये)**

(सर्व अंतर श्रीनगरहून धरण्यात आलेले आहे.)

| अ.क्र. ठिकाणाचे नाव | | कि. मी. | ठिकाणाचे नाव | | कि. मी. |
|---|---|---|---|---|---|
| १) अनंतनाग | – | ५५ | ७) मटन | – | ६३ |
| २) अच्छाबल | – | ५८ | ८) अमरनाथ | – | १३६ |
| ३) कोकरनाग | – | ८२ | ९) सोनमर्ग | – | ८४ |
| ४) वेरीनाग | – | ८० | १०) निलमर्ग | – | ३२ |
| ५) पहलगाम | – | ९४ | ११) युसमर्ग | – | ३२ |
| ६) मार्तंड | – | ६४ | १२) गुलमर्ग | – | ४६ |
| | | | १३) लेह | – | ४३४ |

**साईटसीईंग बस**:–(श्रीनगरहून जे. के. ट्रान्सपोर्ट तर्फे खालील प्रेक्षणीय स्थळांसाठी बसेस् सुटतात. वेळ सकाळी ८ वा.)

१. मोगल गार्डनस्. २. चश्मेशाही-शंकराचार्य हिल. ३ . वूलर लेक. ४. युसमर्ग ५. सोनमर्ग. ६. गुलमर्ग. ७. पहलगाम. ८. अच्छाबल (कोकरनाग). ९. एअरपोर्ट.

**टीप**:—साईटसीईंग बस व्यतिरिक्त रोडवेज्च्या बसने त्यांच्या टाईमटेबलप्रमाणे गेल्यास भाडे अल्प असते.

**जम्मू-काश्मिर टूरिस्ट कार्यालयेः–**

| अ. नं. | पत्ता | | फोन |
|---|---|---|---|
| १. | २४ तास या फोनवर पर्यटनाविषयी माहिती मिळू शकते. | (श्रीनगर) | ७७३०३ |
| २. | डायरेक्टर ऑफ टूरिझम | –,,– | ७२४४९ |
| ३. | डेप्युटी डायरेक्टर | —,,— | ७३६४८ |
| ४. | असि. डायरेक्टर (रजिस्ट्रेशन व कंप्लेंट) | —,,— | ७७०३५ |
| ५. | असि. डायरेक्टर (माहिती व मदत) | —,,— | ७७३०३ |
| ६. | असि. डायरेक्टर (एअरपोर्ट) | —,,— | ७६९११ |
| ७. | श्रीनगरहून रिझर्वेशनसाठी संपर्क | —,,— | ७२९२९ |
| ८. | डेप्यु. डायरेक्टर ऑफ टूरिझम | (जम्मू) | ५३२४ |

| अ. नं. | पत्ता | | फोन |
|---|---|---|---|
| ९. | टूरिस्ट ऑफिसर | (जम्मू रेल्वे स्टेशन) | ४३८०३ |
| १०. | असि. डायरेक्टर ऑफ टूरिझम | (पहलगाम) | २४ |
| ११. | असि. डायरेक्टर | (गुलमर्ग) | ९९ |
| १२. | टूरिस्ट ऑफिस | (युसमर्ग) | — |
| १३. | टूरिस्ट ऑफिस | (अच्छावल) | — |
| १४. | टूरिस्ट ऑफिस | (सोनमर्ग) | — |
| १५. | टूरिस्ट ऑफिस | (कटरा) | — |
| १६. | टूरिस्ट ऑफिस | (कुद) | — |
| १७. | टूरिस्ट ऑफिस | (वेरीनाग) | — |

**श्रीनगरमधील ट्रॅव्हल्स व सहल एजंटस्ः-**

| | ट्रॅव्हलचे नाव | पत्ता | फोन |
|---|---|---|---|
| १) | जी. एम्. वट अॅन्ड सन्स | दालगेट | ७२१७५ |
| २) | शाह ट्रॅव्हल्स | दालगेट | ७४११९ |
| ३) | केअर फ्री ट्रॅव्हल्स | पोलो व्ह्यू | ७४६१७ |
| ४) | कर्नल ट्रॅव्हल्स | पोलो व्ह्यू | ७८६७६ |
| ५) | सफारी ट्रॅव्हल्स् | पोलो व्ह्यू | ७४७७३ |
| ६) | काश्मीर एक्सप्रेस कं. प्रा. लि. | रेसीडेन्सी रोड | ७२१५० |
| ७) | सबीना ट्रॅव्हल्स् | रेसीडेन्सी रोड | ७८०४६ |
| ८) | गुलमर्ग ट्रॅव्हल्स् | बोलीवर्ड रोड | ७५६३१ |
| ९) | काश्मिर हिमालयन | बोलीवर्ड रोड | ७३९१३ |
| १०) | मोगल टूरस् | एम. ए. रोड | ७७२४८ |
| ११) | मर्क्यूरी ट्रॅव्हल्स् लि. | ऑबेराय हॉटेल | ७८७८६ |
| १२) | व्ही. आय. पी. ट्रॅव्हल्स् | बादशहा रोड | ७७८५० |

**श्रीनगरमधील बँक्सः-**

१) स्टेट बँक ऑफ इंडिया
२) पंजाब नॅशनल बँक
३) सेंट्रल बँक
४) जम्मू-काश्मिर बँक
५) महाराष्ट्र बँक
६) युनायटेड कमर्शिअल बँक
७) बँक ऑफ बडोदा
८) बँक ऑफ इंडिया

**श्रीनगरमधील हॉस्पिटल्स :-**

| | | |
|---|---|---|
| १) | एस्. एम्. एच्. एस्. हॉस्पिटल (करन नगर) | ७६९२४ |
| २) | चेस्ट डिसीज हॉस्पिटल (दाललेक) | ७३९२९ |
| ३) | काश्मिर नर्सिंग होम (गोपूर रोड) | ७२४०० |
| ४) | जवाहरलाल नेहरू मेमोरियल | ७७३३२ |
| ५) | चिल्ड्रन हॉस्पिटल | ७३६६१ |
| ६) | ललदेड (स्त्रियांचे हॉस्पिटल) | ७३८९६ |

**श्रीनगरमधील महाविद्यालये:-**

१) अमरसिंग कॉलेज
२) गव्हर्मेन्ट कॉलेज फॉर वुमेन
३) टिचर्स ट्रेनिंग कॉलेज
४) गांधी मेमोरियल कॉलेज
५) श्री. प्रताप कॉलेज
६) रीजनल इंजीनियरिंग कॉलेज
७) जम्मू-काश्मिर विद्यालय

**श्रीनगरमधील सिनेमागृहे:-**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ब्रॉडवे | सोनवार | ७७१७७ |
| २) | फिर्दोस | हवाल | ७७५२२ |
| ३) | नाझ | हजारीबाग | ७४७७८ |
| ४) | शाह | हजारीबाग | ७१५५५ |
| ५) | पॅलेडियम | लालचौक | ७७५२० |
| ६) | खय्याम | नुपुरा | ७५९९१ |
| ७) | नीलम | करन नगर | ७३८९१ |
| ८) | रीगल | रेसिडेन्सी रोड | ७६५८० |
| ९) | शिराझ | खानयार | ७३७०३ |

**श्रीनगरमधील इमर्जन्सी व काही महत्त्वाचे फोन:-**

| | | |
|---|---|---|
| १) | फायर | ७७५५५ |
| २) | पोलिस | १०० |
| ३) | रिझर्व्हेशन मॅनेजर | ७६१०७ |
| ४) | टूरिस्ट रिसेप्शन सेंटर | ७२६९८ |
| ५) | इंडियन एअर लाईन (सिटी) | ७३५३८ |
| ६) | गव्हर्मेंट सेंट्रल मार्केट | ७६८७४ |
| ७) | काश्मिर गव्ह. टूरिस्ट ऑफिस | २०४७३ |
| ८) | ॲम्बुलन्स | ७४५९१ |
| ९) | हॉटेल विक्रम | ७७७९५ |
| | किंवा | ७४२७६ |
| १०) | कंट्रोलरूम | ७२२२२ |
| ११) | एम्. एल्. ए. होस्टेल | ७६९६७ |
| १२) | टूरिस्ट टॅक्सी स्टॅन्ड | ७४८९८ |
| १३) | नॉर्दन रेल्वे एजंट | ७२९२९ |
| १४) | एअरपोर्ट | ७२१०० |
| १५) | डायरेक्टर ऑफ टूरिझम | ७३६४८ |

**श्रीनगरमधील डॉक्टर्स:–**

| डॉक्टरचे नाव | स्पेशालिस्ट | क्लिनिक (फोन) | घरचा (फोन) |
|---|---|---|---|
| १) डॉ. अबदूल अहद | नाक, कान, घसा | ७५५३० | ७३८४६ |
| २) डॉ. आर्. एस्. मन्हास | चिल्ड्रन | — | — |
| ३) डॉ. ए. के. कौल | डेंटिस्ट | ७३६८० | — |
| ४) डॉ. एम्. एल्. बाबू | न्युराओलॉजिस्ट | ७२१२३ | — |
| ५) डॉ. गिरीजाधर | गायनाकॉलॉजिस्ट | ७२५९९ | ७३८९६ |
| ६) डॉ. आशल | आर्थोपेडिशियन | ७३०३२ | — |
| ७) डॉ. एम्. अशरफ | कार्डियालॉजिस्ट | ७२६७० | ७३२५६ |
| ८) डॉ. मंझूर अहमद | आय स्पेशालिस्ट | ७३९२४ | ७३६९४ |
| ९) डॉ. बिल्कीज जमीला | गायनॉकॉलॉजिस्ट | ७८८८७ | — |

**श्रीनगरमधील बार :–**

१) ब्रॉडवे–मौलाना आझाद रोड
२) ओबेराय–बोलीवर्ड रोड
३) पयमाना–शहेनशहा पॅलेस
४) नया काश्मिर–अमीरकदल
५) मरीना–रीगल चौक
६) गुलमर्ग–बोलीवर्ड रोड
७) लाबेला–पोलो व्ह्यू
८) चिनार–दालगेट

**श्रीनगरमधील रेस्टॉरंट :–**

१) जुनीपर––लालचौक
२) सुरती––लालचौक
३) महालक्ष्मी––लालचौक
४) गुलमर्ग––रीगल चौक
५) मुगल––रीगल चौक
६) रॉयल––शीखानी रोड
७) सोलास––शीखानी रोड
८) अलका-सलका––शीखानी रोड
९) हॉलीवूड––शीखानी रोड
१०) रुबी––लॅबर्ट लेन

**श्रीनगरमधील क्लब :–**

(या क्लबमध्ये इनडोअर किंवा आऊटडोअर खेळ खेळण्याची सोय आहे.)

१) अमरसिंग क्लब––राम मुन्शी बाग––७६८४८
२) नागीन गव्ह. क्लब––नागिन लेक––७६५१७
३) श्रीनगर क्लब––झीरो ब्रिज––७२१३२

शेर-ए-काश्मिर कॉम्प्लेक्स हे श्रीनगरमधील स्टेडियम आहे. येथे टेबल-टेनिस, बॉक्सिंग, बिलीयर्ड, चेस, इ. खेळण्यासाठी सर्व सोयी आहेत.

**श्रीनगरमधील सरकारी निवासस्थाने :–**(खालील पत्त्यांवर अॅडव्हान्स बुकिंग करावे.)

१) मॅनेजर, रिझर्व्हेशन टूरिस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन टूरिस्ट रिसेप्शन सेंटर, श्रीनगर–१९०००१. फोन–७६१०७.

२) डेप्युटी डायरेक्टर, टूरिझम रिझर्व्हेशन डिपार्टमेंट ऑफ टूरिझम, रिसेप्शन सेंटर, श्रीनगर १९०००१. फोन–७७३०५.

१) चष्मेशाही हटमेंटस् २) टूरिस्ट रिसेप्शन सेंटर–(डिलक्स) ए. बी. ब्लॉक (डबल बेड रूम) सी. डी. ब्लॉक (डबल बेड रूम) ३) टूरिस्ट हॉटेल ४) डाक बंगले– जम्मू, उधमपूर, बटोत, रामबन, बनिहाल, वेरीनाग, खानाबल येथे डाक बंगले व पार्टीला उतरण्यासाठी डॉर्मेटरीज् आहेत.

**यूथ होस्टेल:–**श्रीनगरमध्ये दोन यूथ होस्टेल्स आहेत. १) नेहरू पार्कसमोर डोंगरात आहे. २) लालचौकातून झेलम पार करून गेल्यानंतर गव्हर्न्मेंट मार्केटच्या मागील बाजूस आहे. दोन्ही ठिकाणी रूम्स आणि कॉमन हॉल उपलब्ध आहेत.

मॅनेजर, यूथ होस्टेल, हजुरीबाग, श्रीनगर. या पत्त्यावरच येथील बुकिंग करावे.

**श्रीनगरमध्ये राहण्याची सोय:–**

**पाश्चात्त्य पद्धतीची उच्च हॉटेल्स:–**

| हॉटेलचे नाव | पत्ता | फोन |
|---|---|---|
| १) ओबेराय पॅलेस हॉटेल | बोलीवर्ड रोड | ७१२४१/४६ |
| २) अझीझ हॉटेल | —,,— | ७७६७५ |
| ३) गुलमर्ग हॉटेल | —,,— | ७१३३१ |
| ४) ब्राऊन पॅलेस | —,,— | ७३८५६ |
| ५) लेक व्ह्यू सेंटॉर हॉटेल | —,,— | ७७६०१ |
| ६) नेहरू हॉटेल | —,,— | ७३६४१ |
| ७) परिमहल हॉटेल | —,,— | ७१२३५ |
| ८) हॉटेल सनशाईन | —,,— | ७१७०८ |
| ९) शहा अब्बास हॉटेल | —,,— | ७७७८९ |
| १०) झबरवान हॉटेल | —,,— | —— |
| ११) शहनशहा पॅलेस हॉटेल | —,,— | ७७०१५ |
| १२) हॉटेल न्यू पार्क | —,,— | ७४२३० व ७७७७० |
| १३) निडोज हॉटेल | मौलाना आझाद रोड | ७३०१५ |
| १४) ब्रॉडवे हॉटेल | —,,— | ७१२११ |

| हॉटेलचे नाव | पत्ता | फोन |
|---|---|---|
| १५) पाम्पोश | रेसिडेन्सी रोड | ७५६०१ |
| १६) सबीना हॉटेल | —,,— | ७८०४६ |
| १७) कबीर हॉटेल | ओल्ड ग्रॅगीबल रोड | ७८४२२ |
| १८) सम्राट | —,,— | — |

**श्रीनगरमधील मध्यमवर्गीय लोकांसाठी चांगली हॉटेल्सः–**

| हॉटेलचे नाव | पत्ता | फोन |
|---|---|---|
| १) विक्रम हॉटेल | मंदिरबाग | — |
| २) होलीनाईट हॉटेल | दलगेट | ७४६०८ |
| ३) हॉटेल हिलस्टार | —,,— | ७२५१२ |
| ४) एम्बसी हॉटेल | —,,— | ७८१५२ |
| ५) क्रिसेंट हॉटेल | —,,— | ७३४९१ |
| ६) न्यू ग्रीन व्हयू | —,,— | ७६३७८ |
| ७) रिझ हॉटेल | —,,— | ७२४९८ |
| ८) मोतीमहल | —,,— | — |
| ९) नीलम | —,,— | — |
| १०) यॉर्क | —,,— | ७२२८ |
| ११) हॉटेल रुमा | —,,— | ७२३६८ |
| १२) टूरिस्ट | —,,— | ७८१५२ |
| १३) आरोमा | —,,— | — |
| १४) महाराजा | —,,— | — |
| १५) मेघदूत | —,,— | — |
| १६) हॉटेल लिवर्ड | बोलीवर्ड रोड | ७४०४० |
| १७) हॉटेल मझदा | —,,— | ७२८४२ |
| १८) रचना | —,,— | ७२२०० |
| १९) हॉटेल मधुबन | —,,— | ७२४७८ |
| २०) हॉटेल डॉन | —,,— | ७५६१६ |
| २१) हॉटेल पॅराडाईज | —,,— | ७८६६७ |
| २२) न्यू शालिमार | —,,— | — |
| २३) सम्राट | —,,— | ७६७६३ |
| २४) सूर्य | रेसिडेन्सी रोड | ७८७७८ |
| २५) ग्रॅन्ड हॉटेल | —,,— | ७३२४२ |
| २६) ला बेला | —,,— | ७४८१९ |
| २७) लालारुख | चौकबाला | ७२३७८ |
| २८) खालसा | फर्स्ट ब्रीज | ७२७६६ |

० ० ०




१) **राज्य:**—जम्मू-काश्मिर.

२) **हवामान:**—एप्रिल ते सप्टेंबर थंड आल्हाददायी.
नोव्हेंबर अति थंड.

३) **समुद्रसपाटीपासून उंची:**—२१३४ मीटर.

४) **नदी:**—लीदर.

५) **भेटीचा कालखंड:**—एप्रिल ते नोव्हेंबर.

६) **पहलगामला पर्यटकांसाठी सोयी :—**

१. कॅम्पसाठी जाता येते.

२. वनसंचार करता येतो.

३. घोड्यावरून रपेट करता येते.

४. मासेमारीसाठी उत्कृष्ट जलाशये आहेत.

५. क्लब—२/— रु. भरून तात्पुरते गव्हर्मेंट क्लबचे सभासद होता येते.

७) **पहलगामच्या परिसरात साईटसीईंग:—**

१. बैसरन ५ कि. मी.

२. अरु ११ कि. मी.

३. कोलोहाई ग्लेसीअर ३५ कि. मी. (३ दिवस) घोडे उपलब्ध.

४. चंदनवाडी १६ कि. मी.

५. शेषनाग २७ कि. मी.

६. तारसर लेक ३९ कि. मी. (३ दिवस)

७. तुल्लीन लेक १६ कि. मी.

८. अमरनाथ ४६ कि. मी. (५ दिवस) घोडे उपलब्ध.

**श्रीनगरहून पहलगामकडे :–**

**पांद्रेठन** :–(Pandrethan)–श्रीनगरहून निघाल्यानंतर ६ कि. मी. अंतरावर पांद्रेठन लागते. अति प्राचीन ऐतिहासिक स्थान म्हणून पांद्रेठनची महती आहे. इ. स. अडीच हजार वर्षांपूर्वी बौद्धधर्मीय सम्राट अशोकाने या ठिकाणी राजधानी बनवली होती. येथे एक तलाव असून त्यात इ. स. ७ व्या शतकातील बांधलेले एक शीख मंदिर पाहण्यासारखे आहे. या मंदिरातील शिल्पाकृती उत्तम आहेत. अजूनही दगडावर कोरीव काम करणारे उत्तम शिल्पकार या गावी आढळतात.

**पाम्पूर** :– (Pumpore) –श्रीनगरपासून १७ कि. मी. अंतरावर हे छोटे खेडेगाव आहे. कस्तुरीमृगाला पाहिले की काय वाटते ? बस्स ! पाम्पूरगाव पाहिले की तीच भावना मनात निर्माण होते.

पाम्पूर म्हणजे काश्मिरचा सुगंध. भारतात सर्वाधिक शुद्ध सुगंधी केशराच्या बागा या गावाभोवती आहेत. भारतातच काय, जगातही इटली-स्पेनमधील केशर प्रसिद्ध असले, तरी पाम्पूरइतके दर्जेदार केशर कोठेही उपलब्ध होत नाही. केशराला बहार येतो, तो नोव्हेंबर महिन्यात. साऱ्या बागा निळ्या-जांभळ्या रंगांच्या फुलांनी आच्छादलेल्या असतात. पौर्णिमेच्या चांदण्यात या बागा न्याहाळल्या, तर रंगीबेरंगी असे स्वर्गतुल्य नवखे सौंदर्य पाहिल्याचा भास होतो. केशराला सहा पाकळ्यांचे जांभळे फूल येते. त्यात तीन पिवळे पराग असतात. (या परागांनाच केशरी रंग व सुगंध लावून खरे केशर म्हणून नकली केशर विकले जाते. केशराची पारख नसलेले ग्राहक या वासालाच फसतात.) याच निळ्या फुलात तीन केशरी पराग असतात. ते खरे सुगंधी केशर. पण तेही हळुवार काढणे ही एक कला आहे.

हिमालयातील वर्फावरून आलेल्या शीतल वायुलहरी हळुवार येऊन या जांभळ्या फुलांना चुंबतात व त्याच गुलाबी आठवणींचा सुगंध बरोबर घेऊन बेहोष-पणे त्या बेछूट धावतात. सुगंधाची धुंदी या चंचल वाऱ्याला चढली आहे, हे सर्व निसर्गाला कळलेले असते. तरीही आपल्याजवळील सुगंध चहुबाजूला उधळत वारा मात्र बेदिक्कतपणे पुढे धावतच असतो.

पाम्पूर या नावाच्या व्युत्पत्तीमागे मजेशीर इतिहास आहे. इ. स. ८०० नंतर राजा अजतपिडाने पद्माच्या साहाय्याने या शहराची उभारणी केली. पद्मापासून पद्मपूर आणि याचाच अपभ्रंश होऊन या शहराचे नाव पाम्पूर असे पडले असावे.

**अवंतीपूर:** – (Avantipur)–अवंतीपूर हे अवशेषात्मक शिल्प, तत्कालीन इतिहास आणि कलेची साक्ष देणारे स्थान असून, श्रीनगरपासून ३३ कि. मी. अंतरावर आहे. इ. स. ५ व्या शतकात अवंती राजाने हे शहर वसवले, म्हणून या ठिकाणाला अवंतीपूर असे म्हणतात. राजाने येथे विष्णु व शंकर अशा दोन मंदिरांची उभारणी केली. शंकराच्या मंदिराला अवंतीस्वामी मंदिर असे म्हणतात. कदाचित अवंतीपूरचा रक्षक परमेश्वर म्हणून शंकराला हे नाव रूढ झाले असावे. अवंतीवर्मनाच्या काळातील विष्णुमंदिराचे अवशेष मात्र शिल्पकलेतील भरभराटीची अजूनही साक्ष देतात. वितस्ता नदीला आलेला भयावह पूर आणि इ. स. १४२६ मध्ये झालेल्या भूकंपाने हा परिसर उध्वस्त झाला. त्यावेळी ही मंदिरे पण उध्वस्त होऊन जमिनीत गाडली गेली. डोग्रा अधिपतींच्या मदतीने इ. स. १९२२ मध्ये 'दयाराम सोहोनी' यांनी उत्खनन करून या विष्णुमंदिराचा शोध घेतला.

हे विष्णुमंदिर जम्मू-श्रीनगर रस्त्याला लागूनच असल्याने येथे सहज लक्ष जाते. याचे प्रवेशद्वारच काळ्या कातळात कोरलेले आहे. दगड कठीण असला, तरी त्यावरील कोरीवकाम मात्र नाजूक व सुंदर आहे. पायऱ्या उतरून आत गेल्यावर भव्य प्रासादासारखे हे मंदिर वाटते. या ठिकाणी एका दगडावर अवंतीवर्मन व त्याची राणी या दोघांच्या बाजूला एक वाघाचे शिल्प कोरलेले आहे. प्रवेशद्वारास दोन्ही बाजूंस गरुडांची शिल्पे दिसतात. तसेच गंगा, जमुना यांच्या मूर्तीही कोरलेल्या दिसून येतात. या मंदिराला 'पंचायत मंदिर' असेही संबोधले जाते. या मंदिराचा मुख्य भाग म्हणजे विष्णूचे देवालय म्हणून समजले जाते. याच्या चारही बाजूस वरुण, गरुड, गणेश, लक्ष्मी अशी मंदिरे होती.

अवंतीपूरच्या प्रत्येक भिंतीला कोरीव दगडी खांब असून ते जवळजवळ ६९ खांब आहेत. या मंदिरातील विष्णूची मूर्ती श्रीनगरला हलविण्यात आल्याचे कळते. एका ठिकाणी कामदेवाची मूर्ती आढळून येते. एकेकाळी अवंतीपूर हे काश्मिरमधील राजधानीचे शहर मानले जात असे. अवंतीवर्मन राजाचा चेहरा कोरलेल्या दाढीसह तिबेटी लोकांप्रमाणे आढळला.

अवंतीपूर या स्थळाची आणखी एक दंतकथा ऐकावयास मिळते, ती अशी : पांडवांची राजधानी अवंतीपूर ती हीच होय. या ठिकाणी धर्मराजाचा भव्य राजवाडा असून आताचा जो भाग अस्तित्वात आहे, तो धर्मराजाचा भव्य महाल होता. द्रौपदी ही काबूल-कंदाहार देशातील राजकन्या. म्हणजे सध्याचा इराण-इराक



...ग्रंथालय ठाणे

हा देश होय. पांडवांनी द्रौपदीला पणात जिंकून स्वयंवर झाल्यावर प्रथम अवंतीपूर येथे आणले व या ठिकाणी धर्मराज व द्रौपदी एकांतात असताना अर्जुनाने महालात प्रवेश केल्याची व त्यानंतर त्यास वनवासात जावे लागले. त्याची दंतकथा येथील काही लोक सांगतात. अर्थात अशा गोष्टींना पुरेसा पुरावा नसल्याने हा एक दंतकथेचाच भाग म्हणाला लागेल.


**अनंतनागः –** (Anantnag)–श्रीनगरपासून ५५ कि. मी. अंतरावर अनंतनाग हे प्रसिद्ध व्यापारी केंद्र आहे. अनंत म्हणजे अनेक किंवा ज्याला अंत नाही असा व नाग म्हणजे झरा. अनंतनाग शहरात प्रवेश करण्यापूर्वी झेलम नदी ओलांडून जावे लागते. पर्यटकांना अनंतनागमधील अनंतबागेचे आकर्षण वाटते. येथील तीन-चार झऱ्यांपैकी सल्फर-गंधकयुक्त झरा प्रसिद्ध आहे. येथे हिंदू मंदिर, मशीद व गुरुद्वारही आहे. पेपरमिशी (कागदाच्या लगद्यापासून तयार केलेल्या वस्तू) व लाकडावरील कोरीव काम केलेल्या वस्तू विकत मिळतात.

अनंतनाग येथील गंधक निर्झराबद्दल एक दंतकथा ऐकवली जाते. ती अशी, गौतम ऋषींच्या पत्नीशी समागम करण्यासाठी इंद्राने गौतमऋषीचे रूप धारण केले. यामुळे गौतमऋषी भयंकर क्रोधित झाले व त्यांनी इंद्राला शरीर रोगग्रस्त व व्याधिजर्जर होण्याचा शाप दिला. तो शाप इंद्राला चांगलाच भोवला. ती दुर्दैवाची स्थिती नाहीशी व्हावी, म्हणून इंद्राने विष्णूची तपश्चर्या केली. भगवान विष्णु प्रसन्न झाले. त्यांनी इंद्राला येथील गंधक झऱ्याच्या पाण्यात शरीर धुण्यास सांगितले. त्या पाण्यातील गुणधर्माने इंद्राचे व्याधिग्रस्त शरीर पूर्ववत झाले.

नैसर्गिक गंधकयुक्त पाणी आरोग्यास उत्तम असते. तसेच या पाण्यात स्नान केले, तर आपल्या घराण्यात कोणी अपघातात मृत्यू पावला असेल, तर त्यास सद्गती मिळते. हे या निर्झरास महादेवाने वरदान दिलेले असल्याचेही ऐकवले जाते. अशा अनेक दंतकथा येथे ऐकायला मिळतात.

**मटनः**–(Mattan)–श्रीनगरपासून हे स्थान ६१ कि. मी. अंतरावर आहे. अनंतनागपासून ६ कि. मी. पहलगामकडे निघाले असता हे स्थान लागते. येथे शीखांचे पवित्र गुरुद्वार असून एक मनोरम निर्झर आहे. आजूबाजूच्या सर्व परिसरात चिनार वृक्ष आहेत. मटन हा अपभ्रंशात्मक शब्द 'मार्तंड' या संस्कृत शब्दापासूनच निर्माण झाला आहे.

**मार्तंड मंदिरः**–(Martand Temple)–मटनपासून १ कि. मी. अंतरावर इ. स. ५ व्या शतकात 'रामदित्याने' उभारलेले सूर्यनारायणाचे हे भव्य मंदिर आहे. राजा ललितदित्याने इ. स. ८ व्या शतकात या मंदिराचा जीर्णोद्धार केला. महाराजा अवंतीवर्माने या ठिकाणी नंतर अनेक मंदिरे उभारली. या धार्मिक स्थळांची साक्ष देणारी एक पौराणिक कथाही कथन केली जाते.



।। मार्तंडायः नमः ।।

**रमणीय निसर्गाच्या कुशीत मरण या गांवातील प्रसिद्ध सूर्यमंदिर, पहलगाम.**


ही गोष्ट सत्ययुगातील आहे. कश्यपऋषींच्या पत्नीचे नाव आदिती होते. तिलाच 'आदितीमाता' असे संबोधले जात असे. विष्णूने तिला दिलेल्या वरदानातून जो पुत्र झाला, तोच तेरावा सूर्य म्हणजेच मार्तंड होय. हा सतीसारमध्ये राहणारा पूर्व जन्मीचा विकर्ण होय. कश्यपऋषींनी सतीसार परिसरात काश्मिरमध्ये नवीन वसाहत स्थापन केली. यावेळी येथे आदितीपासूनच उत्पन्न झालेले एक अंडाकार पिंड होते. विष्णूने सुदर्शन चक्राने या पिंडाचे विभाजन केले. त्यावेळी त्यातून एक प्रकाश-ज्योत बाहेर आली. हे तेज म्हणजेच मार्तंडांचा जन्म होय.

मार्तंड नावाची व्युत्पत्ती सांगताना 'मृताद् अण्डात् आगत:' असा अन्वयार्थ लावला जातो. जे दोन अंडाकार पिंड होते, त्यांतून विमल व कमल ही दोन जलकुंडे तयार झाली. तसेच सुदर्शनचक्राने पिंड दुभंगल्यावर तेथूनच एक पाण्याचा प्रवाह निर्माण झाला. तीच चक्रसुता म्हणजे 'चाका' नदी होय. या चाका नदीकाठीच 'पितृ गया' समजून अनेक लोक श्राद्ध करण्यासाठी येतात.

भगवान विष्णूच्या वरदानानेच अधिक मासाचा अधिपती म्हणून मार्तंडास मान मिळाला. मार्तंडमंदिर हे जागृत दैवत समजून मोगल बादशहांनीही या धर्मस्थानास जहागिरी अर्पण केली होती. प्राचीन काळात तिबेट, चीन, काबूल येथून यात्रेकरू

दर्शनार्थ येथे येत असत. दर अडीच वर्षांनी मार्तंडला कुंभमेळा भरतो. भारतातून ठिकठिकाणांहून लोक पितृश्राद्धासाठी येथे येतात. विशेषत:, अपघातात कोणी गेले असल्यास त्यास सद्‌गती लाभावी, म्हणून येथे श्राद्ध केले जाते. रविवार व चंद्र-सूर्य ग्रहणाच्या वेळी एक पवित्र पर्वणी म्हणून लोकांची येथे स्नानासाठी गर्दी असते. मंदिरामागील डोंगरातून येणारा एक जलप्रवाह या मंदिराच्या खालून वाहतो. या मंदिराशिवाय पहाडावर असलेले मर्गशिखा मंदिर, सीताराम मंदिर, सदाशिव मंदिर, गणेश मंदिर, राधाकृष्ण, शिवलिंग इ. अनेक मंदिरे येथे असल्याने अनेक देवतांच्या दर्शनाचे भाग्य येथे लाभते. येथील तलावात असंख्य सुंदर मासे आहेत. एखादा मासा मेला, तरी त्याचे विधिपूर्वक दफन केले जाते.

**अच्छाबल:**–(Acchabal)–श्रीनगरपासून हे ठिकाण ५८ कि. मी. अंतरावर आहे. अनंतनागहून कुकरनागकडे जाताना ८ कि. मी. अंतरावर हे स्थान आहे. हजारो वर्षांपूर्वी येथे अक्ष नामक राजा राज्य करीत होता. याच्या नावावरून या गावाला अक्षबल (अपभ्रंशात्मक) अच्छाबल असे नाव प्राप्त झाले.



**जहांगीरने वसवलेली एक उत्तम बाग, अच्छाबल–पहलगाम.**

अच्छाबल येथे एक सुंदर बाग सम्राट जहाँगीरने वसवलेली आहे. या बागेतूनच एक शीतल पाण्याचा स्वच्छ झरा वाहतो. बागेत थुईथुई नाचणारे कारंजे, रंगीबेरंगी फुले, चिनार व देवदार वृक्ष आणि बागेच्या पार्श्वभूमीला आकाशाशी स्पर्धा करणारा उंच पर्वत आहे.


**कोकरनाग**:–(Kokarnag)–श्रीनगरपासून ८२ कि. मी. अंतरावर असलेले हे रमणीय स्थान अच्छाबलपासून ८ कि. मी. अंतरावर आहे. (कोकर = कोंबडी व नाग = झरा.) कोंबडीच्या पायाचा पंजा ज्याप्रमाणे असतो, त्याप्रमाणे येथून एकाच झऱ्याच्या धारा विविध तऱ्हेने वाहतात. म्हणून या स्थानास कोकरनाग असे संबोधले जात असावे. या कोकरनागच्या चारही बाजूस हिरवीगार पर्वतराई पसरलेली आहे. प्रकृतिस्वास्थ्यासाठी हे ठिकाण उत्तम आहे. येथून दोन मैल अंतरावर एक कॅल्शियमचा झरा असून त्या ठिकाणी एक बोटॅनिकल गार्डनही आहे. कोकरनागला मासेमारीसाठी पूर्व परवानगी घेऊन जाता येते. राहण्यासाठी टूरिस्ट बंगले आहेत.

**वेरीनाग**:–(Verinag)–श्रीनगरपासून ८० कि. मी. अंतरावर व अच्छाबलपासून १६ कि. मी. अंतरावर हे ठिकाण आहे. जम्मूहून श्रीनगरला जाता-येताना हे ठिकाण पाहून आपण पुढील प्रवास सहज करू शकतो. जवाहर बोगदा संपल्यानंतर ४ कि. मी. श्रीनगरकडे आलो असता उजव्या हाताला जो रस्ता फुटतो, तेथून ६ कि. मी. अंतरावर वेरीनाग हे स्थळ आहे.

डोंगराच्या पायथ्याशी ३० फूट व्यास असलेला एक झरा जमिनीतून बाहेर येतो. याच्या भोवती पक्क्या विटांची भिंत बांधलेली असून श्रीनगर शहराच्या बाजूस ठेवलेल्या ६ फूट मोकळ्या जागेतून पाणी वाहत बाहेर पडते. यासच वितस्ता नदीचा उगम म्हणतात. 'वितस्ता' नदीसच सध्या 'झेलम' या नावाने संबोधले जाते. झेलमच्या उगमापासून जो प्रवाह वाहतो, त्याच्या दोन्ही बाजूंस दोन फर्लांग लांबीची उत्तम व भव्य बाग आहे. येथील झऱ्याचे पाणी नीलमण्याप्रमाणे निळेशार दिसते.

उगमाचे जे कुंड आहे, ते मोगल बादशहा जहाँगीर याने बांधलेले आहे. या कुंडातील माशांच्या तोंडात नूरजहाँने सोन्याच्या रिंगा घातल्या असल्याचा उल्लेख आहे. उन्हाची तिरीप पाण्यात पडल्यानंतर माशांच्या हालचाली होताच त्या रिंगा चमकत असतील. चिनार व देवदार वृक्षराईतील एक रम्य ठिकाण म्हणून नूरजहाँ येथे विश्रांतीसाठी येत असे. येथे टूरिस्ट बंगले असून ते अल्प भाडे घेऊन दिले जातात.

**पहलगाम**:– (Pahalgam)–श्रीनगरच्या पूर्वेला ९४ कि. मी. अंतरावर पहलगाम हे निसर्गसौंदर्याने नटलेले अतिसुंदर टुमदार गाव आहे. लीदर नदीकाठी हिरव्यागच्च हिरवळीचे वस्त्र ल्यालेल्या व हरितवृक्षांनी वेढलेल्या पहलगावातील रंगीबेरंगी घरे अथवा गेस्ट हाऊसेस् आकर्षक वाटतात.



**हिरव्यागार पर्वतराईतून खळखळ वहाणारी सौंदर्यसौदामिनी 'लीदर नदी.' पहलगाम.**

समुद्रसपाटीपासून ७९०० फूट उंचावर पहलगाम शहर असल्याने, येथील शीतल हवेत रोज निसर्गच उमलतो नव्हे, तर मानवी जीवन रोज सकाळी नव्या ताजेपणाने उमलते, की काय ? असे येथे वाटते. काश्मिरमध्ये आपणांस सर्वाधिक कोणते स्थान आवडले, असा पर्यटकांना काश्मिरहून परत आल्यावर कोणी प्रश्न विचारला, तर प्रत्येकाचे एकच उत्तर असते 'पहलगाम'. भारतीय पर्यटकांचे तरी या पर्यटन-स्थळाकडे जबरदस्त आकर्षण आहे.

**पहल = मेंढपाळः–** (Shephards) गाम = गाव. मेंढपाळांचे गाव. या ठिकाणी हिरव्या कुरणात मेंढ्या-पालनाचा विशेष उद्योग चालतो. म्हणून या गावाला पहलगाम असे संबोधले गेले आहे. प्रकृतीला उत्साहित करणारा गारठा आणि गुलाबी थंडी येथील हवेत आहे. गोल-गोल दगडी गोट्यांना ठेचाळत खळखळ वाहणारा लीदर नदीचा प्रवाह पाहिला, की बालकवींची एक उक्ती आठवते.

ऐलतिरावर पैलतिरावर हिरवाळी घेऊन ।
निळा सावळा झरा वाहतो बेटाबेटांतून ।।

या गौरवर्णांच्या नद्या कोणत्या अनामिक ओढीने पुढे-पुढे धावतात, कुणास ठाऊक ? कितीतरी पर्यटक सकाळ-संध्याकाळ या नदीतीरी मनसोक्तपणे निसर्ग-सौंदर्य न्याहाळताना दिसतात.

मखमलीने लाजावे; अशा सुंदर, सर्वत्र पसरलेल्या हिरवळी आणि पार्श्वभूमीवर उंचउंच आकाशाला भिडणारी बर्फाच्छादित पर्वतशिखरे एक अविस्मरणीय ओढ मानवी मनात निर्माण करतात. पहलगाम या छोटयाशा गावाची रचना म्हणजे रुपेरी चंद्राला हिरव्या पाचूंचे कोंदण किती छान दिसेल ! अगदी तसेच आहे पहलगाम. चार हिरव्या डोंगरांच्या छोटयाशा दरीत एका बाजूने नदी वाहाते व त्यालाच समांतर या गावात असलेला एकुलता एक रस्ता, त्याच्या दोन्ही बाजूने आकर्षक वस्तूंची दुकाने, गेस्टहाऊस व लांबवर तुरळक हिरवळीतच लपंडाव खेळणारे काही बंगले. बस्स ! की, संपले 'पहलगाम'. एका नजरेत संपूर्ण पहलगाम साठवता येते.

पहलगाम म्हणजे काश्मिर राज्याची राणीच. खानदानी निसर्गसौंदर्याचा खासा अनुभव पहलगामच्या भेटीतच चाखता येतो. येथे पाहण्यासारखी फारशी प्रेक्षणीय स्थळे नसली, तरी तेथील निसर्गसौंदर्य मन रिझविण्यास पुरेसे आहे. मुख्य रस्त्याला लागूनच लीदर नदीकाठी गौरीशंकर मंदिर आहे. बाजूलाच गुरुद्वार व मशीदही आहे. गुण्यागोविंदाने नांदणारी ही धार्मिक स्थाने पाहिली, की निसर्ग हाच येथील मानवाचा धर्म असावा, असे क्षणभर वाटते. जवळच्या परिसरातील स्थळे पाहण्यासाठी गेस्ट हाऊस समोरच तेथील तट्टूवाले लोक पर्यटकांची वाट पाहात असतात. या तट्टूवर (घोडा) बसून अल्पखर्चात सफर करण्याचा आनंद पर्यटक लुटतात.

पहलगामहून फक्त श्रीनगर व अनंतनाग यासाठीच बस सुटते. येथून जम्मूत जायचे असल्यास परत श्रीनगरला आल्याशिवाय किंवा वाटेत खानाबल येथे उतरल्यास येथून जम्मूकडे जाणाऱ्या बस मिळू शकतात. पहलगाम गावची सुरुवातच होताना छोटा बसस्टँड आहे. या बसस्टँडला लागूनच टूरिस्ट सेंटर आहे. एकूण जम्मूसाठी स्पेशल बस मिळू शकते. पहलगामला खरी गर्दी असते, ती अमरनाथ यात्रेच्यावेळी.

**गोल्फ-ग्राऊंड :-** (Golf-Ground)–हे पहलगाममधील एक प्रेक्षणीय व प्रशस्त स्थळ. डेरेदार पाईन वृक्ष एकमेकांच्या अंगाला अंग लावून, फेर धरून या मैदानासभोवती उभे आहेत. मैदानावर तर एखादा मखमली हिरवा गालिचा पसरल्याचा भास होतो. मन शरीराबाहेर उडी घेते आणि या हिरवळीवर यथेच्छ दुडूदुडू धावण्याचा आनंद लुटते. चारही दिशांना असलेल्या हिरवळीच्या मऊ स्पर्शाने मन सुखावते. पायापेक्षा मनाचा धावण्याचा वेग अधिक असल्याने साऱ्या मैदानाला फेरी मारीत मन हिरवळीत लोळण घेते.

**बॉबी-हाऊस :-** (Boby-House)–पहलगाम गावाकडून गोल्फग्राऊंड चढत असताना उजव्या हाताला बॉबी हाऊस लागते. हा एक प्रशस्त बंगलाच आहे. राजकपूर या प्रसिद्ध सिनेनिर्मात्याने 'बॉबी' या सिनेमाचे चित्रण याच ठिकाणी केले. विशेषतः 'हम तुम एक कमरेमें बंद हों। और चाबी खो जाए।' या शृंगाररसाने

ओथंबलेल्या गाण्याचे चित्रण येथे झाले. आता 'हौस' आहे. हाऊस पाहण्याची हौसही आहे. पण बॉबीशिवाय बॉबीहाऊस पाहाताना कसलीतरी कमतरता जाणवते.

**मामलेश्वर मंदिर :–** (Mamleshwar Temple) :– गोल्फ ग्राऊंडच्या डाव्या बाजूला लीदर नदीचा पूल ओलांडून गेले असता व्याघ्र पर्वतात येथून १ कि. मी. अंतरावर थोडी चढण चढली असता हे एक छोटेसे पुरातन मंदिर दिसते. मंदिरात महादेवाची छोटीशी पिंड असून मंदिराच्या दारातच एक जिवंत झरा उगम पावलेला आहे. थोड्याच अंतरावर हा खळखळत लीदर नदीला जाऊन मिळतो. पूर्वी या डोंगरात वाघाच्या शिकारीसाठी लोक येत असत. आता वाघ अस्तित्वात नाहीत, पण त्याचे नाव मात्र पर्वतास तसेच राहून गेले.

**गणेशबल** (Ganeshbal)–पहलगामपासून १ कि. मी. अंतरावर विघ्न-नाशक गणरायाचे मनोरम आणि प्रसन्न स्थान आहे. निर्झराच्या मध्येच प्रस्थापित एका शिळेला सिंदूर लेपलेला गणपती आहे. येथे उतरण्यासाठी धर्मशाळा आहे. आजूबाजूचे भाविक येथे दर्शनासाठी नेहेमीच येत असतात.

**बैसरन :–** (Benisaran)–बैसरन या शब्दाचा अर्थ वाहता झरा असा आहे. हे निसर्गरम्य स्थान पहलगामपासून ५ कि. मी. अंतरावर आहे. चारही बाजू पर्वताच्या शिखरांनी व्यापलेल्या आणि हिरवळीने आच्छादलेल्या भूमीमुळे कँपसाठी लोक येथे येतात. झुळझुळणारा निर्झर व खळखळणारी नदी येथील सौंदर्यात भर घालतात. येथून सभोवताली पाईन वृक्षांच्या जंगलात वाऱ्यावर स्वार होऊन मन भराऱ्या मारीत राहते.

**तुल्लीन:–** (Tulian)–पहलगामपासून १९ कि. मी. अंतरावरील हे ठिकाण बैसरनपासून जवळ आहे. रस्ता एकदम चढ असून चालताना चांगलाच दम लागतो. भूकही सपाटून लागते. खाण्याच्या वस्तू जवळ असणे आवश्यक. मार्गदर्शनासाठी कुली बरोबर घेतला, तर प्रवास अधिक सुकर होतो.

**तारसर लेक:–** (Tarsar Lake)–पहलगामपासून हे स्थान ३५ कि. मी. अंतरावर आहे. आरू या ठिकाणापासून तारसरकडे जाता येते. तारसर लेककडे जाताना रस्त्यातच सभोवताली रंगीबेरंगी फुलांची उधळण झालेली दिसते. चिरतरुण पृथ्वीच्या हिरव्या काश्मिरी रेशमी शालूवर इतके कलाकुसरीचे रंगीबेरंगी नक्षीकाम करणाऱ्या विधात्याच्या किमयेने मन विस्मित होते. हे ठिकाण १३००० फूट उंचावर आहे. तारसर सरोवर १.६ कि. मी. लांब आहे. येथून २ कि. मी. अंतरावर सेकीवस हे कँपिंगला सुयोग्य स्थान आहे.

येथूनच पुढे मन्सार सरोवराकडे जाता येते. पण त्यासाठी पुन्हा दोन-अडीचशे मीटरचा चढ चढून पुढे जाणे आवश्यक आहे.

**पहलगाम शॉपिंगला चला**:–पहलगामच्या बस स्टँडपासून शंकर मंदिराच्या अलिकडे मध्यभागातून गेलेल्या एकमेव रस्त्याच्या दोन्ही बाजूंना एकमेकांना लागून दुकानांच्या रांगा उभ्या आहेत. हीच पहलगामची छोटी बाजारपेठ, पण विविध कलापूर्ण वस्तूंनी व कापडांनी गजबजलेली दिसते. हँडग्लोव्हज, सुती पायमोजे, ओव्हर-कोट, रेशमी साड्या, वूलन स्वेटर्स, काश्मिरी शाल, झब्बा, वुलन रग, रुमाल, विविध टोप्या, लाकडावरील कोरीव काम केलेल्या विविध वस्तू, कार्पेट्स्, बेडशीटस्, वुलन व सिल्क कोट, भरतकाम केलेले कापड इ. अनेक वस्तू येथे उपलब्ध आहेत. या बाजारपेठेतच असंख्य स्टुडिओ आढळतात. आणि आजूबाजूच्या परिसरात निसर्गाच्या पार्श्वभूमीवर फोटो काढून घेण्याचा मोह तरुणांना तर होतोच. पण वृद्धसुद्धा सामील होतात. काश्मिरी ड्रेस, हुक्का व गुलाबांचा गुच्छ घेऊन लोक फोटो काढतात.

**पहलगाम येथे कोठे उतराल ?**

(टीप:–या ठिकाणी गाव छोटे असल्याने वेगवेगळ्या नावांनी गावाचे भाग पाडलेले नाहीत. सर्व हॉटेल्सचा पत्ता "पहलगाम" असाच आहे.)

| अ.नं. | हॉटेलचे नाव | टेलिफोन नं. |
|---|---|---|
| १. | पहलगाम हॉटेल | २६ |
| २. | न्यू पाईन वूड | ४२ |
| ३. | प्लाझा हॉटेल | ३९ |
| ४. | व्होल्गा हॉटेल | ४६ |
| ५. | ग्रँड व्ह्यू हॉटेल | ७३ |
| ६. | पौर्णिमा हॉटेल | ३३ |
| ७. | राजपॅलेस | ३८ |
| ८. | वूडस्टॉक हॉटेल | २७ |
| ९. | नटराज हॉटेल | २५ |
| १०. | हिल व्ह्यू हॉटेल | — |
| ११. | रीगल हॉटेल | ६२ |
| १२. | अप्सरा हॉटेल | — |
| १३. | हॉलीडे इन | — |
| १४. | विंड रश हॉटेल | — |
| १५. | अक्सा लॉज | — |

| अ. नं. | हॉटेलचे नांव | टेलिफोन. नं. |
|---|---|---|
| १६. | दारकॅम्प (तंबू) | — |
| १७. | मॅन्शन | ४६ |
| १८. | माऊंट व्ह्यू | २१ |
| १९. | शेफर्डस | ७४ |
| २०. | टूरिस्ट बंगलो | — |

**रिझर्व्हेशन कोठे कराल**:—डायरेक्टर ऑफ टूरिझम, जे. अँड के. गव्हमेंट टूरिस्ट, रिसेप्शन सेंटर—श्रीनगर.

## अमरनाथ

**अमरनाथ** :— (Amarnath Yatra)—श्रीशिव शंकराचे अस्तित्व असलेले अमरनाथ हे अतिशय पवित्र असे भारतीय श्रद्धाळू भक्ताचे यात्रास्थान मानले जाते. अक्षरश: हिमालयात १२७२९ फूट उंचीवर बर्फाच्छादित शिखरावरील हे स्थान इतर धार्मिक यात्रास्थानाप्रमाणे पोहोचण्यास मात्र कठीण स्थान आहे. पहलगाम-पासून ४५ ते ५० कि. मी. बर्फ तुडवीत अमरनाथला जावे लागते. ही एक शिव-भक्तांची आणि पर्यटकांची कसोटीच आहे. अमरनाथला जाण्यासाठी प्रथम पहलगाम हे मुक्काम स्थळ मानावे लागेल. येथून पोनी उपलब्ध आहेत.

जम्मू-काश्मिर राज्यात 'शिवपूजा' अग्रगण्य असल्याने हरिपर्वत, गोपाद्री, नीलपर्वत याप्रमाणेच अमरनाथ हे पण शिवोपासकांचे श्रद्धास्थान आहे. पर्वत चढून संपल्यावर अमरनाथ येथेच 'अमरनाथाची गुंफा' आहे. या गुंफेत बर्फाचेच स्वयंभू असे शिवलिंग आहे. जुलै-ऑगस्ट मध्ये लोक यात्रेसाठी येथे जातात. अमरनाथाचे द्वार उघडताना तेथे अजूनही शुभ्रवर्णी कबुतराचे एक जोडपे पाहिल्याचे अनेक भाविक सांगतात. शिवलिंग असलेल्या गुंफेची लांबी ६० फूट असून रुंदी ५० फुटापर्यंत आहे. गुंफेत बर्फातून पाण्याचे थेंब ओघळत असतात. अमावास्येला शिवलिंग नसते, अशी समजूत आहे. श्रावण शुक्ल-पक्षातील प्रतिपदेपासून हे शिवलिंग पौर्णिमेला पूर्ण होते, व कृष्णपक्षात ते घटत जाते. पण ही समजूत असावी, असेच वाटते. नैसर्गिकरीत्या हवामानानुसार हे शिवलिंग तयार होते व नंतर घटते. या सर्वांसाठी अंदाजे १ महिन्याचा कालावधी जातो. त्यामुळे अमरनाथ वर्षातून १ महिनाच फक्त दर्शन देतो, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. श्रावणी पौर्णिमेला अमरनाथची खरी यात्रा असते व त्याच दिवशी दर्शन घेण्यासाठी म्हणून यात्रेकरू श्रावणशुक्ल द्वादशीला पहलगामकडून अमरनाथकडे प्रयाण करतात.

अमरनाथ गुंफेच्याखाली अमरगंगेचा प्रवाह वाहातो. भक्तगण येथे स्नान करून अमरनाथच्या दर्शनाला येतात. येणाऱ्या यात्रेकरूंना काठ्या, खाण्याच्या वस्तू, बूट, पोनी, वुलन रग सर्व सोयी वाटेत उपलब्ध आहेत. येथील दुर्गानाथ आश्रमाकडून तंबू पुरविले जातात. यात्रेच्या वेळी पहलगामहून अमरनाथपर्यंत जाणाऱ्या पर्यटकांना काश्मिर सरकारकडून सर्व सोयी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. यावेळी येथे खास सरकारी अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते. पहलगामहून यात्रेसाठी निघताना आठ दिवस पुरेल एवढे कोरडे अन्न तसेच पायात गमबूट, अंगावर जाड फुलसाईज वुलन कपडे, कानटोपी, वुलन पायमोजे, हातमोजे, रेनकोट, छत्री, हातात काठी, गरम पेयासाठी थर्मास, फर्स्टएड बॉक्स, बॅटरी इ. वस्तू बरोबर घेणे आवश्यक बाबी आहेत. पहलगामच्या टूरिस्ट कार्यालयामार्फत अगोदरच बुकिंग करून निघाल्यास पुढे चंदनवाडी, शेषनाग येथे तंबूत राहण्याची सोय होऊ शकते. अन्यथा तंबू, घोडा व कुली निघतानाच बरोबर घ्यावेत.

**चंदनवाडी** :– (Chandanwari)–पहलगामहून अमरनाथकडे जाताना चंदनवाडी हे स्थान लागते. पहलगामपासून हा प्रवास १३ कि. मी. अंतरावर आहे. पहलगामहूनच चंदनवाडीचा चंदेरी पर्वत दाखवला जातो. पण पर्वत पाहाणे जेवढे सोपे आहे, तेवढे तो चढणे सोपे नाही. हिरवी कुरणे, हिरव्या टेकड्या पार करीत आपण बर्फाच्छादित भूमीवर पदार्पण करतो. वर निळे आकाश व खाली शुभ्र बर्फ. सारे वातावरण शांतता गिळून बसलेले असते. या बर्फाच्छादित भागातही बर्फाचीच शुभ्र शाल ओढून बसलेले पाईन, फर, पानवृक्ष आढळतात. चंदनवाडीला बर्फानेच माखलेला पूल आहे. रस्ता टाररोड नाही. पोनीट्रॅकने वर जावे लागते. चंदनवाडीहून वाहाणारे दुधाळ शुभ्र पाणी वेगाने खाली वाहत लीदरच्या पाण्यात एकरूप होते.

**शेषनाग**:– (Sheshnag)–नागाच्या फण्याप्रमाणे दिसणारी सात शिखरे येथे आहेत. या शिखरांच्या समुच्चयाला शेषनाग असे म्हणतात. याच्या वरच्या भागाला 'जमातरनाग' असे संबोधतात. या ठिकाणाबाबत एक दंतकथा ऐकिवात आहे.

येथील एका नागकन्येचा विवाह बिजबिहाड येथील ब्राह्मण पुत्राबरोबर झाला. पण ती सुंदर नागकन्या तेथील राजाच्या वासनेची बळी ठरली. तिचा पती तिचे रक्षण करू शकत नव्हता. मुलीची दारुण अवस्था पाहून नागकन्येचा पिता भयंकर रागावला आणि त्याने त्या राजाची राजधानीच नष्ट करून टाकली व मुलीला आणि जावयाला जमारतनाग येथे आणले. शेषनाग हा भाग पहलगामहून २४ कि. मी. अंतरावर असून तेथे नयनमनोहर सरोवर आहे. काश्मिरच्या दऱ्याखोऱ्याचे अवलोकन येथून करता येते. लोचनांच्या ओंजळीने हे मुक्त सौंदर्य किती गटागट प्यायचे, हे सौंदर्यासक्तीवर अवलंबून आहे. शेषनाग सरोवर समुद्रसपाटीपासून ९५०० फूट उंचावर आहे. या सरोवरातील पाण्याचा रंग हिरवा दिसतो.

**कोलाहाई ग्लेसीयर** :– (Kolahai Glacier)–कोलाहाई हा भाग लीदरच्याच हिरव्या कुरणात व्यापलेला दऱ्याखोऱ्यांचा भाग आहे. येथे गुजर लोकांच्या झोपड्या आढळतात. जून ते ऑगस्ट या कालखंडात येथे जाता येते. कॅम्पसाठी या जागेचा उपयोग लोक करतात.

**अरू**:–(Aru)–९००० फूट उंचावरील या ठिकाणी जाताना आजूबाजूला गर्द झाडी दिसते. येथे चहूबाजूस हिरवी कुरणे आहेत. येथून वाहाणारी लीदर नदी वाहता वाहता एकदम अदृश्य होते व पुन्हा २७ मीटरनंतर दिसू लागते. या स्थानास गुरखूब म्हणतात. येथे रेस्ट हाऊस आहे.

**मुक्कामाची ठिकाणे**:–

| दिवस | गाव | कि. मी. | उंची (फुटामध्ये) |
|---|---|---|---|
| पहिला मुक्काम | पहलगाम ते चंदनवाडी | १६ | ९५०० |
| दुसरा मुक्काम | शेषनाग | २७ | ११७५० |
| तिसरा मुक्काम | पंचतरणी | ४० | १२००० |
| चौथा मुक्काम | अमरनाथ गुंफा | ४७ | १२७२९ |

याचप्रमाणे परतीचा प्रवास दोन मुक्कामात करता येतो.

**श्रीनगरहून १०० मैलांच्या आत सहलीसाठी योग्य असलेल्या काही निसर्गरम्य स्थानांची माहिती**:–(Sight Seeing :– Excursions)

**युसमर्ग** :– (Yusmarg)–श्रीनगरपासून हे नयनमनोहर निसर्गरमणीय स्थान ४० कि. मी. अंतरावर आहे. पीरपंजल पर्वतराईत हा हिरवागार दऱ्याखोऱ्यांनी व्यापलेला प्रदेश सुखावह वाटतो.

समुद्रसपाटीपासून याची उंची २३७९ मीटर आहे. या ठिकाणाकडे जाताना वाटेतच नुरुउद्दीनवलीचा दर्गा आहे. हिंदू लोक यास नंदऋषी असे पण संबोधतात. येथून जवळपास फिरण्यासाठी पोनी मिळतात. येथे राहाण्यासाठी टूरिस्ट हट्स् उपलब्ध आहेत. श्रीनगरला डायरेक्टर ऑफ टूरिझम कार्यालयात याचे रिझर्व्हेशन होते.

**नागिन लेक**:– (Nagin Lake)–दाल सरोवराच्या वायव्येला नागिन लेक आहे. येथील पाणी स्वच्छ, नितळ असून येथे पोहण्याची सोय आहे. या पाण्यात गाळ, गवत वा वेलींची जाळी नाहीत. बोटिंग वाटरस्केईंगचीही सोय आहे. या सरोवराच्या काठाकाठाने असलेल्या अनेक हाऊसबोटींत हौशी प्रवासी वसाहतीस येतात.

**वूलर सरोवर** :– (Wular Lake)–भारतातच नाही, तर आशिया खंडात काश्मिरमधील वूलर सरोवर सर्वाधिक मोठे सरोवर मानले जाते. ते श्रीनगरपासून ४० कि. मी. अंतरावर आहे. सरोवराची लांबी २४ कि. मी. आहे, व १० मैल रुंद आहे. या सरोवरात आजूबाजूच्या पर्वतराईतून खळखळ वाहत येणारे तीन जलप्रवाह मिळतात, तसेच झेलम नदीचा प्रवाहही या सरोवरातूनच जातो. वूलर सरोवराच्या ईशान्येला राजा अबीदीनने उभारलेले बान्डीपूर नावाचे एक द्वीप आहे. येथून संपूर्ण सरोवराचे भव्य आरसपानी दृश्य न्याहाळता येते.

**कृष्णसार लेक** :– (Krishnasar Lake)–कृष्णसार सरोवर सोनमर्ग-पासून २५ कि. मी. अंतरावर असून उंची १२५२८ फूट असल्याने डोंगरातून पायी चढून जावे लागते. बर्फाच्छादित पर्वतातच हे सरोवर असल्याने त्याच्या निळ्याशार पाण्यावर बर्फाचे थरपण आढळतात. आजूबाजूला हिरवळीत रंगी-बेरंगी फुले उमललेली दिसतात.

**गंगाबल लेक** :– (Gangabal Lake)–हे सरोवर श्रीनगरपासून १३ कि. मी. अंतरावर असून ते हरिमुख पर्वताच्या पायथ्याशी आहे. जवळच मैदान असून तेथे चिनार वृक्षांची झाडी आहे. कॅम्पिंगसाठी पण या स्थानाला महत्त्व देण्यात येते. हे सरोवर ११७२ फूट उंचीवर आहे. हिंदूजनांचे ते यात्रेचे पवित्र तीर्थस्थान मानले जाते. हाऊसबोटीत येथे पर्यटकांना नीरव शांततेत मानसिक विश्रांती घेता येते. येथे 'वीजघर' असून तेथून श्रीनगरला वीजपुरवठा केला जातो.

**मनसाबल सरोवर** :– (Manasabal Sarowar)—श्रीनगरपासून ३२ कि. मी. अंतरावर वूलर सरोवराकडे जातानाच वाटेतच वीरभवानी पासून ५ कि. मी. अंतरावर हे सरोवर आहे. बस किंवा टॅक्सीने येथे जाता येते. या सरोवरात सुंदर कमळांची फुले उमललेली दिसतात. पर्यटकांना येथे मासे पकडण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या सरोवरात शिकारा सहलही करता येते. जलाशयाच्या काठी सुंदर गार्डन आहे. सरोवर छोटे असले, तरी हे स्थान रमणीय आहे. येथे राहण्या-साठी लहान-लहान बंगले बांधले आहेत.

**अहरबल झील** :– (Aharbal Zeal)–श्रीनगरपासून ५१ कि. मी. अंतरावर अतिशय नयनरम्य असलेल्या या निसर्गस्थळी ७५ फूट उंचावरून वेशण-नदी खाली कोसळताना हा धबधबा निर्माण झाला आहे. मे व ऑक्टोबरमध्ये येथे बर्फ पाहावयास मिळतो. येथे राहाण्याची सोय आहे.

**नीलनाग लेक** :– (Neelnag Lake)–या सरोवरास जाण्यासाठी बसने प्रथम नागम येथे जावे लागते. ७००० फूट उंचावर हे सरोवर असूनही या सरोव-

वरातील पाणी ऊबदार असल्याने पर्यटक पोहण्यासाठ। या सरोवराचा अधिक उपयोग करतात. नागमपासून १३ कि. मी. अंतरावरील नीलनाग सरोवरास पोनीने जाता येते.

**शेषनाग झील** :– (Sheshnag Zeal)–पहलगामपासून हे सरोवर १८ मैल लांब आहे. अमरनाथच्या यात्रेला जाताना वाटेतच हे सरोवर लागते. येथील निळ्याशार पाण्यात बर्फाच्छादित पर्वतांची प्रतिबिंबे रेखीव व सुंदर दिसतात.

**कौन्सरनाग लेक** :– (Kounsarnag Lake)–हिमालयाच्या कुशीत १२०० फूट उंचीवर हे सरोवर आहे. या सरोवराच्या आजूबाजूस पीरपंजल पर्वतांची शिखरे आहेत.

० ०


जम्मू येथे राहण्याची उत्तम सोय

**–: हॉटेल पिकनिक :–**

**फोन : ५८५९**

**सर्व सुखासोयीयुक्त राहणे व जेवणाची उत्तम सोय.**

**श्रीनगरला जाता-येता आमचेकडे थांबा !**

**वैशिष्ठ्ये:–**


- ★ जम्मूहून मुंबई–पुणे–नागपूर–दिल्लीची रेल्वे व विमानाचे तिकीट बुकींग करू.
- ★ जम्मू ते श्रीनगर विमान-टॅक्सी-बस बुकींग.

लिहा किंवा भेटा

मॅनेजर हॉटेल पिकनिक

पिकनिक रोड, टुरिस्ट सेंटरच्या मागे

मु. पो. जम्मू (जे. अँड के) १८०००



**गावाचे नाव**:–सोनमर्ग.

**राज्य**:–जम्मू-काश्मिर.

**हवामान**:–मे ते ऑक्टोबर–थंड आल्हाददायी.

**समुद्रसपाटीपासून उंची**:–२७४० मीटर.

**नदी**:–सिंधू.

**भेटीचा कालखंड**:–मे ते ऑक्टोबर. (कधी-कधी १० मे पर्यंत येथे जाता येत नाही.)

**वैशिष्ट्य**:–मुबलक बर्फ.

**ऋतू**:–ऑक्टोबर ते एप्रिल–हिवाळा.

**मे ते सप्टेंबर**–उन्हाळा.

(मे व ऑक्टोबरमध्ये थोडा पाऊस.)

**भाषा**:–हिंदी, ऊर्दू.

**उद्योग**:–भातशेती.

**सोनमर्ग** :– (Sonmarga)–श्रीनगरपासून ८४ कि. मी. अंतरावर हे स्थान आहे. याला 'Golden Medos 'सोनेरी कुरण' असेही संबोधतात. श्रीनगरहून लेहकडे जाताना रस्त्यावरच सोनमर्ग लागते. सोनमर्गला जाताना गांधारबलच्या पुढील सर्व प्रवास सिंधू नदीच्या खोऱ्यातूनच करावा लागतो. गोल-गोल दगडगोटच्यातून खळखळ वाहणारा सिंधू नदीचा प्रवाह दऱ्याखोऱ्यातील गंभीर शांतता भंग करतो. मे महिन्याच्या प्रवासात चारही बाजूंना नजर फिरवली, तर बर्फाच्छादित पर्वतशिखरेच आढळतात. येथे घोडचावरून रपेट करता येते. जाताना वाटेत पर्वतांच्या दरडी कोसळलेल्या आढळतात. पर्वतावरून घरंगळत येणारे बर्फ दिसते, तर

नदीकाठी प्रचंड हिमनग पडलेले दिसतात. सिंधू नदीवर स्नो ब्रिज पाहावयास मिळतो. पण या दृश्यासाठी मे महिन्याच्या पहिल्या काही दिवसांतच येथे भेट देणे आवश्यक आहे.

सोन म्हणजे सोने व मर्ग म्हणजे मैदान. म्हणूनच 'सोनेरी मैदान' असे नाव असले, तरी मात्र आपणांस तो डोंगर बर्फाचाच दिसतो. सोनमर्गला जाताना अर्ध्या रस्त्यातच पुढील निसर्गाची चाहूल लागते. हवेत चांगलाच गारठा असतो. सोनमर्गला उतरल्यावर नजर पोहोचेल, तेथपर्यंत चहूबाजूला हिरव्या पाचूंचे बेटच पसरलेले वाटते. निसर्गाचा मनसोक्त आनंद लुटायचा असेल, निसर्गसौंदर्याचे आकंठ पान करायचे असेल, तर सोनमर्गसारख्या ठिकाणांना भेट देणे अपरिहार्य ठरेल. येथील हिरवळीची मैदाने चढती होत जातात आणि थोड्याच उंचीवर बर्फाच्या कुशीत लाडिकपणे शिरतात. तरुण जोडपी, पर्यटक, मुले येथे बर्फाचे चेंडू करून खेळताना आढळतात. पावसाच्या रिपरिपीने गवत ओले झालेले असते. पृथ्वीच्या हिरव्याकच्च तारुण्यसुलभ सौंदर्याची झलक अनुभवायला मिळते, ती येथेच.

येथील मातीचा रंग सोनेरी आहे. युसमर्गच्या निसर्गसौंदर्याने तृप्त झालेले मन बर्फाळ शिखरांवर उड्या घेत हिरवळीत कोठेतरी दडून बसते.

**निवासस्थाने**:—बरेचसे पर्यटक सोनमर्गला मुक्काम करीत नाहीत. सकाळी येथे येऊन संध्याकाळी परत जातात. काही हौशी पर्यटकांना मुक्काम करावासा वाटल्यास खाजगी लॉजेस् येथे नाहीत. पण रेस्ट हाऊसमध्ये भाडे देवून राहण्याची सोय आहे. तसेच टूरिस्ट हट्समध्ये सुद्धा राहता येते. श्रीमंत लोकांसाठी टूरिस्ट बंगले उपलब्ध आहेत. श्रीनगर येथील टूरिस्ट सेंटरलाच याचे बुकिंग करावे.

सोनमर्गला बोटावर मोजण्याइतकी दुकाने व रेस्टॉरंट आहेत. तेथे खरेदीसाठी वैशिष्टचपूर्ण असे काहीच नाही. मात्र अस्सल 'शिलाजित' (दगडाचा घाम) येथील भटके लोक विकतात. प्रकृतीसाठी हे अतिउत्तम. तसेच 'कस्तूरी'पण या ठिकाणी आपणांस मिळू शकते. बनावट मालापासून मात्र सावध असावे. सोनमर्गला खरी गर्दी असते, ती अमरनाथ यात्रेच्या वेळी. येथून अमरनाथला सकाळी निघून, दर्शन घेऊन संध्याकाळी परत येता येते. पण हा जवळचा रस्ता असला, तरी अत्यंत धोकादायक आहे. काश्मिरी तरुण पुरुष ज्यांना रोज पर्वत चढण्याची सवय आहे, तेच लोक फक्त या मार्गे जातात.

**खिरभवानी** :— (Khir–Bhavani)—श्रीनगरहून सोनमर्गकडे जाताना २७ कि. मी. अंतरावर डाव्या बाजूस वूलर लेक रस्त्यावर खिरभवानी हे एक जागृत देवस्थान आहे. जवळूनच सिंधू नदी वाहते. तिचे पात्र या ठिकाणी शांत व भव्य आहे. सपाट पृष्ठभागावर चिनारवृक्षांच्या वनराईत प्रशस्त जागेत हे छोटेसे मंदिर पाहून मन प्रसन्न होते.

एक लांबट आकाराचे संगमरवरी दगडातील बांधीव शुभ्र कुंड आहे. या कुंडाच्या मध्यभागी देवीचे मंदिर आहे. चारही बाजूंनी पाणी असल्याने कोणीही भक्त प्रत्यक्ष मंदिरापर्यंत जाणे दुरापास्त आहे. देवीच्या पुजेसाठी सकाळी-संध्याकाळी या पाण्यावर फळी टाकून पुजारी सोवळ्यात त्या मंदिरापर्यंत जातात व अन्यवेळी मंदिरासमोर बांधलेल्या सभामंडपात बसूनच भाविकांना पूजा सांगतात. मंदिराच्या परिसराभोवतीचे जिवंत झऱ्याचे पाणी स्नानासाठी उपयुक्त ठरते. येथे स्त्री व पुरुषांना स्नानासाठी स्वतंत्र बांधीव घाट आहेत. या मंदिरात प्रवेश करतानाच दुधाचे भरलेले ग्लास आणि पूजेचे सामान मिळते. मंदिराच्या कुंडाभोवती कठडा आहे. या कठड्याजवळ जाऊन कुंडातील पांढऱ्याशुभ्र दुधाळ पाण्यात दुधाचा ग्लास अभिषेक म्हणून रिता केला जातो. खीर हा शब्द क्षीर = दूध या शब्दाचा अपभ्रंश आहे. भवानी = देवी. मूळशब्द "क्षीरभवानी" असावा. पण हे ठिकाण खिरभवानी म्हणूनच प्रसिद्ध आहे.

येथील झऱ्याचे वैशिष्टच असे सांगतात, की झऱ्याच्या पाण्याचा रंग वारंवार बदलतो. या देवीच्या दर्शनासाठी येणारे हिंदू वा मुस्लिम-कोणीही असो, ते त्या दिवशी मांसभक्षण करीत नाहीत. तसेच धुतलेले कपडे घालून स्नान करून येतात. प्रत्येक अष्टमीला भक्त येथे येतात. मात्र ज्येष्ठ शुद्ध अष्टमीला येथे खिरभवानीचा उत्सव असतो. या दिवशी खिरीचा प्रसाद सर्वांना मंत्रघोषात वाटला जातो.

काश्मिरमधील हिंदू लोकांची खिरभवानी ही कुलस्वामिनी आहे. या देवी-विषयी एक दंतकथा आहे ती अशी,

पंडित गोविंदजींना एके रात्री स्वप्न पडले. सौरा घाटातून ते अंचार सरोवरा-कडे निघाले. त्यांनी आपल्याबरोबर अनेक दुधाचे घट भरून घेतले होते. तेथे त्यांना एक झरा गवसला. त्यांनी बरोबर आणलेले दुधाचे घट त्या झऱ्याच्या पाण्यात ओतून दिले. तेव्हापासून या झऱ्यात दूध ओतण्याची प्रथा रूढ झाली असावी.

याच झऱ्यात कुंड बांधून खिरभवानीचे मंदिर बांधण्यात आले आहे.

याबाबत दुसरी एक कथा अशी,

येथील एक रहिवासी व धार्मिक-सात्विक गृहस्थ म्हणजे कृष्णा पंडित. यांना एकदा दृष्टांत झाला. त्यांना देवदूतांकडून संदेश मिळाला, की तुलामुल्ला येथे एक खिरभवानी निर्झर आहे. (तुल = कापूस, मुल्ला = किंमती) त्याने तेथे कसे जायचे ? म्हणून देवदूतांना विचारले. देवदूताने सांगितले, तुझ्यापुढे एक सर्प चालेल. त्याच्या मागून तू जा. तो ज्यात उडी मारेल, तो झरा खिरभवानीचा असेल. त्यांनी शाहीपोर येथून बोट केली. पुढे त्यांना पाण्यात साप पोहत असलेला दिसला. ते आपली

बोट त्या सापामागून नेऊ लागले. साप इच्छित स्थळी येऊन पोहोचला. तेथे कृष्णा पंडितांना त्या दिव्य झऱ्याचे दर्शन झाले. तेथे तरंगत असलेल्या लाकडावर एक संस्कृत श्लोक आढळला. त्याचा अर्थ असा होता,

'येथील दिव्य शक्तीदेवीचे तुम्ही पूजन करा.'

दर आठवड्याने तो पंडित पूजेसाठी तेथे जाऊ लागला. याची भक्ती पाहून सभोवतालचे लोकही तेथे जमू लागले. आणि आपोआपच खिरभवानी या स्थानाचे महत्त्व वाढले.

पूर्वी हे एक बेट असून त्याच्या मध्यभागी झरा होता. या झऱ्यास आजूबाजूने येऊन मिळणारे इतरही अनेक झरे होते. यांतील मुख्य झरा खिरभवानीला अर्पण केलेला आहे.

**काश्मिरचे सौंदर्य वाढवणाऱ्या नद्या:–**

सिंधू :– (Sindhu)–हिमालयाच्या उत्तरेकडे २००० फुटांपेक्षा उंच बर्फाच्छादित अशा कैलास शिखराच्या उत्तर व पश्चिमेकडून दोन प्रवाह वाहात येऊन, ते संयुक्त होऊन वायव्येकडे वाहात जातात, हाच सिंधूचा उगम होय. पुढे काश्मिरमध्ये या प्रवाहासच सिंधूनदी म्हणतात. हिंदू लोक यास परमपवित्र सिंधूनदी म्हणतात.

या सिंधू नदीलाच ग्रीक भाषेत Sinthos सिंथॉस, तर लॅटिन भाषेत Sindus 'सिंधस' असे संबोधतात. नंतर ही सिंधूनदी आग्नेय कोपऱ्यातून काश्मिरमध्ये प्रवेश करते. या नदीने लेहला वळसा घातला आहे. या ठिकाणी तिला झासकार नदी येऊन मिळते. लेहजवळ हा प्रवाह ३२०० मीटर उंचीवरून वाहतो. पुढे स्कर्डू जवळ वळसा घेऊन ती "हरमोश" पर्वताकडे वळते. सुरुवातीला हिमालयाच्या दऱ्याखोऱ्यांतून दगड-गोटे आणि खडकांवर ठेचाळत अति वेगाने वाहणारा हा जलप्रवाह पुढे सपाटीवर येताच संथ होतो.

"मिथनकोट" जवळ सिंधू पाकिस्तानात शिरते. प्राचीन काळात देश नव्हते. नदीकाठची संस्कृती असायची. सिंधूनदीकाठी झालेला विकास तीच सिंधू संस्कृती. कालांतराने निर्माण झालेल्या संकुचिततेत संस्कृती नष्ट झाली. पूर्वी सिंधू ते सरस्वती प्रदेशात आर्य वसाहत होती.

आपण सिंधू नदीसच 'सप्तसिंधू' म्हणतो. यात सिंधू, सरस्वती, झेलम, चिनाब, रावी, बियास व सतलज या सात नद्या मोडतात. कालांतराने सरस्वतीचा प्रवाहच खंडीत झाला (गुप्त झाला.) व सिंधू पाकिस्तानात वाहात गेली. नंतर भारतात उरला, तो पंचनद्यांचा पंजाब. सप्तसिंधू व पंजाब ही नद्यांमुळे निर्माण झालेली नावे आहेत.

मिथनकोट जवळच पंचनद्यांचा एकत्रित प्रवाह सिंधू नदीत एकरूप होऊन सिंधु नदीचा 'नद' निर्माण होतो. जम्मूतील चिनाब झेलमला मिळते. नंतर रावी या दोन नद्यांच्या प्रवाहात सहभागी होते. नंतर बियाससह सतलज या तिहींची सहचरी होते व पुढे सिंधू (सिंधू = समुद्र) म्हणूनच वाहाते. हा सिंधूचा रोरावणारा प्रचंड प्रवाह दुसऱ्या सिंधूशी एकरूप होण्यास सज्ज होतो.

सिंधू नदीचे महत्त्व पाण्यामुळे आहेच. पण त्याहीपेक्षा तिने निर्माण केलेल्या संस्कृतीमुळे भूगोलातच नाही, तर इतिहासातही स्थान मिळवून आपला स्वत:चा इतिहासच निर्माण केला आहे.

"गंगे च यमुने चैव गोदावरी सरस्वती ।
नर्मदे सिंधु कावेरी जलेस्मिन् सन्निधिं कुरु ।।

स्नानाच्या वेळी हा श्लोक म्हणताना सिंधूच्या नामोच्चाराने आपल्या चिरस्मृतीचा तिलाही अभिमान वाटत असेल. सिंधूचा वेगवान प्रवाह सिंधूने पाहिलेल्या प्राचीन संस्कृतीच्या ऐतिहासिक आठवणी कथन करतो, की काय, असे वाटते. काश्मिरमध्ये सिंधू नदीत गंगेचा संथपणा नाही, किंवा भव्यताही नाही. पण कड्याकपारींना धडाडत बर्फाचे हिमनग चिरत दगड-गोटयांतून खळाळत वाहणारा शुभ्र-हरित प्रवाह मंत्रमुग्ध करून टाकतो. जोपर्यंत इतिहासात एका संस्कृतीस उद्देशून 'हिंदू' शब्द आहे, तोपर्यंत सिंधूचे साहचर्य विसरणे शक्य नाही.

**चिनाब** :– (Chinab)–वेदात या नदीचा उल्लेख 'असिक्नी' असा करण्यात आलेला आहे. हिमाचल प्रदेशातील लादूल या ठिकाणी तिचा उगम आहे. याठिकाणी चंद्र आणि भागा असे दोन प्रवाह आहेत. त्यातूनच चंद्रभागा म्हणजे 'चिनाब' चा जन्म झाला. काश्मिरमध्ये या नदीचा प्रवेश होताच ती जवळ जवळ ३०० मैल उंच पर्वतराईतील दऱ्याखोऱ्यांतून प्रवास केल्यावर अश्वनूरच्या डोंगराळ प्रदेशातून वाहाते. येथेच मेराळजवळ ती पाकिस्तानात शिरते. चिनाब जेव्हा पंजाबात शिरते, त्यावेळी सतलज नदीशी तिचा संगम होतो. पाकिस्तानातील त्रिम्मूजवळ झेलम आणि चिनाब यांचा संगम आहे.

**झेलम** (Zelam) :– झेलम नदी श्रीनगरची जीवदायिनी आहे. झेलमने श्रीनगरच्या मध्यभागी त्या शहराच्या हृदयाचाच ठाव घेतला आहे. या भव्य पात्रात काश्मिरी लोकांची छोटी-छोटी घरे आहेत. श्रीनगर शहरात या नदीवर हब्बाकदल, फतेहकदल, जैनाकदल, अलिकदल, झिरोब्रिज, छताबल व सफाकदल या नावाचे पूल आढळतात.

झेलमला संस्कृतमध्ये वितस्ता असे संबोधले जाते. काश्मिरी लोक तिला 'वेथ' (Veth) असे म्हणतात. या वितस्ता नदीच्या जन्माविषयी काश्मिरमध्ये एक कथा ऐकवली जाते.

काश्मिरचा प्रदेश पूर्वी 'सतीसार' नावाने ओळखला जात असे. येथे सतीसार नावाचे सुंदर सरोवर होते. गौरी या सरोवरात जलक्रीडा करण्यासाठी येत असे. त्यावेळी या सरोवराच्या पाण्यात एक राक्षस येऊन लपलेला होता. त्याचा विनाश करण्यासाठी कश्यप ऋषींनी परमेश्वराची आराधना केली. परमेश्वराने वराह रूप घेऊन सुळचांनी पर्वताला खिंड पाडले आणि सतीसारचे पाणी 'वराहमुलम' च्या खिंडीतून प्रवाहित केले. त्या प्रवाहालाच लोक वितस्ता म्हणतात. वराहमुलमचेच हल्लीचे अपभ्रंशात्मक नाव बारामुल्ला आहे.

या वितस्ता ऊर्फ झेलमला, स्वतःची भौगोलिक पार्श्वभूमी आहे. जवाहर बोगदा संपल्यानंतर याच पर्वताच्या पायथ्याशी सपाट पृष्ठभागावर श्रीनगरपासून ८० कि. मी. अंतरावर वेरीनाग या स्थळी वितस्ता उगम पावते. वेरीनाग हा जिवंत झरा आहे. काश्मिरच्या खोऱ्यातून वाहणाऱ्या या नदीला लीदरच्या बर्फाळ प्रदेशातून वाहत येणारे अनेक जलप्रवाह येऊन मिळतात. श्रीनगरनंतर झेलम वूलर सरोवरात एकरूप होते व तिचा प्रवाह पुन्हा बारामुल्लाच्या दिशेने वाहू लागतो. झेलम या पाकिस्तानमधील शहराजवळ ती पाकिस्तानात शिरते व त्रिम्मू या गावी झेलम व चिनाब या दोन नद्यांचा संगम होतो.

झेलम नदीमुळे श्रीनगरला पूर्वेच्या व्हेनिसचे सौंदर्य प्राप्त करून दिलेले आहे. झेलम श्रीनगरमध्ये शिरली, की श्रीनगर झेलममध्ये वसले आहे, हे सांगणे कठीण आहे.

० ० ०




**शहराचे नाव**:–लडाख.

**राज्य**:–जम्मू-काश्मिर.

**समुद्रसपाटीपासून उंची**:–३५०० मीटर.

**भेट केव्हा देणार**:–जून ते ऑक्टोबर.

**कपडे**:–उन्हाळा–सुती कपडे, वुलन स्वेटर.
हिवाळा–फुल वुलन ड्रेस.

**मुख्य मार्ग**:–श्रीनगर ते लेह.

**पर्यटनापूर्वी संपर्क**:–१) असि. डायरेक्टर ऑफ टूरिझम, लेह.
२) टूरिस्ट ऑफिसर, लेह कारगिल.

**वाहतूक व्यवस्था** :–श्रीनगर ते लेह रोज बसेस् सुटतात. रात्रीचा मुक्काम कारगिल.


**बँक**:–१) स्टेट बँक २) जे. अँड के. बँक.

**हॉस्पिटल**:–डिस्ट्रिक्ट हॉस्पिटल, लेह/डिस्ट्रिक्ट हॉस्पिटल, कारगिल.

**प्रायमरी हेल्थ सेंटर**–द्रास, पद्म, झनकार.

**पोस्ट व टेलिफोन**:–कारगिल.

**पोलिस स्टेशन**:–लेह, कारगिल व ट्रास.


SRINAGAR To GULMARG
SRINAGAR
JAMMU AND DELHI
SHALETANE
MIRGUND
MAGAM
TANGMARG
GULMARG
SRINAGAR To LEH
LEH
SITOK
NIMU
SASPAL
NURLA
LAMAYURU
KHALSI
BODH KHARBU
FOTU LA
MULBEK
KARGIL
TO ZANSKAR VALLEY
KHARBU
DRAS
MACHOI
ZOJI LA
BALTAL
SONAMARG
FISHING CENTRE
SUMBAL
GUND
KANGAN
GANDARBAL
SRINAGAR
TO JAMMU AND DELHI
TO GULMARG

**लडाख** (Ladakh)–समुद्र–सपाटीपासून उंच पर्वतमय प्रदेशात ३५०० मीटर उंचीवर हा प्रदेश वसलेला आहे. लडाखचा परिसर जवळ-जवळ ९७,८७२ कि. मी. अंतरात पसरलेला आहे. सपाट अशी जमीनच येथे दिसत नाही. उंच-सखल भागाच्या सभोवताली सर्व बर्फाच्छादित पर्वतशिखरे आढळतात. वेगळ्या निसर्ग-सौंदर्याने व्यापलेल्या लडाखकडे पर्यटक आकर्षित न झाले, तरच नवल. श्रीनगरहून लडाखला जाण्यासाठी मार्ग आहे. पण काश्मिरमधील बर्फ जूनमध्ये वितळू लागते. त्यानंतरच लडाखला जाण्याचा मार्ग मोकळा होतो. परत नोव्हेंबरमध्ये बर्फ पडण्यास सुरुवात होते व हा मार्ग बंद होतो. पर्यटक जुलै ते ऑक्टोबर या कालावधीतच लडाखला जातात.

**लेह ही लडाखची राजधानी**:–या राजधानीला प्रसिद्ध चिनी प्रवासी फाहैन याने भेट दिल्याचा उल्लेख आहे. झोजी-ला हा लडाखला जाताना पहिला टप्पा लागतो. द्रासच्या दऱ्याखोऱ्यांतून पुढील मार्ग सुरू होतो. तेथून सरळ लडाखमधील कारगिलला जाता येते. श्रीनगर ते कारगिल २०४ कि. मी. असून श्रीनगर ते लेह यांतील अंतर ४३४ कि. मी. आहे. लडाखला लामांची भूमी मानली जाते. या लोकांचा आवडता धर्म म्हणजे बौद्ध. लडाखची स्वतंत्र अशी संस्कृती आहे. त्यांचे वागणे बोलणे पर्यटकांना प्रभावित करते. यांची नाच-गाणी पाहून पर्यटक खूश होतात.

जे. के. ट्रान्सपोर्ट कार्पोरेशनच्या बसेसने लेहकडे जाता येते. पण रात्री मात्र कारगिलला मुक्काम करावाच लागतो. खाजगी जीप किंवा टॅक्सी लडाखला जाण्यासाठी भाड्याने मिळतात.

लडाखला जगाचे छप्पर असे म्हणतात. कारण तिबेटशी त्या प्रदेशाचे साम्य आहे. लडाख तसा उजाड-बर्फाळ प्रदेश आहे. बर्फ वितळून झालेले निर्झर नसते, तर लडाखियांचे पाण्यावाचून हाल झाले असते. हिमालयाने आर्द्रवारे अडवल्याने पर्जन्य-छायेतील हा प्रदेश कोरडा-ठणठणीत राहिला. म्हणून तर काश्मिरसारखी मुलायम हिरवळ लडाखच्या वाट्याला आली नाही. हवामात्र कोरडी पण गारठा भयानक. काही ठिकाणी उंचीवर तर प्राणवायूचे प्रमाणपण कमी होऊन श्वासोच्छ्वासाला त्रास होतो.

तिसऱ्या शतकात अशोकाने बौद्ध धर्माची पताका येथे फडकवली. येथे तिबेटियन पद्धतीचे बौद्ध धर्मीय जीवनाचे दर्शन होते. बौद्ध धर्माचे प्राचीन अवशेष येथे आढळतात. श्रीनगरहून कारगिलला पोहोचल्यावर पुढील खडतर मार्गांची पूर्व कल्पना येत नाही. कारगिल ते लेह हा प्रवास मात्र कापलेल्या पहाडी प्रदेशातूनच करावा लागतो.

प्रचंड पर्वतरांगा, उंच कडे, खोलवर उतार, कोठे-कोठे हरित पट्टे यां लडाखच्या प्रदेशालाही एक चित्तथरारक आगळे सौंदर्य आणतात. श्रीनगरहून आपण सोनमर्ग पाहायला जातो. तोच रस्ता पुढे लडाखला जातो. सोनमर्ग सुटले की, लगेच लडाखच्या भूमीत आपण प्रवेश करतो. काही मैल जाताच काश्मिर व लडाखच्या भूमींतील फरक स्पष्ट दिसू लागतो. 'द्रास' या लडाखी खेड्यात येताच रस्त्यावरील बर्फ दूर करण्याचे काम चाललेले दिसते. पुढे आपण कारगिलकडे प्रयाण करतो व जेव्हा रात्रीच्या मुक्कामाचा प्रसंग उद्भवतो, तेव्हा थंडीचे खरे गांभीर्य कळते.

लेहजवळ पोहोचताच इतर गावांपेक्षा या राजधानीचे वेगळे महत्त्व लक्षात येते. येथील, अवशेषात्मक राहिलेला का होईना, राजवाडा एक प्रेक्षणीय स्थळ म्हणून दाखवला जातो. हा राजवाडा इ. स. १६ व्या शतकात सोवंग न्यामग्याल याने बांधला. अजूनही येथील राजघराण्याचीच मालकी त्यावर आहे. पण उद्ध्वस्त अवस्थेमुळे येथे कोणी राहत नाही. या राजवाड्याच्या जुन्या भिंतीवर गौतम बुद्धाची चित्रे आढळून येतात. ती चित्रे म्हणजे पेंटिंगचे उत्कृष्ट नमुने आहेत.

**लेह मशीद** (Leh Masjid)–हा एक इराणी वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना मानावा लागेल. इ. स. १५९४ मध्ये ही मशीद सिंगे न्यामगाल यांनी बांधली. तुर्की व इराणीयन वास्तुशिल्पाचा समन्वय यात आढळतो. त्याने आपल्या मुस्लिम आईच्या स्मरणार्थ हे बांधकाम केलेले आहे.

**बौद्ध मठ** (Bauddha Math):–लेह येथील राजवाड्याच्या शेजारीच हा एक प्रसिद्ध बौद्धमठ आहे. या ठिकाणी बुद्धाचा उंच बसलेला पुतळा आहे. या बौद्ध मठांना गुंफा असेही संबोधतात.

**लडाख परिसरातील प्रेक्षणीय स्थळे:–**

**स्पीटक गुंफा**:–हे स्थान लेह राजधानीपासून १० कि. मी. अंतरावर आहे. सिंधूच्या परिसरात उंच पर्वतमय प्रदेशावर हे ठिकाण असून येथील मंदिर १०,००० (दहा हजार) वर्षांपूर्वीचे असावे, असा अंदाज आहे. या गुंफेत प्रवेशासाठी शुल्क आकारले जाते.

**हेमीस गुंफा** (Hemis Gompa)–लेहपासून ५० कि. मी. अंतरावरील या ठिकाणी लडाखमधील सर्वाधिक मोठा असा बौद्धमठ आहे. येथील काही बौद्ध-मूर्ती सोन्याच्या असून देखण्या आहेत. मौल्यवान दगड वापरून बौद्धस्तूप बांधलेले आहेत. जून महिन्यात येथे गुरुदेवांची जन्मतिथी साजरी करण्यात येते. मुखवटे घालून नाचण्याचा पारंपरिक कार्यक्रम होतो. येथे बौद्धधर्मविषयक जुन्या पुस्तकांचा संग्रह आहे. बौद्धधर्मीय भिक्षू या ठिकाणी मोठ्या प्रमाणात फिरताना दिसतात.

**चोगला मसार** (Chogala Masar)–चीनने तिबेटचा ताबा घेतल्यानंतर बौद्धधर्मीय तिबेटीयन निर्वासित भिक्षूंचा मोठा लोंढा भारताकडे आला. त्यांच्या आश्रयार्थ येथे मोठी छावणी उभारली आहे. बोद्ध भिक्षूंनी येताना अनेक धर्मग्रंथ आपल्याबरोबर आणले. येथे तिबेटियन वाङ्मयाच्या अभ्यासाचे केंद्र आहे. बौद्ध धर्माचा इतिहास आणि बौद्धधर्मीय तत्त्वज्ञानाचा खरा विशेष अभ्यास येथे केला जातो.

**शेय** (Shey Palace):–लेहपासून १५ कि. मी. अंतरावर हे स्थान आहे. लडाखमधील राजाचा उन्हाळ्यात राहण्याचा राजवाडा येथे आहे. हा ६०० वर्षांपूर्वीचा असल्याने आता अवशेषात्मकच शिल्लक राहिला आहे. राजवाड्यासमोर एक विजयस्तूप आहे. तसेच बसलेल्या बुद्धाची १२ मीटर उंचीची एक मूर्ती आहे. आता या ठिकाणी एक आधुनिक बौद्धमठ बांधण्यात आला आहे.

**तिक्से गुंफा** (Tikse Gompa)–हे स्थान लेहपासून १९ कि. मी. अंतरावर आहे. एका टेकडीवर वसलेले हे स्थान शेयपासून दिसू शकते. कलात्मक वस्तू व तिबेटियन ग्रंथांचा उत्कृष्ट संग्रह तेथे पाहायला मिळतो. यासाठी प्रवेश फी १० रु. असून पहाटेच्या वेळी मठास भेट दिल्यास तेथील धार्मिक कार्यक्रम पाहायला मिळतात. या मठास १२ मजले असून यात १० मंदिरे आहेत. बुद्धधर्माचे तत्त्वज्ञान येथील खांबावार कोरलेले आहे.

**स्टोक राजवाडा** (Stok Palace):–चोगलामत्तर पुलाजवळील राजवाडा २०० वर्षांपूर्वीचा असूनही चांगल्या अवस्थेत आहे. या राजवाड्यात लडाखमधील राजघराण्यातील लोक राहतात.

**शंकर गुंफा** (Shankar Gompa)–लेहपासून ३ कि. मी. अंतरावर हा एक नवीनच बौद्धधर्मीय मठ आहे. येथील सोन्याच्या मूर्ती व पेंटिंग्ज प्रसिद्ध आहेत.

**लमायुर्न**:–(Lamayurn) श्रीनगर-लेह मार्गावरील हा अतिप्राचीन बौद्धमठ आहे. खडकाळ पर्वतात एका भव्य खडकात कोरलेली ही लेणी आहेत. यांतील कोरीवकाम, तिबेटीयन वस्तू व मौल्यवान गालिचे पाहून मन थक्क होऊन जाते.

**फायांग** (Phyang)–श्रीनगर-लेह रस्त्यावर लेहपूर्वी १६ कि. मी. अंतरावर हे स्थान आहे. येथे सुंदर बौद्धमूर्ती असून आजूबाजूचा परिसर म्हणजे ग्रामीण जीवनाचा एक उत्तम नमुना आहे. येथे प्रवेशासाठी १० रु. तिकीट आहे.

**लिकीर गुंफा** (Likir Gompa):–हे स्थान अलचीपासून जवळ आहे. कापतळ कापलेल्या पहाडातून येथे जावे लागते. येथे मातीपासून केलेली बुद्धाची प्रतिमा अतिशय सुंदर आहे.

**झंनस्कार** (Zanskar):–झंनस्कार खोऱ्यातील प्रदेश पर्वतराई व दऱ्या-खोऱ्यांनी व्यापलेला आहे. 'पडूम' हे या खोऱ्यातील हवामानाच्या दृष्टीने उत्तम गाव. येथे टूरिस्ट कार्यालय आहे. येथील स्थानिक लोकांच्या घरातच राहाण्याची व्यवस्था होऊ शकते.

**लडाखमधील निवासस्थान व्यवस्था** (हॉटेल्सची नावे):–

ए/क्लास:–१. इंडस् Indus २. कांग ला चेन Kangla Chen ३. खांग्री Khangri ४. के. सार. K. Sar ५. संबाला Shambala ६. स्तेमोला Temola.

बी/क्लास:–१. लुंग से जंग Lung-Se-Junga २. रॉ-रॅब Ra-Rab ३. तिबेट Tibet ४. सोधाम Sodham.

सी/क्लास:–१. हिमालय Himalaya २. याक टेल Yak Tel.

डी/क्लास:–१. बर्चा Barcha २. ड्रीमलॅंड Dreamland ३. डिलक्स Delux ४. हील्स व्हयू Hills Views ५. ड्रॅगन Drugan.

---

१) टूरिस्ट बँगलो–खालटसी (Khaltsi)
२) टूरिस्ट बंगलो–लेह (Leh)
३) टूरिस्ट बंगलो–सक्ती (Sakti)
४) टूरिस्ट बंगलो–ससपोल (Saspol)

---

**गेस्ट हाऊसेस**:– (लेह या राजधानीत)

१) इंडस Indus
२) कैलाश Kailash
३) समकार Samkar
४) इक्बाल Ekbal
५) ओल्ड लडाख Old Ladakha
६) पॅलेस व्हयू Palace View
७) लॅसर्मो Lasarmo
८) फिर्दोस Firdous
९) नझर व्हयू Nazar View
१०) गिया Gia
११) ताज टेस्ट Taj Test
१२) टू स्टार Two Star
१३) मूनलॅंड Moon Land
१४) स्नो व्हयू Snow View
१५) मालपाक Mal Pak
१६) शेल्डन Sheldon
१७) न्यू अॅण्टीलाप New Antilop
१८) ग्रीन व्हयू Green View
१९) पदमखार Padamkhar
२०) गोम्बा Gomba
२१) ओस्तल Ostal
२२) शालीमार Shalimar
२३) शेरा Shera
२४) स्ट्रीम व्हयू Stream View

**लडाखमधील रेस्टॉरंटस्ः–**

१) खांग्री Khangri
२) सुमन Suman
३) हिलस्टॉप Hilltop
४) याक बॉय Yak Boy
५) ड्रीमलँड Dream Land

**श्रीनगर ते लेह प्रमुख स्थाने व कि. मी.**

| स्थान | कि. मी. |
|---|---|
| श्रीनगर ते सोनमर्ग | ८४ |
| ,, ,, झोजिला टॉप | ११० |
| ,, ,, द्रास | १४७ |
| ,, ,, कारगिल | २०४ |
| ,, ,, नमकीला | २५९ |
| ,, ,, खालसी | ३३७ |
| ,, ,, नुर्ला | ३४८ |
| ,, ,, स्पिटोक | ४२१ |
| ,, ,, लेह | ४३४ |

**लेहच्या परिसरात काय पाहालः–**

| नाव | लेहपासून कि. मी. |
|---|---|
| १) संकर | २ |
| २) स्पिट्रक | ९ |
| ३) शेय | १५ |
| ४) स्पांझा | १७ |
| ५) स्टोक | १७ |
| ६) थिक्से | २० |
| ७) मॅथो | २० |
| ८) हेमीस | १२७ |

*WITH BEST COMPLIMENTS*

WELL WISHER

# गुलमर्ग



**नाव**:–गुलमर्ग.

**राज्य**:–जम्मू-काश्मिर.

**समुद्रसपाटीपासून उंची**:–२७३० मीटर.

**कोणत्या महिन्यात भेट द्याल**:–मे ते नोव्हेंबर.

**बर्फातील खेळांसाठी**:–डिसेंबर ते मार्च.

**कपडे**:–वुलनचे उबदार.

**स्किइंग व गोल्फसाठी**:–१) इंडियन इन्स्टिटयूट ऑफ स्किईंग.
२) गव्हर्मेंट गोल्फ क्लब.

**गुलमर्गला जाण्याचा मार्ग**:–श्रीनगर ते तंगमर्ग व तंगमर्ग ते गुलमर्ग.

**असि. डायरेक्टर, गुलमर्ग**:–फोन ९९.

**टूरिस्ट ऑफिसर, तंगमर्ग**:–फोन ३६.

**उन्हाळयातील सीझन**:–मे ते ऑक्टोबर.

**हिवाळयाचा सिझन**:–डिसेंबर ते मार्च.

**गुलमर्ग :–** (Gulmarg)–हिमालयाची कन्या पार्वती ऊर्फ गौरी हिचा संचार शंकर-पूजनासाठी, फुले गोळा करण्यासाठी हिमालयाच्या सर्व परिसरात असायचा. गुलमर्ग तर फुलांचे नंदनवन, मग गौरी येथे संचार करण्यासाठी न येईल तरच नवल !

गौरी म्हणजे पार्वती. मर्ग म्हणजे मैदान. स्त्री-सुलभ मनाचे या फुलांच्या ताटव्यात मन गुंतल्यामुळे गौरी या मर्गला (मैदानात) येत असावी. त्यावरून या परिसराचे नाव गौरीमर्गचे अपभ्रंश होऊन 'गुलमर्ग' झाले असावे, असे काहींचे मत आहे.

गुलमर्ग या नावाविषयी आणखी एक आख्यायिका अशी आहे, गुलमर्ग म्हणजे Medows of Flower's फुलांचे नंदनवन. इ. स. १६ व्या शतकात काश्मिरमध्ये युसुफशहा नावाचा बादशहा होऊन गेला. त्याची पत्नी हबाखातून ही सौंदर्यासक्त होती. ही यौवना आपल्या पतिसमवेत या परिसरात आल्यानंतर तेथील विलोभनीय निसर्गसौंदर्य पाहून अंतर्मुख होत असे. चहूबाजूच्या दिशांना स्पर्श करणारे हिरवेगार मैदान, त्यात उमललेली रंगीबेरंगी फुले पाहून तिच्या फुलांच्या पाकळ्यासारख्या ओठांतून शब्द आले, "बहोत खूबसूरत – वाह. . . . . गुलमर्ग." (किती सुंदर ही पुष्पभूमी ! ) आणि त्यावेळेपासून या परिसरास 'गुलमर्ग' असे संबोधले जाऊ लागले असावे, असे मार्गदर्शक सांगतात. गुलमर्ग या नावातच येवढे गूढरम्य सौंदर्य वाटते, तर प्रत्यक्ष या स्थळाचे सौंदर्य विचारूच नका.

गुलमर्ग श्रीनगरच्या पश्चिम दिशेला ४६ कि. मी. अंतरावर आहे. याठिकाणी जाण्यासाठी श्रीनगरहून बसेस सुटतात. श्रीनगरहून बसने निघाल्यानंतर पहिला टप्पा आहे 'तंगमर्ग'. येथूनच गुलमर्गच्या सौंदर्याची चाहूल लागते.

'तंगमर्ग हा पठारी भाग आहे. उत्तुंग-उत्तुंग = तंग व मर्ग = मैदान. असा तंगमर्ग हा शब्द रूढ झाला असेल, असे काही भाषाप्रभूंचे मत आहे. बसस्टँडला लागूनच रिसेप्शन सेंटर आहे. तंगमर्गला उतरून पर्यटक चहा-नाश्ता घेतात. किंवा बरोबर आणलेले पदार्थ या प्रशस्त सेंटरमधील डायनिंग हॉलमध्ये बसून आजू-बाजूच्या खिडक्यांतून निसर्गसौंदर्य न्हाहाळीत खात असतात.

काश्मिरच्या या सौंदर्यस्थळांना भेट देताना एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते. ती म्हणजे, काश्मिरच्या कुशीत शिरल्यानंतर मन हरपते, ते मन इतके सौंदर्यासक्त, मुग्ध होते की, आजुबाजूच्या जीवनाचा, काळजीचा, मनस्तापाचा, थकव्याचा व इतर मानसिक बोजांचा संपूर्ण विसर पडतो. काम करतात फक्त डोळे. कितीवेळ उघडे ठेवावेत. . . . . कोठे-कोठे नजर भिरभिरत न्यावी व त्या नजरेच्या मखमखली पेटीत सौंदर्याचा खजिना साठवून घ्यावा असे होते.

गुलमर्ग येथूनच नंगापर्वताच्या बर्फाच्छादित शिखराचे दर्शन होते. गुलमर्गच्या हिरवळीने आच्छादलेला, किंचित उंच-सखल, पण मैदानी वाटणारा गुलमर्गचा परिसर ८ ते १० कि. मी. तरी आहे. आजूबाजूला पाईन आणि फर वृक्षांची झालर लावल्यासारखे वाटते.

श्रीनगरहून गुलमर्गला जाताना जो रस्ता आहे, त्यापेक्षा अतिसुंदर रस्ता दुसरा असूच शकत नाही. आकाशाकडे एकटक पाहत असलेली एका सरळ रेषेतील सफेदाची उंच-उंच झाडे दोन्ही बाजूंनी जणू पर्यटकांच्या स्वागतासाठी अगदी शिस्तीत उभी असल्यासारखी वाटतात. या झाडांचे शेंडे ढगांना टोचत तर नसतील ना? अशीही शंका मनाला चाटून जाते. तरल लेखकाला काश्मिरला स्वर्गीयसौंदर्याची उपमा देण्याची कल्पना 'गुलमर्ग' येथेच सुचली असावी.

गुलमर्गला पोहोचल्यावर तेथील घोडेवाले घोडे भाड्यांनी घेण्यासाठी गळ घालतात. घोड्यावरून सफर करताना मौज वाटते, पण सवय हवी. कारण त्यावर नीट बसता आले नाही, तर आपल्या पार्श्वभागाची घोड्यावरून खाली उतरल्यावर इतकी आग होते, की नंतर पायी चालणे देखील मुश्किल होते. गुलमर्गच्या फुलांनी सजलेल्या हिरव्यागार कुरणात तर पायी चालताना त्या मखमली स्पर्शाने मन सुखावते. ब्ल्यूबेल, व्हॉयलेट, डेझीज, गोल्डन बटर कप, फरगेट-मी-नॉट या फुलांच्या सौंदर्याने भानच हरपते. पाईनच्या डेरेदार वृक्षांची दाट हिरवी नक्षी शुभ्र बर्फाळ पार्श्वभूमीवर अधिकच नाजूक वाटते.

हिवाळ्यातील गुलमर्गचे सौंदर्य काहीसे आगळे-वेगळे आहे. मे ते ऑक्टोबर-पर्यंत ज्या ठिकाणी तुम्ही हिरव्यागार गवतावर उभे असता, ते गवत ऑक्टोबर-नंतर अचानक भूमिगत नव्हे, तर बर्फमय होते. भुरभुरणारे शुभ्र बर्फ जमिनीवर आच्छादले जाते. बर्फाचा थर चमकणाऱ्या रेशमासारखा असतो. बर्फाचा थर असला तरी जमिनीचे उंचसखल आकार तसेच असतात. युरोपियन लोक विशेषत: स्केटिंग व गोल्फ खेळण्यासाठी गुलमर्गला भेट देतात. काही भारतीय लोकांना तेथील कडक थंडीचा त्रास होईल, असे वाटते. तसेच बर्फ काय पाहायचे ? अशा समजुतीने काश्मिरचा हिवाळा ते टाळतात. सोनेरी उन्हाची सुवर्णसंधी नाही, तरी पण बर्फाच्छादित रुपेरी संधी गमावण्याची हुरहुर मात्र रसिक मनाला जाणवल्याशिवाय राहणार नाही. पर्वत बर्फाखाली झाकले जातात, बंगले तर काही ठिकाणी कौलापर्यंत बर्फात बुडतात. पण त्या बर्फावर मात करणारी पाईनची हिरवी झाडे बर्फाशी अगदी फटकून वागतात. बर्फ त्यांना वाकवू पाहातो; पण ताठ मानेची ही शालीन चिरतरुण झाडे स्वत्व राखून दिमाखाने एका रांगेत उभी असलेली दिसतात.

गुलमर्गचे आणखी एक खास आकर्षण म्हणजे 'चेअर लिफ्ट'. यालाच कोणी ट्रॉली, रोपचेअर किंवा विजेचा पाळणा असेही संबोधतात. चेअरलिफ्टमध्ये बसणे

हा देखील एक चित्तथरारक अनुभव आहे. जत्रेतील पाळण्यात बसणे वेगळे व या विजेच्या पाळण्यातील अनुभव वेगळा. बसस्टॉपपासून २-३ कि. मी. चा रस्ता कापून पुढे आल्यावर आपण चेअरलिफ्टच्या बेसमेंटला येऊन पोहोचतो. येथे तिकिटाची खिडकी आहे. प्रत्येकास तिकीट काढावे लागते. तिकीट काढल्यानंतर बार लावून तयार केलेल्या भागात रांग लावावी लागते. रांग पुढे सरकू लागते, तशी मनातील हुरहुर आणि उत्सुकताही वाढते !

चेअरलिफ्ट म्हणजे विजेच्या साहाय्याने तारांच्या मजबूत दोरखंडावरून लांब गोलाकार जाणारे पाळणे. जेव्हा पाळणा उंच टेकड्या व दरी-खोरे ओलांडीत डोंगराच्या मध्यभागापर्यंत नेऊन पोहोचवितो, तेव्हा तेथे उतरून घेण्यास मदतनीस नोकर असतात. मात्र याठिकाणी उतरावेच लागते. अर्थात चढताना-उतरताना पाळणा थांबत नाही. त्याच वेगात तो फिरत असताना आपणांस चढावे-उतरावे लागते. ट्रॉलीकडे जाताना हातात कोणतेही सामान नसले, की ही कसरत सहजसाध्य होते.

चेअरलिफ्टने डोंगरावर उतरल्यावर तेथे हॉटेल्स आहेत. लोक तेथे गरम पेय घेतात. येथून खिलनमर्गला आपण पायी जाऊन परत येऊ शकतो. या ठिकाणी मनसोक्त फिरून आल्यावर परत ट्रॉलीने खाली उतरण्यासाठी रांग लावावी लागते. पुन्हा सुरवातीप्रमाणेच परतीच्या प्रवासासाठी धावत लिफ्ट पकडायची, लिफ्टमध्ये बसल्यावर रॉड बंद करायचा. चढण्याच्या प्रवासापेक्षा उतरण्याचा प्रवास अधिक चित्तथरारक वाटतो. या ठिकाणी लिफ्टमध्ये चढताना आपण काढलेले पहिलेच तिकीट दाखवावे लागते. चेअरलिफ्टमधून उतरल्यावर हायसे वाटते. काश्मिरच्या सर्व प्रवासात हा प्रवास अगदी स्वर्गारोहण करावे, तसा लक्षात राहातो.

**गुलमर्गच्या परिसरात :**

**खिलनमर्ग** :– (Khilanmarg)–समुद्रसपाटीपासून ११००० फूट उंचावर हे स्थान आहे. गुलमर्गपासून खिलनमर्गचे अंतर ४ कि. मी. आहे. खिलन = (खलना–खुलणे-उमलणे-बहरणे) मर्ग = मैदान किंवा डोंगर. येथील हिरवा निसर्ग सदोदित फुललेलाच असल्याने या भागास खिलनमर्ग असे संबोधीत असावेत. या ठिकाणी बाराही महिने बर्फ असतो. उन्हाळ्यात बर्फापर्यंत जाण्यासाठी फारच उंच चढावे लागते. गुलमर्गहून लोक पोनीने येथे येतात. उंच पर्वतराईत खिलनमर्ग दडलेले असल्याने येथील हवा चांगलीच थंड असते. मे व ऑक्टोबरमध्ये येथे भरपूर बर्फ असते. यावेळी येथे पर्यटक स्केटिंगचा आनंद लुटतात.

खिलनमर्गचे मैदान अपरहत पर्वताच्या पायथ्याशी येते. गुलमर्गला जर Medows of Flowers म्हटले, तर खिलनमर्गला Carpet of Flowers

(फुलांचा गालिचा) असे म्हटले जाते. खिलनमर्गला Winter ? Summer play Ground असे म्हणणे सार्थ ठरते. उन्हाळ्यात हिरवी नवकांती दिसत असली, तरी हिवाळ्यातील बर्फाळ सौंदर्य मात्र निसर्गाचे वृद्धत्व दर्शवीत नाही. शुभ्र रंगाचा दिमाखही मनाला मोह घालतो. बर्फाचे खरे सौंदर्य न्याहाळावे, ते उतार असलेल्या जमिनीवरच. चांदीचा किंवा चांदण्यांचा कीस जमिनीवर पसरावा, तसे वाटते.

**अल्पथर लेक** (Alpathar Lake):–गुलमर्गपासून हे स्थान १३ कि. मी. अंतरावर आहे. येथील निळ्याशार पाण्यावर बर्फ किंवा हिमनग तरंगताना आढळतात. येथे पोनी करून जाणेच योग्य. कारण बर्फ तुडवीत जाणे कठीण पडते. हवेत गारठवून टाकणारा थंडावा असतो. अल्फावत शिखर १४८०० फूट उंचीवर आहे. याच्या पायथ्याशी हा लेक आहे. जूनपर्यंत येथील पाणी गोठलेलेच असते. येथे बर्फाचे कडे कोसळण्याची शक्यता असते. हे नागदेवतेचे प्रमुख स्थान मानले जाते.

**निंगलनाला** (Ninglenallah) :–गुलमर्गपासून १० कि. मी. अंतरावर पाईन वृक्षाच्या गर्द छायेत हे रमणीय स्थान आहे. हा झुळझुळणारा प्रवाह बर्फातूनच वाहतो. या नाल्याचे पाणी झाडीतून वाहताना अधिकच सुंदर दिसते. अरुंद भागात शिरून पुढे उसळताना निंगल नाल्याच्या पाण्याचा आवाज चित्तथरारक वाटतो.

**कंतरनाग** (Kanturnag) :– यालाच नीलकंठ असेही संबोधतात. हे उंच पर्वताचे एक शिखरच. पण आजूबाजूला हिरवेगच्च कुरण आहे. १३०० फूट उंचीवर हे स्थान आहे. हे निळ्या पाण्याचे सरोवर अतिउंच पर्वत प्रदेशात निर्माण झालेले आहे. या गोल सरोवराच्या पाण्यात ढगाचे प्रतिबिंब इतके स्पष्ट दिसते, की आकाश वर आहे, की सरोवराच्या पृष्ठभागावर आहे, असा संभ्रम निर्माण होतो.

**फिरोजपूर नाला** (Firozapur Nallah) :– निसर्गसौंदर्य स्थळ म्हणून हे अप्रतिम स्थान आहे. येथून खळखळणारा जलप्रवाह वेगाने सळसळत पुढे धावतो. उताराच्या वेगाने जाणारा प्रवाह दऱ्याखोऱ्यांत जिवावर उदार होऊन उड्या घेतो.

**बाबाऋषि** (Babarushi) :– तंगमर्ग व गुलमर्गच्या वाटेवर यांना जोडणारा बाबाऋषी म्हणजे एक दुवा आहे. पयाम-उद-दीन मध्ये बाबांचा जन्म झाला. एकदा घोड्यावरून जात असताना त्यांनी या ठिकाणी एक मुंग्यांची रांग पाहिली. त्यांची श्रमिक वृत्ती पाहिली, घोड्यांच्या पायाखाली मुंग्या चेंगरू नयेत, म्हणून तो विचारमग्न बसून राहिला. त्याच्या मनात विचार आला, आपल्या जीवनाच्या प्रवासात असेच काहीसे साठवले पाहिजे. त्याने ज्ञानसाधना केली व परमेश्वर चिंतनात ध्यानमग्न झाला. याच बाबांचे हे पवित्र स्थान आहे.

**लीनमर्ग** ( Linmarg ) :– पाईन वृक्षाच्या वनराईतूनच या ठिकाणचा रस्ता जातो. येथील मैदाने व उंचसखल भाग हिरव्या रेशमी गवताने झाकलेला असल्याने कँपिंगसाठी उत्तम जागा आहे.

**गुलमर्गला राहण्याची सोय**:–

१) टूरिस्ट बंगला (जुना)

२) टूरिस्ट बंगला (नवीन)

३) टूरिस्ट हटस् (नवीन)

याचे रिझर्व्हेशन जे. अँन्ड के. टूरिझम डेव्हलपमेन्ट कार्पोरेशन, टूरिस्ट रिसेप्शन सेंटर, श्रीनगर. येथे करावे.

**खाजगी लॉज**:– हॉटेलचे नाव:–

१. हायलँड पार्क २. नेडूस हॉटेल ३. वूडलँड हॉटेल ४. गुलमर्ग इन ५. गल्फ व्ह्यू हॉटेल ६. स्नो व्हाईट हॉटेल ७. किंग्जवे.

खिलनमर्गला बर्फात फिरण्यासाठी गुलमर्ग बसस्टँडजवळ असलेल्या दुकानातून बूट, कोट, टोपी, स्कीटीक इ. वस्तू भाड्याने मिळतात. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ स्किईंग अँन्ड माऊंटेनियरिंग तासाप्रमाणे फी घेऊन स्किईंग शिकवतात. २१ दिवस शिकले असता हा कोर्स पूर्ण होतो.

**काश्मिर सहलीची आखणी**:–(आपण खाजगीरीत्या काश्मिरला जाणार असल्यास खालीप्रमाणे प्रवास आखावा. योग्य वेळी गाईडची मदत घ्यावी.)

**१ ला दिवस**:–मुंबई, पुणे, नागपूरहून मिळेल त्या रेल्वे रिझर्व्हेशनने निघणे.

**२ रा दिवस**:–हा रेल्वे प्रवासातच जातो. गाडी लेट होण्याची शक्यता असते. त्यामुळे ठरलेल्या ठिकाणी जेवण मिळू शकत नाही. तसेच लहान मुलांचे हाल होतात. तेव्हा या एका दिवसाचे जेवण (कोरडे) शक्यतो बरोबर घ्यावे.

**३ रा दिवस**:–या दिवशी बहुतेक रेल्वे सकाळी १० च्या आत जम्मूत पोहोचल्यास लगेच श्रीनगरकडे निघावे. काही सुपरफास्ट गाड्या जम्मूत दुसऱ्या दिवशीच दुपारी १२ पर्यंत पोहोचतात. यावेळी लगेच श्रीनगरकडे निघू नये. कारण वाटेतच मुक्काम करण्याची वेळ येते. तेव्हा हा दिवस जम्मूतच विश्रांती घेऊन तिसरे दिवशी सकाळी ८ वा. सुटणाऱ्या गाड्यांनी श्रीनगरकडे प्रयाण करावे.

**टिप**:–आपण जम्मूहून श्रीनगरला जाण्यापूर्वी परतीचे रेल्वे, बस, विमान रिझर्व्हेशन केले नसल्यास करावे.

अंदाजे १० तासात श्रीनगर शहरात आल्यावर आपण अगोदर बुक केलेल्या लॉजवर जावे. बुकिंग केले नसल्यास या पुस्तकाप्रमाणे लॉजवर फोन करून जागा व दर यांची खात्री करून नंतरच सामानासहित तेथे जावे.

**४ था दिवस**:–आपण श्रीनगर शहरात नवीनच असल्याने सकाळी विश्रांती घ्यावी व या वेळात अनेक ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारची चौकशी, बुकिंग व विविध दर पाहून पुढील कार्यक्रमासाठी तयार राहावे. दुपारी जेवण झाल्यावर चश्मेशाही, निशाद व शालिमार गार्डनसाठी साईटसीईंगच्या बसने निघावे. या बसचे तिकीट याच दिवशी सकाळी काढून ठेवावे. ज्या त्या दिवशी हे तिकीट सहज मिळू शकते. पण तिकीट न मिळाल्यास सिटी बसने किंवा टॅक्सीने आपण हे सहज करू शकतो. हवा चांगली असल्यास 'शालिमार' बागेतील 'लाईट अॅन्ड साऊंड' कार्यक्रम पाहूनच यावे. परत आल्यावर किंवा निघण्यापूर्वीच आपल्या पुढील कार्यक्रमाची म्हणजे गुलमर्ग, सोनमर्ग व पहलगाम यांसाठी मुंबईहून बुकिंग करण्याची गरज नाही. ही सर्व तिकीटे १००% मिळू शकतात. मात्र जम्मूत परतण्याची तारीखवार तिकिटे काढून ठेवावीत.

**५ वा दिवस**:–टनमर्ग, गुलमर्ग, खिलनमर्ग, रोपवे, स्केटिंग.

**६ वा दिवस**:–हजरतबाल, सोनमर्ग, खीरभवानी व सिंधूनदी.

**७ वा दिवस**:–पहलगाम, अवंतीपूर, पाम्पूर, अच्छाबल, मार्तंड, कोकरनाग.

**८ वा दिवस**:–सकाळी ८ ते ११ पर्यंत शिकारा सहल. नेहरूपार्क, कबूतरखाना, चार चिनार फ्लोटिंग व लोटस गार्डन. दुपारी जेवणासाठी परत लॉजवर येऊन नंतर खरेदीसाठी श्रीनगर शहरात फिरण्यास संपूर्ण वेळ मिळतो. याशिवाय रोज रात्री ७ ते ९ पर्यंत आपणास श्रीनगर शहरात फिरण्यासाठी वेळ मिळतच असतो.

या ठिकाणी आपला काश्मिरचा कार्यक्रम संपतो व परतीचा प्रवास सुरू होतो. मुक्काम वाढवायचा असल्यास त्याचा साधारण तपशील असा.

**१ ला दिवस**:–पहलगाम गावात मुक्काम करावा.

**२ रा दिवस**:–मानसबल व वूलरलेक.

**३ रा दिवस**:–युसमर्ग.

**४ था दिवस**:–विश्रांती. (यासाठी आपण कितीही दिवस ठेवू शकता.)

**९ वा दिवस**:–श्रीनगरहून जम्मूकडे प्रयाण. पण याच दिवशी जम्मूत परतीचे रिझर्व्हेशन असू नये. कारण बऱ्याच वेळा घाटात नैसर्गिक अडचणींमुळे जम्मूस येण्यास उशीर होतो. व रिझर्व्हेशन फुकट जाण्याची शक्यता असते. तेव्हा या दिवशी जम्मूत मुक्काम करणे सोईस्कर.

**१० वा दिवस**:–जम्मूहून परतीच्या प्रवासास निघणे.

**११ वा दिवस**:–प्रवास. किंवा जर का सुपरफास्ट गाडीचे तिकीट मिळाल्यास रात्रौ ११–३० वाजता आपण मुंबईत येऊ शकतो.

**१२ वा दिवस**:–अन्य गाड्यांचे रिझर्व्हेशन मिळाल्यास आपण मुंबई व पुणे येथे सकाळी येऊ शकतो.

आपल्यास अजूनही वेळ असल्यास व वैष्णोदेवी करणे आवश्यक असल्यास खालीलप्रमाणे कार्यक्रम असावा.

**९ वा दिवस**:–श्रीनगरहून जम्मूत येण्याऐवजी कटरा येथे जाणे व रात्रौ वैष्णोदेवीस निघणे.

**१० वा दिवस**:–सकाळी किंवा दुपारपर्यंत कटरा येथे येऊन जम्मूत येणे व संध्याकाळची गाडी पकडून परतीचा प्रवास सुरू करणे.

**टिप**:–जम्मूत साईटसीईंग असल्यास दोन दिवस मुक्काम वाढवावा. अशा रीतीने आपली काश्मीर–सहल पूर्ण होते.

० ० ०

प्रवासी मित्र

*(भाग दुसरा)*

# उत्तर भारत



# दिल्ली

१) **प्रेक्षणीय स्थळाचे नाव**:–दिल्ली.


२) **राज्य**:–दिल्ली हे राजधानीचे शहर केंद्रशासित आहे.

३) **समुद्र सपाटीपासूनची उंची**:–२३० मीटर.

४) **ऋतू**:–हिवाळा–नोव्हेंबर ते जानेवारी, हवामान थंड.
**पावसाळा**–जुलै ते सप्टेंबर.
**उन्हाळा**:–मार्च ते जून (ऑक्टोबरमध्ये पण उष्मा जाणवतो.)

५) **उष्णतामान**:–हिवाळा २० अंश सें. मी. ते ८ अंश सें. मी. पर्यंत.
उन्हाळा ४५ अंश सें. मी. ते ३५ अंश सें. मी. उन्हाळा खूपच त्रासदायक एप्रिल ते जून.

६) **लोक**:–सिंधी, पंजाबी, मुस्लिम व महाराष्ट्रीयन.


DELHI
To AMRITSAR
① JAMA MASJID
② MUSEUM
③ CONNAUGHT PLACE
④ LAKSHMI NARAYAN TEMPLE
⑤ INDIA GATE
⑥ VIGYAN BHAVAN
⑦ UNIVERSITY
⑧ PARLIAMENT
⑨ SECRETARIAT
⑩ RASHTRAPATI BHAVAN
TO ROHTAK
RANA PRATAP BAGH
GULABI BAGH
MOTI NAGAR
CHANDNI CHAUK
RED FORT
VIJAY GHAT
SHANTI VANA
RAJ GHAT
KIRTI NAGAR
KAROL BAGH
INDRAPURI
GRO
LOHIA HOSPITAL
Nehru Memorial Museum
STATION ROAD
KHAN MARKET
NIZAMUDDIN EAST
NANAK PURA
JOR BAGH
MOTI BAGH
DEFSNCE COLONY
To AGRA
PALAM AIRPORT
SFDARJANG
Shri-Aurobindo Ashram
Qutb Minar

७) **लोकसंख्या**:–६१,९६,४१४.

८) **भाषा**:–हिंदी, इंग्रजी, उर्दू.

९) **पर्यटनास योग्य कालावधी**:–१ नोव्हेंबर ते १५ मार्च.

१०) **उद्योग व कारखाने**:–रसायने, टेक्स्टाईल्स, कातडी सामान, इलेक्ट्रॉनिक (टेलिव्हिजन-रेडिओ).

११) **शेती**:–दिल्ली शहराच्या आजुबाजूस विशेष प्रमाणात गहू पिकतो.

१२) **पर्यटन कार्यालय**:–भारत सरकार, पर्यटन कार्यालय, ८८ जनपथ, नवी दिल्ली, फोन:–३२० ००५.

**दिल्ली**:–(भारताची राजधानी) या शहराचे प्राचीन नाव होते इंद्रप्रस्थ. महाभारतात वर्णिलेल्या पांडवकथेतील पांडवांची इंद्रप्रस्थ राजधानी होती. या शहराने प्राचीन कालखंडापासून आजपर्यंत जेवढ्या राजकीय उलथापालथी पाहिल्यात तेवढ्या इतर शहरांनी क्वचितच पाहिल्या असतील. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राचे राजधानी म्हणून प्रतिनिधित्व करणाऱ्या या शहराने आपली व्याप्ती प्रचंड वाढवलेली आहे. दिल्लीने केवळ इतिहास पाहिलाच नाही तर इतिहास घडविला आहे.

घोरी घराण्यानंतर कुतुबुद्दीन ऐबकने सत्ता हाती घेतली. गुलाम घराण्यात जन्माला आलेल्या सुलताना रेझियाने दिल्लीची सत्ता राबविली. नंतर खिलजी घराण्याने आपली सत्ता येथे रोवली. इ. स. १४ व्या शतकात तघलक घराण्याने दिल्लीवरची पकड घट्ट केली. या काळात दिल्लीने एक भयानक रक्ताळलेले वादळ पाहिले. समरकंदच्या तैमूरने दिल्लीवर हल्ला करून अक्षरश: रक्त थिजवून टाकणारा मानवी संहार केला. यानंतर मोगल साम्राज्याची स्थापना झाली. बाबर, हुमायून, अकबर, जहांगीर, शहाजहान यांनी दिल्लीची शान वाढविली. दिल्लीच्या वैभवाचे वर्णन कोणत्या शब्दात करावे ? येथील मयूर सिंहासनाने परकीयांचे डोळे दिपवून टाकले होते. येथील अनभिषिक्त सम्राटशाहीने दिल्लीचे खरे महत्त्व वाढवले. इंग्रजांनी बंदराच्या शहराना महत्त्व दिल्याने जरी दिल्लीकडे त्यांचे काहीकाळ दुर्लक्ष झाले तरी सम्राट पंचम जार्जने दिल्लीचे राजधानी म्हणून महत्त्व ओळखले होते. इ. स. १९४७ नंतर दिल्लीला पुन्हा भारताच्या राजधानीचा सार्थ मान लाभला.

या सौंदर्यशाली शहराचे एकेक पान उलगडले तर येथे ऐतिहासिक घटनांची प्रचंड मालिका गवसेल. या ऐतिहासिक घटनांची साक्ष अजूनही काही ऐतिहासिक स्थाने निस्तब्ध उभी राहून पण बोलक्या रीतीने देत आहेत. राजधानी या सन्मानाला शोभेसे ऐतिहासिक प्राचीन आणि राजकीय वैभव या शहराने जोपासले आहे.

सात जुन्या शहरातून आजचे दिल्ली शहर आकाराला आलेले आहे. पृथ्वीराज चव्हाणने संरक्षणासाठी येथे 'पुराना किल्ला' उभारला. त्यानंतर अल्लाउद्दीन खिलजीने 'सिरी' ची स्थापना केली. नंतर आलेल्या गियासउद्दीन तघलकाने 'तघलकाबाद' स्थापले. मोहमदाच्या वेळी जहाँपनाह आणि फिरोजशहाच्या वेळी फिरोझाबाद आकारास आले. 'लालकोट' हाही एक दिल्लीचा जुना भाग. नंतर आलेल्या शहाजहानने 'शहाजहानाबाद' वसवले. कालप्रवाहात उरला फक्त वरील नावांचा इतिहास. अनेक सिंहासने धुळीला मिळालीत पण या प्राचीन नगरीने आपले 'दिल्ली' हे नाव मात्र अजूनही कायम राखले आहे.

हीच दिल्ली आज 'नवी दिल्ली' (भारताची राजधानी) आणि 'जुनी दिल्ली' या दोन नावांनी प्रसिद्ध आहे. जुने किल्ले, मीनार, मशिदी व इतर ऐतिहासिक अवशेषातून मोगल संस्कृतीचा इतिहास जुन्या दिल्लीत गवसतो. भारतीय संस्कृती प्रथम नदीच्या खोऱ्यातच वसली गेली. त्यानुसारच दिल्ली ही यमुना नदीच्या खोऱ्यातच वसलेली आढळते. यमुनेमुळे दिल्लीस एक आगळेच सौंदर्य प्राप्त झाले आहे. भारतमातेच्या गळ्यातील रत्नजडित हारात मध्यभागी स्थिरावलेला विविध पैलूंनी सुंदर दिसणारा तेजस्वी कोहीनूर म्हणजेच 'दिल्ली'.

लाल किल्ला, कुतुबमिनार या ऐतिहासिक ठेवींबरोबर राष्ट्रपती भवन, इंडिया गेट, एशियाड स्टेडीयम्स या आधुनिक वास्तुशिल्पांनी दिल्लीची शान अधिकच खुलवली आहे.

१) **लालकिल्ला**:—लालकिल्ला म्हणजे राजधानी दिल्लीच्या मुगुटात खोवलेला लालजर्द लालमणीच. वैभवशाली साम्राज्याचा बादशहा शहाजहानने हा किल्ला बांधला. इ. स. १६३९ च्या एप्रिलमध्ये या किल्ल्याच्या बांधकामास सुरुवात झाली. सातत्याने ९ वर्षे काम चालले. त्या काळात दहा लाख रुपये खर्चून इ. स. १६४८ मध्ये हा किल्ला पूर्ण आकारास आला. यमुनेच्या काठी वसलेल्या या किल्ल्याचे वैभव आणि भव्यता अतुलनीय आहे. शहाजहानाबाद हे तत्कालीन शहर या किल्ल्याच्या सभोवतालीच वाढले.

लालकिल्ल्याने मोगल साम्राज्याचे खरे श्रीमंती वैभव पाहिले आणि उपभोगले. या किल्ल्याच्या उद्‌घाटन समारंभाला बादशहा शहाजहानवर रत्नमाणके-मोती उधळण्यात आले होते. लालकिल्ल्याच्या पायवाटेनेपण रत्न ल्यालेली होती. हेच ते डोळे दिपवणारे प्राचीन वैभव. जगप्रसिद्ध हिरेजडीत सोन्याचे मयुर सिंहासन आपल्या हृदयात जपून ठेवण्याचे भाग्य याच किल्ल्याला लाभले. लालकिल्ल्याचे पूर्वीचे नाव 'किला-ए-मुबारक' नंतर यास "किला-ए-मुल्लाह" संबोधले गेले. पण ही नावे काल-

प्रवाहात लुप्त होऊन हा दिल्लीच्या गळ्यातील कंठहारात कालखंडात येथे अतिशय किल्ला या आवडत्या नावाने लोकांच्या गळ्यातील ताईत केच्याचे जलाशय होते. या नाही. पातच 'सावनभादो'

या किल्ल्यासाठी खास लाल पत्थराचा वापर केलेला आहे. ाशये आहेत. यातून आक्रमणाना जे तोंड दिले त्यास तोड नाही. सातत्याने क्रांतीतच व किल्ल्याच्या दगडांनी क्रांतीचे लाल वस्त्र तर ल्यालेले नाही ना ? असंख्य ेगम राहात सांडलेल्या लाल रक्तात तर हे दगड न्हाले नाहीत ना ? रक्तरंजित इतिहासाची रक्ताच्या लाल शाईने या अबोल दगडांवर नोंदवलेली आहे की अखंड स्वातंत्र्याचा लालजर्द सौभाग्य कुंकुमतिलक दिल्लीच्या कपोलावर रेखलेला आहे !

**मुख्य प्रवेशद्वार**:–या दरवाजास 'लाहोरगेट' असे नाव आहे. दरवाज्यावर मोगली पद्धती घुमटाकार भागावर छत्री आहे. डाव्या व उजव्या हाताला तसेच मागच्या बाजुलापण घुमटाकार छत्र्या आढळतात. या दरवाजासमोर मोगलकाळात मीनाबाजार भरत असे. या दरवाज्या समोरील पटांगणात १०० फूट अंतरावर 'कालकुपी' इ. स. १९५६ मध्ये पुरण्यात आली. या दरवाज्या जवळील बुरुजाच्या तटावरच १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम दरवर्षी साजरा होतो. तटावर जाण्यासाठी लाहोर गेट जवळच दोन जिने व एक लिफ्ट आहे.

**दिल्ली दरवाजा**:–या दरवाजाचे तोंड जुन्या दिल्लीकडे असल्याने यास दिल्ली दरवाजा असे संबोधतात.

**हत्ती दरवाजा** :– या दरवाजाबाहेरच दोन प्रचंड कोरलेले हत्ती आहेत. जयमल व फत्ताह ह्या दोन राजपूत वीरांचे येथे पुतळे होते ते औरंजेबाने तोडले. हत्ती दरवाजा या नावाने अजूनही हा दरवाजा प्रसिद्ध आहे.

**चट्टा चौक**:–लाहोर गेटमधून आत चालत गेल्यावर हा चौक आहे. या भोवती पूर्वी दुकाने होती. मध्ये पाण्याची छोटी टाकी होती.

**नौबतखाना**:–चट्टाचौक पासून पुढे गेल्यावर ९९' × ६८' असा नौबतखाना लागतो. मोगलकाळात दिवसातून पाचवेळा येथे वाद्ये (नगारा) वाजवली जात असत.

किल्ल्याच्या अंतरंगाचे सौंदर्य काही आगळेच आहे. दिवान-ए-आम आणि दिवान-ए-खास हे दोन भाग सौंदर्याने विनटलेले होते.

**दिवान-ए-आम**:–लोकदरबार ज्या ठिकाणी बोलावण्यात येत असे तो म्हणजेच 'दिवान-ए-आम' होय. प्रजेची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी खास रत्नमाणकांनी सुशोभित

सात जुन्या शहतहासनावर राजा आरुढ होत असे. येथील संगमरवरी दगडा-
चव्हाणने संरक्षणास चांदण्याने धुतला आहे की काय असे वाटते. यावर फळे, फुले
खिलजीने 'सिरी' चलेले आहेत.

बाद' स्थापले. म -खासः–दरबारी व खाजगी मंडळींशी हितगुज करण्यासाठी दिवान-
आकारास आ रचना करण्यात आली. संगमरवरी दगडांमध्ये याची संपूर्ण बांधणी
जहानने ' आहे. याच ठिकाणी त्यावेळी १८ कोटी खर्च करून बांधलेले रत्न-माणके व
अनेक ांनी सजवलेले मयुर सिंहासन होते. छतावर चांदीची सजावट होती. नदीर-
शहाने हे सिंहासन दिल्ली स्वारीच्या वेळी पर्शियात नेले. एकेकाळी येथे रत्नखचित
भव्य वैभव होते, याची साक्ष मात्र उरलेल्या अवशेषातून येते. हा दिवाणखाना ९०' × ६७' आहे. येथील छताची चांदी पुढे जाटांनी लुटून नेली. या लुटीत चांदी गेल्याचे दुःख नाही. भारताचे प्राचीन वैभवच लुटले गेल्याचे दुःख आहे. या दिवाणखान्या-समोरील मैदानात रोज रात्री ध्वनी आणि छाया (Light and Sound) वर आधारित लाल किल्ल्याचा संपूर्ण इतिहास कथन केला जातो.

**हमाम**:–(Hamam)–दिवान-ए-खासच्या उत्तरेला बादशाही स्नानगृह आहे. 'हमाम' याचे तीन भाग असून प्रत्येक हमामखान्यात संगमरवरी कारंजा आहे. यांतील एक हमामखाना गुलाब पाण्यासाठी तर दुसरा थंड व गरमपाणी एकाच वेळी येण्या-साठी प्रसिद्ध होता.

**मोती मशिद**:–लाल किल्ल्यातच हमामच्या पश्चिमेला पांढरीशुभ्र मोती-मशीद आहे. इ. स. १६५९ मध्ये औरंगजेबाने बांधलेल्या या मशिदीत मोगल शिल्प-कलेचे हुबेहूब प्रतिबिंब उमटलेले आहे. मोगल काळात येथे रत्नाचे दिवे होते. मोती मशिदीचे पूर्वीचे रत्नजडित वैभव आता हरपले आहे. साक्षीला उरला आहे तो शुभ्र संगमरवर.

पृथ्वीवरील स्वर्गीय सौंदर्याचा आभास निर्माण व्हावा इतका हा लाल किल्ल्याचा आतील भाग सौंदर्यशाली आहे.

**खास महल**:–(Khas Mahal)–दिवान-ए-खासच्या बाजूलाच तसबीर-खाना, ख्वाबगृह आणि बैठक आहे. या तसबीरखाना व स्नानगृहाच्या मध्यभागीच पांढऱ्या शुभ्र संगमरवरावर रत्नजडीत न्यायासन आहे. या महालात बादशहा विश्रांती घेत असे किंवा मित्रांबरोबर काव्य, शास्त्र, विनोद-गप्पा करीत असे.

**सम्मान बुरूज**:–ह्या बुरुजाला आता चुन्याचे प्लॅस्टर केलेले आहे. पण पूर्वी येथे सोनेरी धातूचा पत्रा होता. सूर्यदर्शनासाठी मोगलसम्राट येथे येत असत. तसेच काही समस्या सुटत नसल्यास सम्राट विचार करण्यासाठी येथेच शांतपणे बसत असत.

**हय्यात बक्ष बाग**:—मोगल साम्राज्यातील वैभवाच्या कालखंडात येथे अतिशय नयनमनोहर बाग होती. या बागेच्या मध्यभागी पाण्याचे जलाशय होते. या जलाशयाचा रुपेरी कारंजासाठी उपयोग केला जात असे. यातच 'सावनभादो' या वर्षाऋतुतील दोन महिन्यांची खास नावे दिलेली फरसबंद जलाशये आहेत. यातून उसळून उडणारे पाणी पावसाचा वर्षाव व्हावा तसे वाटते.

**रंगमहाल**:—या प्रशस्त रंगीत महालात शहाजहानची मुमताज बेगम राहात होती. राजघराण्यातील स्त्रिया येथे मनोरंजनासाठी एकत्रित येत असत. हा शीश-महल काचेच्या तुकड्यांनी सजवलेला असून येथे सुंदर चित्रेही रंगवून ठेवण्यात आलेली आहेत.

**किल्ल्यास भेटण्याची वेळ**:—सकाळी ९ ते सायंकाळी ५, प्रवेश शुल्क प्रत्येकी २।– रु., लहान मुलांना प्रवेश मोफत.

**शॅडो अॅण्ड लाईट प्रोग्रॅम**:—छाया व प्रकाशाच्या सहाय्याने लाल किल्ल्याचा इतिहास या कार्यक्रमात ऐकवला जातो. कथानकाची सुरुवात शहाजहानच्या काल-खंडापासून होते. नंतर मोगल काळ, ब्रिटिश काळ, महात्मा गांधी व पंडित नेहरू यांच्या काळापर्यंतचा सर्व इतिहास या कार्यक्रमात संकलित होतो.

| **कार्यक्रमाचा सीझन** | **हिंदी (वेळ)** | **इंग्रजी (वेळ)** |
|---|---|---|
| १ मे ते १५ जुलै | ८ ते ८-५० | ९-३० ते १०-२० |
| १५ सप्टें. ते ३० ऑक्टो. | " | " |
| १ नोव्हें. ते ३० एप्रिल | ७-१५ ते ८-०५ | ८-३० ते ९-२० |


(हा कार्यक्रम सूर्यास्तानंतरच असतो.) प्रवेश शुल्क—मागील बैठक ५ रु. पुढील बैठक ३।– रु.

**कुतुबमिनार**:—आकाशाशी स्पर्धा करणारे दिल्लीतील हे दुसरे एक ऐतिहासिक आकर्षण आहे. पिसा येथील झुलता मनोरा किंवा पॅरिसच्या अॅफेल टॉवर प्रमाणे 'कुतुब मिनारचे' पर्यटकांना जबरदस्त कुतूहल वाटते. मिनार म्हणजे मनोरा. हा लाल वालुकाश्म दगडांनी बांधलेला आहे.

गुलाम घराण्यातील कुतुबुद्दीन ऐबकने हा मिनार बांधायला सुरुवात केली. पण पहिला भाग बांधल्यानंतर पुढील काम त्याच्या हयातीत त्याला पूर्ण करता आले नाही. पण त्याचा मुलगा 'अल्तमश' याने हा मिनार बांधून पूर्ण केला. यास एकूण ५ मजले असून उंची २३८ फूट आहे.

इतिहास म्हटला की मतभिन्नता आलीच. काही विचारवंतांच्या मते कुतुब-मिनार हा पूर्वी पृथ्वीस्तंभ होता. पृथ्वीराजाने आपल्या पत्नीसाठी यमुनादर्शनार्थ हा

स्तंभ उभारलेला. पण या मताचे खात्रीलायक पुरावे उपलब्ध नाहीत. या मिनारचा तळमजला सर्वाधिक उंच आहे. त्याची उंची १०१ फूट असून अनुक्रमे ५०, ४०, २५, २२ अशा फुटांनी ही उंची नंतरच्या प्रत्येक मजल्याला कमी होत जाते. आत चढण्या-साठी मळसुत्री आकाराच्या ३७९ पायऱ्या आहेत. दिल्ली शहरापासून ८ कि. मी. अंतरावर हे स्थान आहे. कुतुबमिनारच्याच शेजारी नंतरच्या काळात असाच एक मिनार बांधण्याचा प्रयत्न केला गेला पण तो यशस्वी होऊ शकला नाही.



**आकांक्षा पुढती इथे गगन ठेंगणे ! कुतुबमिनार दिल्ली.**

**कुवत-उल-इस्लाम मशीद**:—कुतुबमिनारच्याच पायथ्याशी असलेली ही मशिद भारतातील पहिली मशिद असावी. इ. स. ११९३ मध्ये कुतुबुद्दीनने ही मशीद बांध-ण्यास सुरुवात केली. पण कुतुबमिनारप्रमाणे या मशिदीचे बांधकामपण अल्तमशने पूर्ण केले. या मशिदीच्या दक्षिणेकडील अलाई दरवाजा अल्लाउद्दीनने बांधला.

याच मिनारच्या परिसरात एक लोहस्तंभ आहे. ७ मीटर उंच असा अकराव्या शतकातील हा स्तंभ अजूनही गंजलेला नाही. सध्या पर्यटक या स्तंभास भाग्यस्तंभ

म्हणतात व या ठिकाणी एक खेळ म्हणून आपले भाग्य पडताळून पाहतात. या खांबाला पाठ लाऊन उभे राहायचे व दोन्ही हात मागे करून खांबास मागून मिठी मारायची. यामध्ये दोन्ही हातांचा स्पर्श मागून एकमेकांस झाल्यास तो भाग्यवान म्हणून म्हणण्याची प्रथा आहे.

**जंतरमंतर**:–दिल्लीतील पार्लमेंट स्ट्रीटवरील 'जंतरमंतर' हे गूढरम्य स्थान प्राचीन खगोलशास्त्रीय अभ्यासाचे प्रतीक आहे. ही वेधशाळा होती. सूर्योदय, सूर्यास्त, चंद्रोदय, चंद्रास्त, वेळ, घटिका आणि इतर खगोलशास्त्रीय ज्ञानाचे परीक्षण या वास्तूत होत असे.

जंतरमंतर या नावातच जादू आहे. त्या नावासभोवताली काहीतरी गूढ अर्थाचे वलय आहे. कालप्रवाहात जंतर-मंतरच्या प्रत्येक रचनेत काय कार्य होत असे हे पुसले गेले, फक्त शिल्लक आहेत ते अंदाज. पण या वेधशाळेने अनंत ग्रहगोलांचे वेध घेऊन निश्चितच तत्कालीन विज्ञानाचा विकास साधल्याची साक्ष तेथील अवशेष देतात. तेथील भिंतीची रचना चक्राऊन टाकते. तो काही बांधकाम कलेचा नमुना नाही. पण त्या बांधणीत आकाशाला गवसणी घालण्याचे, अवकाशातील ग्रहगोलांचे ज्ञान पृथ्वीवर आणण्याचे सामर्थ्य निश्चित होते.

जंतर-मंतरची बांधणी जयपूरचा खगोलशास्त्र तज्ञ राजा जयसिंग याने केली. एकाच समुहात बांधलेल्या वेगवेगळ्या रचनेतील भिंती अर्थपूर्ण आहेत. तो अर्थ मात्र शोधणे म्हणजे बुद्धीला आवाहन आहे. भारतीयांनी उभारलेल्या प्रत्येक प्राचीन वास्तूला अर्थ आहे हे नाकारता येत नाही.

**पुराना किल्ला**:–दिल्लीतील अती प्राचीन वैभवाचे किंवा मोगल आमदानीतील एक ऐतिहासिक स्थान, या दोन वेगवेगळ्या दृष्टिकोनातून ह्या जुन्या किल्ल्याकडे पाहिले जाते. जुन्या किल्ल्याच्या ठिकाणी प्राचीन 'इंद्रप्रस्थ' म्हणजे पांडवाच्या राजधानीचे स्थान असावे असा काही विचारवंतांचा दावा आहे. तर पुराना किल्ला इ. स. १५३० मध्ये मोगल साम्राज्याचा दुसरा बादशहा हुमायून याने बांधायला सुरुवात केली, असा काही इतिहासकारांचा दावा आहे.

या भव्य किल्ल्यास तीन दरवाजे आहेत. किल्ल्यातील काही बांधकाम शेरशहाने पूर्ण केले. यातील मशीद इ. स. १५४१ मध्ये उभारली. ती भारत-अफगाण वास्तुशास्त्राचा उत्कृष्ट नमुना आहे. यातच मशिदीच्या दक्षिणेला शेरमंझील किंवा शेरमंडळ नामक लाल दगडांनी बांधलेली एक वास्तू आहे. याच इमारतीत हुमायूनने पुन: सत्ता हस्तगत केल्यानंतर आपले प्रसिद्ध पुस्तकालय उभारले होते. त्यात अनेक चित्रे, हस्तलिखिते, उत्कृष्ट ग्रंथांचे नमुने ठेवलेले होते. प्राचीन ग्रंथसंपत्तीचे हे दुर्मिळ भांडार कालौघामध्ये कसे नष्ट झाले हे फक्त इतिहासालाच ज्ञात आहे.

प्रार्थनेला निघालेल्या हुमायूनचा जिन्यावरून पाय घसरल्यामुळे येथेच तो गतप्राण झाल्याचे सांगितले जाते. (इ. स. १५५६).

**हुमायू मकबरा**:–दिल्लीतील इंडिया गेटच्या थोडे पुढे गेल्यानंतर 'हुमायू मकबरा' दिसतो. हुमायून इ. स. १५५६ मध्ये मृत्यू पावल्यावर त्याची पत्नी बेगम हाजी किंवा हमीदा हिने आपल्या पतीच्या स्मरणार्थ इ. स. १५६५ मध्ये हा मकबरा बांधून घेतला. संगमरवरी दगडावर पर्शियन कलेचा नमुना येथे प्रत्ययास येतो. मध्य घुमटाखाली हुमायूनची कबर असून याच वास्तूत हुमायूनची बेगम फर्रूकाशियर व दाराशिकोह यांच्याही कबरी उभारण्यात आलेल्या आहेत.


**जामा मशीद**:–भारतातील सर्वाधिक मोठे असे इस्लाम धर्मियांचे हे पवित्र प्रार्थनास्थान आहे. लाल किल्ल्याच्या समोर असलेल्या या प्रार्थनामंदिरात ईद किंवा इतर पवित्रदिनी प्रचंड संख्येने लोक नमाज पडण्यासाठी येथे येतात.

इ. स. १६५० च्या सुमारास कित्येक दशलक्ष रुपये बांधकामासाठी या मशिदीस खर्च झाले. ही बांधून पूर्ण होण्यास १० ते १२ वर्षे लागली. या वरील दोन मिनार ४० मीटर उंच आहेत. नमाज पढण्याचा हॉल भव्य आणि विस्तृत आहे. मशिदीचे तिन्ही घुमट पांढऱ्या संगमरवरी दगडाचे आहेत. या पवित्र मशिदीच्या आत प्रेषितांच्या खुणा गवसतात.

**अशोकस्तंभ**:–दिल्लीतील सब्जीमंडी भागात असलेला हा अशोकस्तंभ वालुकाश्म दगडांनी बांधलेला असून इ. स. पूर्व सम्राट अशोकाच्या वेळी असलेल्या ब्रह्मी लिपीत त्यावर माहिती कोरलेली आहे. मीरतजवळ असलेला हा स्तंभ चौदाव्या शतकात फिरोजशहा तघलकाने दिल्लीत आणला.

**बिर्लामंदिर**:–दिल्लीच्या या प्रसिद्ध बिर्लामंदिरालाच 'लक्ष्मी नारायण' मंदिर असे म्हणतात. लक्ष्मी-नारायणाच्या प्रसन्नमुद्रा असलेल्या अतिशय सुंदर मूर्ती या मंदिरात प्रतिष्ठापन करण्यात आलेल्या आहेत. इ. स. १९३८ मध्ये बलदेवदास बिर्ला यांनी बांधायला घेतलेल्या या मंदिरात, आधुनिक कोरीव शिल्पात, प्राचीन भारतीय धार्मिक-तात्त्विक विचार व भारतातील कथांवर आधारित चित्रे, गीतेचे श्लोक, वेदवाणी व रामायणाचे श्लोक कोरलेले आढळतात. या मंदिराशेजारीच शिष व दुर्गा देवीचे मंदिर आहे. येथेच बुद्धमंदिर असून बुद्धांचे जीवन-चित्र चितारलेले आहे.

**इंडिया गेट**:–पहिल्या महायुद्धात ज्या भारतीय वीरांनी आपले प्राणार्पण केले त्या शौर्यशाली सैनिकांच्या स्मृत्यर्थ इ. स. १९२१ मध्ये राजपथावर हा भव्य दरवाजा उभारण्यात आलेला आहे. सगळे बांधकाम चिरेबंद दगडांत केलेले असून याची उंची ४२ मीटर आहे. पहिल्या महायुद्धात कामी आलेल्या अमर जवानांची स्मृती म्हणून बंदुकीच्या दस्त्यावर सैनिक शिरस्त्राणाचे प्रतीक येथे उभारण्यात आले असून सभोवती चार अखंड ज्योति प्रज्वलित करण्यात आल्या आहेत.




"तेथ कर आमुचे जुळती" लक्ष्मी नारायण मंदिर दिल्ली.

येथे खालील मजकूर कोरलेला आढळतो. "फ्रान्स, मेसापोटेमिया, पर्शिया, पू. आफ्रिका तसेच वायव्य सरहद्द प्रांत आणि तिसऱ्या अफगाण युद्धात कामी आलेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ."

**राष्ट्रपती भवन**:–इंडिया गेटपासून राजपथावरच सरळ दुसऱ्या टोकाला भारताच्या राष्ट्रपतींचे निवासस्थान आहे. यासच राष्ट्रपतीभवन असे म्हणतात. १३० हेक्टर जमिनीत ३४० भव्य खोल्यांचे हे राष्ट्रपतीभवन पूर्वी ब्रिटीशकाळात व्हाईसरॉयचे निवासस्थान असायचे. येथे खरी भव्यता दरबार हॉलच्या सजावटीतच पाहावयास मिळते. या दिवाणखान्यावर प्रचंड घुमट असून आत पांढऱ्या शुभ्र संगमरवरी भिंती व सोनेरी खांब आहेत. राष्ट्रपतीभवनातील बागेला 'मोगल गार्डन' म्हणतात. प्रवाशांना हे भवन पाहायचे असल्यास दी मिल्ट्री सेक्रेटरी टू प्रेसिडेन्ट, राष्ट्रपतीभवन यांच्याकडून लेखी परवानगी घ्यावी लागते. पर्यटकांनी ही परवानगी १ महिना किंवा किमान २ दिवस अगोदर मिळवावी. आपल्या जवळ परवानगी नसून आपणास ज्या-त्या दिवशीच राष्ट्रपतीभवन पहायचे असल्यास कोणत्याही खासदा-दाराचे संमतीपत्रक घ्यावे व ते मेनगेटवर दाखविले असता लगेच आपल्यास आत पाठविले जाते.

**पार्लमेंट हाऊस**:–भारतीय भाषेत यालाच संसदगृह असे संबोधतात. दिल्लीचे हे संसदगृह म्हणजे भारतीय लोकशाहीचा आत्मा आहे, असे म्हटले तर अतिशयोक्ती

ठरणार नाही. खांबाखांबांनी सजवलेल्या या गोलाकार इमारतीचा घेर जवळजवळ १७१ मीटर आहे. सभोवताली दर्शनी भागात दिसणाऱ्या खांबांची संख्या १४४ आहे. या इमारतीचे डिझाईन हर्बर्ट बेकर या वास्तु-तज्ञाने तयार केलेले आहे. संसदेचे अधिवेशन चालू नसेल तर संसदभवनातील रु. नं. २६ मधील अधिकाऱ्याशी संपर्क साधून भवन पाहण्याची परवानगी मिळवता येते. मात्र यासाठी २ ते ३ तास लागतात. तसेच अधिवेशन चालू असताना आपणास प्रेक्षक गॅलरीतून ते पाहण्यासाठी कोणत्याही खासदाराची लेखी संमती असल्यास आत सोडण्यात येते. मात्र आंत प्रवेशापूर्वी तुमची संपूर्ण तपासणी घेतली जाते.



**जगाला ललामभूत ठरलेल्या लोकराज्यातील लोकशाही मंदिर, लोकसभा. (दिल्ली)**

भारतीय तिरंगी राष्ट्रध्वज संसदगृहावर व राष्ट्रपती भवनवर डौलाने फडकत असतो. या संसद भवनातच लोकसभा व राज्यसभा या दोन गृहांची अधिवेशने होतात.

**त्रिमूर्ती**:–भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे हे निवासस्थान चाणक्यपुरीजवळ तीनमूर्ती रोडवर आहे. नेहरूंनंतर या निवासस्थानाचे रूपांतर 'नेहरू म्युझियममध्ये' करण्यात आले. यांच्या जीवनसंबंधित वस्तू व कागदपत्रांची येथे मांडणी केलेली आहे. लाल किल्ल्याप्रमाणे येथेही रोज रात्री लाईट अँड साऊंडचा कार्यक्रम होतो. पं. नेहरूंच्या जीवनावरील व त्रिमूर्तीचा संपूर्ण इतिहास यात ऐकावयास मिळतो.

त्रिमूर्ती प्रथम इ. स. १९३० मध्ये भारतीय सेनेच्या ब्रिटिश सेनापतीसाठी बांधण्यात आले होते. इ. स. १९४८ मध्ये पं. नेहरू येथे राहण्यासाठी आले. शेवट—पर्यंत त्यांचे वास्तव्य याच इमारतीत होते. त्यांना २७ मे १९६४ ला मृत्यू आल्यानंतर 'त्रिमूर्ति'चे रूपांतर नेहरू मेमोरियल म्युझियममध्ये करण्यात आले. या म्युझियममध्ये केवळ नेहरूंच्या जीवनाचा इतिहास गवसतो असे नाही तर, भारताच्या स्वातंत्र्य इतिहासाचे अनेक चित्तथरारक क्षणही टिपता येतात.

म्युझियममध्ये आपण प्रथम पदार्पणातच नेहरूंच्या दिवाणखान्यात येतो. नेहरू इच्छुकांना येथे भेटत असत. पुढील व्हरांड्यात नेहरूंच्या मृत्यूपत्रातील काव्यमय विचार वाचावयास मिळतात. इतके सुंदर मृत्युपत्र इतरत्र दुर्मिळच. त्यांनी या काव्यमय मृत्युपत्रात लिहिले आहे,

" Portion of my ashes was to be carried high up into the air in an aeroplane and scattered from that height over the fields where the peasants of India toil, so that they might mingle with the dust and soil of India...

मातृभूमीशी एकरूप होण्याची केवढी ही भव्य कल्पना. त्यांच्या टेरेसच्या मागील हिरवळीत गुलाबांचे ताटवे उमललेले आहेत. प्राणी, पक्षी, फुले आणि वृक्षांच्या सहवासात पं. नेहरू येथे आपला अल्पसा रिकामा वेळ घालवीत असत. याठिकाणी आता इ. स. १९६४ पासून सातत्याने तेवणारी जवाहर ज्योत पाहावयास मिळते. ही ज्योत लालबहादूर शास्त्री यांनी प्रज्वलित केली.


नेहरूंच्या कार्यालयात ते वापरीत असलेले फर्निचर आहे. वर गेल्यावर प्रशस्त हॉलमध्ये त्यांच्या जीवनातील अनेक क्षणचित्रे पहायला मिळतात. त्याच व्हरांड्यात कौटुंबिक जीवनातील क्षणचित्रे आहेत. शेजारच्या खोलीत स्वातंत्र्य-संग्रामातील नेहरूंच्या जीवनाचे चित्रण आहे. " discovery of India " या पुस्तकाच्या लेखनातील मूळ कागदपत्रेपण येथे आहेत. विशेषत: इथे डोळ्यात भरते ती नेहरूंची 'लायब्ररी'. एका खोलीत नेहरूंना मिळालेल्या भेटवस्तू आहेत. नेहरूंची झोपण्याची खोली अजूनही इतकी व्यवस्थित आहे की, काही क्षणात नेहरू येथे विश्रांतीला येतील की काय अशी पुसटशी कल्पना मनाला चाटून जाते. शब्दांकित वर्णनाने प्रत्यक्ष पाहण्यातील आनंद काय व्यक्त करणार. आपल्या या लाडक्या पंतप्रधानांनी अखेरचा देह याच खोलीत ठेवला. त्यांच्या या बिछान्यावर आता आपणास रोज पाहावयास मिळते तेजस्वी टपोरे गुलाबाचे फूल.

**राजघाट** :–'राष्ट्रपिता महात्मा गांधी' हे भारतीय स्वातंत्र्य इतिहासाचे अविभाज्य घटक आहेत. हे अहिंसेचे पूजक होते. त्यांनीच जगाला 'सत्याग्रहाचे' शस्त्र दिले. म. गांधींच्या सत्य व शांतीच्या तत्त्वांकडे आजही जग आदराने पहात आहे.



ग्रंथसंग्रहालय

३० जानेवारी १९४८ ला गांधी निर्वाण दिन. मृत्योत्तर म. गांधींना चंदनी लाकडात जेथे अग्नी देण्यात आला. तेथेच त्यांच्या स्मृत्यर्थ उभारलेल्या स्मारकाला 'राजघाट' असे संबोधतात. प्रत्येक देशी-परदेशी प्रवासी या स्थानाला भेटी देऊन अहिंसेची स्फूर्ती घेऊन जातात. (म. गांधींची हत्या मात्र बिर्लाहाऊस मध्ये झाली.)




**महान मानवतेच्या पुजाऱ्याची तेजस्वी ज्योत जेथे मालवली ते बिर्ला हाऊस, (दिल्ली)**

अतिशय निर्मळ व स्वच्छ अशा या चौथऱ्यावर फुलांनी शब्द लिहिलेले आढळून येतात......'हरे राम'–.....२ ऑक्टोबर गांधी जयंती आणि ३० जानेवारी गांधी पुण्यतिथीला येथे प्रार्थनेसाठी लोक जमतात.

**शांतिबन**:–या शांतीवनात आता आपणास तीन समाध्या पाहावयास मिळतात. यमुनातीरी, भरगच्च वृक्षराईत शांतस्थळी या तीन समाध्या आहेत.

१) **इंदिरा गांधी**:–म. गांधींच्या समाधीपासून जवळच प्रशस्त मैदानात दोन निमुळत्या होत गेलेल्या चौथऱ्यावर ही समाधी आहे. '३१ ऑक्टोबर (बुधवार) १९८४' रोजी आपल्या देशाच्या लाडक्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांच्याच रक्षकाकडून हत्या झाली. त्यांना ३ नोव्हेंबर (शनिवार) रोजी या ठिकाणी मंत्राग्नी देण्यात आला.

२) **पं. जवाहरलाल नेहरू**:–भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू २७ मे १९६४ मध्ये स्वर्गवासी झाले. त्यांच्या स्मृत्यर्थ उभारलेल्या या समाधीच्या परिसरास शांतीबन असे म्हणतात. अगदी सार्थ नाव. कारण भारत हे शांतताप्रिय



**जबतक सूरज चाँद रहेगा। इंदिरा तेरा नाम रहेगा।। पंतप्रधान इंदिरा गांधींची समाधी, शांतीबन, दिल्ली.**

राष्ट्र आणि नेहरूंचा सन्मान सारे जग शांतीदूत म्हणून करीत असत. कै. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची समाधी आपल्या लाडक्या पित्याजवळच आहे.

३) **संजय गांधी**:–पं. नेहरूंचा नातू. या युवक नेत्याची समाधी शांतीबन व विजयघाट यांच्या मध्ये आहे. एक छोटासा चौथरा व त्यावर १० फूट उंच स्तंभ आहे. या तरुण संघटकाचा मृत्यू दि. २३–६–१९७८ रोजी सकाळी ८-३० च्या सुमारास विमान अपघातात दिल्ली येथेच झाला.

**विजयघाट** :– पं. नेहरूंच्या समाधीपासून ३ फर्लांग अंतरावर भारताचे पंतप्रधान लाल बहाद्दूर शास्त्री यांची यमुना नदीकाठी बांधलेली ही स्फूर्ति समाधी. लालबहाद्दूर शास्त्रींच्या नावातच बहादूरी, पराक्रम आहे. जेथे पराक्रमाची तेजस्विता असते तेथे विजय ठरलेलाच. भारताच्या इतिहासात त्यांनी मिळवलेल्या विजयाची नोंद आहे. म्हणूनच त्यांच्या नावातच कतृत्त्वाचे सार साठवलेले आहे, असे म्हणावे लागेल.

**दिल्लीतील म्युझियम्सः–**

| अ. नं. | म्युझियमचे नाव | पत्ता | वेळ | बंद |
|---|---|---|---|---|
| १) | एअरफोर्स म्युझियम | वेस्टर्न एअर कमांड, दिल्ली कॅंट पालम | १ ते ६ | सोमवार |
| २) | डॉल्स म्युझियम | नेहरू हाऊस, बहादूर शहा जाफर मार्ग | — | — |
| ३) | नॅशनल म्युझियम ऑफ नॅचरल हिस्टरी. | फी. आय.सी.सी.आय. बिल्डिंग, बाराखंबा रोड | — | — |
| ४) | रेडफोर्ट म्युझियम ५० पैसे प्रवेश फी | रेडफोर्ट दिल्ली | ९ ते १<br>२ ते ६ | सोमवार |
| ५) | गांधी स्मारक संग्रहालय | राजघाट | ९-३० ते ५-३० | सोमवार |
| ६) | नॅशनल म्युझियम | जनपथ | १० ते ५ | सोमवार |
| ७) | नेहरू मेमोरियल म्युझियम | तीनमूर्ती मार्ग | १० ते ५ | सोमवार |
| ८) | इंडियन वॉर मेमोरियल म्युझियम | — | १० ते ४ | शुक्रवार |
| ९) | नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट | जयपूर हाऊस | १० ते ५ | सोमवार |
| १०) | तिबेट हाऊस | जोरबाग | १०-३० ते १<br>२-३० ते ६ | — |

**आर्ट गॅलरीः**–१) गॅलरी चाणक्य (चाणक्यपुरी)
२) गॅलरी आम्रपाली (ग्रीनपार्क)
३) कुमार आर्ट गॅलरी (सुंदरनगर)
४) दिल्ली शिल्पी चक्र (शंकर मार्केट)
५) गॅलरी ललितकला (फिरोजशहा रोड)
६) कोनार्क आर्ट गॅलरी (साऊथ एक्सटेंशन मार्केट सेकंड.)

**दिल्ली साईट सीईंगः**–इंडियन टूरिझम डेव्हलपमेंट कार्पोरेशन तर्फे साईट-सीईंगसाठी डिलक्स कोचेस करिता २-३ दिवस अगोदर रिझर्व्हेशन करावे.

**रिझर्व्हेशन पत्ताः**–१) इंडियन टूरिझम डेव्हलपमेंट कार्पोरेशन एल्. ब्लॉक रॅडीयल रोड, कॅनॉट प्लेस नवी दिल्ली.

२) टूरिस्ट कार्यालय ८८ जनपथ, नवी दिल्ली.

| ऋतू | वेळ | काय पाहू शकाल ? |
|---|---|---|
| १) हिवाळा<br>उन्हाळा | सकाळी ९-१५ ते १२-३०<br>,, ७-१५ ते १०-३० | जंतरमंतर, इंडियागेट, हुमायून टॉम्ब, कुतुबमिनार, लक्ष्मीनारायण मंदिर. |
| २) हिवाळा | सकाळी ११ ते १-४०<br>दुपारी १-३० ते ५-४० | फिरोजशाह कोटला, राजघाट–(तीन घाट), जामामशीद, लालकिल्ला. |
| ३) शुक्रवार, शनिवार व फक्त रविवार | सकाळी ९-३० ते २-३० | नेहरू, डॉल व गांधी म्युझियम, झू. |

**दिल्ली बाहेरील ठिकाणे**:–

१) **भडकल सरोवर**:–दिल्लीपासून ४० कि. मी. अंतरावर (मथुरा रोड) राहण्यासाठी हॉटेल्स व पोहण्यासाठी उत्तम तलाव आहे.

२) **माऊर बंद**:–दिल्लीपासून ३२ कि. मी. अंतरावर (मथुरारोड) **गारुडी** नागाचा खेळ दाखवितात.

३) **लोही गार्डन**:–दिल्लीच्या हद्दीतीलच एक सुंदर बाग. येथे योगासाठी लोक भेट देतात. येथील घुमटावर असंख्य कबुतरे बसलेली दिसतात.

४) **सफदरजंग टॉम्ब**:–शहरापासून ४-५ कि. मी. अंतरावर हा टॉम्ब इ. स. १७५३ मध्ये बांधण्यात आला. मोगल वास्तुकलेचा हा शेवटचा नमुना मानण्यात येतो. पाहण्याची वेळ सकाळी ७ ते संध्या. ६ पर्यंत.

५) **तघलकाबाद**:–दिल्लीपासून १९ कि. मी. असलेला हा भाग गियासुद्दीन तघलकाने स्वतःच्या राजधानीसाठी निवडला होता. या शहराच्या सभोवताली संरक्षणासाठी तट उभारण्यात आला होता.

६) **चक्रवर्ती सरोवर**:–दिल्ली-अमृतसर रस्त्यावर १३२ कि. मी. अंतरावर असलेला हा कालव्याच्या काठचा भाग अतिशय नयनमनोहर आहे.

७) **सुलतानपूर**:–४२ कि. मी. अंतरावर असलेल्या या स्थळी पक्षी अभयारण्य आहे. पर्यटक विश्रांतीगृहाची येथे सोय आहे.

८) **हिंडन**:–१९ कि. मी. अंतरावरील हे अतिरमणीय स्थान पिकनिकसाठी उत्तम आहे. दिल्ली-हिंडन रस्त्यावर असलेल्या या स्थळी मासेमारीची देखील सोय आहे.

**दिल्ली व अन्य पर्यटनाविषयी:–(खाजगी ट्रॅव्हल एजंटस्)**

| अ.नं. | कंपनीचे नाव | पत्ता | | | फोन |
|---|---|---|---|---|---|
| १. | टूरिस्ट काऊंटर | नवी दिल्ली, रेल्वे स्टेशन | | | — |
| २. | दिल्ली टूरिझम डे. कॉर्पोरेशन | मेन ब्लॉक, केनॉट प्लेस | | | — |
| ३. | इंडियन टूरिझम डे. कार्पोरेशन | एल्. ब्लॉक | ,, | ,, | — |
| ४. | अस्लॅटीक ट्रॅव्हल सर्व्हिस | — | ,, | ,, | — |
| ५. | बर्डस ट्रॅव्हल्स | ई.१९ | ,, | ,, | ३५२०६६ |
| ६. | एव्हरेस्ट ट्रॅव्हल सर्व्हिस | सी।११ प्रेम हाऊस, | ,, | ,, | ३५१११७ |
| ७. | ओरियंट ट्रॅव्हल्स | | ,, | ,, | — |
| ८. | वर्ल्ड-वाईड एजन्सी | | ,, | ,, | — |
| ९. | सीता वर्ल्ड ट्रॅव्हल्स | एफ्।१२. | ,, | , | — |
| १०. | शहा अॅण्ड राय ट्रॅव्हल्स | | ,, | ,, | — |
| ११. | अंबर टूरस् | द्वारका सदन | ,, | ,, | ३५३१२६ |
| १२. | अमेरिकन एक्सप्रेस | ए ब्लॉक | ,, | ,, | ३४४११९ |
| १३. | एशियाटिक ट्रॅव्हल सर्व्हिस | ११९० | ,, | ,, | ३४३४५९ |
| १४. | इंडिया टूरिस्ट ऑफिस | ८८ जनपथ | | | ३२०००५ |
| १५. | ओरिएंट एक्सप्रेस | ७० जनपथ | | | ३२२१४२ |
| १६. | ट्रॅव्हल वर्ल्ड | हॉटेल जनपथ | | | ३८१३६७ |
| १७. | बिझनेस टूरिस्ट सर्व्हिस | २।२ सूर्यकिरण, कस्तुरबा गांधी मार्ग | | | ३५३१३३ |
| १८. | इंडियन ट्रॅव्हल्स | चाणक्यपुरी | | | — |
| १९. | मर्क्युरी | जीवनतारा बिल्डिंग, पार्लमेंट हाऊस | | | ३१२००८ |
| २०. | अँबॅसडर ट्रॅव्हल्स | ६० रिगल बिल्डिंग, पार्लमेंट हाऊस | | | ३१२३४८ |
| २१. | ट्रॅव्हल इंडिया ब्युरो | S।१३ ग्रीनपार्क | | | — |

**दिल्लीहून काही स्थानांचे कि. मी. मध्ये अंतर:–**

१) आग्रा—२०० कि. मी.
२) अमृतसर—४४६ कि. मी.
३) चंदिगड—२४९ कि. मी.
४) डेहराडून—२३६ कि. मी.
५) सिमला—३६८ कि. मी.
६) जम्मू—५८६ कि. मी.
७) श्रीनगर—८९१ कि. मी.
८) पुणे—१४२९ कि. मी.
९) नागपूर—९८५ कि. मी.
१०) धुळे—१०६४ कि. मी.
११) औरंगाबाद—१२०७ कि. मी.
१२) नासिक—१२२० कि. मी.
१३) ठाणे—१३६५ कि. मी.
१४) मुंबई—१४०८ कि. मी.
१५) सोलापूर—१५०३ कि. मी.

**दिल्लीतील टूरिस्ट कार्यालयेः–**

१) गव्हर्मेंट ऑफ इंडिया टूरिस्ट कार्यालय–८८ जनपथ.

२) देहली टूरिझम डेव्हलपमेंट कार्पोरेशन–एन. ब्लॉक, कॅनॉट प्लेस व रेल्वे स्टेशन.

३) हरयाना गव्हं. टूरिस्ट इन्फर्मेशन सेंटर–जनपथ.

४) हिमाचल प्रदेश टूरिस्ट इन्फर्मेशन सेंटर–जनपथ.

५) जे. के. गव्ह. इन्फर्मेशन सेंटर–जनपथ.

**दिल्लीतील सिनेमागृहेः–**

| अ.नं. | नाव | पत्ता | अ.नं. | नांव | पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १. | अजंठा | सुभाषनगर | २१. | दूरास | जंगपुरा |
| २. | अप्सरा | जी.टी.रोड, शाहदरा | २२. | फिल्मीस्तान | मॉडेल वस्ती |
| ३. | राधू | ,, ,, ,, | २३. | डचुबीली | फाऊंटन |
| ४. | गियानंद | ,, ,, ,, | २४. | चंदरलोक | बेंगाली सीटी |
| ५. | प्लाझा | कॅनॉट प्लेस | २५. | रॉबीन | सब्जीमंडी |
| ६. | ओडेन | ,, ,, | २६. | सुदर्शन | गौतमनगर |
| ७. | रिगल | ,, ,, | २७. | पायल | नारायण विहार |
| ८. | रिव्होली | ,, ,, | २८. | उपहार | ग्रीनपार्क |
| ९. | खन्ना | पहाडगंज | २९. | बात्रा | मुखर्जीनगर |
| १०. | इम्पेरिअल | ,, | ३०. | अम्बा | क्लॉक टॉवर |
| ११. | सपना | कैलाश | ३१. | अलंकार | लजपतनगर |
| १२. | संगम | आ. के. पुरम | ३२. | लक्ष्मीपॅलेस | गांधीनगर |
| १३. | डिलाईट | असफअली रोड | ३३. | लिबर्टी | गोविंदसिंग मार्ग |
| १४. | रेसकोर्स | रेसकोर्स | ३४. | मिनर्व्हा | काश्मिर गेट |
| १५. | सावित्री | ग्रेटर कैलाश | ३५. | प्रिया | वसंत विहार |
| १६. | अर्चना | ,, | ३६. | शैला | डी.वी.गुप्ता मार्ग |
| १७. | चौधरी | गझियाबाद | ३७. | नाझ | ,, ,, ,, |
| १८. | कल्याण | ब्रह्मपुरी | ३८. | नटराज | मोतीमार्ग |
| १९. | चांद | त्रिलोकपुरी | ३९. | रीझ | काश्मिरी गेट |
| २०. | दीप | वझीरपूर | ४०. | विराट | दक्षिणपुरी |

**प्रौढांसाठी मनोरंजन**–१) घुंगरू–मौर्य शेरेटन रात्रौ १० नंतर.
२) तबेला–ओबेरॉय इंटर कॉन्टीनेंटल रात्रौ ९ नंतर.
३) पुसीकॅट–राजदूत हॉटेल रात्रौ १० नंतर.
४) व्हील्स–हॉटेल अँबॅसडर रात्रौ ९ नंतर.

**मनोरंजन**:–चिल्ड्रन फिल्म सोसायटी–सप्रूहाऊस.
त्रिवेणी चेंबर थिएटर–तानसेन मार्ग.
त्रिवेणी कला संगम–तानसेन मार्ग.
इंडिया इंटरनॅशनल सेंटर–लोही इस्टेट.
ललितकला ॲकॅडमी–रवींद्रभवन.
गांधी मेमोरियल हॉल––झफरमार्ग.

**दिल्लीत कोठे उतराल ?**

| अ.नं. | हॉटेलचे नाव | पत्ता | फोन |
|---|---|---|---|
| १. | अशोक | ५०, बी. चाणक्यपुरी, न्यू. दिल्ली. | ३७०१०१ |
| २. | अकबर | ,, ,, | ६७३२५१ |
| ३. | हॉटेल जनपथ | जनपथ | ३५००७० |
| ४. | कनिष्क | विंडसर प्लेस | ३४३४०० |
| ५. | इंपेरिअल | ,, ,, | ३८८६११ |
| ६. | डिप्लोमॅट | ९, सरदार पटेल मार्ग, न्यू दिल्ली | ३७२००३ |
| ७. | भगीरथ पॅलेस | चांदनी चौक लाल किल्ल्याजवळ | २७६२२३ |
| ८. | सिद्धार्थ | ३, राजेंद्र प्लेस न्यू दिल्ली | ५८४५९७ |
| ९. | मौर्य शेरेटन | शामाप्रसाद मुखर्जी मार्ग | ३७०२७१ |
| १०. | हॉटेल रिगल | ,, ,, ,, | २५६१९७ |
| ११. | न्यू फ्रँटियर | ,, ,, ,, | २५७३३२ |
| १२. | प्रेसीडेंट | ४।२३ असफअली रोड, न्यू दिल्ली | २७७८३६ |
| १३. | ब्रॉडवे | ,, ,, ,, | २७३८२१ |
| १४. | हॉटेल ग्रोव्हस | ३११७– ,, ,, ,, | २७१९८१ |
| १५. | राजदूत | मथुरा रोड | ६९९५८३ |
| १६. | ताजमहाल | १ मानसिंग रोड | ३८६१६२ |
| १७. | विक्रम | रिंगरोड, न्यू दिल्ली | ६२५६६९ |
| १८. | कुमारस हॉलीडे इन | ,, | ६२१८४४ |
| १९. | इंटरनॅशनल इन | ,, (लजपतनगर) | ६९०९८० |

| अ.नं | हॉटेलचे नाव | पत्ता | फोन |
|---|---|---|---|
| २०. | कुतुब | श्री अरविंद मार्ग | ६६००६० |
| २१. | हॉटेल निरू | १०, नेताजी सुभाष मार्ग, दर्यागंज | २७८५२२ |
| २२. | मोतीमहल | २, ,, ,, ,, ,, | २७४७९१ |
| २३. | लोधी | लालालजपत राय मार्ग | ६१९४२२ |
| २४. | वाय्. एम्. सी. ए. टूरिस्ट | जयसिंग रोड, न्यू दिल्ली | ३११९१५ |
| २५. | हॉटेल हॅन्स | बारखंबा रोड ,, | ४९८६१ |
| २६. | टूरिस्ट हॉलीडे होम | ७, लिंक रोड, जंगपुरा | ६१८७९७ |
| २७. | आग्रा | १६, दर्यागंज | २७८०४१ |
| २८. | टूरिस्ट | रामनगर स्टेशनजवळ, न्यू दिल्ली | — |
| २९. | हॉटेल एअरलाईन | ,, ,, ,, | ५१७५७१ |
| ३०. | सोबती | हार्धियन सिंग रोड, करोलबाग | ५६९०३५ |
| ३१. | गौरव गेस्ट हाऊस | अजमल खाँ रोड, करोलबाग | — |
| ३२. | सिटी हॉटेल | ३९९०, अजमेरी रोड | ५२६४५९ |
| ३३. | कलसी गेस्ट हाऊस | कॅनॉट प्लेस, न्यू दिल्ली | ३५०५३२ |
| ३४. | हॉटेल पॅलेस व्हाईट | ,, ,, | ३५१३६९ |
| ३५. | हॉटेल प्रभात | ,, ,, | — |
| ३६. | हॉटेल ब्ल्यू | कॅनॉट सर्कस् | ३५२२२२ |
| ३७. | हॉटेल मरीना | ,, ,, | ३४४२६९ |
| ३८. | हॉटेल ब्राईट | कॅनॉट सर्कस | ३५०४४४ |
| ३९. | हॉटेल अलका | ,, ,, | ३४४३२८ |
| ४०. | हॉटेल विवेक | मेनबझार पहाडगंज | ५२३०१५ |
| ४१. | हॉटेल केसरी | ,, ,, | — |
| ४२. | दी नेस्ट हॉटेल | ११, कुतुबमार्ग | ५१२५७५ |
| ४३. | यूथ हॉस्टेल | न्यायमार्ग | — |
| ४४. | वाय्. डब्ल्यू. सी. ए. (फक्त स्त्रियांसाठी) | अशोक रोड | ३१२९७५ |

**रेल्वे स्टेशनला राहाण्याची सोय**:—ब्रेकजर्नी असेल किंवा त्या रेल्वे स्थानकावर उतरायचे असेल आणि एका दिवसात शहर पाहून पुनः दुसऱ्या गाडीने पुढे जायचे असल्यास रेल्वे स्टेशनलाच उपलब्ध असलेल्या रेल्वे रिटायरिंग रूम्समध्ये आपली आवश्यक असल्यास उतरण्याची सोय होते.

आपले प्रवासाचे तिकीट स्टेशनमास्तरला दाखवून तेथेच राहण्याचा योग्य चार्ज भरून स्लीप घ्यावी. ती स्लीप रिटार्यरिंग रूमच्या व्यवस्थापकाला दाखविली असता तो आपणाला हॉलमधील आपला बेड दाखवितो. अंदाजे प्रत्येकी १२।– रु. प्रमाणे नवी व जुनी दिल्ली रेल्वे स्टेशनवर ही व्यवस्था आहे.

**धर्मशाळा**:–शाळेच्या ट्रिप्स, मध्यमवर्गीय कुटुंब, पर्यटक मित्रमंडळी यांना पैशाअभावी भरपूर किंमत देऊन मोठ्या हॉटेल्समध्ये उतरणे शक्य होत नाही. अशा-वेळी धर्मशाळेचा आश्रय जरूर घ्यावा. पूर्वी धर्मशाळेला जो अर्थ होता तो आता बदलला आहे. हल्लीच्या धर्मशाळा या स्वस्त दरातील गेस्टहाऊसच समजाना ! सोयीपण घरगुती असतात. अगदी तारांकित हॉटेलसारखे सेवक गरमपाणी घेऊन उभे नसले तरी स्वत: मागितले तर ते आणून देऊ शकतात. थाटमाट किंवा ए वन सर्व्हिसची अपेक्षा न करता आपण घरी स्वत: जसे स्वत:चे आटपतो तसे राहिले तर धर्मशाळेइतकी स्वस्त आणि मस्त दुसरी जागा नाही, हे निश्चित. येथेपण आवश्यक सोयी उपलब्ध असतात.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | बुद्धिस्ट पिलीग्रीमेज सेंटर | नवी दिल्ली स्टेशनसमोर | बुद्ध भिक्षूंना प्राधान्य |
| २) | लडाख बुद्ध विहार | वेलारोड | —,,— |
| ३) | लक्ष्मी नारायण टेंपल | मंदिरमार्ग, न्यू दिल्ली | — |
| ४) | हिंदूमहासभा | —,,— —,,— | — |
| ५) | कॉलवारी | —,,— —,,— | — |
| ६) | जब्वन धर्मशाळा | —,,— —,,— | कालीबारी |
| ७) | पारशी अंजूमान | दिल्ली गेटजवळ (मथुरा रोड) | फक्त पारशी |
| ८) | मारवाडी पंचायत धर्मशाळा | नयी सडक | — |
| ९) | भूपींदर हॉल | रामकृष्ण मिशन, पंचकुईन रोड | — |
| १०) | गुजराथी समाज | सिव्हील लाईन, जुनी दिल्ली | — |
| ११) | भोलूमल धर्मशाळा | चरखेवाला, चवरी बझार | — |
| १२) | लेडी हार्डींग सराई | न्यू दिल्ली रेल्वे स्टेशनसमोर | — |
| १३) | आगरवाल धर्मशाळा | —,,— | — |
| १४) | आर्यसमाज भवन | आर्य समाज रोड. | — |
| १५) | आगरवाल धर्मशाळा | करोल बाग, न्यू दिल्ली | — |

**दिल्ली हॉटेल्स रेस्टॉरंट**:–

१) युनायटेड कॉफी हाऊस–कॅनॉट प्लेस
२) यार्कस्– —,,—
३) व्होलगा– —,,—
९) हॉटेल ऑर्बिट–जनपथ
१०) हॉटेल रणजित–संतूर
११) अशोक हॉटेल–पिकॉक

| | | |
|---|---|---|
| ४) एम्बसी– | –,,– | १२) डिफेन्स कॉलनी–चायनीज फूड |
| ५) मिनार– | –,,– | १३) वसंतविहार माकट-गोल्डन ड्रॅगन |
| ६) गेलार्ड– | –,,– | १४) डिप्लोमॅट हॉटेल–शांघाय. |
| ७) स्टँडर्ड– | –,,– | |
| ८) चिनार– | –,,– | |

**दिल्लीतील हॉस्पिटल्सः–**

| अ.नं. | हॉस्पिटलचे नाव | पत्ता |
|---|---|---|
| १) | देहली मॅटर्निटी | साधू वासवानी मार्ग |
| २) | बी.एल्.कपूर मेमोरिअल | –,,– |
| ३) | अगरवाल नर्सिंग होम अँड चिल्ड्रन हॉस्पिटल | विशाल एनक्लेव्ह |
| ४) | डॉ. लोहिया चिल्ड्रन हॉस्पिटल | सदरबझार |
| ५) | गिरीधारीलाल चिल्ड्रन हॉस्पिटल | कमला मार्केट |
| ६) | सिव्हिल हॉस्पिटल | शाहदरा |
| ७) | कस्तूरबा हॉस्पिटल | मच्छलीवाला-जामा मशीद |
| ८) | सफदरजंग हॉस्पिटल | सफदरजंग |
| ९) | टी. बी. हॉस्पिटल | मेहरअली, नवी दिल्ली. |
| १०) | आयुर्वेदिक हॉस्पिटल | बलीमरन |
| ११) | ऑल इंडिया इन्स्टिटच्यूट ऑफ मेडिकल सायन्स | अन्सारी नगर |
| १२) | मूलचंद हॉस्पिटल | लाला लजपतराय मार्ग |
| १३) | न्यू दिल्ली टयूबर क्युलेसीस सेंटर | ज. नेहरू मार्ग |
| १४) | स्वामी दयानंद हॉस्पिटल | शाहदरा |

**दिल्लीतील प्रार्थनास्थळेः–**

| मंदिराचे नाव | पत्ता | मंदिराचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| १) लक्ष्मीनारायण मंदिर | मंदिरमार्ग (बिर्ला) | ९) सीसाग गुरुद्वार | चांदनी चौक |
| २) हनुमान मंदिर | बाबा खरकसिंह मार्ग | १०) कॅथड्रल चर्च | चर्चरोड |
| ३) आर्य समाज मंदिर | मंदिरबाग | ११) फ्री चर्च | जंतरमंतर |
| ४) गौरी शंकर टेंपल | चांदनी चौक | १२) सेंट अँथनी चर्च | पहाडगंज |
| ५) दिगंबर जैनमंदिर | लालकिल्ला | १३) सेंट मायकेल चर्च | पुसारोड |

| मंदिराचे नाव | पत्ता | मंदिराचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| ६) बुद्ध विहार | मंदिरमार्ग | १४) फत्तेपुरी मशीद | चांदनी चौक |
| ७) पारसी फायर टेंपल | मथुरा रोड | १५) जामा मशीद | उर्दू बझार |
| ८) गुरुद्वारा बांगला साहेब | बांगला साहेब मार्ग | १६) सोनेरी मशीद | चांदनी चौक |

**दिल्लीतील बँक्सः–**

| बँकेचे नाव | पत्ता |
|---|---|
| १) स्टेट बँक ऑफ इंडिया | ५१३१ न्यू बिल्डिंग, पार्लमेंट स्ट्रीट |
| २) बँक ऑफ इंडिया | ४, पार्लमेंट स्ट्रीट |
| ३) बँक ऑफ बडोदा | —,,— |
| ४) चार्टर्ड बँक | १७ —,,— |
| ५) पंजाब नॅशनल बँक | ५ —,,— |
| ६) रिझर्व्ह बँक | ६ —,,— |
| ७) कॅनरा बँक | मार्शल हाऊस, हनुमान रोड. |
| ८) ग्रीनलँड बँक | एच-ब्लॉक, कॅनॉट सर्कस |
| ९) आंध्र बँक | एम्–३६ —,,— |
| १०) विजया बँक | जी-४४ कॅनॉट सर्कस |
| ११) युनियन बँक ऑफ इंडिया | — कॅनॉट प्लेस |
| १२) मर्कन्टाईन बँक | २६, कस्तूरबा गांधी मार्ग |
| १३) सेंट्रल बँक ऑफ इंडिया | बहादूरशहा झफर मार्ग. |

**शॉपिंगला चलाः–**

१) **कॅनॉट प्लेस**:–या शॉपिंग सेंटर असलेल्या भागाची उभारणी इ. स. १९२० मध्ये भारताला भेट देणाऱ्या "ड्यूक ऑफ कॅनॉट" यांच्या स्मृत्यर्थ करण्यात आली. दिल्लीतील हे महत्त्वाचे व्यापारी केंद्र मानले जाते. लोकसभा गृहाप्रमाणेच गोलाकार खांबाची ही बाजारपेठ आहे. मध्यभागी हिरवळीवर थुईथुई नाचणारा कारंजा आहे. येथे विविध वस्तूंच्या दुकानाबरोबरच हॉटेल्स, एअरलाईन्स, रेल्वे प्रथम वर्गाची तिकीटे इ. कार्यालये आहेत. रविवारी कॅनॉट प्लेस बंद असते. सर्व प्रकारच्या वस्तू येथे मिळू शकतात.

२) **जनपथ**:–हे दिल्लीतील कपडयांच्या विक्रीसाठी प्रसिद्ध असलेले मार्केट. येथेही शोभेच्या वस्तू, बूट-चप्पल मिळतात. तयार कपडयांचे ढीगच्या ढीग रस्त्यावर असलेले दिसतात.

३) **करोलबाग**:–अजमलखाँ रोडवर असलेल्या या मार्केटमध्ये वेगवेगळ्या मिलचे कपडे, पुस्तके, संगीतवाद्ये इ. वस्तू मिळतात. इ. स. १९५० नंतर ही बाजारपेठ वसविण्यात आली. सोमवारी ही बाजारपेठ बंद असते.

४) **चांदणी चौक**:–जुन्या दिल्लीत लाल किल्ल्यासमोर जामा मशिदीच्या बाजूचा जो सर्व भाग येतो त्यास चांदणीचौक असे म्हणतात. दागिने, कोरीवकामाच्या वस्तू, चप्पल-बूट, कपडे, मशिनरी, घरोपयोगी सर्व वस्तू व अन्य वस्तू येथे मिळतात.

५) **चवरी बझार**:–येथे तांबे, पितळ, हस्तदंती वस्तू व घाऊक कागदाचा व्यापार चालतो.

६) **शंकर मार्केट**:–वेतकामाच्या वस्तू, बदाम, पिस्ता, काजू असा सुकामेवा मिळतो.

७) **मोहनसिंग प्लेसः**–(बाबा खरकसिंग मार्ग)–कॅसेट, रेडिओ, टेपरेकॉर्डर, इलेक्ट्रॉनिक वस्तू, कापड इ. मिळते.

८) **हँडलूम खरेदीसाठीः**–१) गांधी आश्रम खादी भंडार–कॅनॉट प्लेस

२) हँडलूम हाऊस-कॅनॉट प्लेस.

३) खादी ग्रामोद्योग भवन–२४, रिगल बिल्डिग.

४) हॅन्डीक्राफ्ट एक्सपोर्ट शोरूम–लोककल्याण भवन.

**विविध राज्यांचे एम्पोरियम**:–(बाबा खरकसिंग मार्ग, नवी दिल्ली.)

| राज्याचे नाव | एम्पोरियमचे नाव | राज्याचे नाव | एम्पोरियमचे नाव |
|---|---|---|---|
| १) पंजाब | फुलकरी | ९) आसाम | बी १. |
| २) उ. प्रदेश | गंगोत्री | १०) मणीपूर | गव्हन्मेंट एम्पोरिअम |
| ३) काश्मिर | झून | ११) प. बंगाल | मंजुषा |
| ४) महाराष्ट्र | त्रिमूर्ती | १२) त्रिपूरा | गव्हन्मेंट एम्पोरिअम |
| ५) कर्नाटक | कावेरी | १३) ओरिसा | उत्कल्का |
| ६) गुजराथ | गुर्जरी | १४) तामीळनाडू | पुंपूहार |
| ७) बिहार | अंबापाळी | १५) नागालँड | गव्हर्मेन्ट एम्पोरिअम |
| ८) दिल्ली | स्टेट इंडस्ट्रीज एम्पोरिअम | | |

**टिप**:–वरील एम्पोरिअममध्ये त्या त्या राज्यातील वैशिष्टचपूर्ण उत्पादने, हस्तकला व कलात्मक वस्तू उपलब्ध असतात.

**प्रमुख वस्तूंची विक्री:–**

| | वस्तूचे नाव | मिळण्याचे ठिकाण |
|---|---|---|
| १) | एअरकंडिशनर, रिफ्रेजरेटर | कमला मार्केट, दर्यागंज. |
| २) | आयुर्वेदिक औषधे | खारीबावली-फत्तेपुरी. |
| ३) | बुक सेलर | चवरीबझार |
| ४) | पी.व्ही.सी/रबर | तिलक बझार/सदर बझार. |
| ५) | इलेक्ट्रीक/इलेक्ट्रॉनिक | लजपतराय मार्केट |
| ६) | फर्निचर | राणी झाशी रोड. |
| ७) | चामड्याच्या वस्तू | करोलबाग-देवनगर |
| ८) | संगीतवाद्ये | नई सडक |
| ९) | कागद | चवरीबझार |
| १०) | स्टेशनरी | नई सडक-सदरबझार |
| ११) | विज्ञानवस्तू | लजपतराय मार्केट-दर्यागंज |
| १२) | खेळणी | सदरबझार. |

**दिल्लीतील सणसमारंभ:–**

१) **जानेवारी**–आयुष्यात प्रत्येकाने एकदा तरी प्रत्यक्ष पहावा असा नयन-मनोहर व भव्यतेने नटलेला प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम २६ जानेवारी रोजी सकाळी ८ पासून राजपथावर साजरा होतो. राष्ट्रपती यावेळी लष्करी व सांस्कृतिक सलामी स्वीकारतात. हा कार्यक्रम पहाण्यासाठी तिकीट असते. शाळा व कॉलेजला ग्रुप तिकीट १ महिना अगोदर मिळू शकते.

२) **फेब्रुवारी**–वसंत पंचमीचा सण मोठ्या उत्साहाने लोक साजरा करतात. यावेळी बहुतेक जण मोगलगार्डनला भेट देतात.

३) **मार्च**–होळी हा रंगाने न्हाऊन निघणारा आनंदाचा सण. उत्साहाने साजरा करतात.

४) **एप्रिल**–'निझामाबाद' येथे अमीर खुश्रूच्या जयंती निमित्ताने कव्वालीचा कार्यक्रम होतो.

५) **ऑगस्ट**–१५ ऑगस्ट हा स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम लाल किल्ल्यावर होतो. यावेळी पंतप्रधान राष्ट्राला उद्देशून भाषण करतात.

६) **ऑक्टोबर**–रामलीला कार्यक्रम वेगवेगळ्या संस्था सादर करतात. तसेच २ ऑक्टोबरला पंतप्रधान व अन्य लाखो जण राजघाटावर म. गांधींच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी जातात.

७) **नोव्हेंबर**–१४ नोव्हेंबरला नेहरू जयंतीला बालदिन साजरा करण्यासाठी दर वर्षी बालक मेळा भरविला जातो.

**मुलांना दिल्लीत विशेषतः काय दाखवाल ?:–**

लहान मुले ऐतिहासिक स्थळे, प्राचीन-अर्वाचीन वास्तूशिल्प इ. थोरांच्या बरोबर पहातातच पण कालांतराने या स्मृती ते विसरूनही जातात. या निरागस बालकांचा आनंद भिंतीवर कोरलेल्या इतिहासात नसतोच मुळी ! पशुपक्षी व भव्य वस्तू पहाण्यात त्यांना मौज वाटते. प्रेक्षणीय स्थळाच्या आसपास अशी कित्येक स्थळे असतात की, ती लहान, क्षुल्लक म्हणून आपण सोडून देतो. पण त्यामुळे मुलांना त्यांच्या आनंदापासून आपण दूर नेतो एवढे मात्र खरे. एखाद्या जुन्या किल्ल्यापेक्षा प्राणीसंग्रहालयात मुलांना नेऊन त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद बघा ! दिसतो ना हसरा ? मग मुलांसाठी तरी तुम्हाला त्या स्थळांना भेट द्यायलाच हवी.

१) **चिडियाघर**:–(पशुपक्षी संग्रहालय)–दिल्लीत जुन्या किल्ल्याजवळच हे प्राणीसंग्रहालय आहे. यात विविध पशुपक्षी ठेवलेले असून पुन्हा पुन्हा पाहूनही मुलांचे त्यात समाधान होत नाही. त्यांच्या मनोरंजनासाठी एक लहान रेल्वे येथे आहे.

२) **नॅशनल म्युझियमः**–यात भारतीय आणि एशियन ऐतिहासिक वस्तूंचा संग्रह आहे. जनपथावर असलेल्या या म्युझियममध्ये मुलांना विविध धातूंच्या मूर्ती, कोरीव लाकूडकाम, विविध जमातींच्या लोकांचे तयार केलेले नमुने, खेळण्यातील प्राणी इ. गोष्टी पहावयास मिळतात.

३) **मुलांचा बगीचाः**–इंडिया गेटजवळ चिल्ड्रन पार्क असून यात मुलांना खेळण्यासाठी सर्व सोयी उपलब्ध आहेत.

० ० ०

---



**दिल्लीमधील पर्यटकांचे माहेरघर**


**दिल्लीत राहण्याची व्यवस्था, परतीचे रेल्वे तिकीट**
**इ. सर्व व्यवस्था करू.**

**श्री. अनंतराव जोशी**

५२/५३ रामजस रोड, करोल बाग, न्यू दिल्ली.


---


TARKHANMAJRA TO DELHI
KHANNA
TARKHANMAJRA
CHANDIGARH
Morni Hills
AMBALA
RAJPURA
NABHA
PATIALA
SHAHABAD
THANESWAR
PIPLI
Jagadhari
KURUKSHETRA
CHAKRAVARTY LAKE
KARNAL
Jamuna
PANIPAT
SAMALKHA
SONIPAT
ROTAK
DELHI
Ghaziabad


JAMMU TO KHANNA
JAMMU
SAMBA
MADHOPUR
CHAKKI
PATHANKOT
GAGGAL
Jwalamukki
DASUYA
HOSHIARPUR
BHAKHRA DAM
BATALA
URMER
PHAGWARA
ROPAR
BEAS
KAPURTHALA
JULLUNDER
LUDHIANA
KHANNA
Tarkhanmajra
AMRITSAR
HARIKE



# आग्रा

**प्रेक्षणीय स्थळाचे नाव**:–आग्रा.

**राज्य**:–उत्तर प्रदेश.

**ऋतू**:–उन्हाळा–फेब्रु. ते मे पावसाळा–जून ते सप्टेंबर. हिवाळा–नोव्हें. ते जाने. ऑक्टो.–उष्मा.

**उष्णतामान**:–३१ अंश सें. ग्रे. उन्हाळा–४५ अंश सें. ग्रे.

**सरासरी पाऊस**:–६६. सें. मी.

**लोकसंख्या**:–७,७०,३५०.

**भाषा**:–हिंदी, इंग्लिश, ऊर्दू.

**येथे कोणत्या महिन्यात भेट द्याल?**–२५ ऑक्टोबर ते १५ मार्च तसेच एप्रिल मे महिन्यातही पर्यटक येतात. पण येथे उन्हाळा कडक असतो.

**उद्योग व कारखाने**:–दगडावरील कोरीव काम, लेदर वर्क.


**टूरिस्ट कार्यालय**:–गव्हर्नमेंट ऑफ इंडिया टूरिस्ट ऑफिस, १९१, दिमाल रोड, आग्रा. फोन–७२३७७.

**शेती**:–सुपिक जमीन,–गहू, तांदूळ, मका.

आग्रा साईट सीईंग व अन्य कोठेही जाण्यासाठी
घरगुती व चोख बस सर्व्हिस

**गुप्ता बस सर्व्हिस, १३७ शहाजदीमण्डी, आगरा (यु. पी.)**

(व्ही. डी. ओ . A. C., पुशबॅक, ९, १५, ३५, ४९ व ५५ सीट बस उपलब्ध)



**आग्रा**:—यमुना नदीच्या तीरावर वसलेले तसेच मोगल कारकीर्दीत वैभवसंपन्न राजधानीचा मान लाभलेल्या एका इतिहास प्रसिद्ध अग्रगण्य अशा या शहराचा विस्तार जवळजवळ ५००० स्क्वे. कि. मी. पसरलेला आहे. चार हजार वर्षापूर्वी महाभारत काळात या शहराचे नाव 'अग्रबन' असे होते. दुसऱ्या शतकात या शहराचे नांव 'आगरा' असल्याचा उल्लेख आहे. या शहराची कीर्ती भारतातच नाहीतर जगभर वाढवली ती तेथील सौंदर्यशाली ताजमहालने. म्हणून 'सिटी ऑफ ताज' असेही या शहरास संबोधतात. ताज म्हणजे मुगुट. भारताची शान वाढवणारा तो सरताज आहे.

आग्रा किल्ल्याच्या उत्तरेस जुने आग्रा शहर वसले असून कँटोनमेंटचा भाग म्हणजे आग्र्यातील नवीन वसाहत होय. येथेच 'आग्रा कॅन्ट' हे सेंट्रल रेल्वेचे स्टेशन आहे. येथूनच जवळ 'राजा की मण्डी' हे स्टेशन आहे. दिल्लीप्रमाणेच अनेक ऐतिहासिक वास्तू या परिसरात आढळतात. दक्षिण भारतातून येणारे बरेचसे प्रवासी आपल्या पर्यटनाचा श्रीगणेशा आग्र्यापासूनच करतात. आग्र्याला उत्तरभारतीय पर्यटनाचे महाद्वार म्हटले तर फारसे अतिशयोक्तीपूर्ण ठरणार नाही. या शहराला इतिहासकालीन संस्कृतीचा वारसा लाभलेला असल्यामुळे पाश्चात्य पद्धतीची भव्यता वा नाविन्यपूर्णता येथे गवसणार नाही. पण येथील प्रत्येक वास्तूतील नयनमनोहर सौंदर्य अद्वितीय आहे. 'आग्रा' पर्यटनातून वगळले तर पर्यटनाला अर्थ उरेल असे वाटत नाही. देशात वा परदेशात पहिला प्रश्न पर्यटकांना विचारला जातो 'ताजमहाल' पाहिला का ? या प्रश्नातच आग्रा शहराची शान सामावली आहे, यात शंकाच नाही. आग्रा हे शहर भव्य बाजारपेठही मानली जाते.

आग्र्याचा उदय घडवून आणण्यात राजा अग्रसेनचापण वाटा आहे, असे काही इतिहासकारांचे मत आहे. इ. स. १४७५ मध्ये बादलसिंगने आग्रा येथे स्वसंरक्षणार्थ एक किल्ला बांधला होता. इ. स. १५८२ मध्ये सिकंदर लोदीने या शहरापासून ४८५ मैलाच्या अंतरावर सिकंदरा नावाचे शहर उभारले होते. इब्राहीम लोदीचा बाबराने पराभव केल्यानंतर आग्रा शहर मोगलांच्या ताब्यात आले. सिकंदर लोदीपासूनच या शहराला राजधानीचा मान प्राप्त झालेला होता. इ. स. १५६६ मध्ये अकबराने आग्रा शहराचा विकास घडवून आणलेला होता. अकबराची राजधानी मात्र फत्तेपूर सिक्री हीच होती. अकबराचा मृत्यू आग्रा येथेच झाला. त्यानंतरचा वारस जहांगीरच्या काळात येथील बाजारपेठ वाढली. पण या बादशहाला काश्मिरचे आकर्षण अधिक होते. जहांगीरचा मुलगा 'शहाजहान' याने मात्र आग्रा येथे ताजमहाल बांधून जगाच्या इतिहासात 'आग्रा' शहराचे स्थान चिरंतन केलेले आहे. औरंगजेबने त्याच्या स्वभावानुसार आग्रा येथील सौंदर्यात फारशी भर घातली नाही. तो दक्षिणेकडे वळला त्यावेळी [illegible]र लोकांच्या हल्ल्याला हे बुलंद शहर बळी पडले. इ. स. १७६१ नंतर या शहराची बुट्टी [illegible] झाली. ब्रिटीश येण्यापूर्वीच हल्लेखोरांनी येथील सोने-चांदी, हिरे-माणिके

जे मिळेल त्या चिजा लुटून शहाजहानने वसवलेल्या या स्वप्न नगरीचे वैभव संपवले. आता शिल्लक आहेत त्या फक्त वैभवाच्या खुणा. आग्र्याचा सौंदर्यशाली दिमाख काळाच्या पडद्याआड गेलेला आहे.

**आग्र्याचा लालकिल्ला**:—आग्रा शहरात सध्या आपण जेथे 'लालकिल्ला' बघतो त्याच ठिकाणी पूर्वी 'बादलगड' नावाचा लहान किल्ला होता. हा किल्ला इ. स. १५४७ मध्ये उभारला. त्यानंतर अकबर हिंदूस्थानचा सम्राट झाल्यावर त्याने यमुना नदीकाठी आग्रा शहराच्या पूर्वेला इ. स. १५६५ मध्ये लालकिल्ला उभारला. हा किल्ला बांधण्यासाठी जवळजवळ ८ ते ९ वर्षे लागली व त्यावेळी ३५ लाख रुपये एकूण बांधकामाचा खर्च झाला. किल्ला बांधणीच्या वेळी कासिमखान नावाचा वास्तुतज्ञ सर्व काम पहात असे. इ. स. १५७४ मध्ये किल्ल्याची बांधणी पूर्ण झाली.

बाह्यपरिसर संपूर्ण लाल दगडांनी बांधलेल्या या भव्य किल्ल्याचे तांबडे जर्द प्रतिबिंब दुथडी भरून वाहणाऱ्या यमुनेच्या पाण्यात पाहून इंद्राच्या अमरावतीलापण निश्चित हेवा वाटला असावा. किंवा पृथ्वीवर वाहणाऱ्या या लाल सोमरसाच्या वाहत्या प्रवाहातील एक थेंब तरी आपल्या वाट्याला यावा असे सुरापान करणाऱ्या सुरांना खचितच वाटलें असेल. पृथ्वीच्या मुकुटात बसविलेला हा 'लालमणी' पाहून स्वर्गातल्या अप्सराही थक्कल्या असतील. पर्यटक जेव्हा किल्ल्याच्या समोर उभे राहातात त्यावेळी त्यांच्या डोळ्यात पडलेल्या लाल प्रतिबिंबाची धुंदी सौंदर्यशाली नजरेला चढते. आणि त्या धुंद मंत्रमुग्ध स्थितीतच किल्ल्याचे भव्य सौंदर्य हृदयात साठविले जाते.

आग्र्याचा लाल किल्ला हा मोगल साम्राज्याचा भव्य कलात्मक वारसा आहे. या किल्ल्याचा आकार काहीसा लंबवर्तुळाकार आहे आणि दीड मैलाच्या परिसरात याचा घेर पसरला आहे. किल्ल्याच्या चारही बाजूला संरक्षणार्थ दुहेरी भिंती आहेत. आतल्या भिंतीची उंची ७० फूट असून यमुनेकडील बाहेरच्या भिंतीची उंची ४० फूट आहे. तसेच सभोवताली २५ फूट रुंदीचा खडक आहे.

या किल्ल्याच्या आतील वैभवाला मोगल साम्राज्यात तर सीमाच नव्हती. किल्ल्याच्या आत एकाहून एक असे सुंदर ५०० प्रासाद होते. यातील फार थोडे अवशेष आता पाहायला मिळतात. येथील बांधकामात हिंदू-मुस्लिम कलेचा उत्कृष्ट समन्वय झालेला आढळून येतो. या किल्ल्यात जस्मिन पॅलेस म्हणून एक भाग आहे. येथून यमुनेच्या पात्राच्या कडेने सरळ नजर टाकली की 'ताजमहाल' दिसतो. औरंगजेबाने शहाजहानला त्याच्या वृद्धापकाळात येथे बंदिस्त ठेवलेले होते. अकबराने हा किल्ला संरक्षणाच्या दृष्टीने उभारला असला तरी शहाजहानने यात सौंदर्यशाली भर घातली ती कलेचा पुजारी म्हणूनच. या किल्ल्यास दिल्ली, अमरसिंग, दर्यायी व दर्शनी

चार दरवाजे आहेत. यापैकी पर्यटक ज्या दरवाजातून प्रवेश करतात तो अमरसिंग दरवाजा आहे. दिल्ली दरवाजाकडील भाग सध्या आर्मीसाठी दिला गेलेला आहे. बाकी दोन दरवाजे बंद आहेत.

**अमरसिंग दरवाजा**:–लालकिल्ल्याचे हे भव्य प्रवेशद्वार आहे. या दरवाजाच्या नावामागे पण एक मनोरंजक इतिहास उभा आहे. किल्ला बांधला मोगल सम्राटांनी आणि नाव मात्र रजपूत राजाचे. हे गूढच आहे ना ? इ. स. १६४० मध्ये शहाजहानचा दरबार लालकिल्ल्यात भरलेला होता. त्यावेळी दरबारात जयपूरचे महाराज अमरसिंग राठोड उपस्थित होते. दरबारात सलाबतखान नावाचा खजिनदार हजर होता. त्याने अमरसिंगचा अपमान केला. याचा बदला भर दरबारातच स्वाभिमानी अमरसिंगाने घेतला. मोगलांच्या सैनिकांनी त्याचा पाठलाग सुरू केला. अमरसिंग घोड्यावर बसून किल्ल्याच्या आतच घोडदौड करू लागला. पण घोडा किल्ल्याच्या भिंतीखंदक कसे पार पाडणार ? आणि काय आश्चर्य....अमरसिंगाच्या घोड्याने भिंतीवरूनच उंच उडी घेतली. स्वामिनिष्ठ प्राण्याचा शेवट काय झाला, हे सांगायलाच नको. या अमरसिंगाच्या शौर्यशाली कृत्यावर खूष होऊन बादशहाने त्या घटनेच्या स्मरणार्थ या जागी अमरसिंग दरवाजा उभारला.

**दर्यायी दरवाजा** :– लालकिल्ला यमुनेच्या काठीच आहे. नदीच्या बाजूला असलेल्या भिंतीच्या मध्यभागी हा दरवाजा आहे. यमुनेचे पाणी या दरवाज्यापर्यंत असायचे. मोगल साम्राज्यातील सौंदर्यसम्राज्ञी आणि शाही महिला या दरवाजातूनच स्नानासाठी नदीत प्रवेश करायच्या.

**दिल्ली दरवाजा**:–जामा मशिदीकडे तोंड करून असलेले हे लालकिल्ल्याचे सर्वाधिक प्रसिद्ध असे प्रवेशद्वार. या दरवाजाच्या दोन्ही बाजूला संगमरवराचे अष्टकोनी मिनारी खांब आहेत. मोगल काळात या दरवाजावर 'नगारखाना' असायचा. जेव्हा बादशहाचे आगमन होई तेव्हा स्वागतार्थ-सूचनार्थ येथे वाद्ये वाजविली जात असत. इ. स. १५६८ मध्ये अकबराने चितोडवर मिळवलेल्या विजयाच्या स्मरणार्थ येथे दगडाचे दोन कोरीव हत्ती बनवले होते. याच्या शेजारी शौर्याने लढणाऱ्या दोन रजपूत वीरांच्या प्रतिमापण होत्या. पण औरंगजेबाने आपल्या स्वभावास अनुसरून या प्रतिमेसह हत्तीपण उखडून टाकले.

**दर्शनी दरवाजा**:–जस्मिन मनोऱ्याच्या खाली हा दरवाजा बनवण्यात आला. उगवत्या सूर्याला नमस्कार करण्यासाठी बादशहा येथे येत असे. दर्शनाला येत असल्याने त्यास दर्शनी दरवाजा असे नाव पडले. प्रजेची मानवंदना बादशहा येथूनच स्वीकारत असे. कदाचित प्रजेला राजाचे दर्शन येथून होई, म्हणूनही यास दर्शनी दरवाजा म्हणत असावे. औरंगजेबने शहाजहानला लालकिल्ल्यात नजरकैद केल्यानंतर हा दरवाजा बंद करण्यात आला.

**जहांगीर महाल**:–अमरसिंग प्रवेशद्वारातून आत आल्यानंतर प्रथमच दर्शन होते ते 'जहांगीर महालाचे.' नांव जहांगीराचे असले तरी तो बांधला होता मात्र अकबराने. मोगल साम्राज्य काळात हा महाल स्वर्गीय सौंदर्याने नटलेला होता. जयपूरच्या रजपूतकालीन चित्र व शिल्प कलेचे प्रतिबिंब येथे उमटलेले दिसते. या ठिकाणी मोगल सम्राटची रजपूतराणी 'जोधाबाई' राहात असे. या महालाच्या पूर्वेला वाचनालय मंदिर, उत्तरेला बैठक तर दक्षिणेला चित्रशाळा होती. मोगल सम्राटांच्या पुढील वारसांनी काही सौंदर्यस्थळे बेचिराख केलीत. उरलेले वैभवशाली सौंदर्य आक्रमकांनी धुळीला मिळवले. लालकिल्ल्याच्या आतील भूतकालीन सौंदर्याचे वैभव दर्शविणारा हा महाल आहे असे खचितच म्हणता येईल.

**खासमहल**:–या ठिकाणी अकबराने इ. स. १६३६ मध्ये प्रथम एक सुंदर गृह उभारले होते. शहाजहानने हे स्थान नष्ट करून तेथेच खासमहल उभारला. हा संपूर्ण शुभ्र संगमरवरी दगडात उभारला आहे. शाही स्त्रियांसाठी येथे सौंदर्य प्रसाधनाची–सोय होती. याच्या आत शीशमहल होता. उन्हाच्या वेळी येथे अतिशय शांत व शीतल वाटत असल्यामुळे यास पूर्वी आरामगृह असेही संबोधले जात असे. हा महल ७० फूट लांब व ४० फूट रुंद आहे. या महालामध्येच असलेल्या हौदात गुलाबपाण्याचे कारंजेही पूर्वी उडवले जात असत. शहाजहान येथे विश्रांती घेत असे. या महालाचा अंतरभाग त्यावेळी सोन्यांनी व चित्रांनी मढवलेला होता. महालाच्या दक्षिण भागात शहाजहानची मुलगी शहानआरा व उत्तरेला रोशनआरा राहात असे.

**अंगूरीबाग**:–खास महालाच्या समोर सम्राट अकबराने आपल्या बेगमसाठी या खास बागेची उभारणी केली होती. येथे संगमरवरी बांधणीचा एक लहान तलाव आहे. राजघराण्यातील स्त्रिया येथे मुक्त जलविहार करीत असत.

**कृष्णवर्णी सिंहासन**:–१० × ९ आकार असलेले काळ्या संगमरवरी दगडातील हे सिंहासन अलाहाबाद येथे बनविण्यात आले आणि दिवाण-ई-खास समोर किल्ल्यात प्रशस्त जागी हे सिंहासन बसविण्यात आले. आजही ते पहायला मिळते. बादशहा प्रार्थनेसाठी या दगडी आसनावर बसत असे.

**मीना बझार**:–सम्राट अकबराने राजघराण्यातील स्त्रियांची खरेदीची हौस पूर्ण करण्यासाठी 'मीनाबझार' उभारला. मौल्यवान खडे, दागिने, कपडे, अनेक विविध तऱ्हेच्या वस्तू येथे मिळत असत. हा बाजार काही ठराविक काळातच भरत असे. पुरुषांना या बाजारात जाण्याची सक्त मनाई होती.

**दिवाण-ए-खास**:–लालकिल्ल्यातच यास शुभ्र संगमरवरी दगडांनी उभारलेला हा भव्य दरबार ठराविक सरदारांसाठीच असे. या महालातील कोरीव खांब दरवाजांच्या कमानी पाहिल्या की, नाजूक नक्षी कोरण्यासाठी संगमरवरी

त्यावेळी लोण्यासारखा मऊ तर झाला नव्हता ना ? अशी शंका मनाला स्पर्श करून जाते. इ. स. १६३७ मध्ये शहाजहानने दिवाण-ए-खासची खास उभारणी केली. ताजमहालचे कारागीर या शिल्पाकृतीसाठी त्याने वापरले होते.

शहाजहानच्या काळात या दिवाण-ए-खासच्या छताला रत्नमाणके जडवली होती. तसेच सोन्याची कलाकुसर केली होती. पण कालांतराने जाट लोकांनी केलेल्या हल्ल्यात हे वैभव नष्ट झाले. या अरसिक शत्रूंनी भारताचे ऐतिहासिक वैभवच धुळीला मिळवले.

**दिवाण-ए-आम**:–हा मूळ उभारला अकबराने. पण त्याचे सौंदर्यमात्र वाढवले शहाजहानने. निर्जीव दगडातून जिवंत सौंदर्य निर्माण करण्यासाठी शहाजहानने आपली कलासक्त वृत्ती पणाला लावली होती. लालकिल्ल्यात लक्ष वेधून घेणारी ही दुसरी सुंदर वास्तू आहे. येथील भिंतीलाच लागून संगमरवरी सिंहासनाचा भाग उभारला आहे. तेथे रत्नजडित सिंहासन ठेवले जात असे. आता तेथील संगमरवरात उरली आहेत ती केवळ आठवणींची पोकळ छिद्रे.


याठिकाणी आम जनतेसाठी दरबार भरत असे. याचा आकार १९२ × ६४ आहे. या महालातील खांबांची रचना अशी आहे की, आपण कोठेही बसलात तरी रत्नजडीत सिंहासन दिसू शकते. त्यास एकही खांब आडवा येत नाही. महालासमोरच भव्य पटांगण असून त्यात शामियाना उभा करून प्रजेला बसण्यासाठी व्यवस्था केलेली असे. हा ८ फर्लांग चौ. एरिया आहे. पूर्वीच्या काळी यांत्रिक सुधारणा नव्हती. तरीसुद्धा बादशहाने सिंहासनावर बसून उद्‌गारलेले वाक्य या भव्य दरबारात काना-कोपऱ्यात ऐकू जात असे. ही ध्वनीची क्रिया त्या महालाच्या रचनेतच लपलेली आहे. आजही आपणास यातील गूढ समजू शकत नाही.

**ताजमहल**:–भारतीय कलेची शान आणि मान आजही जगात उच्च ठेवण्यासाठी कोणती वास्तू कारणीभूत आहे ? या प्रश्नाचे एकमेव उत्तर आहे, 'ताजमहाल.'

सौंदर्याचा सरताज ! पृथ्वीच्या मस्तकावर ठेवलेला शुभ्र रुपेरी ताज-मुगुट ! सर्व धर्म-पंथ-भाषा-देश विसरून सौंदर्याचे एकमेव मनोहारी नयनरम्य स्थान म्हणून एकात्मतेने पाहिले जाणारे-एकमेव वास्तुशिल्प म्हणजे ताजमहाल ?

चांदी नव्हे तर चांदणे आटवून त्या शुभ्र दगडांनी तर ही वास्तू साकारली नसेल ना ? की रोज संगमरवरी दगडाला चांदण्याने धुवून ताजमहालचा एकेक भाग आकारण्यात आला असेल ? शिल्पकारांनी आपल्या जादुमय हातांनीच नाजूक छिन्नीचे घाव घालीत शुभ्र संगमरवर घडविलेत ? की फुलांच्या नाजूक देटानी वेल-बुट्टी कोरली ? की स्वर्गातील अमानवी अद्‌भुत शक्तीने गोठवलेले हे शुभ्रकाव्य

गंधर्वांनी अलगद पृथ्वीवर आणून ठेवले ? जगातील प्रसिद्ध कलाकारांनी अशा अनुप-मेय, अतुलनीय, अचाट, अप्रतिम सौंदर्याची घडण करण्यासाठी हिंदुस्थानची भूमीच हे सौंदर्य जोपासायला योग्य आहे असे समजून प्राणपणाने आपल्या कलेची संजीवनी संगमरवरी दगडावर ओतून त्यातून एका चैत्यनशील जिवंत कलेला जन्म दिला.



**प्रत्येक संगमरवरी चिरा भावनेत चिंब भिजवून तर हे अप्रतमि प्रेममंदिर उभारले गेले नसेल ना ! ताजमहाल. आग्रा.**

पत्नीच्या स्मरणार्थ ताज उभारला ती बेगम मुमताज लाजवाब, फार-फार सुंदर होती म्हणतात. त्या मृत स्त्रीचा सौंदर्यशाली आत्मा तर पुन्हा वेगळे सुंदररूप घेऊन शहाजहानला चांदण्या रात्री सोबत करायला ताजच्या रूपात साकारला नाही ना ?

मोगल साम्राज्य भारताच्या इतिहासातील एक अजोड वैभवशाली साम्राज्य होते. पराक्रमी-श्रीमंत ! पण सम्राट संपताच त्याचे वैभवही इतिहासजमा होऊ लागले. मोगल साम्राज्याचा खरा सम्राट 'ताजमहाल' आजही भारतावर नव्हे जगावर आपल्या सौंदर्यशाली अनभिषिक्त साम्राज्याचा अंमल गाजवीत आहे. अगदी मोगल वैभवाच्या थाटात. यानंतर एखादेवेळी या देशाचा इतिहास बदलेल. पण हा वैभवसंपन्न सौंदर्याचा इतिहास चिरंतन राहील. ताजवर चाल करून आलेल्या प्रत्येक शत्रूच्या तलवारी येथे नम्रतेने मॅन झाल्यात. तिरस्कार, चीड, शत्रुत्व, असुंदरता सर्वांचा एका शुभ्र दर्शनाने बिमोड झाला. ताजमधील हिरे-माणके हल्लेखोरांनी

काढली असतील पण ताजचे स्वयंभूत सौंदर्य ते लुटू शकले नाहीत. सौंदर्य लुटता येत नाही तर ते तेवढयाच पवित्र मनाने अस्पर्शित उपभोगायचे असते. शत्रूला आपली कृती बदलवून ताजच्या मोहक सौंदर्याने क्रूर दानवाचे क्षणार्धात कलाभक्त मानवात रूपांतर केले असेल. हातातील शस्त्र ताजच्या पायथ्याशी टाकून सौंदर्यशाली 'ताज'चे श्रेष्ठत्व आणि जेष्ठत्व मान्य करीत त्याला कुर्निसात करीत शत्रूने पराभव पत्करून काढता पाय घेतला असेल.

ताजच्या नाजूक, मोहक, शीतल, आकर्षक, मादक सौंदर्याचे वर्णन करणारा महाकवी अजून साहित्य शारदेच्या मंदिरात जन्माला यायचा आहे. तोपर्यंत 'हे ताजमहाला ! तू एकटाच आहेस. तुझे मोठेपण शब्दांच्या मर्यादेत, कवींच्या काव्यात, प्रतिभावंतांच्या प्रतिभेत, चित्रकारांच्या कुंचल्यात सामावणारे नाही. तुझ्या फुला-सारख्या नाजूक गोऱ्यापान शरीराला आतून शुभ्र दुधाने की, बाहेरून चांदण्याने न्हाऊ घातले हे आम्हाला अजूनही कळलेले नाही. तुझे वर्णन करताना काव्य भाषा लाजून चूर होते तर रंग स्वतःच बेरंग होतात. तुझा दिव्य-दिमाख हुबेहूब प्रतिबिंब टिपणाऱ्या पाण्याला पण अजून प्रतिबिंबीत करता आलेला नाही. शरदाच्या पौर्णि-मेला शुभ्रतेने सजून निघालेला चंद्र जलद ढगाआड का लपतो ? कारण तुझ्या शुभ्र-तेची वैभवसंपन्नता पाहून तर स्वतःचा कमीपणा तो ढगाआड लपवीत नाही ना ? हे कर्पूररंगा–तू मुमताजच्या अतुलनीय सौंदर्याचे शहाजहानला पडलेले एक तरळ स्वप्न आहेस.

ताजमहालचे आपण वर्णन करू तेवढे थोडे आहे. सौंदर्यासक्त मुक्तमनाने ताजमहाल पाहताना खरोखर आपण स्वप्नात शिरल्याचा भास होतो. असा हा ताज-महाल केवळ आग्र्याचे नव्हे तर सर्व भारत देशाचे वैभवस्थान आहे. पण त्याला शेकडो वर्षे जपण्याचा मान मात्र आग्र्याचाच आहे. ताजमहाल म्हणजे एक कबर. पण सौंदर्याला जन्म-मृत्यूचे भान नसते, अचेतनात ते सचेतना आणते.

मोगल साम्राज्याचा बादशहा शहाजहान याने आपली प्रिय पत्नी मुमताज बेगम हिच्या मृत्यूनंतर तिच्या स्मरणार्थ ताजमहाल उभारला. मुमताज इ. स. १६३१ च्या सुमारास निवर्तली. ती शहाजहानची दुसरी पत्नी. पण हा कलेचा बादशहा तिच्या सौंदर्यावर लुब्ध होऊन तिच्या संसारात इतका एकरूप झाला की तिचा विरह ही त्याच्या जीवनातील असह्य वेदना होती.

मुमताजला १४ मुले झाली आणि शेवटचे बाळंतपणच तिच्या जिवावर बेतले. बऱ्हाणपूरच्या मुक्कामात मुलाला जन्म देऊन तिने मात्र जीवन संपविले. तिचे दफन त्यावेळी बऱ्हाणपूरलाच झाले. त्यानंतर राजाचे राज्यकारभारात चित्तच लागेना. ह्या स्थितीतही त्याला आशेचा किरण गवसला. ६ महिन्यानंतर दफन केलेल्या मुम

ताजचा देह आग्र्यास आणण्यात आला व तेथील जयसिंगाच्या ताज नावाच्या बागेमध्ये तिचा पुन्हा दफनविधी झाला. अगदी राजइतमानाने बेगमचा अंत्यविधी झाला पण तिची स्मृती क्षणाक्षणाला चैतन्यशील होऊन राजाला अस्वस्थ करू लागली. बस्स ! बादशहाने मनोमन ठरविले, ताज बांधून मुमताजला मी अमर करणार. इ. स. १६३२ मध्ये खजिन्याचे दार सताड उघडले गेले. पर्शिया, व्हेनिया, इटाली, तुर्कस्थान, युरोप व हिंदुस्थान इ. देशात पसरलेले कलाकार, कारागिर यांना एकत्र करण्यात आले. ताज उभारणारा वास्तुशिल्प तज्ञ पर्शियन होता. त्याचे नाव 'उस्ताद ईसा.' इ. स. १६३२ मध्ये ताजमहालच्या बांधकामास सुरुवात झाली. फक्त दुधाळ चंदेरी संगमरवरी चिरे कलाकारांच्या नाजूक स्पर्शाने मोहरून निघाले. २० वर्षे काम चालले. इ. स. १६५२ मध्ये कोट्यावधी रुपये खर्च केल्यानंतर कलाकारांच्या अनंत श्रमाअंती शहाजहानचे स्वप्न साकार झाले.

यमुनाकाठच्या या बागेतील संपूर्ण जमिनीवर शुभ्र संगमरवरी दगड बसवला आहे. आजबाजूला हिरवी झाडे, हिरवळी, रंगीबेरंगी फुले आणि समोर ताजचे प्रतिबिंब हृदयाशी कवटाळणारे जलाशय. ताजच्या मध्यभागाचा घुमट ७७ मीटर उंच असून सभोवताली आकाशाशी स्पर्धा करणारे चार उंच मिनार आहेत. या शुभ्र घुमटाच्या खाली मुमताज व शहाजहान या दोघांच्या कबरी आहेत. प्राथमिक स्थितीत दोन्हीही थडगी हिरे माणकांनी सजवलेली होती. पण कालांतराने या गोष्टी नाहीशा झालेल्या आहेत.

शहाजहानची पत्नी 'अर्जुमन्द बानू' ऊर्फ मुमताज. तिचे वडील यामिनु दद्रौला जहाँगीरच्या दरबारात मानाचे पद भूषवित होते. मुमताजने खुर्रम ऊर्फ शहाजहानला तारुण्यात पदार्पण करण्यापूर्वीच आकर्षित केले होते. शहाजहानने तिच्याशी दुसरा विवाह केला. शहाजहान लढण्यासाठी दक्षिणेत आला त्यावेळी मुमताज त्याच्या सोबत होती. वयाच्या ३९ व्या वर्षीच तिचे निधन झाले. प्रियतमा, हृदयस्वामिनी मुमताज सोडून गेल्याचे कळताच एवढा प्रचंड मोगल साम्राज्याचा कणखर सम्राट पण दुःखाने विव्हळला. भावना वितळून अश्रूरूपाने डोळ्यावाटे ओघळल्या. सौंदर्याला मृत्यू असतो हे पुनः एकदा क्रूर दैवाने सिद्ध केले. मरणाआधीच मुमताजने आपल्या पतीला पुनः विवाह न करता मरणोत्तर भव्य मकबरा बनवण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्या अंतिम इच्छेला दिलेला प्रतिसाद म्हणजेच 'ताजमहाल.'

ताजमहाल या अप्रतीम इमारतीचे डिझाईन कोणी तयार केले, याबाबत विद्वानात मतभेद आहेत. युरोपियन इतिहासकारांच्या मते इटालीच्या जरूनिमो वेरिनियो याने किंवा फ्रान्सच्या आस्टीन दी बोरडक्स याने हे डिझाईन केले असावे, तर भारतीय इतिहासकारांच्या मते उस्ताद ईसा या कलानिपुण कलाकाराने तयार केले. या कलाकाराशी बादशहा शहाजहानची मुलाखत कशी झाली याचा इतिहासपण मनोरंजक आहे.

एकदा बादशहा मुमताजच्या विरह विचारात उद्विग्न स्थितीत बसला असताना असाच उद्‌वस्त मनाचा कलाकार अचानक तेथे आला. पत्नीच्या विरहाने तोपण व्यथित झालेला, कपडे फाटलेले पण हातातील रुमालावर एक विश्वसौंदर्य चितारलेले होते. याआधी बादशहानी अनेक डिझाईन पाहिली होती पण कोणाचेच डिझाईन पसंतीला उतरले नव्हते. रेशमी कापडावरील या डिझाईनने मात्र शहा-जहानला हरवलेले गवसले आणि मुमताजच्या इच्छापूर्तिचा क्षण जवळ आला. ते सौंदर्य साकारण्यासाठी कलाकारालापण कोणीतरी कलासक्त उदारदाता हवा होता. आणि बादशहाला कितीही किंमत ताजसाठी मोजावी लागली तरी स्वप्न साकारणारा समदु:खी कलावंत पाहिजे होता. या प्लॅनचे लाकडी मॉडेल शहाजहानला तयार करून पहायचे होते. त्याने प्रश्नार्थक नजरेने कलाकाराकडे पाहिले. 'उद्याच' उस्तादने उत्तर दिले. बादशहाला आश्चर्यच वाटले.

एकाच्या हातात लक्ष्मी तर दुसऱ्याच्या हातात कला. सरदार व दरबारी लोकांना बोलावण्यात आले. त्यांचे मत आजमावण्यात आले. ही स्मृतिवास्तू कोठे बांधायची याविषयी विचार विनिमय झाला. संगमरवर कोठून आणावयाचा याची चौकशी झाली. भविष्यवाल्यांना बोलावून शुभमुहूर्त काढण्यात आले. आणि मुमताजच्या सौंदर्याच्या कोंदणात बसवलेले एक चंदेरी स्वप्न साकार होऊ लागले. निवडक २० हजार कलावंत व कसबी कामगार कामावर रुजू झाले. खर्चासाठी खजिन्याचे दारच उघडले गेले होते. पाया खणताना यमुनेच्या पात्रातून निघणारी वाळू, तिचाच उपयोग करून नदीत बांध घालून नदीचे पाणी बांधकामासाठी अडविण्यात आले. यात देशो-देशीचे अनेक कलावंत होते. घुमट बांधण्यात प्रसिद्ध इस्माईल आमदानी यास तुर्कस्तान-मधून बोलाविले. तर कासीमखान सोन्याचा मुलामा चढविण्यात तरबेज होता. अमानतखान अरेबी भाषा कोरण्यात दर्दी होता. त्याच्या मदतीला बगदादचा मोहम्मदखान व सिरीयाचा अमानतखान होता. बलदेवदास हा फुले कोरण्यात हुशार होता. या शिवाय अमीरअली हा मुलतानहून व अमामुहम्मद बखाराहून तर बाबरखान पार्शियाहून येथे ताजमहालच्या कामासाठी आणले होते.

एका तपापेक्षा अधिक काळ चाललेल्या या कामासाठी मौल्यवान दगड, माणके व चंदनी लाकूड देशातून ठिकठिकाणाहून व परदेशातूनही आणले होते. शुभ्र संगमरवर राजस्थानातील मकाना व रायवळ येथून आणलेला तर काळा संगमरवर सुरतहून, खड-ग्वाल्हेर, फारंग-रशिया, बिलोर-हैद्राबाद, सुमग-अरेबिया, हिरे-पन्ना व लाल दगड-ग्वाल्हेरहून आणलेले होते.

ताजमहालच्या सभोवताली लाल चिरेबंद भिंत आहे. मुख्य द्वारातून आत येताच ताजबाग सुरू होते. ही बाग १५०० फूट लांब व १००० फूट रुंद आहे. काश्मिर

मधील मोगल बागांची छाप या बागेवर पडली आहे. ताजमहालच्या अगदी समोर कारंजे आहेत. मध्यभागी पाण्याने भरलेले जलाशय आहे.

**प्रवेशद्वार**:—ताजमहालच्या प्रवेशद्वाराची उंची १०० फूट आहे. या द्वारासाठी आठ प्रकारचे धातू वापरले असून लोखंडी सुळके आहेत. शहाजहानच्या काळात ताज म्हणजे सोने-चांदी-हिरे-माणिकांचा खजिनाच असल्याने तेथे सक्त पहारा ठेवला जात असे. आत येताच ताजबागेला सुरुवात होते. दाराच्या सरळ रेषेत शुभ्र ताजचे मनोरम रूप मनात साठवून घेता येते. १०।। फूट रुंदीचा एक जलप्रवाह थेट ताजच्या पायथ्यापर्यंत आहे. जवळजवळ ४२५ फुटाचे हे अंतर आहे. त्यातच कारंजेही आहेत. प्रत्यक्ष ताजमहाल उभारला तो संगमरवरी चौथऱ्यावर. पहिला लाल सँड-स्टोनचा चौथरा जमिनीपासून ४।। फूट उंच असून त्यावर १८ फूट उंचीचा दुसरा संगमरवरी चौथरा आहे. वर जायला दोन जिने असून २२ संगमरवरी पायऱ्या आहेत. ताजबागेच्या बाजूनी ताजच्या बांधकामाची बांधणी २४३ फूट व यमुनेच्या बाजूने ताजची उंची २७० फूट आहे.

मूळ चौथरा ते कमानीची उंची ८१ फूट, कमानीपासून घुमट ८९ फूट व घुमटापासून कळस २० फूट आहे. भोवतालच्या चारही मिनारांची उंची १४० फूट आहे. मिनारांचे तीन टप्पे असून १६१ पायऱ्या आहेत. (मिनारावर जाण्यास परवानगी नाही.) ताजमहालच्या शुभ्र घुमटाच्या बरोबर खालच्या बाजला बेगम मुमताजची कबर उंच चौथऱ्यावरून पुन: आत खाली पायऱ्या उतरून गेल्यानंतर दिसते. १०।। ते ६।। फूट चौथऱ्यावर ही ६।×३×२।।। उंचीची कबर बांधण्यात आलेली आहे. यावर काळ्या अक्षरात अर्जुमंद बानू १०४० हिजरी शक हा मृत्यू पावल्याचा उल्लेख आहे. या कबरीशेजारीच औरंगजेबने बांधलेली ११।।×७।। अशी शहाजहानची कबर आहे. मुमताजच्या कबरीपेक्षा ही कबर मोठी आहे. या कबरीचा संगमरवर पारदर्शक आहे. बॅटरीचा प्रकाश विरुद्ध बाजूला पाडला तर तो दुसऱ्या बाजने दिसतो. पण खऱ्या कबरीमात्र खालच्या तळघरात आहेत. कबरी-वर कोरलेली अल्लाची नावे व वचने मात्र कोणाला लुटून नेता आलेली नाहीत.

ताजच्या पूर्वेला जमातखाना, पश्चिमेला सुंदर मशिद आहे. मशिदीत सुंदर शुभ्र संगमरवरी दगड वापरला आहे. आतील बाजूला कोरलेली वेलबुट्टी, फुले सुंदर व नाजूक आहेत. या शेजारीच एक विहीर असून जवळच एक ओटा आहे. तेथेच मुमताजचे बऱ्हाणपूरहून आणलेले शव ताजमहालचे काम चालू असताना काही वर्षे ठेवण्यात आलेले होते. ताजमहालच्या चिऱ्याआड याप्रकारे खोल खोल इतिहास दडलेला आहे.

**उदमद-उद-दौलाह कबर**:—यमुनानदीच्या पैलतीरावर मोगल साम्राज्यात शुभ्र संगमरवरी दगडाचा पहिला मकबरा हाच उभारला गेला असावा. ताजमहाल उभारताना हा संगमरवरी शिल्पकलेचा नमुना त्यावेळी उपलब्ध होता.

मोगल साम्राज्याची राणी नूरजहाँ हिने आपला पिता मिर्झागियास बेग ऊर्फ एतमाऊददोलाच्या मृत्यूनंतर त्याच्या स्मरणार्थ उभारला आहे. हा मूळ इराणमधील तेहरान या ठिकाणचा एक गरीब नागरिक. नशीब अजमावण्यासाठी तो हिंदुस्थानात आला. त्यावेळी वाटेतच त्याला मुलगी झाली ती नूरजहाँ. मिर्झा गियास फत्तेपूर शिक्रीला येऊन अकबराच्या दरबारात कामाला लागला. नूरजहाँचे लहानपणीचे नांव मेहरुन्निसा होते. ती दिसायला अतिशय सुंदर होती. राजपुत्र सलीम व मेहरुन्निसा यांची दिलजमाई होणे हे सम्राट अकबराला मुळीच सहन झाले नाही. दरबारी नोकराची मुलगी आणि हिंदुस्थानच्या भावी सिंहासनाच्या सम्राटची पत्नी होणार हे त्यास आवडले नसेल. साम्राज्याबाबत बड्या दिलाने कारभार करणाऱ्या सम्राटाचे दिल याबाबतीत छोटे असावे. त्याने मेहरुन्निसाचे लग्न शेरअफगाणशी करुन तिला बंगालमध्ये पाठवून दिले.


बादशहा बादशाही हुकमाने राज्यावर कोणताही हुकूम गाजवू शकत असेल पण कुणाच्या दिलावर हुकूम गाजवण्याची हुकमत त्याच्या हातात नव्हती. अकबरानंतर जहाँगीराने नूरमहल ऊर्फ नूरजहाँला हस्तगत केलेच. प्रेम आणि युद्ध यात सर्व गोष्टी चांगल्याच मानतात हेच खरे. जहाँगीरशी निकाह लावल्यानंतर ती सौंदर्यसम्राज्ञी हिंदुस्थानची सम्राज्ञी झाली. विवाहानंतर तिने आपले वडील मिर्झा गियास बेग यांना जहाँगीरच्या दरबारात श्रेष्ठस्थान मिळवून दिले.

इ. स. १६२० मध्ये नूरजहाँनची आई मरण पावल्यानंतर तिचे वडील अतिशय दुःखी झाले आणि त्या दुःखातच त्यांचा लवकर अंत झाला. त्यावेळी इ. स. १६२२ मध्ये वडिलांच्या प्रित्यर्थ नूरजहाँने संगमरवरी मकबरा बांधायला घेऊन तो ५ वर्षात पूर्ण करवून घेतला. पतीच्या मृत्यूनंतर नूरजहाँने असाच मकबरा पाकिस्तानात लाहोरजवळ बांधून घेतला होता.

एतमाउददौला कबरीचा पाया १५० चौ. फूट लाल दगडात बांधला आहे. दोन मजल्याच्या या इमारतीच्या दरवाजासाठी लाल दगड वापरला असून इतरत्र शुभ्र संगमरवरी दगडावर फुलवेलींची नाजूक नक्षी कोरलेली आहे. या मकबऱ्याच्या चारही कोपऱ्यांना अष्टकोनी मीनार असून त्या प्रत्येक मिनारच्यावर खांबांना आधारीत घुमटाकार छत्री आहे. प्रवेश दरवाज्यावरच दोन घुमट एकत्र यावेत अशी एक छत्री आहे.

**राधास्वामी मंदिर**:—अजून पूर्णपणे अस्तित्वात न आलेले पण पूर्णरूपात साकार झाल्यावर हे संगमरवरी काम किती सुंदर असेल अशी कल्पना राधास्वामी मंदिरास भेट दिल्यावरच येते. अजूनही नाजूक कोरीव काम करणारे शेकडो शिल्पकार हातोडी, छिन्नीने संगमरवरी दगड घडवताना तेथे दिसतात. आजूबाजूला संगमरवरी दगडांचे प्रचंड खडकच आणून टाकलेले आहेत. गेली कित्येक वर्षे हे काम चालू आहे.

आणि पुढेही कितीतरी दशके ते चालू राहील असे वाटते. आग्र्याला मोगल साम्राज्या-पासून मिळालेल्या कलावंतांचा वारसा मात्र अजूनही संपलेला नाही. याचा चक्षुर्वै-सत्यम् पुरावा म्हणजे आजही उभारले जात असलेले राधास्वामी मंदिर.



**प्राचीन वास्तूशास्त्राला आवाहन देणारे आधुनिक संगमरवरी शिल्प. राधास्वामी मंदिर, दयाळबाग आग्रा.**

राधास्वामी या नावामुळे हे मथुरेतील मंदिरांप्रमाणे एखादे कृष्णाचे मंदिर असावे असे वाटते, पण कृष्ण या भक्तिभावाशी या मंदिराचा काही संबंध नाही. आग्र्यापासून ४ मैल अंतरावर ही समाधी उभारली जात आहे. या समाधीची प्रतिकृती पाहिल्यानंतर ही समाधी की मंदिर हे ओळखणेच कठिण जाते. पर्शियन वास्तुशिल्पाचा गाढ परिणाम या प्रतिकृतीच्या आकारावर आढळून येतो. मुख्य द्वाराच्या दगडावरील कोरीवकाम मोहक आहे. अजूनही काम अपूर्णच आहे. पण दरवाजातील आर्च गोव्यातील चर्चचा दरवाजा पाहिल्याची आठवण करून देतात.

ज्या थोर संत पुरुषाच्या स्मरणार्थ ही समाधी बांधली जात आहे ते मूळ आग्रा येथील 'पन्नीगल्ली' मोहल्ल्यात राहाणारे. त्यांचे मूळ नाव होते शिवदयाळसिंह. यानाच लोक स्वामीजी महाराज म्हणत. त्यांनाच राधास्वामी असे संबोधून सत्संगाचा फायदा अनेक लोकांना झाला. याच गादीच्या परंपरेतील तिसरे महापुरुष 'महाराज साहब' हे होते. वाराणशीत वुद्धिवान घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांनी Discourses on Radhaswami Faith हे पुस्तक लिहिले. या पुस्तकात राधास्वामी महाराजांचे तत्त्वज्ञान व विचारप्रणाली प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. यांच्यानंतर वाबूजी महाराज या गादीवर स्थानापन्न झाले. यांनी स्वामीजींच्या विचारांचे मार्मिक विश्लेषण प्रवचनाद्वारे करून ते तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहचवण्याची महान कामगिरी केली.

राधास्वामी ट्रस्ट समितीचे मुख्य कार्यालय स्वामीबारा आग्रा येथे आहे. स्वामीबारा येथे प्रतिदिन स्वामीजी स्वतः येत असत. येथेच सत्संग, भजनादी कार्यक्रम होत असे. या कार्यक्रमात धार्मिक भेदभाव न ठेवता हिंदु, मुस्लीम, ख्रिश्चन, पारसी व जैन असे सर्व धर्मीय लोक एकत्रित येत. याच सर्वधर्म व सर्व कलांच्या समन्वयाचे प्रतीक म्हणून 'स्वामीमहाराजांची' समाधी एक उत्कृष्ट वास्तूशिल्पाचा नमुना असावा. तिसरे वारसदार श्री. महाराजसाहब यांनी या वास्तूच्या बांधणी संबंधी इ. स. १६०४ मध्येच सुरुवात केली.

जेथे राधास्वामी मंदिर (दयाळबाग) उभारले जात आहे तेथील जमीन रेतीची भुसभुशीत असल्याने या भव्य इमारतीचा पाया रचणे कठीण होते. यासाठी प्रथम ५२ विहीरी खोदण्यात आल्या, त्या विहीरी एकमेकांना जोडण्यात आल्या. या प्रत्येक विहिरीवर ६'×४' मोठे चबुतरे बांधण्यात आले. आणि यांना जोडून एक मजबूत भिंत उभारण्यात आली. या भिंती पक्का चुना व विटा यांनी बांधल्या आणि विहिरीच्या आत चुना व गिट्टीचे मिश्रण ओतण्यात आले आहे.

या कामाचे मुख्य निरीक्षक व इंजिनीयर होते श्री. लाला तोताराम. हे खानदानी शिल्पकारही होते. त्यांचे शिक्षण सिव्हिल इंजिनियरिंग कॉलेज सडकी या ठिकाणी झाले. त्यांनी राधास्वामी समाधीचे डिझाईन बनवण्यात आपली बुद्धी व कौशल्य पणाला लावले. भारताचा जगाला अभिमान वाटावा असे प्राचीन स्थापत्य कलेचे पुनरुज्जीवन करण्याचे श्रेय निश्चितच श्री. लाला तोतारामजी यांना द्यावे लागेल.

मुख्य समाधी कशी असेल:—या वास्तूशिल्पाची एकूण उंची १९३ फूट ४ इंच असेल, १०० गोलाकृती दरवाजे, समाधीच्या दोन्ही टोकाला दोन घुमटाकृती छत्र्या, मध्यभागी पहिल्या मजल्यावर मूळ प्रवेशद्वार, चार बाजूला उंच जाणारे चारमिनार,

जाट
वाताहत

(यांची उंची १०४' असेल.) मुख्य दरवाज्यावर पुन: लंबगोलाकृती दरवाजा पाहिल्यावर चर्चसारख्या डिझाईनचा भास होतो. या समाधीतील मुख्य भवन आकर्षक शिल्पकलेचा नमुना असेल. येथे ६५'×६५' चा हॉल असेल. या भवनातील छत ह्या शिल्पकलेतील उच्च नमुना मानावा लागेल. सभोवती खोदलेले खांब आणि दरवाज्याच्या कमानी यातच शिल्पकारांनी चैतन्य आणलेले आहे. निर्जीव संगमरवर कलात्मक शिल्पाने सजीव झाले आहेत. या समाधीसाठी अकीक, सिमाक, विल्लोर, लाजवर्द, मरगज, गौरी, रतक, यशब, पितौनिया इ. किंमती सुंदर व रंगीबेरंगी दगडांचा उपयोग केला आहे.

शुभ्र संगमरवरातून एक जलप्रवाह सोडण्याची योजनाही समाधीजवळ करण्यात येणार आहे. ही शिल्पाकृती पूर्ण झालेली पाहण्याचे भाग्य कोणत्या पिढीला लाभेल हे आज सांगणे कठीण आहे. येथे काम करणारे कलावंत रोजदारीवर नाहीत, तर ते क्षणाक्षणाला आपला प्राण निर्जिव दगडात ओतून त्यास शिल्पकलेच्या अमृत स्पर्शाने सजीव करीत आहेत. अजून कितीतरी वर्षे या कामासाठी खर्च होतील, खर्चही बेसुमार वाढेल. पण अणुयुगातही भारतात कला व कलावंत जिवंत आहेत याची जाणीव निश्चितच जगाला होईल.

आग्रा येथे उतरल्यावर पर्यटनासाठी कोणाशी संपर्क साधाल ?

१. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया टूरिस्ट ऑफिस—१९१ दमालरोड आग्रा. फोन—७२३७७.

२. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया टूरिस्ट—इन्फरमेशन काऊंटर. फोन—६२२४४.

३. यू. पी. गव्हर्नमेंट टूरिस्ट ब्युरो—६४, ताज रोड. फोन—७५८५२.

४. यू. पी. गव्हर्नमेंट टूरिस्ट काऊंटर—आग्रा कॅन्ट रेल्वे स्टेशन. फोन—६१२७३.

**खालील ठिकाणे पाहण्यासाठी संपर्कः—**

| अ.नं. | ठिकाण | वेळ | कि.मी. | कोणाशी संपर्क साधाल |
|---|---|---|---|---|
| १. A. | फत्तेपूर-शिक्री | ८ ते ६ | ३७ | यु. पी. स्टेटरोड |
| | आग्रा किल्ला | ८ ते ६ | ३ | ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन |
| | ताजमहाल | ८ ते १० | ३ | |
| B. | | | A.C. कोच | जनरल मॅनेजर UPSTC ९६, ग्वाल्हेर रोड, फोन—७२२०६ |
| C. | | | A.C. कोच चहा जेवणासहित | इनक्वायरी काऊंटर प्लॅटफॉर्म नं. १, आग्रा कॅन्ट रेल्वे स्टेशन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | ताजमहाल | ८ ते १० | ३ | ITDCट्रान्सपोर्ट युनीट |
| | आग्रा किल्ला | ८ ते ६ | ३ | हॉटेल मुमताज |
| | | | | अशोक, १८१।२ |
| | उद्मद्-उद्-दौलाह कबर | ८ ते ६ | ६.२ | फत्तेहबाद रोड, फोन–६१७५५ |

| अ.नं. | ठिकाण | वेळ | कि.मि | कोणाशी संपर्क साधाल |
|---|---|---|---|---|
| ३. | फत्तेपूर-सिक्री | ८ ते ६ | ३७ | गव्हर्नमेंट ऑफ |
| | सिकंदरा | ८ ते ६ | १० | टूरिस्ट कार्यालय |
| ४. | राधास्वामी मंदिर | ८ ते ५ | ८ | |
| ५. | चिनी-का रोझा | ६ ते ८ | ९ | |
| ६. | मॉलियम कबर | ६ ते ८ | १० | |

**कारसेवा**:–(खालील ठिकाणी उपलब्ध आहेत.)

१. इंडिया टूरिझम डेव्हलपमेंट कार्पोरेशन. फोन–६१७५५.

२. ताज ट्रॅव्हल्स:–क्लार्क सिराझ. फोन–७३५१७.

३. टूरिस्ट गाईड सर्व्हिस:– फोन–७२२०२.

४. **टॅक्सी**:–यासाठी ड्रायव्हरशी अर्धा दिवस, पूर्ण दिवस असे युक्तीने भाडे ठरवावे. यात कि. मी. चाही विचार होतो.

**बससेवा**:–१०, १९, ३५ व ४९ सीटची बस आपण सांगाल त्या साईट सीईंगला दिवसभर मिळू शकते. लक्झरी २ × २ सेमी-लक्झरी ३ × २ तसेच व्ही. डि. ओ. कोच व A·C. असे त्यात प्रकार आहेत.

**संपर्क**:–१) गुप्ता बस सर्व्हिस–मालक विजयकुमार गुप्ता.

२) अजय ट्रॅव्हल्स–मालक–हरि ॐ गुप्ता.

३) गोयल बस सर्व्हिस:–

**राहाण्याची उच्च दर्जाची हॉटेल्स:–**

| अ.नं. | हॉटेलचे नाव | पत्ता | A.C. | फोन |
|---|---|---|---|---|
| १. | हॉटेल मोगल शेरेटन | ताजगंज | ,, | ६४७०१ |
| २. | हॉटेल सौरभ | फतेहाबाद रोड | ,, | ६५५०६ |
| ३. | ग्रँड हॉटेल | १३७, आग्रा कॅन्ट स्टेशन रोड | ,, | ७६३११ |
| ४. | गॅलक्सी शॅन अँड शॅन | फतेहाबाद ताजगंज | ,, | ६४१७१ |
| ५. | हॉटेल क्लार्कस शिराझ | ५, ताज रोड, आग्रा कॅन्ट | ,, | ७२४२१ |
| ६. | हॉटेल मुमताज अशोक | १८१।२, फतेहाबाद रोड | ,, | ६४७७१ |
| ७. | हॉटेल मयूर कॉम्प्लेक्स | फतेहाबाद रोड | ,, | ६४८४१ |

**मध्यमवर्गासाठी हॉटेल्सः-**

| अ.नं. | नाव | पत्ता | फोन |
|---|---|---|---|
| १. | आग्रा हॉटेल | जनरल करिअप्पा रोड | ७२३३० |
| २. | हॉटेल प्रिया | ग्वालीयर रोड, बालुगंज | ७५४०४ |
| ३. | हॉटेल टूरिस्ट | द माल रोड | ७७०६५ |
| ४. | खन्ना हॉटेल | अजमेर रोड | ६६१५७ |
| ५. | हॉटेल रणजीत | न्यू आग्रा कॅन्ट स्टेशन रोड | — |
| ६. | इम्पीरियल हॉटेल | एम्. जी. रोड | ७२२७३ |
| ७. | दिनेश लॉज | स्टेशन रोड | — |
| ८. | जग्गी हॉटेल | सादर बझार | — |
| ९. | बेंगाल हॉटेल | रकबगंज रोड | — |
| १०. | UPSTDC टुरिस्ट बंगलो | राजाकी मंडी स्टेशनसमोर | ७२१२३ |
| ११. | P.W.D. इनस्पेक्शन बंगला | एम्. जी. रोड | — |

**कमी दरातील निवासस्थानेः-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एक्सप्रेस हॉटेल | एम्. जी. रोड | ७५५५८ |
| २. | किरण हॉटेल | शिवाजी मार्केट | — |
| ३. | सिंधपंजाब हॉटेल | फाऊन्टन | ७३१५९ |
| ४. | आनंद लॉज | इदगाह बस स्टेशनजवळ | — |
| ५. | टूरिस्ट होम | शाहाजदी मण्डी | ७५४६८ |
| ६. | हॉटेल जयहिंद | मौलखा रोड | ७३५०२ |
| ७. | हॉटेल धरमलोक | राजा की मण्डी | ६१९९९ |
| ८. | शिताझे हॉटेल | देहली गेट | ७५४७२ |
| ९. | अशोक हॉटेल | देहली गेट | ७५१०६ |
| १०. | हॉटेल अप्सरा | पिपळ मण्डी | ६३३९९ |
| ११. | प्रकाश हॉटेल | जोहरी बझार | ६२७३३ |
| १२. | टूरिस्ट गेस्ट हाऊस | ग्वाल्हेर रोड | ७५८०९ |
| १३. | देवीका हॉटेल | छिपीतोला रोड | ७३७९६ |
| १४. | दिपक लॉज | नामनायर रोड | — |

**धर्मशाळा (ग्रुपसाठी उत्तम व्यवस्था) :-**

| नाव | पत्ता |
|---|---|
| १. आगरवाल पंचायती धर्मशाळा | राजा की मण्डी रेल्वे स्टेशन |
| २. प्रतापचंद गेस्ट हाऊस | राजा की मण्डी रेल्वे स्टेशन |
| ३. गयाप्रसाद बिहारीलाल धर्मशाळा | आग्रा कॅन्ट स्टेशनसमोर |
| ४. जानकीप्रसाद धर्मशाळा | मदनमोहन दरवाजा. |

**आग्रा येथील इतर ट्रॅव्हल एजंटः-**

| ट्रॅव्हल कंपनीचे नाव | पत्ता | फोन |
|---|---|---|
| १. आग्रा ट्रॅव्हल एजंट | प्रतापपूरा अजमेर रोड | ७२५१२ |
| २. सीता ट्रॅव्हल | ताजरोड | ६४७०१ |
| ३. आग्रा टूरर्स | एम्. जी. रोड | ७२७८६ |
| ४. ट्रॅव्हल ब्युरो | हॉटेल मयूरजवळ, फतेहाबाद रोड | ७५७६० |

**आग्रा येथील बँक्सः-**

| नाव | पत्ता | फोन |
|---|---|---|
| १. अलाहाबाद बँक | ताजरोड | ७२४२१ |
| २. बँक ऑफ बरोडा | एम्. जी. रोड | ७५३६३ |
| ३. कॅनरा बँक | एम्. जी. रोड | ७३७४० |
| ४. सेंट्रल बँक ऑफ इंडिया | एम्. जी. रोड | ७२३०३ |
| ५. युनियन बँक ऑफ इंडिया | — | — |
| ६. पंजाब नॅशनल बँक | राजा की मण्डी | ७६७६२ |
| ७. युनायटेड कमर्शिअल बँक | — | — |
| ८. स्टेट बँक ऑफ इंडिया | छिपीतोला | ७४०६१ |
| ९. यू. पी. को-ऑपरेटिव्ह बँक | — | — |

**आग्रा येथील औषधाची दुकानेः-**

१. कॅश केमिस्ट–हॉस्पिटल रोड

२. प्रकाश केमिस्ट–राजा की मण्डी

३. चाचाजी मेडिकल–प्रतापपूरा

४. नॅशनल मेडिकल स्टोअर्स–हॉस्पिटल रोड

**आग्रा येथील सिनेमा थिएटर्सः-**

१. अंजना–राजा की मण्डी–७६८७०

२. भारत–ग्वाल्हेर रोड ७२९४१

३. मेहेर–एम्.जी.रोड ६४३६८

४. शहा टॉकीज–एम्.जी. रोड६२२६२

५. भगवान–सिव्हील कोर्ट ७५३३४

६. मंजुश्री–राजा की मण्डी ७२९४१

७. नटराज–सूर्यनगर ६४१९२

**आग्रा येथील हॉस्पिटल्सः–**

१. कँटोनमेंट जनरल हॉस्पिटल
२. बॅटीस्ट खंबा
३. ले मेंटल हॉस्पिटल
४. लेडी लील अँण्ड डफरीन (मॅटर्निटी)
५. म्युनिसिपल वीमेन्स
६. सरोजिनी नायडू हॉस्पिटल.

**आग्रा येथील क्लबः–**

१. आग्रा क्लब–१९१ दी माल रोड
२. लायन्स क्लब–सदर बझार
३. रोटरी क्लब–आग्रा युनर्व्हसिटी
४. ताज नगर जरासी–हॉटेल मोगल शेरेटन
५. लायन्स क्लब–मुझफूर खान
६. लायन्स क्लब–नंद टॉकीज समोर
७. रोटरी क्लब–सुभाष बझार.

**आग्रा येथील प्रार्थनामंदिरेः–**

१. सत्यनारायण मंदिर–शहाजादी मण्डी
२. कैलास मंदिर–रावतपूरा
३. पारसी टेंपल–रूस्तान बाग
४. बुद्ध विहार–पावर हाऊस स्टेशन
५. सेंट्रल मेथडिस्ट चर्च–एम्.जी. रोड
६. गुरुद्वारा गुरुसिंग साहब —
७. आर्य समाज मंदिर
८. अकबर मशिद
९. सेंट पीटर चर्च
१०. दिगंबर जैन मंदिर
११. जामा मशिद.
१२. मंगलेश्वर मंदिर.

**शैक्षणिक संस्थाः–**

१. आग्रा युनिव्हर्सिटी
२. इंजिनियरिंग कॉलेज
३. स्टेट लेदर इन्स्टीटयूट
४. बी. ज. जैन गर्ल्स डिग्री कॉलेज
५. S. N. मेडिकल कॉलेज
६. विमेन ट्रेनिंग कॉलेज.


**खाण्यासाठी हॉटेल्सः–**

१. व्हेजिटेरियन–धार्मिक–एम्.जी. रोड
कॅन्डी–सदरवहार
लक्ष्मीविलास–सदरबहार

२. नॉन व्हेजिटेरियनः–
आग्रा कँटरर्स–द माल रोड.
क्वालिटी–सदरबहार
पेशवाई–एम्. जी. रोड
प्रकाश–सदरबहार
ताज रेस्ट रंट–ताजमहालजवळ

**आग्रा येथील शॉपिंग सेंटरः–(शॉपिंगला चला.)**

१. बी. आय्./आर्. ए. बझार
२. छाता बझार
३. फ्रीगंज
४. गुदरी मन्सूर
५. सुभाष बझार
६. काळा महल बझार.
७. काश्मिरी बझार.
८. फव्वारा बझार
९. सब्जी मण्डी
१०. सदरबहार



# फत्तेपूर

**फत्तेपूर–सिक्री**:–वेस्टर्न रेल्वेने आग्रा फोर्टकडे जाताना आग्र्याच्या अगोदर ३७ कि. मी. अंतरावर फतेपूर-सिक्री हे रेल्वे स्टेशन आहे. रेल्वेस्टेशनमध्ये गाडी शिरण्याच्या आतच धावत्या गाडीच्या खिडकीतून तांबड्या जर्द बुलंद दरवाजाचे दर्शन होताच हे निश्चितच ऐतिहासिक ठिकाण आहे याची जाणीव होते.

मोगल साम्राज्याचा तिसरा सम्राट अकबर बादशहाने शिक्री येथील किल्ल्याची उभारणी केली. इ. स. १५७० मध्ये अकबर येथे आला. इ. स. १५८२ मध्ये सिक्री येथील किल्ला (राजवाडा) बांधून पूर्ण झाला. पूर्ण तपाची ही तपश्चर्या आहे.

ओसाड किंवा वैराग वाळवंटात अनपेक्षित् एखादा प्रचंड लालमणी आपणास दिसला की कसा विस्मय वाटेल तीव भावना तांबड्या फतेपूरकडे पाहिले की निर्माण होते. इ. स. १५८६ मध्ये अकबराने फत्तेपूर–सिक्री सोडून आग्रा येथे प्रयाण केले. बादशहा गेला पण त्याने निर्माण केलेल्या बादशाही सौंदर्याची स्मृती मात्र त्याला नेता आली नाही. मोगलांच्या भव्य-श्रीमंत साम्राज्याची स्मृती म्हणून उभा असलेला बुलंद दरवाजा मान उंचावून जणू जगातील सर्व दरवाज्यांनाच आव्हान करीत आहे असे वाटते. अकबराच्या काळात मोगल साम्राज्यात काय कमी असणार? हो, पण एक कमतरता मात्र होती. मोगल साम्राज्याच्या सिंहासनाला वारसा नव्हता. बादशहाने कितीतरी मन्नता बाळगलेल्या पण व्यर्थ. याची हळहळ सर्वांनाच होती.

अकबराला चार बायका होत्या. दोन हिंदू, एक मुस्लिम व एक ख्रिश्चन. खऱ्या अर्थाने धर्मसमन्वयाचा प्रयोग करणारा हा पहिला आणि शेवटचा बादशहा असावा. पहिली हिंदू बायको होती 'जोधाबाई.' ही राजा उदयसिंगची मुलगी. राजा मानसिंगची

बहिण. दुसरी 'मरियम' ही बिकानेरची होती. तिसरी सुलताना रुकैय्या बेगम ही तुर्की असून इस्तंबूलची राहाणारी होती. आणि चौथी राणी होती गोव्याची ख्रिश्चन मेरी. याशिवाय जनानखान्यात ३०० दासी अकबराच्या सेवेसाठी होत्या.

चितोडच्या महाप्रतापी महाराणा प्रतापवर अकबराने स्वारी केली तेव्हा लक्षर्हत विजय प्राप्त केल्यावर बादशहा एका प्रख्यात फकीर 'सलीम चिस्ती'कडे आला, व त्याने आपण निपुत्रिक आहोत तेव्हा मला पुत्र व्हावा अशी गुडघे टेकून प्रार्थना केली. सलीम चिस्तीने त्यास 'तुला मुलगा होईल पण एका अटीवर.... पहिला मुलगा तू मला अर्पण करायला पाहिजेस.'


बादशहाने क्षणाचा विलंब न लावता विनंती मान्य केली. सर्वप्रथम राजाने आपली राणी मरियमला येथे आणले. तिला मुलगा झाला. तो कबूल केल्याप्रमाणे सलीम चिस्तीला देण्यात आला. सलीम चिस्तीने मुलाला मांडीवर घेऊन त्याचे नाव 'सलीम' असे ठेवले आणि तो मुलगा अकबराला परत केला. हाच सलीम ऊर्फ शेखू, ऊर्फ नुरुद्दीन ऊर्फ जहाँगीर अशा चार नावांनी ओळखला जाऊ लागला. यानंतर जिया (जोधाबाई) ला पण दोन मुले झाली. एक दानेमाल व दुसरी मुराद. मेरी व रुकय्या या राण्यांनासुद्धा अनुक्रमे एकेक मुलगी झाली.

राजपुत्र जहांगीरचा जन्म सिक्री या ठिकाणी झाला म्हणून बादशहाने त्या गावाला राजधानीचा मान दिला. आज जेथे फत्तेपूर वसले आहे तेथे सलीम चिस्ती रहात असे. गुजराथच्या मोहिमेत फत्ते झाली, यश मिळाले म्हणून राजाने सलीम चिस्तीच्या आश्रमासभोवती फत्तेपूर नावाची वसाहत वाढविली. आणि या दोन नावातूनच 'फत्तेपूर-सिक्री' या प्रसिद्ध ऐतिहासिक नावास आकार मिळाला.

फत्तेपूर सिक्री हा सम्राट अकबराचा लाल दगडांनी उभारलेला राजवाडाच. यातील बरेच वैभवसंपन्न व भव्य काम आजही जसेच्या तसे पहाण्यास मिळते. भूतकालीन इतिहासाच्या स्मृती उजळून निघतात.

**दीवाने-आम**:—ही अकबराची लोकसभाच होती. अकबर प्रजेची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी येथे बसत असे. त्याच्या दोन्ही बाजूस बेगमांना बसण्यासाठी जागा असत. खालच्या तख्तावर ४ हिंदू व ५ मुस्लिम असा 'नवरत्नांचा' दरबार असे. यात बिरबल, तोडरमल, उदयसिंग, मानसिंग, अबूफजल, बैरामखान, मुल्ला-दोपाजा व तानसेन यांचा समावेश होता. ही दरबाराची जागा ३६५ फूट लांब व १८१ फूट रुंद आहे. येथेच न्यायदानाचे काम होत असे. अकबर गुन्हेगाराला कडक शासन करीत असे. बादशहाच्या डाव्या हातास पुढील बाजूस मैदानातच एक छोटा दगड आहे. त्यास 'हरण' नावाचा हत्ती साखळदंडाने बांधलेला असायचा. जो भयंकर गुन्हा करेल त्याला हातपाय बांधून हत्तीसमोर टाकले जाई. हत्ती त्या गुन्हेगाराला पायाने चिरडून मारीत असे. पण एखाद्याला हत्तीने चिरडले नाही तर त्यास निर्दोष मानून सोडून देत असत.

**पंचमहल** :– हा फतेपूर-सिक्रीच्या राजवाड्यातीलच पाच मजल्याची बौद्ध पॅगोडासारखी बांधलेली इमारत आहे. खाली मोठे व वर क्रमाक्रमाने लहान-लहान मजले उभारले आहेत.



**सर्वधर्मसमन्वयाचा वास्तूशास्त्रातील प्रत्येक पंचमहल, फत्तेपूरसिक्री.**

या पंचमहालाची उभारणी करण्याचे प्रमुख कारण म्हणजे सम्राट अकबराची हिंदूराणी जोधाबाई. ही रोज सकाळी सूर्यदर्शन पाचव्या मजल्यावरून घेत असे. तर मुस्लीम राणी 'सुलताना' ही संध्याकाळी येथून चाँदचे दर्शन घेत असे. सूर्य व चंद्राचे दर्शन उगवतानाच व्यवस्थित घेता यावे हाच यामागील प्रमुख उद्देश असावा असे वाटते.

**दीवान-ए-खास**:–हे एक मजली जरा वेगळे आणि विचित्र वाटणारे दालन आहे. याची संपूर्ण बांधणी लाल दगडातच केलेली आहे. दालनाच्या मध्यभागी अप्रतिम कोरीव काम केलेला एक खांब आहे. या खांबाच्या वरील मजल्यावर त्याच्या वरच्या टोकापासून चारही दिशांना व चार बाजूंना असे आठ लहान गॅलऱ्यांचे रस्ते आहेत. स्तंभाच्या मध्यभागी बादशहा अकबर बसत असे. व त्याच्या भोवती नवरत्ने (मंत्री) बसत. याच स्तंभाच्या खालच्या बाजूला विविध धर्मांचे धर्मगुरू शुक्रवारी धर्मतत्त्वावर विचारविनिमय करीत असत. यावेळीही बादशहा अकबर हजर राही.

यालाच काही लोक 'इबादतखाना' असेही संबोधीत. येथूनच थोडे पुढे गेले की, उंचावरून खाली पाहिले असता समोर एक मैदान दिसते. तेथे बाबराने लढाईत विजय प्राप्त केल्याने त्या जागेस 'फराकाबाद' म्हणत. नंतर दक्षिणेकडील विजयानंतर अकबराने याच स्थानाचे नाव 'फत्तेपूर' केले.

**हरण मिनार**:—फराकाबाद मैदानाकडे पहाताना लांब अंतरावर डावीकडे एक मिनार दिसतो. त्यास हरण मिनार म्हणतात. दिवान-ए-आममध्ये पापी माणसांना देहांत प्रायश्चित्त देण्यासाठी जो 'हरण' नावाचा हत्ती होता त्याच्या मृत्यूनंतर मृत शरीरावर हा मिनार बांधण्यात आला आहे. या सर्व भागाला (गावाला) फत्तेपूर असे म्हणतात. व बुलंद दरवाजा ज्या गावात आहे, त्यास शिक्री म्हणतात. ही दोन्ही गावे किल्ल्यामुळे जोडली गेली आहेत. म्हणून या किल्ल्यास 'फत्तेपूर-शिक्रीचा' किल्ला असे म्हणतात.

**आँख मिचौली**:—अकबराच्या राजवाड्यातील मनोरंजनाची जागा. बादशहाच्या राण्या व दासी येथे आंधळी-कोशिंबीर हा खेळ खेळत असत. याला तीन दालने आहेत. भिंतीवर विविध कोरीवकाम करण्यात आलेले आहे.

**पप्पोसी**:—(सारीपाट) पंचमहालाजवळच बांधीव दगडाचा एक ओटा आहे. याची लांबी ५५६ फूट व रुंदी २७२ फूट आहे. याच्या मध्यभागी एक 'चौकट' आहे. चौकटीच्या बाहेर मध्यभागी बसण्यासाठी उंच जागा आहे. त्यावर बसून राजाराणी हा खेळ खेळत असत. पण या प्रचंड पटावर लाकडाच्या नरदा किंवा सोंगट्या नसायच्या. तर त्याऐवजी चारही बाजूला चार-चार अशा एकूण सोळा सुंदर दासी वेगवेगळ्या रंगाचे कपडे घालून उभ्या केल्या जात. कवड्यांच्या सहाय्याने राजा अथवा राणी डाव टाकीत आणि त्यांच्या हुकुमानुसार दासी त्या पटावर हालचाल करीत असत.

**भविष्यदालन**:—येथून थोडेसे पुढे गेले की, एक चारही बाजूला उघडे असे लहानसे छत्रीच्या आकाराचे घर आहे, त्याला 'भविष्यदालन' असे म्हणतात. बादशहाचा भविष्यावर अतिशय विश्वास होता. येथे पुरुषोत्तम नावाचा ज्योतिषी बसत असे. राजाला जर स्वप्न पडले तर राजा त्याचा अर्थ विचारण्यासाठी येथे येत असे. हे स्थान म्हणजे जैन वास्तुशिल्पाचा नमुना वाटतो, कारण माऊंट अबला अशीच मंदिरे बघावयास मिळतात.

**तानसेनच्या गायनाची जागा**:—अकबराच्या पदरी असलेल्या नवरत्नांपैकी तानसेन हा मोगल साम्राज्याचा संगीताचा अभिमानबिंदू ठरावा असा श्रेष्ठ गायक होता. ख्वाबगाहच्या जरा आधी पाण्याचा एक तलाव दिसतो. या तलावाच्या मध्यभागी एक खास उच्चासन आहे. यास 'चारचयन अनुपतालाब' असे म्हणत. मागील बाजूस असलेल्या बाल्कनीत राजा स्वत: गायन ऐकण्यासाठी बसत असे. येथे चारही बाजूला शामियाने लावले जात. या शामियानांचे दोरखंड ज्या रिंग्जना बांधण्यात येत त्या रिंग्ज अजूनही तेथे आहेत.

गायनाचे वेळी तलावात पाणी भरले जाई. मध्यभागी असलेल्या कोरीव दगडांच्या अंतर्भागात गुलाबासारखी अत्तरे ओतली जात. राजपुत्र सलीमच्या वाढदिवसाला अकबराने तलावातील पाणी काढून तेथे मौल्यवान जडजवाहर भरले. आणि तानसेनला गाणे गाण्याचा हुकूम फर्मावण्यात आला. तानसेनच्या गायनाने बादशहा बेहद्द खूष झाला. गायनानंतर बादशहाने तानसेनला बोलावून तुला हवी तेवढी संपत्ती यातून घेऊन जा, असे सांगितले. तानसेन तेवढ्याच मोठ्या दिलाचा, तो म्हणाला, 'हुजूर मैं आपका गवैय्या हूँ। मुझे कोईभी कमी नहीं है। मेरी एक आरजू है–आपको कुछ देना हो तो आपके हाथसेही दीजिए।' नंतर त्या तलावातील सर्व संपत्ती लुटून नेण्याबद्दल जनतेला फर्मावण्यात आले.

**सुलताना रुकय्या महल**:–या तलावाच्या अलिकडेच एक लहानसा महल आहे. तुर्कस्तानची राणी रुकय्या सुलताना हिच्यासाठी हा महल बांधण्यात आला. आतील बाजूस सुंदर पर्शियन शिल्प कोरण्यात आले आहे. या शिल्पाकृतीत खरे हिरे-माणके लावण्यात आले होते. बाजूला काचेचे लहान-लहान तुकडेपण रिचवलेले, यामुळे यास शीशमहल असेही म्हणत. यात दिपज्योती लागल्यानंतर प्रतिबिंबांनी शीशमहल उजळून निघायचा. इ. स. १८५७ च्या कालखंडात जाट लोकांनी हल्ला करून येथील सर्व संपत्ती लुटून नेली.

**ख्वाबगाह**:–तानसेनच्या गायनाची जागा ओलांडून काही अंतर पुढे चालून गेल्यावर अकबराचे ख्वाबगाह पहावयास मिळते. लाल दगडांनी बांधलेले हे स्थान बादशहा अकबराचे विश्रांतीस्थान होते. येथे आंत खिडकीच्या उंचीला लागून एक दगडी उंचवटा आहे, त्यावर बादशहा झोपत असे. या खोलीत काही उंचीपर्यंत पाणी भरले जाई. त्यात विविध अत्तरांचा सुगंध मिसळत. उन्हाच्या वेळी येथे खूपच शांत व थंड वाटत असे. बादशहा येथे बसला असता दिवान-ए-आमकडे जात असलेल्या प्रजाजनांना त्याचे खिडकीतून दर्शन होई. बाहेरची प्रजा तेव्हा राजाला पाहून म्हणत असे.

"अल्ला ऽऽ हो––अकबर"

अकबर त्यांना प्रतिसाद देऊन म्हणत असे.

"जल्ले–जलालेहू"

बादशहावर प्रजेची असीम श्रद्धा होती.

**मीना बाजार**:–पंचमहालच्या जरा पुढे गेले की, मीनाबझार आहे. बाहेरचे सौदागर येथे विविध वस्तू आणत असत. मोगल राण्या व दास्या व अन्य युवतीपण येथे खरेदीसाठी येत. जोधाबाईच्या हवामहलमधून हा बाजार स्पष्ट दिसत असे. लालपत्थर या प्रसिद्ध चित्रपटाचे चित्रीकरण याच ठिकाणी झाले.

**हवामहल**:–जोधाबाईच्याच महालाचा हवामहल हा एक घटक मानला जातो. राजवाड्यातील स्त्रिया येथे जमून प्राण्यांच्या झुंगी येथून पहात असत. जोधाबाई महालाच्या बाजूला एक दगडी तुळशीवृंदावन होते. राजा स्वतः तिलक लावून हातात माळ व पाणी घेऊन राणीबरोबर तुळशीला प्रदक्षिणा घालीत असे. या महालाच्या खालील बाजूस दासींना राहाण्यासाठी दालने आहेत.

**राजा बिरबल महल**:–बिरबल हा अकबराच्या नवरत्नातील श्रेष्ठ विद्वान. याचे पूर्वीचे नाव महेश पंडित. हरियाणातील नारनोल या ठिकाणचा तो राहाणारा. बिरबल निपुत्रिक होता. मात्र त्याने एक गरीब मुलगी दत्तक घेतली होती. त्या महालाला सहा दालने असून त्यात तुर्की व हिंदू शिल्पकलेचा समन्वय आढळून येतो.


**सुनहरा महल**:–येथे अकबराची ख्रिश्चन राणी बेगम मेरी राहात असे. या महालाचा आतील भाग सोन्याने मढवलेला होता. या महालात राधा-कृष्णाच्या मूर्ती कोरलेल्या आढळतात. राजा घोड्यावर पोलो खेळत आहे असेही दृश्य यात कोरलेले आहे. अकबराच्या राजवाड्यात सर्वधर्मसमन्वय व सर्वधर्मसहिष्णुतेचा उत्तम संगम दिसून येतो. मुस्लीम बेगमच्या दालनात त्याने प्राणी कोरले तर मेरीच्या दालनात राधाकृष्ण व जोधाबाईच्या महालात ख्रिश्चन स्टार दिसून येतो.

**बादशाही दरवाजा**:–(जामा मशीद) फतेपूर येथील लाल दगडातील हा अकबराचा राजवाडा पाहून बाहेर पडल्यानंतर तेथून जवळच शिक्री गावाकडे हा दरवाजा दिसतो. या दरवाजातून आत जाण्यापूर्वी पायातील पायतणे बाहेर काढून ठेवावी लागतात. दरवाजातून आत गेले की, फरसबंदी प्रचंड चौक आहे. उजव्या बाजूला अकबराचे गुरु सलीम चिस्तीचा दर्गा आहे. त्या पुढे गेले की लांबवर पसरलेली जामा मशीद आहे.

सलीम चिस्तीने इच्छा व्यक्त केल्याप्रमाणे अकबराने मक्केच्या मशिदीसारखीच या मशिदीची बांधणी करण्याचा प्रयत्न केला आहे. मशिदीची लांबी ४४२ फूट व रुंदी ४३८ फूट आहे. मशिद बांधणीसाठी त्या काळात ५ लाख रुपये खर्च आला. या मशिदीच्या भिंतीला दोन दगड असे बसविले आहेत की, ज्याच्यावर हाताने मारले असता त्याचा आवाज काहीसा तबल्यासारखा येतो. स्वतः हिंदुस्थानचा सम्राट अकबर येथे नमाज पढण्यासाठी येत असे. पण अदमच्या घरी रावरंक सर्व सारखेच. राजा मशिदीत येताना ललकारी कशी देणार? अशावेळी राजाची स्वारी येणार असे कळले की, हलक्या आवाजात हाताने या दगडावर वाजवित. तो आवाज बाहेरच्या उघड्या दालनापर्यंत जाई. त्यावरून बादशहा येत आहे हे इतरेतर जणांना कळत असे.

**सलीम चिस्तीचा मकबरा**:–जामा मशिद आणि बादशाही दरवाजा यांच्यामध्ये हा मकबरा आहे. ४० फुटापर्यंत वर्तुळाकार पांढऱ्या संगमरवरी दगडात हा बांधलेला आहे. या मकबऱ्याच्या तीनही बाजूला अतिनाजूक कोरीव काम केलेल्या संगमरवरी जाळ्या आहेत. मकबऱ्याच्या मध्यभागी सलीम चिस्तीच्या कबरीवर रंगीत कपडे आच्छादलेले आढळतात. बाजूच्या जाळ्यांना दोरे बांधलेले असतात. यावर लोकांची अशी एक श्रद्धा आहे की, आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी या जाळीला दोरा बांधायचा आणि मनोकामना पूर्ण झाली तर पुन्हा येऊन तो दोरा सोडायचा व दानधर्म करायचा.

**बुलंद दरवाजा**:–फतेपूर या ऐतिहासिक स्थानाचे पर्यटकांना आकर्षण वाटते ते बुलंद दरवाजा पहाण्यासाठी. हा आकाशाला स्पर्श करू पहाणारा प्रचंड दरवाजा बांधण्यासाठी लालपत्थर व संगमरवराचा वापर करण्यात आलेला आहे.



**सम्राट अकबराच्या दक्षिणेकडील नेत्रदीपक विजयाचे प्रतीक**
**'बुलंद दरवाजा', फत्तेपूर सिक्री.**

अकबराने दक्षिणेत जो विजय प्राप्त केला त्या विजयाच्या स्मरणार्थ हा दरवाजा उभारण्यात आला. या दरवाजाची उभारणी इ. स. १६०२ मध्ये झाली. जामा मशिदीत जाण्याचे हे प्रवेशद्वारच होय. हा दरवाजा जमिनीपासून १३४ फूट (३८ मीटर) उंच आहे. या दरवाजाच्या बाहेर विस्तृत जागा आहे. तेथे उभे राहून फत्तेपूर शिक्रीच्या परिसराचे संपूर्ण दर्शन होते. येथूनच लांबवर जंगलात राजा तोडरमलचा महाल दिसतो. दरवाजाच्या दगडावर अरबी भाषेत काही वाक्ये कोरलेली आहेत. त्यात म्हटले आहे, 'अकबर अल्लाप्रमाणेच आहे. आयुष्य हे एक फूल आहे. या फुलावरून चला, पण येथे घर करू नका. संपूर्ण आयुष्य त्याग-पूजनात व्यतीत करा'.

या दरवाजाजवळच एक ३२ फूट रुंदीची दगडांनी बांधलेली भव्य विहीर आहे. येथे एक वृद्ध गृहस्थ पैसे घेऊन बुलंद दरवाजाच्या भिंतीवरून खाली विहिरीतील पाण्यात उडी मारून दाखवतो. हे दृश्य पाहताना शरीरावर रोमांच उभे राहातात.

० ० ०


पहलगांम येथे राहाण्याची उत्तम सोय

(अत्यंत स्वस्त दरात)


**रिगल हॉटेल** फोन नं. ६२

लीदर नदीकाठी, व्याघ्रेश्वर पर्वताच्या पायथ्याला, प्रशस्त ग्राऊंड, कार व बस पार्कींग, किचन व डार्यानिंग हॉल, प्रशस्त रूम, जेवणाची उत्तम सोय.

लिहा किंवा भेटा

मॅनेजर रिगल हॉटेल

पहलगांम (जे. ॲन्ड के.)



# मथुरा

**प्रेक्षणीय स्थळाचे नाव**:—मथुरा.

**राज्य**:—उत्तर प्रदेश.

**ऋतू**:—हिवाळ्यात अतिशय थंडी.

**उष्णतामान**:—उन्हाळ्यात उष्मा फार.

**पाऊस**:—जून ते सप्टेंबर.

**लोक**:—विशेषत: कृष्णभक्त. मिश्र जमातीचे लोक आढळतात.

**भाषा**:—हिंदी.

**भेट देण्यास योग्य कालावधी**:—ऑक्टो. ते मार्च.

**मथुरा**:—यमुनानदीच्या पश्चिम किनाऱ्यावर वसलेले मथुरा हे शहर भारतातील कृष्णभक्तांचे पवित्र स्थान आहे. दिल्ली-आग्रा रोडवर आग्र्यापासून केवळ

५७ कि. मी. अंतरावर मथुरा वसलेले आहे. भगवान कृष्णाचे हे जन्मस्थान असल्याने मथुरेला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. येथे केवळ देशातीलच पर्यटक जातात असे नाही, तर परदेशातील पर्यटकपण मोठ्या संख्येने भेट देतात.

भारतीय इतिहासातील मौर्य काळाच्या आधीपासून हे शहर अस्तित्वात असावे. कनिष्कांनी मथुरेला राजधानीचा मान दिला नाही तरी कलानगरीचे स्वरूप मात्र दिले. शिल्पकलेच्या वैभवाचा हा कालखंड होता. राजघराण्यातील व्यक्तींचे पूर्णाकृती पुतळे त्याकाळात मथुरेला बनवण्यात आले. कुशाणानंतर गुप्तकाळातील मथुरा ही खरोखरच सुवर्णयुगाला शोभणारी नगरी होती. मथुरेतील या वैभवसंपन्न कालखंडाची नोंद भारताला भेट देणारे चिनी प्रवासी 'फाहीयन' व 'हुएनत्संग' यांनी आपल्या प्रवास वर्णनात करून ठेवली आहे. वैभवशाली शहरेच प्रथम परकियांच्या हल्ल्याचे भक्ष ठरतात. त्याला मथुरा अपवाद कसे ठरणार ? इ. स. १०१७ मध्ये अफगाणिस्तानच्या महंमद गझनीने मथुरेवर हल्ला करून जाळपोळ केली आणि संपत्ती लुटून नेली. त्या धक्क्यातून मथुरा सावरले न सावरले तोच सिकंदर लोदीने मथुरेवर हल्ला चढविला. त्यावेळी मथुरेतील मंदिरांचे अतोनात नुकसान झाले. नंतर भारतात मोगल साम्राज्य उदयास आले. यातील अकबर आणि जहाँगीर यांनी पुन्हा मथुरेला सावरले पण त्यानंतर आलेल्या औरंगजेबाने पुन्हा मथुरा शहर उध्वस्त केले. औरंगजेबाने मथुरेतील मंदिरांची अगदी दारूण अवस्था केली. येथील धार्मिक वैभवच नष्ट करण्याचा चंग त्याने बांधल्यामुळे केशवदेव गोविंदजी या मंदिरांचे प्राचीन वैभव धुळीला मिळाले.


इंग्रजांनी भारतावर राज्य केले. पण येथील कला उद्ध्वस्त न करता ती जोपासण्यात आनंद मानला. १९ व्या शतकाच्या प्रथमार्धात मथुरेच्या धार्मिक वैभवाचे पुनर्जीवन झाले. भारतीय तीर्थक्षेत्रात मथुरेचे नाव अग्रगण्य आहे यात दुमत नाही.

येथील इतिहास प्राचीन कथात गुंफलेला आहे. याठिकाणी चार हजार वर्षा-पूर्वी कंसाचे राज्य होते. कंसाची बहिण देवकी. तिच्या मुलाकडून मृत्यूची भीती असल्याने कंसाने देवकी व वसुदेवास कारागृहात ठेवले होते. देवकीला झालेली मुले कंसाने मारून टाकली. पण श्रावण कृष्ण अष्टमीस झालेल्या मुलाचे रूपच आगळे होते. तो साक्षात परमेश्वराचा अवतारच. पावसाळ्या रात्री यमुनेला पूर आल्यामुळे ती दुथडी भरून वहात असताना कृष्णाचा जन्म झाला. मुलाला वाचवण्यासाठी वसुदेवाने त्याला टोपलीत घेऊन तो थेट यमुना पार करून आला. नंतर गोकुळात वाढलेल्या कृष्णाने कंसाचा बदला घेतला. ही धार्मिक कथा सर्व विदीतच आहे. कंसाला मारल्या-वर बलराम व कृष्णाने जेथे विश्रांती घेतली, त्यास विश्रामघाट म्हणतात. आज-तागायत तो घाट यमुनातीरी उपलब्ध आहे.

**विश्रामघाट**:–यमनोत्रीवरून हिमालयातून येणारा यमुनेचा प्रवाह येथून स्थिर व शांतपणे वहातो. जणू प्रवाहानेसुद्धा येथे घटकाभर विश्राम करायचे ठरवले तर नसेल ना ? वराह अवतार घेऊन हिरण्यक्षकाचा वध करणाऱ्या परमेश्वराने येथेच विश्रांती घेतली होती. कंसाला मारल्यानंतर कृष्णाने येथेच विश्राम केला होता. त्यामुळेच या यमुनेच्या घाटाला विश्रामघाट असे संबोधले जात असेल. येथे असंख्य पर्यटक सायंकाळी यमुनेच्या आरतीसाठी जमतात व रात्री जलप्रवाहात वातीचे दिवे सोडतात. दिवसा या घाटावर अनेक लोक स्नान करतात. विशेषत: श्रावण महिन्यात विश्रामघाटावर अनेक धार्मिक विधी चालू असलेले दिसतील.

**सतीचा बुरुज**:–विश्राम घाटाच्या दक्षिण दिशेला सतीचा बुरूज आहे. या बुरूजाला ऐतिहासिक कथांची पार्श्वभूमी आहे. श्रीकृष्णाने कंसाचा वध केल्यानंतर कंसाच्या स्त्रिया याठिकाणी सती गेल्या. तसेच जयपूरचा राजा बिहारीमलची पत्नी येथे सती गेल्याचापण उल्लेख मिळतो.

**कृष्णजन्मस्थान**:–मथुरेतील पर्यटकांचे हे आकर्षणस्थान आहे. कृष्णाचा जन्म अशा भयानक परिस्थितीत झाला की जीवनापेक्षा जन्माची कथा भक्तांना अधिक मोह घालते. जेथे कृष्णजन्म झाल्याचे दाखविले जाते, तेथे मंदिर नाही की, त्या घराला



**कृष्ण जन्मभूमीवर इ. स. १९८४ मध्ये बांधून पूर्ण केलेले मंदिर, मथुरा.**

मंदिराचा आकार नाही. कारण कंसाने देवकीला बंदिस्त खोलीतच ठेवले होते. ही तुरुंगवजा खोली आहे. खोलीस लाल दगड वापरला असून १२ फूट जाडीच्या भिंती आहेत. आत जाण्यास एक माणूस जाईल एवढीच भिंतीतून जागा आहे व दुसऱ्या बाजूने बाहेर पडता येते. कालप्रवाहात इतिहासाने आपल्या उदरात अनेक गोष्टी गडप केल्या, त्यातीलच ही एक वस्तू म्हणायला हवी. कृष्णजन्म झाला त्या खोलीला लागूनच मशिद आहे. येथील मंदिराला पूर्वी कटराकेशव मंदिर म्हणत. इ. स. १६६९ च्या सुमारास हे मंदिर उध्वस्त झाले असावे. गतवर्षीच या मंदिराला लागून एक भव्य व प्रशस्त आधुनिक पद्धतीने नवीन मंदिर बांधून त्यात ५ फूट उंचीच्या कृष्ण-मूर्तीची स्थापना केली आहे. हे मंदिर पाहिल्यावर मन प्रसन्न होते व घटकाभर तेथे थांबण्याची इच्छा प्रगट होते. या मंदिराच्या छतावर केलेली ऑईल पेंटिंग्ज पाहिली की, प्रबोधन काळातील 'राफाईल' या प्रसिद्ध चित्रकाराची आठवण होते.

**श्री द्वारकानाथ मंदिर**:—हे मथुरेतील श्रीमंत मंदिर म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही. येथे प्रत्येक मूर्तीस हिऱ्या-मोत्यांचे दागिने घालतात. सदोदित कीर्तन वा पूजनाचे कार्यक्रम येथे होत असतात. त्यामुळे भक्तांनी सतत मंदिर गजबजलेलेच असते. याशिवाय मथुरेत श्रीकृष्णमंदिर, गीतामंदिर, राधाकृष्णमंदिर, मथुरेशजी मंदिर, विजयगोविंद मंदिर अशी अनेक मंदिरे आहेत.

**वृंदावन**:—मथुरेपासून १० कि. मी. अंतरावर वृंदावन हे स्थान आहे. हे यमुनेच्या डाव्या तीरावर आहे. कंसाच्या कचाट्यातून सोडवून वसुदेवाने बालकृष्णाला याच गोकुळात आणून ठेवल्यामुळे त्याचे बालपण व अवखळ तारुण्य येथेच व्यतीत झालेले होते. त्याचे बालसंगोपन नंदाच्या घरी झाले. श्रीकृष्णलीला—रासक्रिडा संबंधित साऱ्या आठवणी वृंदावनात पदार्पण करताच जागृत होतात.

**गोविंददेव मंदिर**:—वृंदावनात प्रवेश केल्यावर डाव्या बाजूस प्रथम दर्शनी गोविंददेव मंदिर दृष्टोत्पत्तीस पडते. हे मंदिर इ. स. १५९३ मध्ये उभारले गेले. महाराजा मानसिंगने या मंदिरासाठी लाल दगड पुरवला होता. अकबरकालीन फत्तेपूर सिक्रीच्या शिल्पकलेची छाप या भव्य मंदिरावर पडलेली आहे. हे मंदिर सातमजली होते पण औरंगजेबने याचे पाच मजले उध्वस्त केले. या मंदिरातील मूळ मूर्ती कोणी भंगवू नये म्हणून ती दुसऱ्या ठिकाणी हलविण्यात आली. येथील कोरीव काम मनाला मुग्ध करून टाकते.

**श्रीजुगलकिशोर मंदिर**:—हिंदुसंस्कृतीचे कलात्मक प्रतीक म्हणून या मंदिराचे महत्त्व आहे. हे मंदिर अष्टकोनी आहे.

**रघुनाथ मंदिर**:—हे मंदिर गोविंददेव मंदिराच्या विरुद्ध दिशेला आहे. येथे रथयात्रा भरते. मद्रासच्या एका धनाढ्य व्यापाऱ्याने हे मंदिर संपूर्ण संगमरवरी दगडाचा वापर करून बांधले आहे.

**राधामोहन मंदिर**:–या बंगाली मंदिरातील मूर्ती शाळीग्राम शिळेत कोरलेली आहे.

**नंदाचा वाडा**:–याठिकाणी आता पूर्वीचे काहीही अवशेष शिल्लक नाहीत. उलट औरंगजेबच्या कारकीर्दीतील उभारलेले बांधकाम मात्र पाहायला मिळते. कृष्णाच्या कितीतरी बाललीला या वास्तूने पाहिल्या असतील. लोणी चोरणारा, सवंगड्या समवेत खेळणारा, गोपींना छेडणारा, यशोदेला त्रास देणारा, उखळीला बांधलेला व पुतना राक्षसणीला मारणाऱ्या बालकृष्णाच्या कितीतरी स्मृती अजूनही या वास्तूत घोटाळत असतील.

येथील यशोदेचे ताकाचे भांडे, रवी, कृष्णाचा पाळणा, या वस्तू पूर्वीच्या नसून त्या वातावरण निर्मितीसाठी नंतर ठेवण्यात आल्या आहेत.

**महाबन**:–यमुनेच्या तीरी १० ते १२ कि. मी. अंतरावरील या स्थानास महावन असे म्हणतात. येथे पूर्वी दाट अरण्य असावे. पण सध्या तेथे फारशी वनश्री दृष्टोत्पत्तीस पडत नाही. गोपाळ व गोपिकांबरोबर खेळणारा कृष्ण येथे रमत असे.

**बरसाना**:–कृष्णावरील भक्तीने सर्वस्व विसरलेली राधा. तिचे हे निवासस्थान. याठिकाणी आता अनेक मंदिरे आहेत.

**गोवर्धन पर्वत**:–मथुरेपासून १६ कि. मी. अंतरावर पश्चिमेला गोवर्धन पर्वत आहे. प्रचंड पाऊस व निसर्गप्रकोपापासून प्रजाजनांस वाचवण्यासाठी कृष्णाने गोवर्धन पर्वत करंगळीवर उचलल्याची दंतकथा कथन केली जाते. हा टेकड्यांनी व्यापलेला भाग आहे. गोवर्धनच्या परिसरात काही अंतरावर राधाकुंड, कृष्णकुंड नारदकुंड पाहण्यासारखी आहेत.

**वृंदावन–यमुना घाट**–याच घाटाजवळ कृष्ण गोपाळांबरोबर विटी-दांडू सारखे खेळ खेळत असे. येथेच चेंडू पाण्यात पडला त्यावेळी कृष्ण व कालिया यांचे द्वंद्व झाल्याचे विदीतच आहे. येथे एक कदंब वृक्ष आहे. पाण्यात स्नानासाठी आलेल्या गोपिकांचे कपडे खट्याळ कृष्णाने याच झाडावर आणून ठेवले होते. येथे अजूनही स्त्रिया श्रद्धेने वृक्षाला साडी किंवा चोळी बांधून ठेवतात. खरे तर आता तेथे कृष्ण नाही, पण हा ज्याच्या त्याच्या श्रद्धेचाही प्रश्न आहे.

**मथुरेतील राहाण्याची सोयी**:–

१) पी. डब्ल्यू. डी. इन्स्पेक्शन बंगला. २) कृष्णादेवी डालमिया इंटरनॅशनल गेस्टहाऊस. ३) रेल्वे रिटायरिंग रूम. ४) आग्रा हॉटेल (बंगाली घाट) ५) क्वालिटी हॉटेल. ६) मॉडर्न हॉटेल. ७) अलका हॉटेल ८) नेपाळ हॉटेल. ९) राज हॉटेल.

(हॉटेलच्या नावासमोर किंवा धर्मशाळेसमोर मथुरा यु. पी. एवढे लिहिले असता पत्र जाते.)

**मथुरा-वृंदावन धर्मशाळा**:–(येथे कमीतकमी खर्चात राहण्यासाठी पुष्कळ धर्मशाळा आहेत. यात स्वतंत्र खोल्यापण उपलब्ध आहेत.)

१) आगरवाल धर्मशाळा
२) भजनाश्रम
३) बॉम्बेवाली धर्मशाळा
४) देहलीवाली धर्मशाळा
५) गुजराथी धर्मशाळा
६) कलकत्तेवाली धर्मशाळा
७) राजपूत धर्मशाळा
८) नरसिंह भवन
९) मिरझापूरवाली धर्मशाळा
१०) अद्वैत आश्रम
११) शामकुटी
१२) किशनदास धर्मशाळा
१३) सहकारी किसानीनिवास
१४) गीता धर्मशाळा
१५) मनोरमा गोयंका विश्रामगृह
१६) रामदास संप्रदायी आश्रम
१७) पागलबाबा आश्रम
१८) मारवाडी पंचायत धर्मशाळा

**मथुरेतील बँक्स**:–१) अलाहाबाद बँक २) पंजाब नॅशनल बँक ३) स्टेट बँक ४) सिंडिकेट बँक ५) युनियन बँक ऑफ इंडिया.

**मथुरेतील सिनेमागृहे**:–१) राजकमल २) मिलन ३) लक्ष्मी ४) सपना ५) डिफेन्स सर्व्हिस.

**मथुरेतील हॉस्पिटल्स**:–१) आयुर्वेदिक फ्री हॉस्पिटल. २) ख्रिश्चन मिशन हॉस्पिटल. ३) डिस्ट्रिक्ट हॉस्पिटल. ४) श्री ब्रिजसेवा समिती (टी. बी. हॉस्पिटल) ५) रमणलाल हॉस्पिटल (डोळ्यांचे).

**मथुरेतील मंदिरे व प्रार्थनास्थळे**:– १) आर्यवृंदावन मंदिर
२) भागवत भवन मंदिर
३) बिर्लामंदिर
४) धृवजी मंदिर
५) गोकर्ण माधव मंदिर
६) हनुमान मंदिर
७) काच का मंदिर
८) आर्य समाज मंदिर
९) कॅथलिक चर्च
१०) जामा मशिद
११) प्राचीन जैन मंदिर
१२) राधाराणीका मंदिर
१३) राजा ठाकुरजी मंदिर
१४) श्रीद्वारकाधीश मंदिर
१५) श्रीरामशिव मंदिर
१६) बाकेबिहारी मंदिर
१७) रंगेश्वर मंदिर

**मथुरेत खरेदी कोठे कराल**:–१) चौक बझार. २) पुराना बझार ३) प्रताप बझार ४) सदर बझार ५) गोपीनाथ बझार ६) अनाज मंडी. ७) रेजीमेंटल बझार.

पूजा-अर्चेच्या अनेक वस्तू मथुरेच्या बाजारात उपलब्ध असतात. पितळेची व तांब्याची भांडी, देवांच्या मूर्ती इ. तसेच खाण्यामध्ये रबडी, मथुरापेढा, कलाकंद हे येथील प्रसिद्ध आहे.



० ० ०



# हरिद्वार

**प्रेक्षणीय स्थळाचे नाव**:–हरिद्वार.

**जिल्हा**:–सहारणपूर

**राज्य**:–उत्तरप्रदेश.

**समुद्रसपाटीपासून उंची**:–२९२.७ मीटर.

**एरिया**:–१२०३२ चौ. कि. मी.

**ऋतू**:–हिवाळा–खूपच थंडी.

**पावसाळा**–पाऊस भरपूर.

**उन्हाळा**–कडक ऊन.

**उष्णतामान**:–उन्हाळ्यात ३५.६ सेंटीग्रेड.
हिवाळ्यात कमीतकमी १०.६ सेंटीग्रेड.

**सरासरी पाऊस**:–६४ इंच.

**लोक**:–हिंदू लोकांचे व यात्रेकरूंचे प्रमाण अधिक.

**लोकसंख्या**:–१,१४,४१५.

**भाषा**:–हिंदी, पंजाबी, इंग्रजी.


**भेट देण्यास योग्य कालावधी**:–ऑक्टोबर ते मे.

**उद्योग व कारखाने**:–वुलन व लोकरीचे कपडे चांगले व स्वस्त मिळतात.

**टूरिस्ट कार्यालय**:–मॅनेजर,

**टूरिस्ट बंगलो**–बेलवाला–हरिद्वार. फोन–३७९.

भूप्रवास ९६० २४६८९ ११।१।८६


HARIDWAR
DEHRA DUN
RISHIKESH
SAPTARISHI ASHRAM
PARMARTH ASHRAM
BUS TERMINUS
PAWAN DHAM
HARI KI PAIRI
N.R. HARIDWAR DEHRA DUN BRANCH
SHRI RAM HANUMAN MANDIR
BHIMGODA TALAB AND MANDIR
TUNNEL
MANSA DEVI MANDIR
MAYA DEVI MANDIR
BHOLANAND SANYAS ASHRAM
MAHADEV
KALESHWAR DEV MANDIR
CHANDI DEVI MANDIR
GAURI SHANKAR MANDIR
NAGESHWAR MANDIR
TOURIST BUNGALOW
BUS STAND
SHRI GURU GORAKSHANATH MANDIR
SHRI BILKESHWAR MANDIR
TOURIST BUREAU
HARDWAR RS
GANGA RIVER
RISHIKUL AYURVEDIC COLLEGE
DAKSH MAHADEV MANDIR
KANKHAL
SHRI AVDHUT MANDALASHRAM
NARAYAN SHILA PIND MANDIR
HARIDWAR ROAD
SATI KUND
GURUKUL PHARMACY
VED MANDIR
GURUKUL KAGRI VISHWAVIDYALAYA
NORTHERN RAILWAY
JWALAPUR
JWALAPUR RS
UPPER GANGA CANAL
GURUKUL MAHAVIDYALAYA
MADHYA MARG
JWALAPUR
BUS TERMINUS
ROORKEE

**हरिद्वार**:—या शहराला पूर्वी 'मायापुरी' असे संबोधले जात असे. याचा उल्लेख स्कंदपुराणात आहे. काही लोक या स्थानाला 'गंगाद्वार' असेही म्हणतात. कारण गंगेचा प्रवाह येथून सपाट पृष्ठभागातून वाहण्यास सुरुवात होते. शिवालिक पर्वत आणि हिमालयाच्या रांगांत गंगेच्या काठी हरिद्वार वसलेले आहे. हर म्हणजे शंकर. कैलासपर्वतात जाण्यास शंकराचा हाच मार्ग होता, म्हणून यास हरिद्वार म्हणतात. भारतातील जी अनेक तीर्थक्षेत्रे आहेत, त्यांत हरिद्वारचा क्रम अग्रभागी आहे, यात शंका नाही. हरिद्वारला 'मोक्षनगरी' पण म्हणतात. याचे कारण येथे येताच मोक्षप्राप्ती होते, असा समज आहे. येथूनच 'पांडव' हिमालयात मोक्षप्राप्ती-साठी गेले होते. 'Gate of God' 'परमेश्वराचे द्वार' म्हणूनच मोक्षप्राप्तीसाठी भाविक लोक येथे गर्दी करतात. कपिलमुनी याठिकाणी राहात होते. म्हणून या स्थानास 'कपिलस्थान' पण म्हणतात. या स्थानाला काही लोक 'हरिद्वार' तर काही लोक 'हरद्वार' म्हणतात. हरि म्हणजे विष्णू व हर म्हणजे शंकर. शैव असो वा वैष्णव. कोणताही भेद येथील भक्तांत नाही. त्यामुळे हे मोक्षाप्रत नेणारे 'स्वर्गद्वार'च आहे. बद्रिनाथ, केदारनाथ, गंगोत्री, यमनोत्री या पवित्र स्थळी हरिद्वारवरूनच जाता येते.

कालिदासासारख्या महाकवीलादेखील या प्रदेशाच्या वर्णनाचा मोह आवरता आला नाही. यक्ष, गंधर्वादिकांच्या विलासी जीवनाचे चित्रण या महाकवीने याच पार्श्वभूमीवर केलेले आहे. चिनी प्रवासी हयु-एन-त्संग भारतभेटीला हिमालयातून आला, तेव्हा त्याने हरिद्वारला भेट दिली होती. त्याने या शहराच्या नावाचा उल्लेख 'माया-या-लो' असा केला. कदाचित त्यावेळी हरिद्वारला मायापुरी म्हणत असावेत. 'हिंदू संस्कृतीचे चैत्यन्यशील केंद्र अशा शब्दात त्याने या धार्मिक ठिकाणाचे महत्त्व प्रतिपादन केले आहे. येथे गंगेकाठी मोगल सम्राट राजा मानसिंगच्या उत्तर क्रियेसाठी आला होता. त्याने तेथे 'मानसिंग की छत्री' उभारलेली आहे. नजीव उद्दौला याने अनेक वेळा हरिद्वारवर हल्ले चढवून अनेक वास्तू उध्वस्त केल्याचा उल्लेख इतिहासात सापडतो. गुरुसाहेब—नानकदेव यांनी पण या शहराला भेट दिलेली आहे. ते त्यावेळी 'नानक-बारा' येथे थांबले होते.

इ. स. १९ व्या शतकात ब्रिटिश अंमल भारतात होता. तत्कालिन ब्रिटिश व्हाइसरॉय डलहौसीने हरिद्वारला इ. स. १८५४ मध्ये गंगानदीवर कालवा बांधला.

दिल्लीहून हरिद्वारला जाण्यासाठी बसेस व रेल्वे उपलब्ध आहेत. हरिद्वार दिल्लीहून २२२ किलोमीटर तर डेहराडूनहून ५२ कि. मी. अंतरावर आहे. हरिद्वार या तीर्थक्षेत्राचे खरे महत्त्व वाढवले ते गंगानदीने. येथे गंगा कशी प्रगट झाली हा इतिहास चित्तथरारक तसा मनोरंजकपण आहे.

सूर्यवंशात सगर नावाचा पराक्रमी राजा झाला. त्याने आपल्या पराक्रमाची द्वाही फिरवण्यासाठी अश्वमेध यज्ञ योजला. सगराच्या पुण्यप्रभावाने इंद्राचे आसन

डळमळित झाले. इंद्र घाबरला. त्याने सगराविरुद्ध एक युक्ती योजली. इंद्राने सगराच्या अश्वमेध यज्ञाचा घोडा कपिलमुनींच्या आश्रमात नेऊन बांधला. 'शामकर्ण' सापडत नाही हे पाहून सगराचे पुत्र अस्वस्थ झाले. शोधत शोधत ते या आश्रमात आले व मुनींच्या आज्ञेशिवाय अश्वाला मुक्त केल्यामुळे संतप्त झालेल्या कपिलमुनींनी शापित नजरेने सगरपुत्रांकडे पाहाताच ते चिरनिद्रेत निपचित पडले. मुले परत न आल्याने सगराचा मुलगा अंशुमान आपल्या भावंडांच्या शोधास निघाला. त्यास वरील हकीगत कळताच त्याने कपिलमुनींची सेवा केली व घोडचास सोडवून आपल्या वडिलांची अश्वमेधाची इच्छा पूर्ण केली. पण पुत्र वियोगाने सगर दु:खी झालेला. पृथ्वीवर गंगावतरणाशिवाय सगर पुत्रांचा उद्धार होणार नाही हा उ:शाप कपिलमुनींनी दिला होता. त्यानुसार अंशुमानने तपश्चर्या केली पण ती फळाला आली नाही. शेवटी तोच प्रयत्न सूर्यवंशातील पुढला वारस राजा दिलीप याने केला पण त्यालाही ते शक्य झाले नाही. राजा दिलीप याचा पुत्र भगीरथाने मात्र प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्याच्या प्रयत्नांना यश येऊन प्रथम हिमालयस्थ गंगा हरिद्वारजवळ सपाट भूमीवर अवतरली. त्यासाठी भगीरथाला शंकराचीसुद्धा तपश्चर्या करावी लागली.


गंगावतरणामुळे सगरपुत्रांचा उद्धार झाला. ही झाली लोककथा. पण खरे पाहिले तर या कथेच्या पार्श्वभागी प्राचीन काळातील जलयोजनेतील तांत्रिक प्रगती दिसून येते. कैलास अधिपती शंकर यांच्या मदतीशिवाय गंगा हिमालयाबाहेर आणणे कठीण म्हणून सगराने त्यांची मदत मागितली. असा स्कंद पुराणात उल्लेख आहे.

येथे अश्वमेध यज्ञासाठी 'अश्व' हा कथात्मक अर्थ झाला पण ऋग्वेदात 'अश्व' म्हणजे भूमीमापनाचे यंत्र असा आहे. या यंत्रासह साठहजार तंत्रज्ञ व कामगार (राजाला प्रजा पुत्राप्रमाणे असते) हिमालयात गेले असावेत. त्यांना तेथे अडवले असावे. पण नंतर भगीरथाच्या प्रयत्नांना यश प्राप्त झाले. गंगेचा प्रवाह सरळ पृथ्वीवर आणला तर पृथ्वीची प्रचंड झीज होईल म्हणून भगीरथासारख्या उच्च दर्जाच्या तंत्रज्ञाने त्या गंगेला लोकांच्या मदतीने वळसे देत प्रवाहाचा वेग कमी करत नंतर जमिनीवर आणले असावे.

कैलास पर्वताजवळ गंगोत्रीला गंगेचा उगम धरला तर पर्वताची उंची २५००० फुटापेक्षा अधिक आहे. आणि हरिद्वारची समुद्रसपाटी पासून उंची १००० फूट आहे. याचा अर्थ भगीरथाला हजारो फूट ही गंगा खाली आणताना खूपच कौशल्य वापरावे लागले असेल.

**हरिद्वारची भौगोलिक रचना:**–हिमालयाच्या कुशीतच हरिद्वार हे तीर्थक्षेत्र वसलेले आहे. हरिद्वारच्या उजव्या बाजूला शिवालिक पर्वताची रांग आहे. शहराच्या परिसरात गंगेच्या गाळाने सपाट झालेला प्रदेश आहे. उन्हाळ्यात उष्णतामान ३५

सें. ग्रे. पर्यंत असले तरी गंगामाईच्या अस्तित्वाने वातावरण आल्हाददायी असते. हिवाळ्यात मात्र जीवघेणी थंडी असते. बर्फाळ प्रदेशातील गार वारे या प्रदेशाला जखडून टाकतात. भरपूर पाऊस असल्याने परिसरात घनदाट जंगले निर्माण झालेली आहेत. हे हवामान बांबूला मानवते. म्हणून या परिसरात बांबूची प्रचंड वनेच पसरलेली दिसतात. हरिद्वारचा परिसर औषधी वनस्पती व जडीबुटीसाठी प्रसिद्धच आहे. देवदारसारखे उच्च दर्जाचे लाकूडपण या जंगलातून उपलब्ध होते. प्राकृतिक सौंदर्याच्या दृष्टीने हरिद्वारकडे पाहिले तर त्यास तुलना नाही.



**भगीरथ प्रयत्नाने पृथ्वीवर अवतरलेली 'गंगामय्या' गंगामंदिर, हरिद्वार.**

मोहक, शांत-सुंदर हिरवा परिसर, गंगामाईचा शांत पण भव्य प्रवाह, पार्श्वभागी हिमालयाची उंच शिखरे, अल्हाददायी हवा आणि वातावरणात दरवळलेला भक्तीचा सुगंध. मनःशांतीसाठी हे तीर्थक्षेत्र योग्य आहे असेच म्हणावे लागेल.

**हरिद्वार शहर**:—हरिद्वार शहरात प्रवेश करताच तेथील श्रद्धाशील वातावरण पाहूनच मन पवित्र होते. या पवित्र वातावरणाचा भंग होऊ नये म्हणून एक सूचना पर्यटकांनी लक्षात घ्यावी. हरिद्वार हे क्षेत्र 'मादक पेय' पिण्यास निषिद्ध क्षेत्र मानलेले आहे. अफू, भांग, दारू, चरस, गांजा या सर्व गोष्टींना येथे सक्त मनाई आहे.

हरिद्वार रेल्वे स्टेशन गावातच असून त्याच्यासमोरच प्रमुख रोडवेज बसस्टॅन्ड आहे. या दोन्हींच्या मधून जातो तोच मुख्य रस्ता. कनखल—ज्वालापूरचा रस्ता

सोडून स्टेशनमधून बाहेर पडल्यावर डावीकडे जाणारा रस्ता म्हणजे हरि की पायरी. तोच रस्ता पुढे भिमगोडापासून ऋषिकेश किंवा डेहराडूनकडे जातो.

मुख्य रस्त्याच्या मध्यभागीच स्टेशनजवळ, जटाधारी व त्यातून गंगाप्रवाह उडणारा सहा हातांचा शंकराचा शुभ्र पुतळा आहे. पर्यटक मंत्रमुग्ध होऊन या जलघटात बसलेल्या मूर्तीकडे बघत असतात. या मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला बद्रीकेदारसाठी प्रवासी कंपन्या, धर्मशाळा व दुकाने आहेत. मुख्य बाजारपेठ मात्र गजबजलेली असून ती नदीकाठी स्टेशनपासून १।। कि. मी. अंतरावर आहे.

**ब्रह्मकुंड**:–ब्रह्मकुंड विभागाला काही भक्त 'हरि की पायरी' असे संबोधतात. हरि की पायरी म्हणजे परमेश्वराच्या पायऱ्या. ब्रह्मकुंड या शब्दामागे धार्मिक इतिहास आहे.

राजा श्वेत याने केलेल्या तपश्चर्येने ब्रह्मदेव प्रसन्न होऊन त्यांनी राजास वर मागण्यास सांगितले. श्वेत राजाने वर मागितला. 'हे प्रभो ब्रह्मा, विष्णू व शंकराचे हे निवासस्थान होऊन सर्व तीर्थक्षेत्रांचा वास या क्षेत्राला लाभावा' ब्रह्मदेवाने 'तथास्तू' म्हटले आणि म्हणाले 'हे कुंड माझ्या नावाने प्रसिद्ध होईल. जे या कुंडात स्नान करतील त्यांच्या पापांचे क्षालन होऊन त्यांचा उद्धार होईल'. याच स्थानाला 'ब्रह्मकुंड' असे संबोधतात. येथेच हरि की पायरी आहे. भगवान विष्णूंनी याठिकाणी आपले पहिले पाऊल ठेवले व गंगेचा स्पर्श परमेश्वराच्या पायास झाला, म्हणून या स्थानास हरि की पायरी म्हणतात. ब्रह्मकुंडावर काही लोक मुंडन करून गंगेला केशभार अर्पण करतात. गंगेत डुबकी घेऊन बाहेर येताच गंध-फुले घेऊन तेथील पंडेलोक दक्षिणा प्राप्तीसाठी जवळ येतात.

'जय गंगामाई' या शब्दांनी हा परिसर गजबजतो. सायंकाळी गंगेची आरती पाहण्यासारखी असते. त्यावेळी मात्र वातावरणात मनाचे भान हरपते. पवित्र भावनेने मन रोमांचित होते. सूर्यास्तानंतर आरतीसाठी रोज हजारो लोक गंगेच्या दोन्ही तीरावर जमतात. सुवासिनी आपल्या वंशाचा दिवा सातत्याने तेवत राहावा म्हणून येथे गंगेत 'दीप' सोडतात. गंगेच्या खळखळणाऱ्या प्रवाहाबरोबर वहात जाणाऱ्या दिव्याचे दृश्य मनाला मोह घालते.

**सुभाष घाट**:–गंगेच्या तीरावर एक सुभाषबाबूंचा पुतळा उभारला आहे. त्यास सुभाषघाट असे म्हणतात. खाण्यापिण्याची छोटी दुकाने येथे आहेत. अनाश्रित स्त्रिया व आजारी, रोगी लोकांसाठी येथे एक उपचारकेंद्र चालवले जाते. या जनसेवेचे श्रेय महंत श्री. ज्ञानसिंग यांना आहे.

**कुशावर्त**:–हे ठिकाण श्राद्धासाठी श्रद्धास्थान मानले जाते. ब्रह्मकुंडापासून एक फर्लांग अंतरावर हे स्थान असून याठिकाणी अस्थी विसर्जनही केले जाते. महर्षी

दत्तात्रयांनी येथे एका पायावर उभे राहून तपश्चर्या केली होती. तसेच ते कुश नावाच्या गवतावर राहत असत. गंगावतराणाच्या वेळी येथे गंगेचे पाणी साचून त्यात आवर्त-भोवरा निर्माण झाला. महर्षींच्या शापाने गंगाप्रवाहच स्थीर झाला. नंतर सर्व देव-तांच्या विनंतीवरून महर्षी शांत झाले व परत पाणी वाहू लागले. त्यावेळी येथील कुश गंगेच्या आवर्तात सापडल्याने या ठिकाणाला 'कुशावर्त' असे संबोधले जात असावे.

**गौ घाट**:–हरि की पायरी व कुशावर्त यांमध्ये गंगेवर असलेल्या स्थानाला 'गौ घाट' म्हणतात. कुणाच्याही हातून गो हत्येचे पाप झाले तर येथे स्नान करून त्या पापाचे क्षालन करता येते. गंगेवर येथे पूल उभारण्यात आला आहे. हे स्थान अतिशय रमणीय आहे.

**रामघाट**:–सब्जीमंडीपासून रामघाट जवळच आहे. येथे महाप्रभूचे मंदिर प्रसिद्ध आहे.

**विष्णुघाट**:–रामघाटाच्या बाजूलाच विष्णूघाट आहे. याठिकाणी भगवान विष्णुंनी तपश्चर्या केल्याची आख्यायिका कथन केली जाते. राजा धर्मध्वज आपल्या पत्नीसह येथे स्नानासाठी आला असताना संतप्त दुर्वासऋषींनी त्याला शाप दिला. तेव्हापासून आजपर्यंत ते सापयोनीत आहेत असे समजले जाते. कारण अजूनही भाद्रपद कृष्ण चतुर्दशीला नाग-नागिणीचे एक जोडपे या घाटावर स्नानासाठी येते असा समज आहे.

**मायापूर पूल**:–हरि की पायरी पासून १।। ते २ मैल अंतरावर हा पूल आहे. जवळच डाकबंगला आहे. याच्या विरुद्ध दिशेला मायापूर धरण आहे. हरिद्वारलाच पूर्वी 'मायापूर' म्हणत. या जुन्या नावाची स्मृती येथे उजळून येते. कनखल मार्गावर हा पूल आहे.

**भीमगोडा**:–हे स्थान हरि की पायरीपासून १ ते १।। कि.मी. अंतरावर आहे. गंगानदीचे पाणी अडवून येथून दुसरीकडे वळवले आहे. दूरवर पसरलेल्या थंडगार निळ्याशार पाण्याचे दृश्य येथे मनोरम वाटते. ज्यावेळी कॅनॉलमध्ये पाणी सोडतात त्यावेळी फेसाळणाऱ्या प्रवाहामुळे गंगानदीच्या एका वेगळ्याच रूपाचे दर्शन घडते.

**साधूबेला** :–ऋषिकेशच्या रस्त्यावर हरिद्वारपासून ५ कि. मी. अंतरावर 'साधूबेला' नावाचा आश्रम आहे.

**हरिद्वार या तीर्थक्षेत्रातील विविध देवस्थाने** :–ब्रह्मकुंडाजवळ अनेक मंदिरे आहेत. मुख्य मंदिर गंगामातेचे असून त्याचबरोबर हनुमान, मन्सादेवी, दुर्गादेवी, विष्णुपादुका ही मंदिरे आहेत.

**बिल्वकेश्वर मंदिर**:–स्टेशनपासून शहरात येतानाच हे मंदिर ललतारी पुलाच्या मार्गाने पुढे गेल्यावर लागते. पहाडाच्या कुशीत हे वसलेले आहे. या पहाडी प्रदेशात बेलाची झाडे खूप असल्याने या पर्वतास बिल्वपर्वत म्हणतात. या मंदिरात व मंदिरा-बाहेर अशा शंकराच्या दोन मूर्ती आहेत.

**भोलगिरी मंदिर**:–गंगानदी काठावर लालरंगाचे मंदिर आहे. या आश्रमाची बांधणी भोलगिरी महाराजांनी इ. स. १९३८ मध्ये केली. या मंदिरात शंकराचार्य, महावीर व भोलगिरी महाराज यांच्या मूर्ती आहेत. वेद आणि उपनिषदातील मंत्रांचे पठण येथे सकाळ-संध्याकाळ चाललेले असते.

**मायादेवी मंदिर**:–इ. स. ११ व्या शतकात हे मंदिर उभारले गेले असावे. स्टेशनपासून ½ कि. मी. अंतरावर आहे. त्रिमुखी, दुर्गादेवी, भैरव आणि अष्टभुज-शंकर यांच्या विविध मूर्ती आहेत. तैमूरलंगाने मंदिराची नासाडी केली. त्यानंतर आता या मंदिरात संगमरवरी मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.

**मनसादेवी** :–हरिद्वारचा परिसर शिवालिक पर्वताने व्यापला आहे. याच पर्वतावर मनसादेवीचे मंदिर आहे. गंगेच्या किनाऱ्यावरून हे शुभ्र मंदिर पर्वताच्या मस्तकावर आरूढ झालेले दिसते. या मंदिरात जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. एक गौ घाटापासून कच्चा रस्ता जातो. दोन्ही रस्त्यावर पूजेच्या सामानांची दुकाने आहेत. मंदिरापर्यंत १ मैलाचा चढ आहे. जाऊन येण्यास कमीत कमी दोन तास लागतात.

मनसादेवीला दुर्गादेवीचाच एक वेगळा अवतार मानतात. मनसादेवी ही कैलास-पती शिवप्रभुची कन्या. हे जागृत दैवत असून मनोकामना पूर्तीसाठी येथे पूजा केली जाते. येथील घंटानाद हरिद्वारमध्ये ऐकू येतो. येथील देवीची मूर्ती भक्तांना मुग्ध करून टाकते. या त्रिमुखी मूर्तीला पाच हात आहेत. येथे जवळच अष्टभुजा व भैरव-नाथाची मंदिरे आहेत. या मंदिरापासून हरिद्वारचे दृश्य अतिशय मोहक दिसते. भक्तांना दर्शन सहज मिळावे म्हणून रतन टॉकीजपासून मंदिरापर्यंत ६०० मीटर लांबीचा 'रोप वे' केला आहे.

**चण्डीदेवी मंदिर**:–हे ठिकाण हरिद्वारपासून ६ कि. मी. अंतरावर आहे. शिवालिक किंवा नीलपर्वतात गंगेच्या पैलतीरावर चण्डीदेवीचे मंदिर आहे. पर्व-तातील चढण २।। ते ३ मैल आहे. खाणे-पिणे बरोबर घेऊन सकाळी निघाले असता संध्याकाळी परतता येते. आजूबाजूला घनदाट जंगल आहे. पायथ्याशी निलेश्वर महादेवाचे व नंतर मारुतीमाता अंजनीचे मंदिर आहे. येथे नवरात्रीनंतर येणाऱ्या चतुर्दशीला देवीची यात्रा भरते.

**सप्तसरोवर**:–भीमगोडापासून २ कि. मी. अंतरावर सप्त प्रवाह स्वरूपात गंगानदीचे दर्शन घडते. सात वेगवेगळ्या प्रवाहातून ती वाहताना दिसते. सातऋषी या ठिकाणी तपश्चर्या करीत असताना भगीरथाने गंगा खाली आणली. गंगेला पुढे जायचे होते पण रस्त्यात हे सात ऋषी येत होते. त्यांची तपश्चर्या भंग करण्यापेक्षा प्रत्येक ऋषीस ती वळसा घालून गेली. हेच ते 'सप्तप्रवाह सरोवर' अशी दंतकथा तेथे कथन केली जाते.

**भारतमाता मंदिर**:–हरिद्वारपासून ४ कि. मी. अंतरावर पर्यटकांना पाहण्याजोगे हे मंदिर आहे. तळमजल्यावर भारतमातेची सुंदर मूर्ती आहे. पहिल्या मजल्यावर शंकराचार्य, बुद्ध, गुरुनानक, मीरा, महावीर, कबीर यांचे पुतळे आहेत, तर दुसऱ्या मजल्यावर वीरमंदिर असून येथे शिवाजी, महाराणाप्रताप, गुरुगोविंदसिंग, चंद्रशेखर आझाद, भगतसिंग यांचे पुतळे आहेत. या मंदिराच्या तिसऱ्या मजल्यावर सतीमंदिर असून तेथे सीता, सावित्री, लक्ष्मीबाई यांचे पुतळे आहेत. चौथ्या मजल्यास शक्तिमंदिर संबोधतात. येथे दुर्गादेवी, मिनाक्षी इ. मूर्ती आहेत तर ५ व्या मजल्यावर विष्णूमंदिर आहे. येथे राधाकृष्ण, राम-सीता, लक्ष्मी-नारायण, उमा-महेश इ. मूर्ती आहेत.

**हरिद्वारचा कुंभमेळा**:–येथे दर १२ वर्षांनी कुंभमेळा भरतो. हा पर्वणी योग मानून लोक गंगास्नानासाठी हरिद्वारला येतात. यावेळी सारे हरिद्वार भक्तिरसात बुडून गेलेले असते. योगी, साधू, संत, भक्त लाखोंच्या संख्येने येतात. यावेळी गर्दी तर एवढी प्रचंड असते की हरिद्वार हे तीर्थक्षेत्र गुदमरेल की काय अशी भीती वाटू लागते. कुंभमेळ्याच्या पर्वणीवर जर गंगास्नान करण्याचा योग लाभला तर मोक्षप्राप्ती होते अशी श्रद्धा आहे.

**हरिद्वार येथील उत्सव**:–

१) महाशिवरात्र
२) मकरसंक्रांत
३) वैशाखी प्रतिपदा
४) कुंभमेळा–दर १२ वर्षांनी.

**हरिद्वारला कोठे उतराल ?**:–(मध्यमवर्गीयांसाठी)

| हॉटेल नाव | पत्ता | फोन | हॉटेल नाव | पत्ता | फोन |
|---|---|---|---|---|---|
| आनंदनिवास हॉटेल | श्रावणनाथ घाट | ६७ | गुरुदेव हॉटेल | स्टेशनरोड | १०१ |
| आर्यनिवास ट्रस्ट बि. | निरंजन अखरा रोड | – | ग्यान निकेतन | सुभाष घाट | ३०२ |
| जयपुरीया हाऊस | रामघाट | २१७ | पॅलेस हॉटेल | श्रावणनाथ नगर | १९१ |
| हॉटेल सम्राट | श्रावणनाथ नगर | ४३३ | दीप हॉटेल | श्रावणनाथ नगर | — |
| न्यू रॉयल हॉटेल | गौ घाट | ३१५ | अलका हॉटेल | गौ घाट | २४४ |
| हॉटेल हरिनिवास | गौ घाट | ४५७ | उपमा हॉटेल | सब्जीमंडी | — |
| विक्रांत हॉटेल | गौ घाट | ३४३ | राज हॉटेल | विष्णूघाट | ६३९ |
| हॉटेल सवेरा | निर्मला छावणी | — | | | |

**हरिद्वार स्टेशनपासून १ कि. मी. अंतरावरील धर्मशाळाः**–(यामध्ये सर्व सोयी असून स्वतंत्र खोली व कॉमन हॉल पण अल्प किंमतीत मिळू शकतात. यासाठी धर्मशाळेचे नाव व हरिद्वार एवढाच पत्ता लिहावा.)

| | | |
|---|---|---|
| १) भाटीया भवन | २) गरहवाली सभा | ३) गुजराथ भवन |
| ४) कर्नाटक धर्मशाळा | ५) काली कमली धर्मशाळा | ६) नानकीबाई धर्मशाळा |
| ७) लखनौवाली धर्मशाळा | ८) मोदीभवन धर्मशाळा | ९) गोपालधाम धर्मशाळा |
| १०) गढवाली धर्मशाळा | ११) शेठ चंदिराम धर्मशाळा | १२) शेठ करोडीमल धर्मशाळा |
| १३) नरसिंह भवन | १४) शेठ सूरजमल धर्मशाळा | १५) मानकौर धर्मशाळा |
| १६) मारवाडी धर्मशाळा | १७) देवीदयाल सुखदयाल | १८) टोपीवाली धर्मशाळा |
| १९) विनायक धर्मशाळा | २०) शेठ खुशीराम धर्मशाळा | |

**स्टेशनपासून लांब पण सर्व सुखसोयींयुक्त राहण्याच्या जागाः**–

१) जगदीश आश्रम २) पंजाबी सिंध क्षेत्र ३) धनदेवी धर्मशाळा ४) पूंच हाऊस

**हरिद्वारपासून इतर स्थानांचे अंतरः**–

| | | |
|---|---|---|
| १) बद्रीनाथ २९८ कि.मी. | २) केदारनाथ २२३ कि.मी. | ३) गंगोत्री २४६ की.मी. |
| ४) यमनोत्री २२२ कि.मी. | ५) ऋषिकेश २४ कि.मी. | ६) मसुरी ७७ कि.मी. |
| ७) उत्तरकाशी १५४ कि.मी. | ८) देवप्रयाग ९३ कि.मी. | ९) जोशीमठ २७४ कि.मी. |

**हरिद्वारमधील काही महत्त्वाचे फोनः**–

| | | | |
|---|---|---|---|
| १) पोलीस स्टेशन | ०९ | २) रेल्वेचौकशी | ३५ |
| ३) पोस्ट ऑफीस | २५ | ४) रोडवेज (बस) | ३७ |
| ५) फायरब्रिगेड | २४ | ६) हॉस्पिटल | ६० |
| ७) तारघर | ०५ | | |

**हरिद्वारमधील बँकाः**–

| | |
|---|---|
| १) सेंट्रल बँक ऑफ इंडिया | २) पंजाब नॅशनल बँक |
| ३) ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स | ४) स्टेट बँक ऑफ इंडिया |
| ५) युनियन बँक | ६) युनायटेड कमर्शियल बँक |

**हरिद्वारमधील सिनेमागृहेः**–


| | | |
|---|---|---|
| १) चित्रा | २) गंगा | ३) केशव |
| ४) रतन | ५) संगीता | |

**हरिद्वारमधील हॉस्पिटल्सः**–

| | |
|---|---|
| १) सिव्हिल हॉस्पिटल | २) जैनेरल गव्ह. स्त्रियांचे हॉस्पिटल. |
| ३) गव्हर्नमेंट मॅटर्निटी हॉस्पिटल | ४) महानंद मिशन सेवासदन |
| ५) रामकृष्ण मिशन सेवाश्रम | ६) ऋषीकुल आयुर्वेदिक |



० ० ०




**ऋषिकेश**:–हरिद्वारपासून २४ कि. मी. अंतरावर हिमालयाच्या पर्वतराईत ऋषिकेश वसले आहे. भारतात भक्तांची गाढ श्रद्धा असलेली जी पवित्र क्षेत्रे आहेत त्यात 'ऋषिकेश' खचितच उल्लेखनीय आहे. ऋषिकेशचे नैसर्गिक वातावरण सांसारिक मायामोहातून मुक्त करून श्रद्धेच्या किनाऱ्यावर मन स्थिर करते. या सुंदर वातावरणात काही वाईट विचार मनाला शिवतच नाहीत. येथे क्षणभर का होईना संसारिक माणसाला ऋषिजीवनाची उत्तुंग अनुभूती लाभते. येथे येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाचे मन हे परमेश्वराचे मंदिर होऊन त्यात श्रद्धेने परमेश्वराची प्रतिष्ठापना होत असावी. भक्तीमय वातावरणात देवपण मंदिरातील स्थान विसरून भक्त हृदयात कधी स्थानापन्न होत असतील याची जाणीव देवांना आणि भक्तगणांनाही होत नसावी.


**त्रिवेणी घाट** :– गंगेच्याकाठीच एक पवित्र कुंड आहे. पर्वतातून खळखळत येणाऱ्या शीतल जल प्रवाहाने हा परिसर पर्यटकांना अधिक आकर्षक वाटतो. गंगा, यमुना व सरस्वती या तीन नद्यांचा पवित्रपणा या कुंडात आहे असे मानले जाते.

येथे रामाचे मंदिर आहे. रावणाचा वध केल्यानंतर (मानवी हत्येनंतर) प्रायश्चित्त घ्यावे म्हणून येथे प्रभू रामचंद्रांनी तपश्चर्या केल्याची कथा कथन केली जाते.

**कैलाशानंद मंदिर**:–लक्ष्मणझूला ओलांडून पुढे येताच समोरच ही मंदिरवजा भव्य इमारत आहे. या इमारतीस १३ मजले आहेत. या मंदिराचे वैशिष्टच असे की, यात प्रत्येक मजल्यावर वेगवेगळ्या देवदेवतांच्या मूर्ती आहेत. प्रत्येक मजल्यावरील हॉलमध्ये लहान स्टोअर्स असून तेथे विशेषत: कलात्मक वस्तू विकत मिळतात.

**लक्ष्मणझूला**:–तारांच्या दोरांनी तयार केलेल्या गंगेच्या प्रचंड पात्रावरील अधांतरी भव्य पुलालाच 'लक्ष्मणझूला' असे म्हणतात. दोरांनी या पुलाचे वजन वरच्यावर पेललेले आहे. याची लांबी ४५० फूट असून तो गंगेच्या पात्रापासून ७० फूट उंच व ८ फूट रुंद आहे. यावरून लोकांना पायी जाता येते. पुलावरून वाहनांना जाण्यास मात्र बंदी आहे. गंगानदीवरील हा पूल आश्चर्यकारक व अद्‌भुत अनुभूती देणारा आहे. पुलाजवळ लक्ष्मणाचे मंदिर आहे व हा पूल झोक्यासारखा टांगलेला वाटतो. म्हणून यास लक्ष्मणझूला म्हणतात. इ. स. १८८९ पर्यंत हा पूल दोरावर उभारला होता.

**स्वर्गाश्रम**:–हा आश्रम स्वामी कालीकमलीवाले यांनी बांधला. शिवानंद आश्रमाच्या विरुद्ध दिशेला गंगेच्या किनाऱ्यावर हा आश्रम आहे. लक्ष्मण झूल्यावरून ३ कि. मी. चालत किंवा शिवानंद आश्रमापासून नावेतून गंगा ओलांडून येथे येता येते. या आश्रमात राहण्याची सोय आहे.



**गंगेच्या प्रचंड पात्रावर तारांच्या साह्याने उभारलेला 'लक्ष्मणझूला' ऋषिकेश.**

**गीताभवन**:–स्वर्गाश्रमाजवळच गीताभवन आहे. संपूर्ण गीता संगमरवरी दगडात कोरलेली येथे आढळते. मुख्य मंदिराच्या मंडपात कृष्ण चरित्रावर आधारित असंख्य चित्रे आहेत. येथे राहण्यासाठी खोल्या मिळू शकतात.

**शिवानंद आश्रम**:–स्वामी शिवानंद महाराज यांनी या आश्रमाची स्थापना केली. हा आश्रम १९३६ मध्ये उभारण्यात आला. ही सेवाभावी संस्था आहे. यांचा स्वत:चा छापखाना असून तेथे वेदान्त वाङमय प्रसिद्ध केले जाते. आश्रमात दवाखाना व गरिबांसाठी अन्नछत्रपण चालवले जाते.

हरिद्वारहून ऋषिकेशसाठी रेल्वे, बस व टॅक्सी सतत आहेत. त्यामुळे हरिद्वारला राहूनच ४ तासांत ऋषिकेश पाहून परत हरिद्वारला येता येते.

**कनखल** :–कनखल हे हरिद्वारपासून ४ कि. मी. अंतरावरील एक रमणीय स्थान आहे. प्राचीन काळात राजा दक्षाची ही राजधानी होती. नीलधारा नदी व गंगा नदी यांचा संगम येथे आहे. दक्ष राजाची मुलगी सती. तिचे लग्न शिवशंकराशी झाले. राजा दक्षाने राजसूय यज्ञ करायचे ठरविले. पण शंकराकडून झालेल्या अपमानाचा बदला म्हणून दक्षाने यज्ञासाठी शिव व सतीस आमंत्रण देण्याचे कटाक्षाने टाळले. आपल्या वडिलांकडे सर्व ऋषीमुनी जात आहेत आणि अशावेळी आपण तेथे नसावे या भावनेने सतीचे मन विव्हळले. माहेरच्या ओढीने तिने शंकरास आमंत्रण आले नाही तरी वडील व गुरु यांच्याकडे जाताना आमंत्रण लागत नाही असा युक्तिवाद योजून वडिलांकडे जाण्यास शंकराची परवानगी मिळवली. शंकराने मात्र स्वत: येण्यास नकार दिला.


सती दक्ष राजाकडे आली, पण तिचे इतरांप्रमाणे स्वागत झाले नाही. उलट अपमानाने ती विद्ध झाली. तिने यज्ञकुंडातच उडी घेऊन प्राणार्पण केले. शंकराला हे कळताच क्रुद्ध झालेल्या त्या रौद्रेश्वराने वीरभद्राला दक्षाचे शिर उडविण्याची आज्ञा केली. ही आख्यायिका आपणास ज्ञात आहेच. या ऐतिहासिक कथेतील काही अवशेष आपणास कनखल येथे पाहवयास मिळतात.

**सतीकुंड**:–कनखल ज्वालापूर रस्त्यावर हे कुंड आहे. येथेच सतीने स्वत:ला जाळून घेतल्याची कथा सांगितली जाते.

**सतीघाट**:–गंगा नदीवर कनखल येथे जो घाट बांधण्यात आला आहे त्यालाच 'सतीघाट' असे संबोधतात. भाविक लोक या घाटावर स्नान करतात. येथे ४ थे गुरु अमददासजी यांच्या स्मृत्यर्थ गुरुद्वार बांधलेला आहे.

हरिद्वारच्या सभोवती कुशावर्त, बिल्वतीर्थ, गंगानदी, नीलपर्वत, कनखल ही ५ पवित्र तीर्थक्षेत्रे आहेत.

० ० ०


DEHRA DUN.
TO MUSSOORIE
SHANSHAHI ASHRAM
RAJPUR
DEAR PARK
TO MALSI
KISHANPUR
RAM KRISHAN ASHRAM
ANAND MAIMA ASHRAM
SAHASTRA DHARA
TAPOVAN
1 Km.
TO RAIPUR
DILARAM
BAZAR
ANARWALA
WATER WORKS
CIRCUIT HOUSE
ROBBERS CAVE
TONS
SURVEY OF FICE
CITY BUS STAND
ASTLEY HALL
CLOCK TOWER
E.C. ROAD
SUBHASH ROAD
GANDHI ROAD
RISPANA
BAZAR
PALTAN
DELHI BUS STAND
TOURIST OFFICE
12
RAILWAY STATION
MUSSOORIE BUS STAND
SAHARANPUR CHOWK
MALL ROAD
RIVER
KISHAN NAGAR
GARHI
CANTT BOARD
TAPKESHWAR
F.R.I.
HERBERT PUR
BALLUPUR
BINDAL
SAHARANPUR
TO DELHI SAHARANPUR
NAINITAL
DAKPTHAR
KALSI
TO YAMUNOTRI
TO CHAKRATA
TO SIMLA
TO SAHABAN PUR
2 Km.
11
LAXMAN SIDB
20
RISHIKESH
BHANIYA WALA
35
HARDWAR
INDEX.
BRIDLE ROAD
MOTOR ROAD
TOURIST SPOTS.
DHARAM SHALA
D

# डेहराडून



**प्रेक्षणीय स्थळाचे नाव**:—डेहराडून.

**राज्य**:—उत्तरप्रदेश.

**समुद्रसपाटीपासून उंची**:—६४० मीटर.

**उष्णतामान उन्हाळा**:—३६.६ अंश ते १६.७ अंश.

**हिवाळा**:—२३.४ अंश ते ०५.२ अंश

**भाषा**:—हिंदी, इंग्रजी, गढवाली, पंजाबी.

**येथे कोणत्या महिन्यात भेट द्याल**:—मसुरीला जाताना एप्रिल ते मे व ऑक्टोबर.

**टूरिस्ट कार्यालय**:—रिजनल टूरिस्ट ऑफिस, ६६, गांधी रोड, डेहराडून.
**फोन : ३२१७.**

**डेहराडून**:—डेहराडून हे शहर उत्तर रेल्वेचे टर्मिनस आहे. पूर्व दिशेला गंगा व पश्चिमेला यमुनेच्या दुआबात हे स्थान वसलेले आहे. शिवालिक पर्वताच्या रांगेत

पायथ्याशी जो भाग आहे त्यास 'डून व्हॅली' म्हणतात. सध्या आपण त्याच भागाला डेहराडून असे म्हणतो.

इ. स. १६९९ मध्ये गुरुरामराय यांनी येथे गुरुद्वार उभारले. गुरुरामराय यांचा औरंगजेबासारखा बादशहापण मान राखायचा. मग इतर लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल निश्चितच आदरयुक्त भावना असणार. या भागाला 'गुरुजीका डेरा' असे संबोधित. या 'डेरा' भोवती हळूहळू वस्ती वाढायला लागली. हा डेरा डून व्हॅलीत असल्याने त्यातूनच 'डेहराडून' या नावाला आकार मिळाला असावा.

डेहराडून येथे द्रोणाचार्यांचा आश्रम होता, अशीही एक महाभारतकालीन कथा ऐकवली जाते. द्रोण या शब्दाचा अपभ्रंश 'डून' व आश्रम म्हणजे 'डेरा'. द्रोणांचा डेरा—डेहराडून. या अपभ्रंशातूनही 'डेहराडून' हे नाव आकारास आले असावे.

लष्करी अधिकाऱ्यांना शिक्षण देण्याचे डेहराडून हे प्रमुख केंद्र मानले जाते. येथे 'भारतीय वन महाविद्यालय' असून सर्व नकाशांसाठी प्रसिद्ध असलेले 'सर्व्हेअर जनरलचे' प्रमुख कार्यालय पण येथेच आहे. आंधळ्यासाठी पुस्तकात वापरायच्या ब्रेललिपीचा प्रेस याठिकाणी आहे. खुद्द डेहराडून शहरात प्रेक्षणीय असे काही पाहाण्यासारखे नसले तरी जवळपास काही प्रेक्षणीय स्थळे आहेत. गावात पलटन बाजार व कॅनॉटप्लेस ही शॉपिंगची स्थाने आहेत. येथे तांदूळ चांगल्या प्रतीचा मिळतो.

**तपकेश्वर मंदिर**:—डेहराडूनपासून ५ कि. मि. अंतरावर हे शंकराचे मंदिर निसर्गरम्य ठिकाणी आहे. शिवरात्रीला येथे यात्रा भरते.

**तपोवन**:—डेहराडूनपासून ५ कि. मी. अंतरावरील रमणीय स्थान. येथे एक आश्रम आहे. येथे जाण्यासाठी बस आहे. पण २ कि. मी. डोंगरातून पायीच जावे लागते.


**भारतीय वनसंशोधन संस्था**:—डेहराडूनच्या उत्तरेला ५ कि. मी. अंतरावर आहे. येथे वन्य परिस्थितीवर सखोल अभ्यास केला जातो.

**गुरुद्वारा**:—डेहराडूनमधील गुरुद्वारा हे शिखांचे प्राचीन प्रार्थनास्थान मानले जाते. जहांगीरने लाहोरमध्ये उभारलेल्या वास्तूच्या धर्तीवर हे गुरुद्वार उभारण्यात आले आहे. गुरुरामराय यांच्या स्मरणार्थ शीख लोक येथे येतात.

**अभयारण्य**:—डेहराडूनहून २० कि. मी. अंतरावर हे ठिकाण आहे. विविध प्राणी येथे पाहावयास मिळतात. हे ठिकाण पाहाण्यासाठी चक्राता रोड येथे संपर्क साधावा.

**चक्राता**:—डेहराडूनपासून ६० कि. मी. अंतरावर हिमालयाच्या कुशीत समुद्रसपाटीपासून ७००० फूट उंचीवर वसलेले हे थंड हवेचे ठिकाण आहे. वाटेत 'कलशी' नजदीक यमुना नदी वाहताना दिसते.

**सहस्त्रधारा**:–डेहराडूनपासून १५ कि. मी. अंतरावर हे रम्य स्थळ आहे. पर्वतावरून वहात येणाऱ्या जलप्रवाहाच्या हजार धारा कोसळताना पाहून मन मुग्ध होते. याच्या समोरील डोंगरातून गंधकाचे पाणी वहात येते व दोन्ही पर्वतांचे पाणी पुढे एकत्र होऊन वहात जाते. स्नानासाठी पर्यटक व अन्य नागरिक या सहस्त्रधारावर येतात. येथे स्नान केल्याने चामडीचे रोग नाहीसे होतात असा समज आहे. हे अतिशय रमणीय स्थान असल्यामुळे येथे निसर्गसौंदर्याचा मनसोक्त आस्वाद घेता येतो.



**सहस्त्रधारा व गंधक झरा, या दोहोंच्या संगमात स्नानाचा आनंद लुटणारे पर्यटक. सहस्त्रधारा–डेहराडून.**

**लक्ष्मणसिद्ध**:–डेहराडूनहून ऋषिकेश मार्गावर ८ कि. मी. अंतरापर्यंत लक्ष्मण-सिद्ध येथे बसने जाता येते व तेथून वनश्रीने घेरलेल्या उर्वरीत दोन मैलांचा प्रवास हा चालतच करावा लागतो. येथे 'लक्ष्मणसिद्ध' हे एक संतपुरुष होऊन गेले.

**राष्ट्रीय सुरक्षा अकादमी**:–लष्करी शिक्षण देऊन लष्करी अधिकाऱ्यांची निर्मिती करणारे भारतातील अति महत्त्वाचे हे केंद्र डेहराडून येथे आहे.

**डेहराडून येथील टूरिस्ट एजंटस्**:–१) ९, बी. अॅस्टले हॉल.
२) कुमार ट्रेडिंग कंपनी, ७५, गांधी रोड.

**डेहराडून येथील बागा**:–१) गांधीपार्क–राजापूर रोड.
२) बोटॅनिकल गार्डन–चक्राता रोड.

**डेहराडून येथे राहाण्याची सोय:–**

| नाव | फोन व पत्ते | नाव | फोन व पत्ते |
|---|---|---|---|
| १) ओरमा हॉटेल | २४४८१ | ९) हॉटेल प्रेसिडेंट (६, अॅस्टले हॉल) | -- |
| २) आकाशदीप | २७२७८ | १०) मधुबन हॉटेल | २४०९४ |
| ३) ओरिएन्टल हॉटेल | २४२५६ | ११) मॅजेस्टिक हॉटेल | २३४८१ |
| ४) टूरिस्ट हॉटेल | २३२६८ | १२) व्हिक्टोरिया हॉटेल | २३४८६ |
| ५) प्रिन्स हॉटेल | २७०७० | १३) रीजेन्ट हॉटेल | २३५१८ |
| ६) मेट्रो हॉटेल | २३२३९ | १४) हॉटेल रिलॅक्स | ७, कोर्ट रोड |
| ७) इंडिया हॉटेल | २४२२९ | १५) हॉटेल मीडो | गांधी रोड |
| ८) डून व्ह्यू हॉटेल | राजपूर रोड | १६) कॅनॉट हॉटेल | चक्राता रोड |

**सरकारी निवासस्थान**–१) पी. डब्ल्यू. डी. इन्स्पेक्शन बंगला, राजापूर रोड
२) टूरिस्ट हाऊस–सहस्त्रधारा.
३) वाय. डब्ल्यू. सी. ए.–न्यू कॅन्टोनमेंट रोड.

**ग्रुपसाठी स्वस्त दरात:**–१) आगरवाल धर्मशाळा–गांधी रोड.
२) जैन धर्मशाळा–गांधी रोड.
३) शिवाजी धर्मशाळा–सहारणपूर रोड.


**डेहराडून येथील हॉस्पिटलस:**–१) करोनेशल हॉस्पिटल–छलानवाला विभाग. २) डून हॉस्पिटल–कुचरी रोड. ३) विमेन्स हॉस्पिटल–कुचरी हॉस्पिटल. ४) पब्लिक हॉस्पिटल–सहारणपूर रोड ५) मिलट्री हॉस्पिटल–कॅंटोनमेंट.

**प्रमुख शहरांचे कि. मी.**

१) मुंबई–१९२७ कि. मी.
२) दिल्ली–२२५ कि. मी.
३) मद्रास–२४८८ कि. मी.
४) हरिद्वार–५४ कि. मी.

**टिप:**–रिजनल टूरिस्ट ऑफिस, डेहराडून, येथून रोज सकाळी ९–०० वा. हरिणपार्क, तपकेश्वर, वनसंशोधन केंद्र व सहस्त्रधारा या साईटसीईंगसाठी बस सुटते.

० ० ०




**प्रेक्षणीय स्थळाचे नाव**–मसूरी

**राज्यः**–उत्तरप्रदेश

**समुद्रसपाटीपासून उंचीः**–२००० मीटर


**हवामानः**–हिवाळ्यात ७२ अंश ते १२८ अंश
उन्हाळ्यात २५.६ अंश ते ३१.७ अंश.

**भाषाः**–हिंदी, इंग्रजी.

**येथे कोणत्या महिन्यात भेट द्याल**–एप्रिल ते जुलै व सप्टेंबर ते ऑक्टोबर.

**टूरिस्ट कार्यालयः**–टूरिस्ट ब्युरो, मालरोड, मसूरी.


**मसूरी** :– या थंड हवेच्या ठिकाणी जाण्यासाठी प्रथम डेहराडून येथे जावे लागते. डेहराडूनपर्यंत विमान, रेल्वे या मार्गाने जाता येते. डेहराडून ते मसूरी हे ३५ कि. मी. अंतर मात्र तेथील रोडवेजच्या बसने किंवा टॅक्सीने जाता येते. भारतातील सिमला, दार्जिलिंग, उटी या थंड हवेच्या ठिकाणापेक्षा मसूरी या हिल स्टेशनला जाणारे म्हणून हौशी लोक येथे येतातच, शिवाय गंगोत्री-यमनोत्रीला जाणाऱ्या यात्रेकरूंचा पण हाच मार्ग असतो. त्यामुळे या हिल स्टेशनचे वेगळेच महत्त्व वाढलेले आहे.


MUSSOORIE
INDEX
A. L.B.S. ACADEMY.
B. MODERN SCHOOL
C. PUNJAB SIND BANK
D. TOURIST HOSTEL
E. VASU THEATER
F. JAYSONS ROLLER RINK
G. MUSSOORIE CO-OP-CLUB
H. HAKMAN'S HOTEL
I. POLICE STATION
J. ALLAHABAD BANK
K. RAILWAY OUT AGENCY
L. GENERAL POST OFFICE
M. TELEPHONE EXCHANGE
N. STATE BANK
O. RIALTO CINEMA
P. PUNJAB NATIONAL BANK
Q. LA-ANJUMAN CINEMA
R. THE RINK
S. PICTURE PALACE & JUBILE CINEMA
T. UNION BANK.
U. C.P.W.D. I/H
V. PETROL PUMP
TO CHAKRATA
54
TO KALSI
25
TO YAMUNOTRI
118
YAMUNA BRIDGE
KEMPTY FALL
HAPPY VALLEY
MUNCIPAL GARDEN
LIBRARY BUS STAND
P.W.D. I/H
13
LIBRARY
BAZAR
MALL ROAD
CAMELS BACK ROAD
GUN HILL
TOURIST OFFICE
KULRI BAZAR
NAG TIBBA
DEVELSARI
CHILDER'S LODGE
THATURE
SURKH ANDA DEVI
DHANOLTI
KADDUKHAL
SUWAKHOLI
TEHRI BUS STAND
LANDAUR BAZAR
MASONIC LODGE BUS STAND
TO BARLOW GANG
TO TEHRI
TO RISHIKESH
63
21
18
KINCRAIGE BUS STAND
BHATTA FALL
TO DEHRA DU.
25
TOURIST SPOTS
DOON VALLEY

मसूरी या शहराचा इतिहास फार प्राचीन नाही. इ. स. १८२६ मध्ये ब्रिटिश राज्यकर्त्यांनी 'लंडार' हा भाग इंग्लिश सैनिकांच्या वास्तव्यासाठी निवडला होता. सर्वत्र पसरलेली मसूरीची झाडे आणि हवामान थंड असल्याने हळूहळू येथे वस्ती होऊ लागली. मसूरच्या झाडावरूनच या भागाला मसूरी हे नाव पडले. इ. स. १८८४ मध्ये डच लोकांनीपण याठिकाणी वसाहत केली. हिमालयाच्या पर्वतमय प्रदेशातच मसूरी मोडत असल्याने खानदानी निसर्गसौंदर्याचा लाभ झालेल्या या थंड हवेच्या स्थानाचे, भारतीय संस्थानिकांनापण आकर्षण वाटले. त्यांनी ग्रीष्म ऋतूतील विश्रांतीसाठी या ठिकाणी निवासस्थाने उभारण्यास सुरुवात केली आणि हळूहळू त्यास गावाचे स्वरूप येऊ लागले. मसूरीलाच 'ब्यूटी क्वीन' असेही संबोधतात. त्याला महत्त्वाचे कारण शहररचना नसून शहराच्या सभोवतालो असलेल्या हिरव्यागच्च सौंदर्याला द्यावे लागेल.

**मसूरीतील प्रेक्षणीय स्थळेः–**

**गनहील** (Gun Hill)–मसूरी शहराच्या मध्यभागी असलेले हे एकमेव



**'तरंगती सफर' गनहीलवर घेऊन जाणारी रोप वे. मसुरी.**

आकर्षक स्थान आहे. ब्रिटिश काळात येथे ठेवण्यात आलेल्या तोफेचा उपयोग संरक्षणापेक्षा लोकांना वेळ कळविण्यासाठी केला जाई. विशिष्ट वेळीच तोफ डागली असता त्या आवाजावर लोक घड्याळे लावीत असत. आता ही प्रथा बंद झाली आहे. या गनमुळेच यास गनहील म्हणत असावेत.

मसूरी बस स्टँडपासून १२ मिनिटांच्या अंतरावरच 'हकमनस' हॉटेलजवळ ट्रॉली स्टेशन आहे. येथे तिकीट काढून ट्रॉलीने 'गनहील'वर जाता येते. टेकडीवर छोटेसे पठार असून तेथे हॉटेल्स, रेडिओ, अन्य खरेदीची दुकाने आहेत. गनहीलची उंची समुद्रसपाटीपासून २४०० मीटर तर मसूरीपासून ४०० मीटर आहे. गनहील वरून दुर्बिणीतून पूंच, श्रीकांता व गंगोत्री ही स्थाने पाहता येतात.

**म्युन्सिपल गार्डन**:—मसुरीतील हा महत्त्वाचा पिकनिक स्पॉट मानला जातो. या बागेतील तलावात बोटिंगची सोय आहे. मालरोडवर ३ कि. मी. अंतरावर हे स्थान आहे.

**टेलिव्हिजन टॉवर**:—मसूरीपासून ५ कि. मी. अंतरावर हा टॉवर आहे. यालाच 'लालटिब्बा' म्हणतात. येथेही अन्य पॉईंट पाहण्यासाठी दुर्बिण आहे. इ. स. १९७७ मध्ये जर्मनीच्या मदतीने येथे टेलिव्हिजन सेंटर उभारण्यात आले.

**गांधीचौक**:—लायब्ररी बाजार म्हणून हा भाग ओळखला जातो. येथे मुलांसाठी एक पार्क आहे.

**कॅमल बॅक रोड**:—कुलरी बाजारपासून उंटाच्या आकारासारखा असलेला हा रस्ता लायब्ररी बाजारला जाऊन मिळतो.

मसुरीतील कुलरी व लंढौर बाजारही प्रसिद्ध आहेत.

**धनोल्ती**:—मसूरीपासून तेहरी रस्त्यावर हे स्थान २४ कि. मी. अंतरावर आहे. हिमालयाच्या टेकड्यांनी व्यापलेल्या या स्थानी देवदार व पाईन वृक्षांची हिरवी जंगले मनाला मोह घालतात. येथे फॉरेस्ट रेस्टहाऊस आहे. राहण्यासाठी आधीच बुकिंग केलेले बरे.

**खुरखंडा देवी**:—तेहरी रस्त्यावर मसूरीपासून ३३ कि. मी. अंतरावर हे मंदिर आहे. शेवटचे २ कि. मी. अंतर पायी जावे लागते. १० हजार फूट उंचीवरील या मंदिराला भेट देणे ही जीवनातील वेगळीच रोमहर्षक अनुभूती आहे.

**मौसी धबधबा**:—मसूरीपासून ३ कि. मी. अंतरावरील एक रमणीय स्थान. निसर्ग सौंदर्याची मुक्त उधळण येथे झालेली दिसते. राजपूर रस्त्यावर हे स्थान आहे.

**केम्पटी धबधबा**:—मसूरीपासून १५ कि. मी. अंतरावरील व १५२५ मीटर उंच असे हे स्थान आहे. हा धबधबा ३८ फूट उंचीवरून कोसळतो.

**मसूरीला कोठे उतराल ?**

| | |
|---|---|
| १) मसोनिक लॉज–बसस्टॅन्ड | १७) हकमनस् हॉटेल–मालरोड |
| २) सेव्हॉय हॉटेल–लायब्ररी बझार | १८) अमर– कुलरी बझार |
| ३) रोझलान —,,— | १९) अप्सरा– —,,— |
| ४) डून व्ह्यू– —,,— | २०) मिनर्व्हा– —,,— |
| ५) इंडिया– —,,— | २१') बीकराम– —,,— |
| ६) इंपेरियल– —,,— | २२) ब्रेंटवूड– —,,— |
| ७) प्रिन्स– —,,— | २३) कॅनॉट कॅसल– —,,— |
| ८) ग्रेस माऊंट– —,,— | २४) ग्लीन व्हीला– —,,— |
| ९) डाऊन स्टोअर– —,,— | २५) मोती पॅलेस– —,,— |
| १०) रॉकवूड– बसस्टँड | २६) नाझ– —,,— |
| ११) स्वॅगी– —,,— | २७) रॉक्सी– —,,— |
| १२) सन व्ह्यू– द माल रोड | २८) रिगल– —,,— |
| १३) वूडलँड– —,,— | २९) दर्पण– लँडौर बझार |
| १४) ब्रॉडवे–कॅमल बॅक रोड | ३०) गणेश– —,,— |
| १५) नंदव्हीला– —,,— | ३१) हिमालय– —,,— |
| १६) शहीन– —,,— | ३२) पॅलेस– —,,— |

**धर्मशाळा**:–१) लक्ष्मीनारायण मंदिर–लायब्ररी बझार. २) गुरुद्वारा–लायब्ररी बझार. ३) सनातन धर्म मंदिर–लँडौर बझार. ४) जैन धर्मशाळा लँडौर बझार. ५) आर्य समाज मंदिर–लँडौर बझार ६) मुसाफिर खाना–लँडौर बझार.

**मसूरीतील प्रार्थनास्थळे**:–१) लक्ष्मीनारायण–लायब्ररी बझार. २) मशीद–लायब्ररी बझार. ३) ख्रिस्त चर्च–लायब्ररी बझार. ४) से इमेलीन चर्च–लायब्ररी बझार. ५) आर्यसमाज–लँडौर बझार. ६) जैनमंदिर–लँडौर बझार ७) बुद्ध टेंपल–हॅपी व्हॅली.

**मसूरीतील रेस्टॉरंटस्**:–१) अलंकार २) अन्नपूर्णा ३) भोजनालय ४) क्वालिटी ५) नीलम ६)रॉयल कॅफे बार.

**मसूरीतील हॉस्पिटल्स**:–

| | |
|---|---|
| १) ब्रूमहील हॉस्पिटल | ४) सिव्हिल हॉस्पिटल |
| २) लँडौर कम्युनिटी हॉस्पिटल | ५) म्युनिसिपल आय्. डी. हॉस्पिटल |
| ३) म्युनिसिपल डिस्पेन्सरी | ६) विमेन्स हॉस्पिटल |

**मसूरीतील सिनेमागृहेः–**

१) वासू थिएटर–लायब्ररी बझार
२) ला अंजूमन–कुलरी बझार
३) पिकचर पॅलेस– —,,—
४) ज्युबिली थिएटर– —,,—
५) कॅपिटल सिनेमा–
६) प्लाझा–
७) बसन्त–

**मसूरीतील क्लबः–**१) रोटरी क्लब २) लायन्स क्लब

**मसूरीपासून काही महत्त्वाच्या ठिकाणांचे अंतरः–**

१) बद्रीनाथ ३१५
२) केदारनाथ २५६
३) यमनोत्री १४३
४) गंगोत्री ३८०.
५) सोमप्रयाग १६४

० ० ०


**भारत बस सर्व्हिस**

**–दिल्लीमधील विश्वासू बस सर्व्हिस–**

दिल्ली, मथुरा व आग्रा साईटसीईंग तसेच उत्तरभारत व काश्मिरसाठी उत्तम सर्व्हिस

९, १५, ३५, ४९, ५५ सीटस् असलेल्या व्ही. डि. ओ. कोच, पुशबॅक, A/C लक्झरी व से. मी. लक्झरी अशा असंख्य बसेस उपलब्ध.

आपण आमचेकडेच बस बुक करा आणि प्रवासाचा आनंद लुटा.

**भेटा अथवा लिहा :–** दुकान नं. २, जुना पंजाब बसस्टॅन्ड,
मेन रेल्वेस्टेशन, दिल्ली–११०००६.



# चंदिगढ

**प्रेक्षणीय स्थळाचे नाव**:–चंदिगढ.

**राज्य**:–१) केंद्रशासित.

२) पंजाब व हरियाणा दोन्ही राज्याची राजधानी.

**समुद्रसपाटीपासून उंची**:–३५० मीटर.

**ऋतू**:–हिवाळा–१४ अंश सें. ग्रे. जास्तीत जास्त विषम हवामान.

०६ अंश सें. ग्रे. कमीत कमी.

**उन्हाळा**:–४३ अंश सें. ग्रे. जास्तीत जास्त.

३५ अंश सें. ग्रे. कमीत कमी.

**पाऊस**:–४५ सें. मी.


**लोक**:–शीख व पंजाबी हिंदू.

**भाषा**:–पंजाबी–हिंदी–इंग्रजी.

**येथे कोणत्या महिन्यात भेट द्याल**:–ऑक्टोबर ते मार्च.

**टूरिस्ट कार्यालय**:–टूरिस्ट ऑफिस, बसस्टॅन्ड, चंदीगढ.

**चंदिगढ**:–स्वातंत्र्यपूर्व काळात लाहोर हे शहर पंजाब राज्याची राजधानी म्हणून ओळखले जात होते. पण हिंदुस्थानची फाळणी झाल्यानंतर लाहोर पाकिस्तानात गेल्यामुळे पंजाबला राजधानीच उरली नाही. काही काळ जालंदरहून कामकाज पाहण्याचा प्रयत्न केला गेला. काही दिवस कामकाज सिमल्याहून पाहिले गेले. त्यामुळे शेवटी पंजाबला राजधानीसाठी योग्य शहर उपलब्ध न झाल्याने हवाई पहाणी करून नवीन शहरच राजधानी म्हणून वसवावे असे ठरले. हिमालयाचा भाग मानलेल्या शिवालिक पर्वताच्या पार्श्वभूमीवर मैदानी जमिनीचा शोध घेतला गेला.


CHANDIGARH
Schematic plan
SIMLA
KALKA
H.M.T.
PINJOR
PANCHKULA
AMBALA
RLY. STATION
IND. AREA
LAKE
GATEWAY
1 ROSE GARDEN
2 MUUZIUM
3 SACHIVALAYA
4 VIDHANSABHA
5 HIGH COURT
6 ROCK GARDEN
7 LAKE

याठिकाणी एका टेकडीवर 'चंदी' नावाच्या देवीचे देऊळ असून तेथेच लहानशी ग्रामीण वस्ती होती. येथेच मास्टरप्लॅन आखून आधुनिक शहर वसवण्याची कल्पना साकार होऊ लागली. 'चंदी' देवीच्या नावावरून या शहराचे 'चंदीगढ' असे नामकरण करण्यात आले.

या शहराचा प्रथम आराखडा न्यूयॉर्कच्या अल्बर्ट मेयरने मॅथ्यू नोव्हेकी यांच्या मदतीने तयार केला होता. नोव्हेकी हे आकस्मितरीत्या विमान अपघातात गेल्यामुळे हे काम फ्रान्सचे प्रसिद्ध वास्तुशास्त्रज्ञ ली कार्ब्यूझर यांच्याकडे सोपविण्यात आले. शहराचे विविध भाग पाडून त्या प्रत्येक भागात मैदाने, बगीचे, शाळा, दुकाने, चित्रपटगृहे, हॉस्पिटल्स यांची वस्तीनुसार संख्या ठरवून, मांडणीनुसार त्या भागांना 'सेक्टर' असे नाव देऊन अशा ४७ सेक्टरचा प्लॅन करण्यात आला. त्यांतील सध्या ३८ सेक्टरपर्यंतचे काम पूर्ण होत आले आहे.


१४ ते १५ चौ. मैलांच्या प्रदेशात नवीन शहराचे स्वप्न साकार होत आहे. इ. स. १९५३ मध्ये शहराचे काम सुरू झाले. यांतील १७ नं. सेक्टर हा शहराचा प्रमुख व मध्यवर्ती भाग मानला जातो. या भागात बसस्टॅन्ड, टूरिस्ट कार्यालये, हॉटेल्सदुकाने, बुकस्टॉल्स इ. आहेत, तर सेक्टर नं. २६ मध्ये धान्याची मोठमोठी दुकाने, भाजीमार्केट तसेच 'सत्संग भवन' हे राहण्याची सोय असलेले एक उत्तम स्थान आहे.

चंदीगढ या शहरातील घरे, रस्ते, फूटपाथ यांची रचना, अतिशय नियोजन, पूर्वक असून ती वास्तुशास्त्रातील आदर्श नमुना ठरलेली आहे. या शहरात कोठेही अव्यवस्थित वा अडचणीचा भाग वाटत नाही. त्यामुळे चंदीगढ हे रचनेच्या बाबतीत आशिया खंडातील प्रथम दर्जाचे शहर मानले जाते. इ. स. १९६६ मध्ये पंजाब व हरियाना या दोन स्वतंत्र राज्यांचे अस्तित्व निर्माण झाल्यावर चंदींगढची समस्या निर्माण झाली. हे शहर या दोन्ही राज्यांना पाहिजे होते. अखेर चंदीगढला केंद्राच्या अधिकार कक्षेत ठेऊन दोन्हीही राज्यांच्या राजधानीचा मान चंदीगढकडे देण्यात आला. पण हा मान बुधवार दि. २४ जुलै १९८५ रोजी संपुष्टात आला. कारण पंतप्रधान राजीव गांधी व अकाली नेते संत लोंगोवाल यांच्यात यशस्वी बोलणी होऊन 'चंदीगढ' हे शहर पंजाबची राजधानी म्हणून घोषित करण्यात आले. स्वच्छ, नीटनेटके, रेखीव अशा या शहराचा दिमाख व सौंदर्य मनोवेधकच आहे. अत्याधुनिक वास्तुशिल्पाचा उत्कृष्ट नमुना म्हणून चंदीगढकडे कौतुकाने पाहिले जाते.

**प्रेक्षणीय स्थळे:–**

**सेक्रेटरीएट** (Secretariat) :– खरे पाहिले तर चंदीगढमधील प्रत्येक इमारत दृष्ट लागावी इतकी सुंदर आहे. पण सेक्रेटरीएटची इमारत तर आधुनिक

कला व बुद्धिमत्तेचा विलासी समन्वय आहे. सिमेंटचीच पण ही लांबलचक पसरलेली भव्य इमारत भारताच्या वास्तूवैभवात भरच घालते. ही ९ मजली इमारत असून याच्या शेजारीच काटकोनामध्ये विचित्र शिल्पाकृतीने नटलेल्या पिरॅमिडप्रमाणे असेंब्ली हॉल आहे.



**आधुनिक वास्तू शास्त्रातील सुंदरता प्रदर्शित करणारी इमारत. सचिवालय. चंदिगढ**

**हायकोर्ट**:–सेक्रेटरीएटसमोरच २ फर्लांग अंतरावर हायकोर्टची आधुनिक पद्धतीची उत्तम इमारत असून याच्या समोरच जलाशय आहे.

**पंजाब विद्यापीठ**:–चंदीगढच्या १४ व्या सेक्टरमध्ये विद्यापीठाचा परिसर पसरलेला आहे. येथील 'गांधीभवन' पाहण्यासारखे आहे. गांधी तत्त्वज्ञानाचा येथे अभ्यास केला जातो.

**रॉकगार्डन**:–(Rock Garden)–चंदीगढमधील सेक्टर ५ मध्ये रॉक गार्डन आहे. इंजिनीयर श्री. सैनी यांच्या बुद्धिकौशल्यातून हा कल्पक बगीचा अवतरला आहे. रंगोबेरंगी दगड, चिनी मातीच्या भांड्यांचे रंगीबेरंगी तुकडे, गोल गोल दगडी गोटे, फुटलेल्या काचा इ. असंख्य टाकाऊ वस्तूंची येथे आकर्षक जुळणी करून त्यापासून विविध प्राणी, ऐतिहासिक व्यक्ती, पक्षी तयार केलेले आहेत. आपल्या घरातील वस्तू फुटल्यानंतर त्या आपण टाकून देतो. पण अशा तुकड्यांची येथे मात्र कलात्मक सांगड घातलेली पाहावयास मिळते. गार्डन म्हणजे फुले, हिरवळ, झोपाळे, वृक्ष, कारंजे अशी

आपली समजूत असते. पण या गोष्टी येथे नाहीत. स्क्रॅप किंवा साध्या वस्तूतून कोणते सौंदर्य घडवता येते याबाबत रॉक गार्डन म्हणजे एक आदर्श नमुनाच म्हणावा लागेल. गार्डन पाहावयास प्रथम तिकीट काढावे लागते. येथे अनेक विभाग आहेत. एका विभागातून दुसऱ्या विभागात जाताना चक्रव्यूहात सापडूनही आपण संपूर्ण गार्डन पाहूनच मजेत बाहेर पडतो.

**रोझ गार्डन**:–(Rose Garden)–चंदिगढमध्ये मनाला लुब्ध करून टाकणारा हा बगीचा रंगीबेरंगी विविध गुलाबांनी फुललेला आहे. पण गुलाब व वृक्ष हे नुकतेच लावले गेले असल्याने त्यांची खरी सजावट अजून काही वर्षानंतर आपणास पाहायला मिळेल. ही बाग सेक्टर नं. १६ मध्ये आहे. आशियात सर्वाधिक मोठ्या मानल्या गेलेल्या या बागेचा परिसर ३० एकर जमिनीत पसरला आहे.

**म्युझियम-आर्ट** गॅलरी:–(Museum)–सेक्टर नं. १० मध्ये रोझ गार्डनजवळच म्युझियम आहे. याची वेळ दुपारी १० ते ४-३० आहे. आधुनिक चित्र-शिल्पाबरोबर गांधारकालीन सुंदर शिल्पाकृती येथे ठेवल्या आहेत.

**पिंजौर गार्डन**:–(Pinjore Garden)–चंदीगढपासून २० कि. मी. अंतरावर कलका रस्त्यावर हे पिंजौर गार्डन आहे. ही पण एक भव्य व रमणीय बाग आहे. मोगलकालीन बगीचे काश्मिरमध्ये अनेक आहेत. पण पंजाबच्या परिसरात भव्य अशी ही एकमेव बाग आहे. औरंगजेबाचा उजवा हात मानला गेलेल्या फादल-खान याने या पिंजौर गार्डनची रचना केली. येथे मोगलकालीन वास्तुशिल्प पण पाहायला मिळते.

शीशमहाल, रंगमहाल आणि जालमहाल हे तीन विभाग पाहण्यासारखे आहेत. या बांधकामात मोगल व राजपूत कलेचा समन्वय झालेला आढळतो. या बगीच्याचा प्राचीन इतिहास सांगताना प्राचीन काळी पांडवांनी केलेल्या वास्तव्याची जाणीवही करून दिली जाते. पूर्वी या भागास 'पंचपूर' म्हणत असत. त्यावरूनच अपभ्रंशातून पिंजौर नाव रूढ झाले असावे. पांडव वनवासाच्या काळात या ठिकाणी काही दिवस राहात होते, अशी पण आख्यायिका कथन केली जाते.

या बागेतील रंगीबेरंगी कारंजे, हिरवीगार झाडे, मखमलीप्रमाणे पसरलेली हिरवळ, पार्श्वभूमीवर कसौली-शिवालिक पर्वतांच्या रांगा पहात पहात एकेक टप्पा खाली उतरत पर्यटक बगीच्यात भ्रमण करीत असतात. बागेत प्रवेशासाठी तिकीट आहे. सायंकाळी विजेच्या प्रकाशात ही बाग पाहण्यात खरी मौज वाटते. दर रविवारी लाइटिंग व कारंजे पाहण्यासाठी असंख्य पर्यटक संध्याकाळी येथे भेट देतात.

**चंदिगढला उतरण्याच्या विविध जागा :–**

| हॉटेलचे **नाव** | सेक्टर नं. | हॉटेलचे नाव | सेक्टर नं. |
|---|---|---|---|
| १) हॉटेल ओबेरॉय | १० | ६) गव्हर्नमेंट सराई | २३ |
| २) माऊंट व्ह्यू | १० | ७) इंदिरा हॉलीडे होम | २४ |
| ३) हॉटेल अरोमा | २२ | ८) एम्. एल्. ए. होस्टेल | ०३ |
| ४) पंकज | २२ | ९) पंचायत भवन | १८ |
| ५) वाय्. एम्. सी. ए. | ११ | १०) स्टेट गेस्ट हाऊस | ०६ |

**चंदिगढ येथील धर्मशाळा:–**

| | | | |
|---|---|---|---|
| १) सूट धर्मशाळा | २२ | ३) सुभक्ती धर्मशाळा | १६ |
| २) चननराम धर्मशाळा | १७ | ४) सत्संग भवन | २६ |

**चंदिगढमधील क्लब:–**

| | | | |
|---|---|---|---|
| १) चंदिगढ | २ | ३) ऑफिसर्स | ८ |
| २) सेंट्रल | ९ | ४) बोटक्लब | — |

**चंदिगढमधील प्रार्थनास्थळे:–**


| | | | |
|---|---|---|---|
| १) गुरुद्वारा | १९ | ३) कॅथलिक प्रॉटेस्टंट चर्च | १८।२० |
| २) आर्यसमाज | २२ | ४) रामगरह भवन | २७ |
| ५) जैनमंदिर | २७ | ६) मशीद | २० |

**चंदिगढ रेस्टॉरंट:**–मेहफील, गझल, क्वालिटी, इंडियन, कॉफी हाऊस, तंदूर, स्टूडंट सेंटर.

**चंदिगढपासून काही महत्त्वाच्या शहरांची अंतरे:**–१) दिल्ली:–२४० कि.मी. २) मुंबई–१६५६ कि. मी. ३) औरंगाबाद–१५१८ कि. मी. ४) मद्रास–२४९९ कि. मी. ५) नागपूर–१३४३ कि.मी. ६) पुणे–१७४४ कि. मी. ७) आग्रा–४५२ कि. मी.

**चंदिगढ शॉपिंग:**–सेक्टर नं. १७ ही बाजारपेठ खरेदीसाठी प्रसिद्ध आहे.

# BHAKRA NANGAL.



**भाक्रानांगल धरण**:–(Bhakra Nangal Project)–भारताचे आधुनिक तीर्थक्षेत्र.

जे पर्यटक चंदिगढला भेट देतात, ते बहुतेक भाक्रा-नांगल धरण पाहिल्या-शिवाय परतत नाहीत. इ. स. १९५२ मध्ये भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या शुभहस्ते या धरणाच्या पायाभरणीचे पूजन झाले, त्यावेळी ते या धरणाला उद्देशून म्हणाले होते, "भारताची भूमी सुजलाम्-सुफलाम् करणारी ही धरणे आधुनिक तीर्थक्षेत्रे आहेत."

इ. स. १९०८ मध्ये ब्रिटिश गव्हर्नर सरतुई याठिकाणी शिकारीसाठी म्हणून आले असताना या दोन उंच डोंगरकडयातून दुथडी भरून वाहणारी सतलज नदी दिसली. त्याचवेळी नाविन्यपूर्ण सुचलेल्या कल्पनेस आधारित ही जागा धरणासाठी योग्य आहे. अशी नोंद त्यांनी आपल्या डायरीत केली. आपले स्वप्न इ. स. १९५२ मध्ये साकार होईल याची स्वप्नातदेखील त्यांना कल्पना आली नसेल. संस्कृतमध्ये सतलज नदीला 'शताद्री' असे संबोधित. हीच नदी पुढे पंजाबमधून वहात जाऊन पाकिस्तानात सिंधू नदीला मिळते.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर स्वावलंबी भारताचे सोनेरी स्वप्न साकार होण्या-साठी पंचवार्षिक योजना आखण्यात आली. या योजनेतूनच बहुउद्देशीय 'भाक्रा-नांगल' हे विज्ञान युगातील जीवनदायी स्वप्न साकार झाले. जगातील इतर प्रचंड धरणांत भाक्रा-नांगल हे नाव प्रभावाने झळकते. दोन प्रचंड टेकडयांच्यामध्ये सतलज नदीचे पाणी अडवून त्यापासून तयार झालेल्या जलाशयाने जवळ-जवळ ६० मैलांचा परिसर व्यापलेला आहे.

सतलज:–या नदीला 'सतुद्रि' या नावाने संबोधले आहे. ही पंजाबची वरदायिनी असून पंजाब सुजलाम् होण्यासाठी ही नदी कारणीभूत आहे. कैलास पर्वताच्या उत्तरेकडून ही नदी खाली उतरते. पंजाबातून वहात जाऊन सुलेमानजवळ ती पाकिस्तानात शिरते. पंजाबमध्ये चिनाब व सतलज नदीचा संगम होतो. पंजाबातून दुथडी भरून वाहणाऱ्या या जीवदायीनीने पंजाबची तृष्णा पूर्णपणे शमविली आहे. ८००-९०० वर्षांपूर्वी ही नदी कच्छकडे वहात होती. नंतर कालचक्र व भूगर्भ हाल-चालीमुळे गेल्या ८-९ शतकात सतलज नदीच्या दिशा पद्धतीने विस्मयकारक प्रवास केलेला आहे. याच नदीच्या १२ कि.मी. अंतरावर भाक्रा व नांगल ही दोन स्वतंत्र धरणे बांधण्यात आलेली आहेत. पंजाबलाच काय पण रणरणत्या वाळवंटी राजस्थानला पण हिरव्या सौंदर्याचा साज चढवण्यास सतलजचा जीवनप्रवाह अमृतसिंचनासाठी अजूनही दिशा सोडून पुढेपुढे जात आहे.


**धरणाविषयी अन्य माहिती**:-(१) धरणाचा पाया १९० फूट खोल, उंची २२५.५५ मीटर, पायाजवळील रुंदी ९९ मीटर आहे. (२) धरणबांधकामासाठी एकूण खर्च २३८०५ कोटी रु., त्यासाठी निव्वळ ८,१२,८०० टन सिमेंट, १०२ लाख टन लोखंड वापरले गेले. (३) फ्लडगेट आकार-क्र. ४।१५२४ मी. × १४.५ मीटर. (४) बांधकाम करण्यास २३००० मजूर व ३००० इंजिनियर होते. पूर्ण होण्यास १५ वर्षे लागली. (५) धरणाचे आयुष्य सुमारे ४०० वर्षे आहे.


या धरणाच्या खालील बाजूस भिंतीजवळच वीजनिर्मितीसाठी ५ जनित्रे आहेत. ही पाण्याच्या गोल टाकीप्रमाणे वाटतात. यांतील २ ते ३ जनित्रे चालू असतात. व बाकी दुरुस्तीसाठी बंद असतात. येथे वातानुकूलित कंट्रोलरूम आहे. ऑपरेटर येथून फॅनेल बोर्डवर निरीक्षण करतात. ग्रनेज व इन्स्पेक्शन गॅलरीत आत जाण्यास परवानगी नसते. खास ओळख असेल तरच हे पाहता येते. इन्स्पेक्शन गॅलरीतून लिफ्टने धरणावरील भागावर जाता येते. तसेच बसचा स्वतंत्र रस्ता आहे व तेथे छोटीशी बाग, पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था केलेली आहे.

धरणाच्या भिंतीवरून प्रचंड जलाशय पाहताना अंगावर रोमांच उभे राहतात. याच जलाशयाला 'गोविंदसागर' म्हणतात. पर्यटकांचे मन उंच टेकडीवरून या जलाशयात केव्हा सूर मारते ते कळतच नाही. त्याच्या शांत लहरीवर ते कितीतरी वेळ रेंगाळत राहते. हे धरण पाहण्यासाठी प्रथम नांगल या गावी यावे लागते. गाव संपतानाच डोंगर चढण चालू होते. येथे परवानगी घ्यावी लागते. सकाळी ८ ते ४ पूर्वी येथून बस वर सोडली जाते. पुढे हिमाचल प्रदेशाची बॉर्डर लागते. या ठिकाणी दुर्बिण-कॅमेरे इ. जमा करून ठेवावे लागतात. सुरक्षादलास शंका आल्यास गाडी चेक केली जाते व नंतरच धरणावर किंवा पॉवरहाऊसमध्ये जाण्याची अनुमती दिली जाते.

**नांगल डॅम**:-भाक्रा धरणापासून १३ कि. मी. अंतरावर ९५ फूट उंचीचे लहान धरण आहे. भाक्रा धरणातील वीजनिर्मितीनंतर वाहात येणारे सतलजचे पाणी परत येथे अडविण्यात आले आहे. येथे १५४ मे. वॅट वीज निर्माण होते. बाकी पाणी कालव्याच्या साहाय्याने शेतीसाठी वळविण्यात आले आहे. या धरणाला ३.२१ कोटी खर्च आला. अंबाला स्टेशनहून नांगलसाठी स्वतंत्र ब्रॉडगेज रेल्वेलाईन आहे.

० ० ०


SIMLA
LONG WOOD
S.D. COLLEGS
WALKER HOSPITAL
HOSPITAL
NAY BAHAR
CHOTA SIMLA
U.S. CLUB
LAJPAT RAI CHOWK
GRAND HOTEL
BUS STAND
HOLIDAY HOME
MARINA HOTEL
HIMLAND HOTEL
LOWER KAITHU
KAITHU
POLICY LINES
ANNADRLE
THE GIEN
TUTIKANDI
SANKAT MOCHAN TAMPLE
GHORA CHOWKI
SIMLA TO KALKA RD.
KALKA
SIMLA
SUMMER MILL 6500
INDIAN INSTITUTE OF ADVANCE STUDY
CHAKKAR
SIMLA MANDI RD
1 HOTEL HOLIDAY HOME SIMLA.
2 TOURIST INFORMATION OFFICE.
3 GENERAL POST OFFICE.
4 TELEGRAPH OFFICE.
5 BUS STAND.
6 RAILWAY STATION
7 ZOO
8 TARA DEVI




**प्रेक्षणीय स्थळाचे नाव**:–सिमला.

**राज्य**:–हिमाचल प्रदेश

**समुद्रसपाटीपासून उंची**:–२२१३ कि. मी. (७२३४ फूट)

**ऋतू**:–हिवाळा Mx. १८.३३ अंश. Mn. ५.५५ अंश (सें. ग्रे.)

**एप्रिल ते जून**–आल्हाददायी हवामान.

**जुलै ते सप्टेंबर**–पावसाळा.

**डिसेंबर ते मार्च**–हिवाळा.

**उष्णतामान**:–उन्हाळा Mm ३३अंश ते ११ अंश सें. ग्रे.

**सरासरी पाऊस**:–१३५ ते १६५ सें. मी.

**भाषा**:–हिंदी, इंग्लीश, उर्दू, पहाडी.

**भेट देण्यास उत्तम हवामान**:–एप्रिल ते ऑक्टोबर.

**टूरिस्ट कार्यालय**:–टूरिस्ट ऑफिस, द माल रोड सिमला.

**फोन** क्र. ३३११ व ३९५६.

**सिमला**:–(Simla)–हिमाचल प्रदेशात हिमालयाच्या कुशीत वसलेले सिमला हे भारतातील प्रथम दर्जाचे थंड हवेचे ठिकाण मानले जाते. सिमला शहराचा जन्म केवळ दोन शतकांपूर्वी झालेला. ब्रिटिश राजवटीतच या हिमालयीन प्रदेशाचे रूपांतर शहरात होऊ लागले.

येथील देवदार वृक्ष व विविध रंगी बेरंगी फुलांनी नटलेला निसर्ग, हिरव्यागार टेकड्या, आल्हाददायी शीतल हवा, निळ्या आकाशाखाली रुपेरी बर्फाने व्यापलेली हिमालयाची पर्वतराई पाहिल्यानंतर ब्रिटिशांचे सौंदर्यासक्त मन लुब्ध झाले नसेल तरच नवल. कालीमातेचे दुसरे रूप असलेल्या 'शामला' देवीचे मंदिर येथील घनदाट अरण्यात होते. ही देवी म्हणजे हिमालयीन प्रदेशातील देवता. शामला या शब्दाचाच अपभ्रंश शिमला––सिमला असा रूढ होऊन या शहराचे नाव सिमला झाले असावे.


१८१४ मध्ये नेपाळने सिक्कीमवर युद्ध लादले व नेपाळी गुरखा पलटणी सिक्कीमकडे चाल करून जाऊ लागताच सिक्कीमने ब्रिटिशांकडे युद्धास मदत मागितली. यावेळी ब्रिटिशांनी सिक्कीमच्या रक्षणाची हमी दिली. इ. स. १८१९ मध्ये प्रत्यक्ष लढाईच्या कालावधीत शामला मंदिराच्या परिसरातील उंच टेकड्यांवर राहाण्याची संधी ब्रिटिशांना मिळाली व त्यावेळपासून येथील वसाहतीला सुरुवात झाली. इतर उष्म प्रदेशापेक्षा हे ठिकाण ब्रिटिश लष्करी मुत्सद्यांचे आकर्षण ठरले. येथे विश्रांतीसाठी ते तंबू ठोकून राहात असत. निसर्गसौंदर्य, शीतल हवा व शिकार या गोष्टींचे त्यांना जबरदस्त आकर्षण होते. या लष्करात मेजर केनडी नावाचा एक लष्करी अधिकारी होता. त्याने प्रथम 'केनडी हाऊस' नावाचे आपले पहिले घर येथे उभारले. हीच सिमला शहरातील पहिली वास्तू. काळीबरी विभागात तेथील पहाडी प्रदेशातील लोकांनी तारादेवी किंवा सिपूर नावाने ओळखल्या जाणाऱ्या देवतेचे मंदिर उभारले होते. अगोदर तेथे लाकडाची मूर्ती होती. नंतर तेथे संगमरवरी देवतेची स्थापना करण्यात आली.

१८५० च्या सुमारास सर जॉन लॉरेन्सने पंजाब व इतर परिसराबद्दलचा पहिला ब्रिटिश शासनाचा रिपोर्ट सिमला येथे तयार केला आणि सिमल्याचे शासकीय दृष्ट्या महत्त्व वाढू लागले. १८७२ मध्ये येथे लहान-लहान लाकडी बंगले, जॉर्जियन प्रकारची लहान घरे उभारली जाऊ लागली. १८७६ मध्ये लॉर्ड लीटनने सिमल्याच्या सौंदर्यात अधिक भर घातली. येथे विविध खेळ आणि स्पर्धांसाठी क्लब, मैदानांसारख्या सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याच काळात अफगाणिस्तानच्या प्रश्नावर ब्रिटिशांशी चर्चा करण्यासाठी अल्ला महंमद सिमल्याला आल्याचा उल्लेख सापडतो. इंग्लीश निवृत्त सरकारी अधिकारी श्री. ए. ओ. ह्यूम यांचे निवासस्थान सिमल्यातच होते. त्यांनीच १८८५ मध्ये इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना केली. येथे ह्यूमहाऊस नंतर थिऑसॉफीसचे कार्यालय बनले.

१८५७ मध्ये चाललेल्या शिपायांच्या स्वातंत्र्ययुद्धानंतर १९११ मध्ये हिंदुस्थानात 'राणीचा दरबार' भरवण्यात आला. त्यानंतर ब्रिटिश राजवटीत सिमल्याचे राजकीय महत्त्व वाढू लागले. सिमल्यातील 'माल' विभागाचा लंडनच्या धर्तीवर विकास होऊ लागला. रिक्षासारख्या वाहनांची वाढ होऊ लागली. ब्रिटिशांच्या सोयीसाठी नृत्यशाळा, हॉटेल्स, दुकाने वाढू लागली. लॉर्ड कर्झन जेव्हा भारतात आला त्यावेळी कलकाहून नॅरोगेज रेल्वेने सिमल्यापर्यंत जाण्याची सोय त्यानेच केली.

१९४२ च्या आंदोलनानंतर भारतातील थोर पुढाऱ्यांच्या सुटका केल्या. पुढे मुस्लिमलीगसह सर्वांना लॉर्ड वेव्हेलच्या काळात सिमल्याला एकत्रित होण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी अखिल भारतीय कीर्तिचे पुढारी म. गांधी, बॅ. जीना, पं. नेहरू, मौलाना आझाद सिमला येथे गेले होते.

इंदिरा गांधींना जसे काश्मिरच्या पर्वतशिखरांचे आकर्षण होते तसे पं. नेहरूंना सिमल्याचे अतिशय आकर्षण होते. सिमल्याला ते घोड्यावरून रपेटही करायचे. हिमाने व्यापलेल्या या अचल (पर्वतमय) प्रदेशाला हिमाचल असे नाव पडले. १९५१ ते १९५६ पर्यंत या प्रदेशाला स्वतंत्र राज्याचा आकार येत होता. ऑक्टोबर १९६६ मध्ये पंजाब व हरियाणाची रचना झाली त्यावेळी सिमला, कांग्रा, कुलू, लाहाऊल इ. हे गिरीभाग हिमाचल प्रदेशात अंतर्भूत करण्यात आले. १-१-६६ ला हिमाचल



**हिमाचल प्रदेशातील हिमालयाच्या कुशीत वसलेले शहर सिमला.**

प्रदेश अस्तित्वात येऊन सिमला शहरास या प्रदेशाच्या राजधानीचा मान मिळाला. भारत-पाक युद्धानंतर भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी व पाकिस्तानचे पंतप्रधान भुत्तो यांच्यात जो ऐतिहासिक शांतता करार झाला तो सिमला येथेच.

**सिमला शहर**:–हिरव्या उंचसखल टेकडचा, झाडां-झुडुपात लपंडाव खेळणारे टुमदार बंगले, रोमांचित करणारी शीतल हवा, शहराला विळखा घालणारे मोजके काळेभोर रस्ते, आकाशाशी स्पर्धा करणारे देवदार. सारे इंद्राच्या अमरावतीचे वैभव ल्यालेली ही नगरी पर्यटकांच्या आकर्षणाचे स्थान म्हणून प्रसिद्ध आहे.

**सिमला माल**:–हॉटेल्स, बंगले, इमारती, दुकाने, थिएटर यांनी गजबजलेला हा भाग सोडला तर निसर्ग सौंदर्याशिवाय सिमल्यात वेगळे असे पाहण्यासारखे काही नाही. विशेषतः एप्रिल-मे-जून उन्हाळयामध्ये याठिकाणी पर्यटकांची झुंबड उडते. आपापल्या प्रदेशातील उष्मा टाळून शीतल हवेची गुलाबी मुलायमता चाखण्यासाठी लोक येथे येतात.

**सिमल्याच्या परिसरात काय पहाल**?:–

**जॅक हिल**:–सिमल्यापासून २ कि. मी. अंतरावर हे निसर्ग सुंदर स्थान आहे. उंच टेकडीवरून बर्फाळ टेकडचांच्या मागून धुक्यात विरघळलेला सूर्योदय पाहताना भान हरपून जाते. याठिकाणी हनुमानाचे मंदिर असून येथे भरपूर माकडे असतात.

**ग्लीन**:–सिमल्याजवळ ४ कि. मी. अंतरावरील वनराईने नटलेला हा भाग पिकनिक स्पॉट म्हणून प्रसिद्ध आहे. उंचउंच वृक्षांनी वेढलेल्या या घनदाट वनराईतून खळखळ वाहणारा शुभ्र-शीतल झरा आहे. येथून केनडी हाऊस किंवा सिसील हॉटेल करून येथे जाता येते.

**समरहील**:–सिमला-कलका रेल्वे लाईनवरच ५ कि. मी. अंतरावर हे ठिकाण आहे. येथे हिमाचल विश्वविद्यालय असून हेही स्थान पिकनीक स्पॉट म्हणून प्रसिद्ध आहे. याठिकाणी 'जॉर्जियन हाऊस' मध्ये महात्मा गांधी उतरले होते. हा भाग जवळ जवळ ६००० फूट उंच आहे.

**कामादेवी**:–हे स्थान प्रॉस्पेक्ट हील म्हणून ओळखले जाते. समुद्रसपाटीपासून ८१३४ फूट उंचीवरचे हे स्थान सिमल्यापासून ५ कि. मी. अंतरावर आहे. उंचावर वसलेल्या कामादेवीच्या मंदिरातून आजूबाजुची नैसर्गिक हिरवी उधळण मोहक वाटते.

**चाडविक**:–समरहीलच्या पलिकडे सिमल्याहून ७ कि. मी. अंतरावर हे रमणीय स्थान आहे. दीडहजार फूट उंचीवरील या ठिकाणी पावसाळयात पाणी वाहताना दिसते.

**तारादेवी**:–उंच टेकडीवर वसलेले हे तारकांच्या देवतांचे मंदिर आजूबाजूच्या टेकड्यांमुळे अधिक सुशोभित दिसते. ६००० फूट उंचीवरील या शीतल ठिकाणी मनःशांतीसाठी लोक येतात. येथे जवळच स्काऊट हेडक्वॉर्टर्स आहे. येथे राहण्यासाठी पी. डब्ल्यू. डी. रेस्टहाऊस आहे. ह्याचे रिझर्व्हेशन एक्झिक्युटीव्ह इंजिनियर, विंटर फील्ड, सिमला येथे करावे.

**तत्तापानी**:–या ५१ कि. मी. अंतरावरील स्थानी बसने जाण्याची सोय आहे. येथे उष्ण पाण्याचा झरा आहे.

**कुफरी**:–रीजपासून १३ कि. मी. अंतरावर हे ठिकाण आहे. याची उंची २६३३ मीटर आहे. या विभागाला हिवाळ्यातील खेळांसाठी महत्त्व दिले जाते. स्केअींगसाठी हौशी खेळाडू येथे येतात.

**वाईल्ड फ्लॉवर हॉल**:–ते एक मनमोहक व शांत स्थान आहे. सर सेनापती लॉर्ड कीचनर येथे राहात होता.

**मशोब्रा**:–१३ कि. मी. अंतरावरील हे ठिकाण ओक व पाईन वृक्षांनी व्यापलेले रमणीय नैसर्गिक स्थान आहे.

**इंदिरा हॉलीडे होम**:–१६ कि. मी. अंतरावर देवदार वृक्षांनी व्यापलेल्या या स्थळी निवासासाठी उत्तम सोय आहे.

**सिमल्याला कसे जाऊ शकाल ?**–

(१) **विमान**–जवळचा विमानतळ चंदीगढ. तेथून विमानाने (१२० कि. मी अंतरावर सिमल्यास जाता येते.

(२) **रेल्वे**–चंदीगढ ते कलका व कलकाहून लहान गाडीने थेट सिमल्यास जाता येते.

(३) **रस्ता**:–दिल्ली–चंदिगढ–सिमला या रस्त्याने मोटारीने जाता येते.

कलका ते सिमला पर्वतमय प्रदेशातून जाणारा नागमोडी रस्ता आहे.

**सिमला**:–टूरिस्ट कार्यालय–माल येथून साईटसीईंगसाठी टूरिस्टकार किंवा लक्झरी बसने विंडफॉल, कुफरी, इंदिरा हॉलीडे, फागू, नरकंडा या विविध ठिकाणी जाण्याची सोय उपलब्ध आहे.

**सिमला येथील प्रमुख रस्ते**:–कार्टरोड, तिबेटरोड, द् माल,

**सिमला येथील सिनेमागृहे**:–(१) रिगल–लक्कार बझार. (२) रिव्होली–टूरिस्ट कार्यालयाखाली. (३) रीझ–दी रीज (४) शशी–लोअर बझार.

**सिमला येथील बँका**:–(१) पंजाब नॅशनल बँक (२) स्टेट बँक ऑफ इंडिया (३) स्टेट बँक ऑफ पतियाला (४) युनियन बँक (५) ग्रिण्डलेज बँक.

**सिमला येथील हॉस्पिटल्स** :– (१) आयसोलेशन (२) लेडी रिडींग (३) रिपन सॅनेटोरियम (४) वॉकर (५) प्रायमरी हेल्थ सेंटर. (६) मिलीट्री (७) कमला नेहरू.

**केमिस्ट**:–(१) गेइंडा मूल हेमराज–द् माल
(२) शांती मेडिकल स्टोअर–द् माल
(३) वोरा मेडिकल स्टोअर–लोअर बझार.

**सिमल्यातील शैक्षणिक संस्था**:–

१) गव्ह. मीडल स्कूल
२) एच्. पी. को. ऑ. ट्रेनिंग सेंटर
३) ऑकलंड हाऊस स्कूल
४) बिशप कॉटन स्कूल
५) सेंट्रल स्कूल
६) गर्ल्स स्कूल
७) गव्हर्नमेंट हायस्कूल
८) कॉन्व्हेंट ऑफ (जेसूस अँड मेरी स्कूल)
९) लेडी आर्यविना हायर सेकंडरी स्कूल
१०) पोर्टमोअर गव्ह. गर्ल्स हायस्कूल
११) सेंट एडवर्ड हायस्कूल
१२) सेंट थॉमस गर्ल्स हायर सेकंडरी स्कूल
१३) तारा हॉल स्कूल
१४) तिबेटीयन स्कूल

**प्रार्थना स्थळे**:–१) कॅथलिक चर्च (२) ख्रिस्त चर्च (३) जामा मशीद (४) गीता मंदिर (५) गोपाळ मंदिर (६) हनुमान मंदिर (७) गुरुद्वारा (८) राममंदिर (९) कालिमाता मंदिर (१०) सेंट मायकेल चर्च (११) शिव मंदिर (१३) आर्य समाज मंदिर (१३) कामनादेवी.

**म्युझियम**:–स्टेट म्युझियम, सिमला ४.

**पोस्ट ऑफिस**:–द माल रोड.

**स्केईंगसाठी प्रसिद्ध ठिकाणे**:–

(१) कुफरी (२) नरकंडा–डिसेंबर महिन्याच्याशेवटी स्केईंगचा सिझन असतो.

**विंटरस्पोर्टस् माहिती**:–टूरिस्ट इन्फर्मेशन ऑफिस, द माल सिमला.

**शेलर स्केटिंग**:–रिगल बिल्डिग.

**सिमला क्लब**:–(१) ग्रीन रूम (२) सिमला क्लब (३) सिमला आईस स्केटिंग क्लब (४) कॅथलीक क्लब.

**सिमल्यातील रेस्टॉरंट**:–(१) आशियाना (२) गुफा (३) अल्फा (४) फॅसीनेशन (५) एम्वसी (६) इंडियन कॉफी हाऊस. (७) हिमानी (८) नॉर्थ इंडियन कॉफी हाऊस.

**सिमला येथे राहाण्याची सोय**:–पत्ते व फोन.

(१) ओबेराय सेसील (२) हिमलॅण्ड (३) ओबेरॉय क्लार्क (४) तारकंद (५) रॉयल (६) सिमला (७) वसंत (८) ग्रँड (९) अशोक–री रीज २०३७ (१०) ब्राईटलँड–द् माल २६५९ (११) गुलमर्ग–३१६८ (१२) व्हाईट–दि रीज ५२७६ (१२) मयूर–दि रीज ६०४७ (१४) कॅपिटल–द् माल ३५८१ (१५) चाणाक्य–द् माल ३५८१ (१६) मरीना–द् माल ३५५७ (१७) मलवार (१८) माऊंट व्हयू (१९) पाईन व्हयू (२०) विक्रांत–बसस्टँड ३६०१ (२१) बिंदू (२२) रॉक्सी (२३) सेंट्रल (२४) नॅगसन्स टूरिस्ट–५२९९.

**धर्मशाळा**:–

(१) वुटेल धर्मशाळा–कार्टरोड (२) जैन धर्मशाळा–मीडलवझार. (३) राममंदिर धर्मशाळा (४) पुरनमाल धर्मशाळा–कार्टरोड (५) काळीवारी–द् माल.

(१) **हॉटेल हॉलीडे होम**–एच्. पी. टूरिझम, डेव्हलपमेंट कार्पोरेशन.

(२) **हॉलीडे होम**–कार्टरोड, यांचे रिझर्व्हेशन कोठे कराल?

जनरल मॅनेजर, हॉटेल हॉलीडे होम, सिमला.


फोन–६०३१/६०३६. टेलेक्स–३९१।२०७.

HTDC/IN

**तत्परतेने सिमला येथे निवासस्थान रिझर्व्हेशनसाठी मुंबईला सोय** :

श्री. एम्. एल्. गुलाटी, गुलाटी सर्व्हिस सेंटर, लालबहादूर शास्त्री मार्ग, विक्रोळी, मुंबई ४०० ०७९. फोन–५८१९००.

० ० ०




**प्रेक्षणीय स्थळाचे नाव**:–अमृतसर.

**राज्य**:–पंजाब.

**ऋतू**:–**हिवाळी**:–कडक हिवाळा  विषम हवामान

**उन्हाळी**:–उष्मा भरपूर. विषम हवामान.

**लोक**:–पंजाबी, हिंदी.

**पोषक हवामान**:–नोव्हेंबर ते मार्च.


**अमृतसर** (पंजाब) पंच=पाच, अब=पाणी. पाच नद्यांच्या पाण्याने व्यापलेल्या या प्रदेशाला पंजाब असे नाव मिळाले. पंजाबात अमृतसर या पवित्र क्षेत्राचे स्थान अद्वितीयच मानले जाते. हे शिखांचे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. या शहराच्या इतिहासाचा व्याप हिमालयाएवढा उंच असून अजूनही या भूमीत इतिहास घडतच आहे.

इ. स. पूर्वी ६ व्या शतकात येथे जयरसने प्रथम आक्रमण केले. नंतर इ. स. पूर्वी ४ थ्या शतकात अलेक्झांडरच्या हल्ल्याला पोरसला तोंड द्यावे लागले. नंतर मौर्य घराण्याचे राज्य प्रस्थापित झाले. त्यानंतर शक, कुशाण, हुण यांना पंजाबला तोंड

द्यावे लागले. इ. स. १० व्या शतकात गझनीच्या महंमदने पंजाबवर आक्रमण केले. पंधरव्या शतकात गुरु नानकांनी या भूमीला शीख धर्माचे नवे स्वरूप दिले. त्यानंतर या धर्मात ९ गुरु झाले. यांतील चौथे गुरु 'गुरु रामदास' यांना मोगल सम्राट अकबराने काही जमीन भेट म्हणून दिली. गुरु रामदासांनी या जमिनीत पाण्यासाठी एक जलाशय खोदले. यास 'अमृतसर' (अमृताचे सरोवर) असे नांव देण्यात आले. हेच नाव येथील शहरास देण्यात आले आहे. या शहराची स्थापना इ. स. १५७७ च्या सुमारास झाली. या अमृतरूपी पवित्र सरोवरातच शिखांचे पवित्र सुवर्णमंदिर उभारण्यात आले आहे. अमृतसरवर नादिरशहा व अहमदशहा अबदालीने इ. स. १७३८ ते १७५१ च्या सुमारास पुन: आक्रमण केले होते.

इ. स. १७८० ते १८३९ या काळात महापराक्रमी राजा रणजितसिंग या ठिकाणी राज्य करीत होता. त्याने पंजाबचे वैभव वाढवले. त्यानंतर हिंदुस्थान ब्रिटिश साम्राज्याने व्यापला पण पारतंत्र्यात ब्रिटिशांशी लढताना पंजाबचे योगदान चिरंतन आहे. पंजाबमधील अमृतसर शिखांचे पवित्रस्थान म्हणून साकारण्यास गुरु रामदासांचेच श्रम कारणीभूत ठरले आहेत. त्यांचे स्वप्न त्यांचा मुलगा गुरु अर्जुनसिंगदेव याने त्या पवित्र सरोवरात मंदिर बांधून पूर्णत्वास नेले. आजतागायत या मंदिरात शिखांचा पवित्र धर्मग्रंथ 'ग्रंथसाहेब' याचे अखंड पठण चालू असलेले आढळून येते.

**सुवर्णमंदिर**:–(Golden Temple)–अमृतसरमधील हे शिखांचे पण इतर अनेक धर्मीय लोकसुद्धा जेथे नतमस्तक होतात असे प्रेक्षणीय व पवित्र मंदिर आहे.



**अमृत सरोवरातील शिखांचे पवित्र मंदिर. सुवर्णमंदिर. अमृतसर.**

गुरु रामदासांनी पाया खोदलेल्या व गुरु अर्जुनसिंगदेव यांनी साकारलेल्या या मंदिरास सुवर्णमंदिराचे स्वरूप आले ते राजा रणजीतसिंगच्या कालखंडात.

इ. स. १८०३ मध्ये राजा रणजितसिंगने या पवित्र मंदिराचा जीर्णोद्धार केला. या अगोदर या मंदिरास दरबारसाहेब किंवा हरमंदिर या नावाने संबोधित. मंदिराच्या खालील बाजूस राजस्थानी वेलबुट्टी कोरलेले संगमरवरी दगड बसविलेले आहेत. शिखराचा काही भाग तांब्याच्या पत्र्याने तर काही भाग सोन्याच्या पत्र्याने मढवला असल्याने या मंदिरास सुवर्णमंदिर म्हणू लागले. मंदिराच्या छताला आतील बाजूने सोनेरी नक्षीकाम केलेले आहे. सोनेरी उन्हात सुवर्णमंदिराचे प्रतिबिंब सभोवतालच्या सरोवरात उमटलेले पाहिले की भान हरपते. स्वर्गातील कुबेर नगरीने पृथ्वीवर डोकावून पाहिले तर या सुवर्णमंदिराचे सौंदर्य पाहून तिला निश्चितच हेवा वाटेल. मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी प्रत्येक व्यक्तीला स्वच्छ पाय धुवून डोक्याला रुमाल बांधूनच आत प्रवेश करावा लागतो. 'ग्रंथसाहेबांच्या' दर्शनानंतर प्रत्येकास प्रसाद दिला जातो.

**अकालीतक्त**:–सुवर्णमंदिराजवळ पश्चिमेला जी वास्तू आहे त्यास अकाली तक्त असे संबोधतात. शीख धर्मियांच्या धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक समस्या निर्माण झाल्या आणि त्याविषयी काही निर्णय द्यावयाचा असल्यास या उच्च स्थानावरून निर्णय घेतला जातो.

शिखांचे ६ वे गुरु हरगोविंद यांनी या अकालतक्ताची स्थापना केली. याठिकाणी गुरुंची पवित्र शस्त्रे, जडजवाहीर ठेवण्यात आलेले आहे. काही धार्मिक प्रसंगाच्यावेळी या मौल्यवान खजिन्याचे दर्शन होऊ शकते. ही पाच मजली सुंदर इमारत आहे.

**बाबा अटल टॉवर**:–सुवर्णमंदिरापासून १०० मीटर अंतरावर हे स्थान आहे. एकूण ९ मजले असलेल्या या टॉवरची १५० फूट उंची आहे. या टॉवरच्या जवळ एक सरोवर आहे.

**जालियनवाला बाग**:–सुवर्णमंदिरासमोरच हे इतिहास प्रसिद्ध स्थान 1 फर्लांग अंतरावर आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात 'जालियनवाला' बागेस विशेष महत्त्व आहे. इ. स. १९१९ मध्ये रौलेक्ट ॲक्टचा निषेध करण्यासाठी या ठिकाणी निषेध सभा बोलवण्यात आली होती. अंदाजे २००० लोक या स्वातंत्र्य संग्रामास हजर होते. त्यावेळी जनरल डायरने १३ एप्रिल १९१९ मध्ये सभा उधळण्यासाठी चारही बाजूने बेछूट गोळीबार केला. यात शेकडो देशभक्त, स्त्रिया व मुलांना पण प्राण गमवावे लागले. या बागेतच असलेल्या विहिरीत जीव वाचविण्यासाठी काहींनी उड्या मारल्या आणि त्यातच ते गतप्राण झाले. आजही तेथील भिंतीवर बंदुकांच्या गोळ्यांची निशाणी आपणास बघावयास मिळते. या बागेत त्यावेळी गतप्राण झालेल्या

स्वातंत्र्यवीरांच्या स्मरणार्थ एक ज्योतिस्तंभ उभारला असून तेथे प्रवेश करताच डाव्या हातास त्या प्रसंगाचे चित्रीकरण केलेले एक छोटेसे चित्तथरारक म्युझियम आहे.

**दुर्गियाना मंदिर**:–हे देवीचे मंदिर सुवर्णमंदिरापासून २ कि. मी. अंतरावर रेल्वे स्टेशनजवळ आहे. पंडित मदनमोहन मालवीय यांनी या मंदिराची पायाभरणी केली. हे मंदिरपण जलाशयात असल्याने येथे सुवर्णमंदिर व दुर्गा मंदिराच्या उभारणीत शीख व हिंदू धर्मात कुठेतरी एकसूत्रता आढळते. हे मंदिर संपूर्ण सोनेरी नसले तरी कळस मात्र सोनेरी आहे. मंदिरात लक्ष्मी-नारायण व राम-सीतेच्या मोहक मूर्ती आहेत.

**रामबाग**:–ही बाग इ. स. १७९९ च्या सुमारास रणजितसिंगने उभारली. येथे जुन्या शस्त्रास्त्रांचे म्युझियम आहे.

**तरणतरण**:–अमृतसरपासून १५ कि. मी. अंतरावर गुरु अर्जुनसिंग राहत असलेले हे गांव आहे. शीख लोक या गावास पवित्र मानतात. येथे एक उंच टॉवर आहे.

**बाबा बकाला**:–अमृतसरपासून ४५ कि. मी. अंतरावर हे गुरुद्वार आहे. शिखांचे ९ वे गुरु श्री. तेजबहाद्दूर यांच्या स्मृत्यर्थ हे गुरुद्वार बांधले गेले. रक्षाबंधनाच्या दिवशी याठिकाणी यात्रा भरते.

**गोविंदवल साहेब**:–अमृतसरपासून ३० कि. मी. अंतरावर अंगद देवजींची याठिकाणी समाधी आहे. इ. स. १८१५ मध्ये रणजितसिंगने ही वास्तू उभारली.

**आनंदपूर साहेब**:–चंदिगढपासून ८० कि. मी. अंतरावर चंदिगढ ते नांगल रस्त्यावर हे छोटेसे गांव आहे. येथे शुभ्र रंगातील व संगमरवरी दगडातील भव्य गुरुद्वारा आहे. गुरु गोविंदसिंग हे शिखांचे १० वे गुरु. त्यांनी शिखांच्या पाच गुरुंना येथेच अमृतानुभव देऊन खालसा बंधुभावाची स्थापना केली. या आनंदपूर साहेबच्या पार्श्वभूमीवर नैना देवीच्या टेकड्या दिसतात. येथे अनेक गुरुद्वार आहेत. गुरु गोविंदसिंग यांची शस्त्रे या ठिकाणी जपून ठेवलेली आहेत. येथे होला-मोहल्ला समारंभासाठी सर्व भारतातून शीख लोक जातात.

**फत्तेगढ साहेब**:–शिखांचे १० वे गुरु गोविंदसिंग याच्या दोन मुलांना औरंगजेबाने कपटाने अटक केली. एक मुलगा ६ वर्षांचा व दुसरा ८ वर्षांचा होता. प्रथम औरंगजेबाने लहान मुलास मुस्लिमधर्म स्वीकारण्यास विनवले. त्याने नकार देताच त्यास भिंतीत चिरडून मारले. मोठा मुलगा तरी या भीतीने धर्म बदलेल अशी त्याची कल्पना होती. पण तीही व्यर्थ ठरली. त्यानेही धर्म बदलण्यास नकार देताच त्याला त्याच पद्धतीने मारले. या बालवीरांची ही कथा ऐकून महाराष्ट्रातील तेवढ्याच

स्वाभिमानी संभाजी महाराजांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. या स्वाभिमानी मुलांच्या स्मृत्यर्थ येथे गुरुद्वारा उभारण्यात आले आहे.

**जालंदर शहर**:–हे शहर अमृतसरपासून ६५ कि. मी. अंतरावर आहे. जालंदर हे औद्योगिक शहर म्हणून ओळखले जाते. खेळण्याच्या वस्तू येथे मिळतात.

**लुधियाना**:–अमृतसर-दिल्ली राजमार्गावरच जालंदरपासून ५७ कि. मी. व अमृतसर पासून १२२ कि. मी. अंतरावर हे औद्योगिक शहर आहे. येथे 'वुलन मिल्स्' आहेत. शेतकी विद्यापीठ येथे आहे. कॉटन-वुलनचे होजिअरी कपडे लुधियाना येथे स्वस्त मिळतात. प्रिंटिंग प्रेस मशिन व प्रेसचे अन्य साहित्य येथे तयार होते.

**पतियाला**:–चंदिगढपासून हे शहर ६५ कि. मी. अंतरावर आहे. येथे एक जुना किल्ला असून राजवाडापण आहे. येथील राष्ट्रीय क्रिडा संस्था प्रसिद्ध आहे.

**कपूरताला**:–जालंदरपासून १८ कि. मी. अंतरावर हे स्थान आहे. नबाब राणासिंग यांनी या शहराची स्थापना केली. येथील राजवाडा व मंदिरे प्रसिद्ध आहेत.

**होशियारपूर**:–पंजाबमधील या शहरात लाकडी खेळणी, संगीत वाद्ये मिळतात. येथील ठकरद्वारा मंदिर प्रसिद्ध आहे.

**अमृतसर येथे राहण्याच्या सोयी**:–

१) अॅस्टेरिया हॉटेल–क्वीन्स रोड
२) भंडारी गेस्ट हाऊस–कॅंटोनमेंट
३) सर्कीट हाऊस –कोर्ट रोड
४) पी. डब्ल्यू. डी. गेस्टहाऊस–कोर्ट रोड
५) हॉटेल चिनार–कोर्ट रोड
६) ग्रँड हॉटेल–जी. टी. रोड
७) स्कायपार्क–लिंकरोड
८) रिझ–द् माल
९) यूथ होस्टेल–जी. टी. रोड
१०) हॉटेल पॅलेस–

**धर्मशाळा**:–(१) स्टेशनसमोर (२) दुर्गामंदिर धर्मशाळा–दुर्गा मंदिरासमोर (३) सुवर्णमंदिराशेजारी हजारो लोकांना राहण्यासाठी मोफत खोल्या व हॉल (सर्व सोयीयुक्त) मंदिरातर्फे मिळतात. येथे जेवण मोफत आहे.

**सिनेमागृहे**:–सूरज, चांद, तारा ही तीन थिएटर्स गावांतच रोडवेजच्या बस स्टँडसमोर आहेत.

**बससर्व्हिस**:–(१) प्रत्येक तासाला जम्मू व पठाणकोटसाठी बस सुटते.
(२) जालंदर–लुधियानासाठी दर २ तासांनी बस सुटते.
(३) चंदिगढसाठी दर तीन तासांनी बस सुटते.

**वाघाबॉर्डर**:–अमृतसरपासून ३६ कि. मी. अंतरावर ही भारत-पाकिस्तानची बॉर्डर आहे. पाकिस्तानात जाण्यासाठी कोणाकडे पासपोर्ट असल्यास सकाळी ९ ते दु. ४ पर्यंत ही बॉर्डर ओलांडून जाण्यास परवानगी असते. भारतातून पाकिस्तानात

(अमृतसर–लाहोर) जाणारा हा राजमार्ग आहे. या रस्त्यावरच बॉर्डर लाईनवर फक्त १२ फुटांच्या अंतरावर दोन गेट बनवले आहेत. एक भारताचे व दुसरे पाकिस्तानचे. गेटवर दोन्ही देशांची राजचिन्हे व बाजूलाच राष्ट्रध्वजही स्वाभिमानाने व मैत्रीपूर्ण फडकत असतात. दोन्ही गेट बंद असतात. पण लोखंडी जाळ्यांचे हे गेट असल्याने पलीकडील सर्व दिसत असते. दोन्ही गेटजवळ दोन्ही देशातील सैन्यातील जवान आपल्या मायभूमीच्या रक्षणार्थ उभे राहिलेले दिसतात. गेटपासून २५ फूटांपर्यंत आपण जाऊ शकतो. भारतातून व पाकिस्तानातून बॉर्डर बघण्यासाठी आलेले पर्यटक आपापल्या गेटजवळ उभे राहून एकमेकांकडे कुतुहलाने पाहून मिस्कील हास्य करीत असतात.

बॉर्डर पाहण्यासाठी बहुतेक पर्यटक सूर्योदयास किंवा सूर्यास्ताला भेट देतात. कारण या दोन्ही वेळी आपापला राष्ट्रध्वज जवान एकाचवेळी सन्मानपूर्वक चढविताना व उतरविताना दिसतात. हा दोन्ही देशांचा मैत्रीपूर्ण नयनमनोहर कार्यक्रम ठरलेला आहे. ध्वजवंदनाचा हा कार्यक्रम १० मिनिटांचा आहे. यावेळचे शंखवादनाचे स्वर पर्यटकांना मोहून टाकतात. सूर्योदयापेक्षा सूर्यास्ताचा कार्यक्रम अधिक मोहक असतो.

**उत्तर भारत सहलीची आखणी:–**

**१ ला दिवस**:–मुंबई–पुणे व नागपूर येथून सोयीनुरूप रेल्वेने दिल्लीस निघणे. दिल्लीसाठी सर्वसाधारण २४ ते २८ तास लागतात.

**२ रा दिवस**:–दिल्ली मुक्काम.

**३ रा दिवस**:–दिल्ली साईटसीईंग (दिल्ली, आग्रा व मथुरासाठी दिल्ली स्टेशनसमोरूनच अनेक ट्रॅव्हल एजंटस्च्या बस सुटतात.)

**४ था दिवस**:–दिल्लीत सकाळी खरेदी-विश्रांती व रात्रौ १२ वा. नंतर आग्रा साईटसीईंगसाठी बस सुटते.

**५ वा दिवस**:–आग्रा, फत्तेपूर, मथुरा पाहून मुक्काम दिल्ली.

**६ वा दिवस**:–जुनी दिल्लीहून हरिद्वारसाठी ट्रेन सुटतात किंवा दर २ तासांनी रोडवेज बसस्टॅन्ड जुनी दिल्ली येथून बस सुटते. यांपैकी कशानेही हरिद्वारकडे प्रयाण. (दिल्ली ते हरिद्वार ६ तास)

**७ वा दिवस**:–हरिद्वार दर्शन.

**८ वा दिवस**:–सकाळी निघून (रेल्वे अथवा बसने) ऋषिकेश पाहून मुक्काम डेहराडून (हरिद्वार–ऋषिकेश १ तास व ऋषिकेश ते डेहराडून २ तास.)

**९ वा दिवस**:–सकाळी सहस्त्रधारा पाहून परत येणे. दुपारी मसुरी पाहून मुक्काम डेहराडून (डेहराडून ते सहस्त्रधारा १ तास व डेहराडून ते मसुरी २ तास) आवश्यक वाटल्यास वेळेनुरूप मसुरीसारख्या हिल स्टेशनवर मुक्काम करावा.

**टिप**:–ज्या पर्यटकांना उत्तर भारतातील फक्त वरील स्थळे पाहायची आहेत ते पर्यटक ही स्थळे पाहून झाल्यावर डेहराडूनहून रेल्वेने मुंबईस परत ब्रेक जर्नी न करता सरळ येऊ शकतात.

**१० वा दिवस**:–डेहराडून ते चंदिगढ ६ तास बसने प्रवास व रेल्वेने प्रवास करावयाचा असल्यास हरिद्वार व अंबाला येथे ब्रेक जर्नी करावा लागतो.

**११ वा दिवस**:–चंदिगढ ते कलका ब्रॉडगेज व कलका ते सिमला नॅरोगेज रेल्वेने ५ तासांचा प्रवास अन्यथा चंदिगढ ते सिमला रोडवेजच्या बसने प्रवास करावा (वेळेनुसार सिमला येथे मुक्काम करावा.)

**१२ वा दिवस**:–रिक्षा किंवा टॅक्सीने चंदिगढ शहर दर्शन.

**१३ वा दिवस**:–रोडवेजच्या बसने चंदिगढ ते नांगल ३ तास प्रवास व नांगल ते माक्रा टॅक्सी अथवा तेथील रोडवेजच्या बसने प्रवास करावा. (वेळ अर्धा तास) मुक्काम चंदिगढ.

**१४ वा दिवस**:–चंदिगढ ते अमृतसर ६ तास प्रवास. (बस अथवा रेल्वे) अमृतसर दर्शन.

**टिप**:–काश्मिर ज्यांना पाहायचे आहे त्यांनी येथून जम्मूस जावे. अन्यथा दिल्ली, मुंबई, पुणे, नागपूरकडे परत फिरावे.

## अन्य माहिती

**मुंबईत उपयुक्त ठरतील असे फोन क्रमांक**:–

१) बॉम्बे म्युन्सिपल कार्पोरेशन २६५६०१.
२) वेस्टर्न रेल्वे रिझर्व्हेशन इन्स्पेक्टर ३७५९८६.
३) एअर पोर्ट बॉम्बे (एअर इंडिया) ५३३२२१
४) एअर पोर्ट बॉम्बे (इंडियन एअर लाईन) ५३६३६३.
५) सेंट्रल रेल्वे रिझर्व्हेशन २६३५८४.
६) सह्याद्री गेस्ट हाऊस ८२२८०१२.
७) एम्. एल्. ए. होस्टेल २२२२३४.
८) मॅजेस्टिक हॉटेल २०२१९८५.

९) बॉम्बे हॉस्पिटल २९७१००.

१०) जे. जे. हॉस्पिटल ८६९४००.

११) पोस्टमास्टर जनरल २६८१२१.

१२) ब्रीच कॅंडी ८२२३६५१.

१३) हरकिसनदास ३५२७०१.

१४) के. ई. एम्. ४४२२०१.

**एस्. टी. डी. नंबर**:–ज्या गावास आपणास एस्. टी. डी. फोन करायचा आहे तो एस्. टी. डी. नंबर प्रथम फिरवावा व लगेच त्या गावांतील ज्याठिकाणी फोन करायचा आहे तो नंबर फिरवावा.

**डिमांड**:–जी गावे डिमांड कॉलला जोडली गेली आहेत त्यासाठी त्या गावचा डिमांड नंबर फिरवावा व टेलिफोन ऑपरेटरला आपणास पाहिजे त्या गावांतील तो नंबर सांगावा, म्हणजे तो नंबर ऑपरेटरमार्फत जोडून देण्यात येतो.

**मुंबईहून एस्. टी. डी. नंबर**:–

| | | |
|---|---|---|
| आग्रा ०५६२ | अहमदाबाद ०२७२ | अकोला ०७२४ |
| बडोदा ०२६५ | अलाहाबाद ०५३२ | अंबाला ०१७१ |
| बेळगांव ०८३१ | अमरावती ९२५ | औरंगाबाद ०२४३२ |
| भोपाळ ०७५५ | अमृतसर ०१८३ | बेंगलोर ०८१२ |
| कलकत्ता ०३३ | कोईमतूर ०४२२ | दार्जिलिंग ०३५४ |
| दिल्ली ०११ | डोंबिवली ९२९-८१ | हुबळी ०८३६ |
| हैद्राबाद ०८४२ | इंदौर ०७३१ | जयपूर ०१४१ |
| जळगाव ९२६ | जम्मू ०१९१ | कळवा ९२२ |
| कल्याण ९२९ | कोल्हापूर ०२३१ | कोटा ०७४४ |
| लखनौ ०५२२ | मदुराई ०४५२ | मद्रास ०४४ |
| मिरज ९७२–८२ | म्हैसूर ०८२१ | नागपूर ०७१२ |
| नाशिक ९२३ | उटी ०४२३ | पाटणा ०६१२ |
| पांडेचरी ०४१३ | पुणे ०२१२ | रत्नागिरी ०१२६२ |
| सांगली ९२७ | सोलापूर ०२१७ | सिमला ०१७७ |
| श्रीनगर ०१९४ | सूरत ०२६१ | त्रिवेंद्रम ०४७१ |
| वाराणसी ०५४२ | वसई ९२२ | |

मुंबईहून डिमांड:–

डिमांड कॉल:–

| | | |
|---|---|---|
| अंबरनाथ १५१ | भिवंडी १५१ | बुलढाणा १५१ |
| चंद्रपूर १५२ | धुळे १५२ | जालना १५३ |
| कऱ्हाड १५३ | उस्मानाबाद १५३ | पनवेल १५१ |
| परभणी १५२ | सातारा १५३ | वास्को १५३ |
| वर्धा १५२ | यवतमाळ १५२ | |

दिल्लीहून एस्. टी. डी. नंबर:–

| | | |
|---|---|---|
| आग्रा ०८५१२ | अमृतसर ९१८३ | औरंगाबाद ०२४३२ |
| बेंगलोर ०८१२ | बडोदा ०२६५ | मुंबई ०२२ |
| कलकत्ता ०३३ | चंदिगढ ०१७२ | कोईमतूर ०४२२ |
| डेहराडन ९३५ | हैद्राबाद ०८४२ | इंदौर ९७८ |
| जम्मू ९१९१ | कोल्हापूर ०२३१ | कोटा ०७४४ |
| मद्रास ०४४ | मदुराई ०४५२ | मसूरी ९३५८५ |
| म्हैसूर ०८२१ | नागपूर ०७१२ | नाशिक ०२५३ |
| उटी ०४२३ | पाटणा ०६१२ | पांडेचरी ०४१३ |
| पुणे ०२१२ | सिमला ९१७७ | श्रीनगर ९१९४ |
| तिरुपती ०८५७४ | त्रिवेंद्रम ०४७१ | वाराणशी ०५४२ |
| वाशी (मुंबई) ०२१५४ | अलाहाबाद ०५३२ | अहमदाबाद ९७५ |

मराठीतील काही वाक्ये काश्मिरी व पंजाबी भाषेमध्ये:–

ए:–मराठीत १) काश्मिरी भाषेत २) पंजाबी भाषेत.

अे:–बादशहा हॉटेल कोठे आहे ?

१) बडशहा होटरल क्यतत् छुहू ?

२) बादशहा होटल कित्थे वे।

बी:–तुम्ही कोठे जात आहात ?

१) त्वहि कोतू छुहू गंच्छून ?

२) तुसी कित्थे जांदेअे.

सी:–येथे खोली रिकामी आहे का ?

१) यति च्छा कमर खली कॉह ?

२) ऐथे कोई रूम हैगाए की

डी:–ही बस कोठे जाते ?

१) इ बस कोत छुह गच्छान् ?

२) एँ बास कित्थे जान वाली ऐ

ई:–तुम्हाला काय हवे ?

१) क्या गछीवू ?

२) तुसी की लवोगे.

एफ्:–या खोलीचे भाडे काय आहे ?

१) यत् कमरंस् क्या छि् किराय ?

२) ऐं रूम दा किन्ना किराया हैगावे.

जी:–आपले नाव काय ?

१) त्योहि क्या छु नाम् ?

२) त्वाडा ना की वे

एच्:–माझे नाव

१) म्योन नाम् छुह.....

२) मेरा ना

आय्:–मला फोन करायचा आहे.

१) म्ये छुह फोन करून।

२) मैन्नू फोन करना वे

जे:–हमाल कोठे मिळेल ?

१) मजूर (कुली) क्यति म्येली ?

२) कुली कित्थे मिलोग

के:–याची किंमत काय ?

१) यत् क्या छुह किंमत ?

२) ऐंदी कीन्नी किमत है

एल्:–किंमत कमी करणार काय ?

१) किंमत करीव क्येह कम ?

२) कीमत कम करोगे की

एम्:–मला रिक्षा-टॅक्सी कोठे मिळेल ?

१) म्ये क्यतत् म्यली ऑटो (रिक्षा) ?

२) मैन्नु रिक्षा-टॅक्सी कित्थे मिलेगी ?

एन्:–त्याचे भाडे किती ?

१) ऑटो च् किराय कथा छह ?

२) ओवे किराये किन्ने होनगे ?

ओ:–माझ्याकडे चिल्लर नाही ?

१) फुटवोट् छु न् म्ये।

२) मेरे कोल छुटे पैसे नई है

पी:—हे कोठे मिळेल ?

१) इय् क्यतत् म्येली ?

२) ऐ कित्थे मिलेगा ?

क्यू:—सामान उचला.

१) सामान तुल् ।

२) सामान चुक्को

आर्:—येथे बघण्यासारखे काय आहे ?

१) यति वुच्छून लायक क्या छुव् ?

२) ऐथे देखन वासते की कुछ वे

एस्:—मुतारी-संडास कोठे आहे ?

१) टच् क्यतत् छह ?

२) वि पिछाप कित्थे वे

टी:—बसस्टॅन्ड कोठे आहे ?

१) बस अड्डु क्यतत् छूह ?

२) बास अड्डा कित्थे हैगाएं

यू:—सिनेमा थिएटर कोठे आहे ?

१) टाकीज (सिनेमा) क्यतत् छूह ?

२) सिनमा हॉल कित्थे वे

व्ही:—हे गाव किती किलोमीटर आहे ?

१) इह गाम कच् किलोमीटर दूरं ?

२) ऐ पिंड किन्ने किलोमीटर हैगाएं

डब्ल्यू:—गावास जाण्यास किती तास लागतील ?

१) यथ गामस भज् कच् घाट् लगन गच्छनस् ?

२) पिंड जान वास्ते किन्ने घन्टे लगनगे ?

एक्स्:—गाईड मिळेल का ?

१) गाईड म्येला यति ?

२) गाईड मिलेगा की

वाय्:—या मालाची गॅरेंटी काय ?

१) यमि मालच् क्या गारंटी छ्ह ?

२) ऐ मालदी की गॅरंटी है

झेड्:—येथे बस कितीवेळ थांबेल ?

१) यति कतिस् कालस छह बस ठहरान् ?

२) ऐथे बास किन्ने टाईम ठहरेगी ?

## वेळापत्रक (रेल्वे)

### – मध्यरेल्वे –

(वेळापत्रकात ६ महिन्यांनी बदल घडत असतो, पण वेळेत फक्त १०–१५ मिनिटांचा फरक होतो हे गृहित धरावे.)

मुंबईहून DN सुटते | मुंबईला UP येते

| 177 झेलम एक्सप्रेस | 3 पंजाब मेल | 75 अमृतसर एक्सप्रेस | स्टेशन व नावे | 58 – अमृतसर एक्सप्रेस | 6 पंजाब मेल | 178 झेलम एक्सप्रेस |
|---|---|---|---|---|---|---|
| १९–२५ पुणे | १६–३० | — | मुंबई (VT) | — | १२–४० | १३–०० पुणे |
| २०–२५ दौंड | १६–४२ | २२–५० | दादर | ०५–१० | १२–१० | ११–३० दौंड |
| — | — | २३–१७ | ठाणे | ०४–३० | — | — |
| — | १७–३३ | २३–४५ | कल्याण | ०४–०० | ११–१० | — |
| — | २०–५३ | ०३–०३ | नाशिक | ००–३१ | ०७–४७ | — |
| ०१–०५ | २१–५६ | ०४–०६ | मनमाड | २३–२० | ०६–४२ | ०७–०२ |
| — | ००–१५ | ०६–३९ | जळगाव | २०–३८ | ०३–४४ | — |
| ०३–३५ | ००–४५ | ०७–२० | मुसावळ | १९–५० | ०३–०० | ०४–१५ |
| ०५–३१ | ०२–५३ | ०९–५० | खंडवा | १७–२५ | ००–४७ | ०२–१३ |
| ०८–०० | ०५–३० | १३–२० | इटारसी | १४–२० | २२–२० | २३–५० |
| ०९–५६ | ०७–३३ | १५–३८ | भोपाळ | ११–३० | १९–४८ | २२–१२ |
| १२–०३ | १०–०५ | १८–३० | बीना | ०८–३५ | १७–२१ | २०–०३ |
| १४–१३ | १२–४२ | २१–२० | झाशी | ०५–३५ | १४–४६ | १७–४६ |
| १५–४० | १४–११ | २३–१३ | ग्वाल्हेर | ०३–३९ | १३–०९ | १६–१० |
| १७–२५ | १६–०५ | ०१–१५ | आग्रा कॅन्ट | ०१–२२ | ११–१४ | १४–०६ |
| १८–१७ | १७–१० | ०२–४८ | मथुरा | ००–१५ | १०–०९ | १३–१५ |
| २०–२५ | २०–०० | ०६–४० | न्यू दिल्ली | २०–०५ | ०७–४० | १०–२२ |
| — | २०–३० | — | दिल्ली | — | ०६–१० | — |

| UP | ऋषिकेश सुटते | हरिद्वार पोचते | DN | हरिद्वार सुटते | ऋषिकेश पोचते |
|---|---|---|---|---|---|
| २ | ०६–३० | ०८–०५ | १ | ०५–०० | ०६–०० |
| ४ | १०–१६ | ११–५० | ३ | ०८–४५ | ०९–४३ |
| ६ | १३–५२ | १५–२२ | ५ | १२–१५ | १३–२२ |
| ८ | १८–३२ | २०–०० | ७ | १६–२० | १७–५४ |

**पश्चिम रेल्वे (Western Railway)**

मुंबईहून सुटणाऱ्या गाड्या (DN)

| स्टेशन व नावे | १९ डेहराडून एक्सप्रेस | ३ फ्रन्टीयर मेल | १५१ राजधानी एक्सप्रेस | २५ पश्चिम एक्सप्रेस मंगल, शुक्र. अमृतसर शनि, रवि, सोम दिल्ली | २३ फिरोजपूर जनता | १७१ जम्मूतावी एक्सप्रेस सोम.गुरु. |
|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई सेंट्रल | २२–०० | २०–३० | १६–०० | ११–०० | ०७–०० | ०६–१० |
| दादर | २२–१२ | — | — | — | ०७–१० | — |
| बोरीवली | २२–५० | — | — | — | ०७–४३ | — |
| बलसाड | — | — | — | १३–५० | १०–४५ | — |
| सुरत | ०२–५७ | ००–१० | — | १४–५५ | १२–०७ | ०९–४७ |
| अंकलेश्वर | ०३–४८ | — | — | — | १३–०३ | — |
| बडोदा | ०५–२५ | ०१–५५ | २०–५३ | १७–१० | १४–३५ | ११–४३ |
| गोद्रा | ०७–४५ | ०३–३३ | — | १८–४० | १६–२२ | — |
| रतलाम | १२–०७ | ०६–३६ | ००–३३ | २१–४० | २०–१७ | १५–४७ |
| नागदा | १३–४१ | ०७–२९ | — | २२–३५ | २१–३२ | — |
| कोटा | १९–०२ | १०–४५ | — | ०१–५० | ०२–३० | १९–२२ |
| बयाना | ००–३७ | १४–५२ | — | — | ०७–३३ | — |
| भरतपूर | ०१–२० | १५–४१ | — | ०६–३० | ०८–२० | — |
| मथुरा | ०२–३७ | १६–३७ | — | ०७–५९ | ०९–०८ | — |
| न्यू दिल्ली | ०५–४५ | १९–०३ | ०९–२० | १०–२५ | १२–२६ | ०१–५१ |
| दिल्ली | ०७–०० | १९–३० | — | — | १२–५२ | — |

| DN<br>अमृतसरला येते | | | | | | UP<br>अमृतसरहून सुटते |
|---|---|---|---|---|---|---|
| ३१<br>फ्रन्टीयर | २५<br>पश्चिम<br>एक्सप्रेस<br>मंगळ.गुरु.<br>शुक्र. | ५७<br>दादर<br>अमृतसर<br>रोज | स्टेशन<br>नावे | ५८<br>अमृतसर<br>दादर<br>रोज | २६<br>पश्चिम<br>एक्सप्रेस<br>गुरु.शुक्र.<br>शनि. | ३२<br>फ्रन्टीयर<br>मेल |
| ०७–२० | २१–१५ | १७–५५ | अमृतसर | ०९–३५ | ०६–२५ | २०–५० |
| ०५–२७ | १८–१६ | १६–१० | जालंदर सीटी | १०–५३ | ०७–४२ | २१–५७ |
| ०४–२८ | १७–०३ | १४–३९ | लुधियाना जंक्शन | १२–२३ | ०८–५६ | २३–२२ |
| ०२–३५ | १५–१७ | १२–०३ | अंबाला कॅ. | १५–१० | १०–४५ | ०१–०४ |
| १९–३० | — | — | जुनी दिल्ली | — | — | ०६–३० |
| १९–०३ | १०–२५ | ०६–४० | न्यू दिल्ली | २०–०५ | १४–४५ | ०८–०५ |

**पश्चिम रेल्वे (Western Railway)**

**दिल्लीहून सुटणाऱ्या गाड्या (UP)**

| स्टेशन व नावे | १७२<br>जम्मू-तावी<br>एक्सप्रेस<br>मंगळ.शुक्र. | २४<br>फिरोजपूर<br>जनता | २६<br>पश्चिम<br>एक्सप्रेस | १५२<br>राजधानी<br>एक्सप्रेस | ४<br>फ्रन्टीयर<br>मेल | २०<br>डेहराडून<br>एक्सप्रेस |
|---|---|---|---|---|---|---|
| दिल्ली | — | १२–२२ | — | — | ०६–३० | २०–५५ |
| न्यू दिल्ली | ०२–४१ | १४–०३ | १४–४५ | १६–२० | ०८–०५ | २१–३५ |
| मथुरा | — | १७–१६ | १८–५४ | — | १०–३६ | ०१–०० |

| स्टेशन व नावे | १७२ जम्मू-तावी एक्सप्रेस मंगळ.शुक्र. | २४ फिरोजपूर जनता | २६ पश्चिम एक्सप्रेस | १५२ राजधानी एक्सप्रेस | ४ फ्रन्टीयर | २० डेहराडून एक्सप्रेस |
|---|---|---|---|---|---|---|
| भरतपूर | — | १८–०५ | १९–२६ | — | ११–२० | ०१–३९ |
| बयाना | — | १८–५९ | — | — | ११–५५ | ०२–२३ |
| कोटा | ०९–०८ | ००–३० | ००–१५ | — | १६–०५ | ०७–३० |
| नागदा | — | ०५–४५ | ०४–३४ | — | २०–३३ | १३–२७ |
| रतलाम | १३–१४ | ०६–४० | ०५–१७ | ०१–१७ | २१–१६ | १४–५० |
| गोद्रा | — | ११–०० | ०८–३२ | — | ००–३२ | १९–२८ |
| बडोदा | १७–२० | १२–४५ | ०९–४५ | ०५–१३ | ०१–४५ | २१–२५ |
| अंकलेश्वर | — | १४–२२ | — | — | — | २२–५८ |
| सुरत | १९–२१ | १५–२० | १२–११ | — | ०४–०० | २४–०० |
| बलसाड | — | १६–३५ | १३–१७ | — | — | ०१–२३ |
| बोरीवली | २२–२६ | २०–२० | १५–३९ | — | — | ०४–१४ |
| दादर | २२–५२ | २१–११ | १६–०७ | — | ०७–४६ | ०४–१७ |
| मुंबई सेंट्रल | २३–१० | २१–३० | १६–२५ | १०–२५ | ०८–०५ | ०५–२५ |

अप — हरिद्वारहून मुंबई–दिल्लीकडे —

डाऊन — हरिद्वारहून डेहराडूनकडे

| डेहराडून मुंबई २० | डेहराडून दिल्ली ४२ | हरिद्वार दिल्ली ३७२ | स्टेशन नाव | दिल्ली हरिद्वार ३७१ | दिल्ली डेहराडून ४१ | मुंबई डेहराडून १९ |
|---|---|---|---|---|---|---|
| १२–४८ | २२–२० | ०६–५० | हरिद्वार | ०४–४० | ०६–३४ | १४–२२ |

## –जम्मू विभाग–

| डाऊन<br>जम्मूस येते | | | | | | | | अप<br>जम्मूहून सुटते |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मे ते ऑक्टो.<br>रोज १४५<br>शालीमार<br>नोव्हें.ते एप्रि.<br>रवि.मंगळ.गुरु. | १७७<br>झेलम<br>एक्सप्रेस | ३३<br>काश्मिर<br>मेल<br>फ्रन्टीयर | १७१<br>जम्मूतावी<br>एक्सप्रेस | स्टेशन नावे | १७२<br>जम्मूतावी<br>एक्सप्रेस | ३४<br>काश्मिरी<br>मेल<br>फ्रंटीयर | १७८<br>झेलम<br>एक्सप्रेस | मे ते ऑ.<br>रोज १४६<br>शालीमार<br>नोव्हें.ते ए.<br>रवि.मंगळ.गुरु. |
| ०६–१० | ११–२० | १०–४४ | ११–५५ | जम्मू | १७–२५ | १५–२५ | १९–०० | २०–४० |
| ०३–३२ | ०८–३५ | ०७–४४ | –– | पठाणकोट | –– | १७–५० | २१–११ | २२–५१ |
| ०१–२५ | ०५–५० | ०४–३० | ०८–१३ | जालंदर कँ | २०–५६ | २०–५५ | ००–५५ | ०१–०७ |
| ००–०४ | ०४–३५ | ०३–१७ | ०७–१८ | लुधियाना | २१–४८ | २३–१० | ०२–२१ | ०२–१० |
| २२–०० | ०१–४६ | ००–५१ | ०५–३४ | अम्बाला | २३–३२ | ०१–२० | ०५–५६ | ०४–२९ |
| १६–०० | –– | १९–३० | –– | जुनी दिल्ली | –– | ०५–५० | –– | ११–०० |
| –– | २०–२५ | १९–०३ | ०१–५१ | न्यू दिल्लो | ०२–४१ | ०८–०५ | १०–२२ | –– |

## –चंदिगढ विभाग–

| अप<br>कलकाला येते | | | | | | | | डाऊन<br>कलकाहून सुटते |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कलका<br>हावरा<br>१ अप | शान पंजाब<br>१९५ अप | कलका<br>रांची<br>१८३ अप | मिमला<br>मेल<br>३४ अप | स्टेशन<br>नावे | सिमला<br>मेल<br>३५डा. | कलका<br>रांची<br>१८४ डा. | शान<br>पंजाब<br>१९६ डा. | कलका<br>हावरा<br>२ डा. |
| ०६–०० | ११–०० | २२–५० | ०५–२० | कलका | २२–५५ | ०३–४५ | १५–३० | २३–५० |
| ०४–३७ | १०–०५ | २०–४३ | ०३–५४ | चंदिगढ | २३–४० | ०५–५० | १६–३२ | ००–४० |
| ०३–०० | ०९–१३ | १९–३० | ०२–४२ | अंबाला कँ. | ०१–१२ | ०७–३४ | १७–२८ | ०१–५७ |
| ००–०६ | –– | १७–०८ | अमृतसर-<br>येते | पानीपत | अमृतसरला<br>पोहचते | १०–०५ | –– | ०४–२० |
| १९–३० | –– | –– | –– | दिल्ली | ०७–२० | –– | –– | ०६–३० |
| –– | ०६–१५ | १३–३५ | –– | न्यू दिल्ली | –– | ११–४२ | २०–२५ | –– |

## –सिमला विभाग–

| सिमला/अप | | डाऊन/कलका | |
|---|---|---|---|
| कलका पोहोचते | सिमल्याहून निघते | कलक्याहून निघते | सिमला पोहोचते |
| १४–४५ | ०९–१५ | ०३–२० | ०९–०५ |
| १५–३० | १०–५० | ०६–३५ | ११–१५ |
| १८–४० | १२–१५ | ०७–१० | १२–४५ |
| २०–१५ | १४–४० | ०८–२० | १४–३५ |
| २०–४५ | १६–१० | ११–२० | १५–५५ |
| २३–०५ | १७–४५ | ११–५० | १७–३० |

## –डेहराडून विभाग–

| डाऊन डेहराडूनला येते | | अप डेहराडूनहून सुटते |
|---|---|---|
| १९ डेहराडून एक्सप्रेस | स्टेशन | २० डेहराडून एक्सप्रेस |
| १६–४० | डेहराडून | ११–२० |
| १४–२२ | हरिद्वार | १२–४८ |
| १३–१० | लक्शर | १४–२० |
| ०५–४५ | न्यू दिल्ली | ११–३५ |

## –डेहराडून ते हरिद्वार–

| हरिद्वार पोहचते | डेहराडूनहून सुटते | गाडीचे नाव | हरिद्वारहून सुटते | डेहराडूनला पोहचते. |
|---|---|---|---|---|
| ०९–२१ | ०७–०५ | दिल्ली पॅसेंजर | १७–५५ | २०–४० |
| १६–५८ | १५–२० | डेह. अमृतसर पॅसेंजर | ०९–५० | १२–४५ |
| २२–२० | २०–५० | मसुरी एक्सप्रेस | ०६–३४ | ०८–५० |
| १९–३० | १७–५० | डेह. हावरा जनता | १०–४५ | १३–३५ |
| २१–४० | १९–५५ | डून एक्सप्रेस (हावडा) | ०५–३१ | ०८–०० |

## —विमान वेळापत्रक—

| | सुटते | पोहचते | |
|---|---|---|---|
| आग्रा ते दिल्ली— | १६–१० | १६–४० | (दररोज) |
| | १८–५५ | १९–४० | (मंगळ. गुरु. शनि. रवि.) |
| दिल्ली ते आग्रा— | ७–३० | ८–०० | (दररोज) |
| | १२–३० | १३–१५ | (मंगळ. गुरु. शनि. रवि.) |

---

मुंबई ते दिल्ली— ६–२० ९–३० १७–०० २०–३० दररोज

दिल्ली ते मुंबई— ६–५० ९–१० १७–३० २०–४० दररोज

दिल्ली ते श्रीनगर—

१) ६–२५ व्हाया चंदिगढ जम्मू (मंगळ. बुध. शुक्र. शनि. रवि.)

२) ११–३० डायरेक्ट (दररोज)

३) ११–४० व्हाया अमृतसर (मंगळ. बुध. शुक्र. शनि. रवि.)

४) ११–४० व्हाया अमृतसर जम्मू (सोम. गुरु.)

५) १३–३० डायरेक्ट (मंगळ. गुरु. शनि. रवि.)

श्रीनगर ते दिल्ली—

१) १२–४० व्हाया अमृतसर (मंगळ. बुध. शुक्र. शनि. रवि.)

२) १३–३५ डायरेक्ट (दररोज.)

३) १४–३० व्हाया जम्मू चंदिगढ (मंगळ. बुध. शुक्र. शनि. रवि.)

४) १५–०० व्हाया जम्मू अमृतसर (सोम. बुध.)

५) १५–२० डायरेक्ट (मंगळ. गुरु. शनि. रवि.)

वेळ:–१) मुंबई ते दिल्ली–१ तास ५० मिनिटे ९४६।– रु.

२) दिल्ली ते श्रीनगर–१ तास १५ मिनिटे ६३१।– रु.

३) जम्मू ते श्रीनगर–फक्त ३० मिनिटे २१०।– रु.

४) मुंबई ते श्रीनगर–(दिल्ली ब्रेक जर्नी) १५७७।– रु.

## –विमान–

### –महत्त्वाचे टेलीफोन नंबर–

| गाव | | सामान्य माहितीसाठी | रिझर्व्हेशन बाबत | विमान येणे व सुटणेबाबत |
|---|---|---|---|---|
| दिल्ली | गाव | ३३१००८४ | ३३१००७१ | — |
| | | ३३१००८५ | ३३१००५२ | |
| | | ३३१००८६ | (२४ तास) | — |
| | | सकाळी ८ ते रात्रौ ९ पर्यंत | | |
| | हवाईअड्डा | ३९३५४४ | | ३९३५४४ |
| | | ३९३५४५ | | ३९३५४५ |
| | | ३९३५४६ | | ३९३५४६ |
| | | ३९३५४७ | | ३९३५४७ |
| मुंबई | गाव | २०२३१३१ | २०२३०३१ | |
| | | | २०२७१५४ | |
| | हवाईअड्डा | ६१२९५३४ | ––– | ६१२६३४३ |
| | | | | ६१२६३४४ |
| | | | | ६१२६३४५ |

भू प्रवास ९६० २४५८९ ११।१।८६